
# चाणक्याविषयी नवीन काही...

## जैन साहित्यात चाणक्याचा शोध

डॉ. नलिनी जोशी



# चाणक्याविषयी नवीन काही...

## (जैन साहित्यात चाणक्याचा शोध)

लेखन आणि संपादन
डॉ. नलिनी जोशी

सन्मति-तीर्थ
जैनविद्या अध्यापन एवं संशोधन संस्था
फिरोदिया होस्टेल
८४४, शिवाजीनगर,
बी.एम्.सी.सी. रोड
पुणे ४११००४

जुलै २०१५

**चाणक्याविषयी नवीन काही...**

**(जैन साहित्यात चाणक्याचा शोध)**


- **लेखन आणि संपादन**

  **डॉ. नलिनी जोशी**

- **लेखन–सहयोग**

  डॉ. कौमुदी बलदोटा

  डॉ. अनीता बोथरा

- **प्रकाशक :**

  **सन्मति–तीर्थ प्रकाशन**

  जैनविद्या अध्यापन एवं संशोधन संस्था

  फिरोदिया होस्टेल, ८४४, शिवाजीनगर,

  बी.एम्.सी.सी. रोड, पुणे ४११००४


- **सर्व अधिकार सुरक्षित**


- **प्रकाशन : जुलै** २०१५

- **प्रती :** ५००

- **मूल्य :** ४००/-

- **अक्षर जुळणी :** श्री. अजय जोशी

- **मुद्रक :** कल्याणी कॉर्पोरेशन,

  १४६४, सदाशिव पेठ,

  पुणे – ४११०३०



ज्यांच्या वयातली आणि कौटुंबिक भूमिकांमधली अनेक स्थित्यंतरे मी गेली तीन दशके न्याहाळत आले आणि

ज्यांनी माझ्या समवेत प्राकृत भाषा आणि जैन तत्त्वज्ञानातील अनेक सौंदर्यस्थळे आणि तथ्ये यांचा बौद्धिक आनंद मनसोक्त लुटला

त्या माझ्या सर्व प्रौढ विद्यार्थ्यांना

मन:पूर्वक अर्पण !!!

**नलिनी जोशी**

# चाणक्याविषयी नवीन काही...

## (जैन साहित्यात चाणक्याचा शोध)

## अनुक्रमणिका


| क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | **भूमिका** | १ |
| २) | **प्रकरण १** | ११ |
| | ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि कौटिलीय अर्थशास्त्र | |
| ३) | **प्रकरण २** | २९ |
| | ब्राह्मण परंपरेतील चाणक्य | |
| ४) | **प्रकरण ३** | ६१ |
| | चाणक्याची समग्र जीवनकथा | |
| ५) | **प्रकरण ४** | |
| | **कथाबाह्य संदर्भ** | |
| | अ) कथाभागापेक्षा वेगळे श्वेतांबर संदर्भ व त्यावरील भाष्य | १३२ |
| | ब) कथाभागापेक्षा वेगळे दिगंबर संदर्भ व त्यावरील भाष्य | १९१ |
| ६) | **प्रकरण ५** | |
| | अर्थशास्त्राच्या गवाक्षातून जैन साहित्य | |
| | अ) जैन साहित्यिकांनी अर्थशास्त्रातून घेतलेली कथाबीजे | २१४ |
| | ब) अर्धमागधी आगमग्रंथ आणि अर्थशास्त्र यातील सामाजिक सांस्कृतिक साम्यस्थळे | २२८ |
| | क) जैन आचारसंहिता आणि अर्थशास्त्रातील समान पारिभाषिक शब्द | २४२ |
| | ड) जैन आचारनियमांची अर्थशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात मीमांसा | २५४ |
| | (१) जैन श्रावकाचार आणि कौटिलीय अर्थशास्त्र | |
| | (२) जैन साधुआचार आणि कौटिलीय अर्थशास्त्र | |
| ७) | **उपसंहार** | २७९ |
| | **संदर्भ-ग्रंथ-सूची** | २९७ |

# भूमिका

# भूमिका

भांडारकर प्राच्यविद्या संस्थेत प्राकृत-इंग्रजी महाशब्दकोशाचे काम करत असताना आरंभीच्या पाच वर्षात, विविध प्रकारच्या प्राकृत भाषांत लिहिलेल्या ग्रंथांतून सुमारे पाच लाख शब्दपट्टिका तयार करून, त्यांची अकारानुक्रमे वर्गवारी केली. कोशात काम करणाऱ्या अभ्यासकांच्या चमूने, हे प्रचंड काम पहिल्या पाच वर्षात बरेच पूर्णत्वास नेले. त्यानंतर त्या शब्दपट्टिका अर्थासहित पूर्ण करण्याचे काम चालू झाले. त्यावेळी 'कोडल्ल', 'कोडिल्ल', 'कोडल्लय', 'चाणक्क', 'चाणिक्क' अशा शब्दपट्टिका लक्षणीय प्रमाणात दिसून आल्या. आश्चर्य म्हणजे त्या प्राय: सर्वच्या सर्व, जैनांनी लिहिलेल्या प्राकृत ग्रंथांतील होत्या. ''जैन साहित्यात चाणक्याचा शोध घेतला पाहिजे''— अशी खूणगाठ त्याच वेळी मनात बांधली.

कित्येक वर्षे हे विचारांचे बीज सुप्तावस्थेत तसेच मनात पडून राहिले. अंदाजे जुलै २०१० ला चाणक्यविषयक प्रकल्पाची रूपरेषा आखली. जैन ग्रंथांचा जसजसा

आढावा घेऊ लागलो, तसतशी एक गोष्ट प्रामुख्याने नजरेसमोर आली. इसवी सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकापासून ते पंधरा-सोळाव्या शतकापर्यंत लिहिल्या गेलेल्या जैन ग्रंथात चाणक्य आणि कौटिल्य यांचे संदर्भ वाढत्या संख्येने नव्याने सापडत गेले. भांडारकर संस्थेचे समृद्ध ग्रंथालय यासाठी अतिशय उपयुक्त ठरले. सर्व जैन संदर्भांची छाननी केल्यावर पुढील गोष्टी नजरेत भरल्या –

- श्वेतांबर साहित्यात, एका शब्दात केलेल्या उल्लेखापासून हेमचंद्रांनी 'परिशिष्ट-पर्वातील' आठव्या सर्गात २७१ संस्कृत श्लोकात लिहिलेल्या समग्र चाणक्य-चरित्रापर्यंत कमीअधिक लांबीचे वेगवेगळे कथाभाग दिसून आले. या संदर्भांची संख्या सुमारे ४५ इतकी लक्षणीय होती.
- दिगंबर परंपरेत 'भगवती आराधनेसारख्या' प्राचीन आणि विश्रुत ग्रंथात चाणक्याच्या पादपोपगमनापासून आरंभ करून थेट अपभ्रंशातील संक्षिप्त चरित्रापर्यंत सुमारे १५ उल्लेख आढळून आले. दिगंबरांचा सर्वात लक्षणीय संस्कृत ग्रंथ जो 'बृहत्कथाकोष', त्यामध्ये हरिषेणाची ८५ संस्कृत श्लोकात बद्ध असलेली 'चाणक्यमुनिकथा' सर्वात लक्षवेधक ठरली. कारण आठव्या शतकानंतरच्या दिगंबर साहित्यावर तिचाच प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून आला.
- सर्व श्वेतांबर आणि दिगंबर उल्लेख एकत्रितपणे ध्यानात घेतल्यावर असे दृष्टोत्पत्तीस आले की, चाणक्यविषयक जैन उल्लेख हे इसवी सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकापासून पंधरा-सोळाव्या शतकापर्यंत पसरलेले आहेत. संशोधनाची शिस्त लक्षात घेऊन, या सर्व संदर्भांची शतकानुसार पुनर्रचना करून, त्यांची काळजीपूर्वक छाननी केल्यावरच जैनांनी जपलेल्या चाणक्याचे यथार्थ चित्र नजरेसमोर येईल – – ही गोष्ट ध्यानात आली.

- जैनांचे साहित्य अभ्यासताना नेहमीच त्यातील समकालीन बहुभाषिकता लक्षात घ्यावी लागते. त्या भाषांचा संदर्भ अर्थातच काळाशी जोडलेला आहे. सर्वात प्राचीन 'अर्धमागधी' ग्रंथात चाणक्यविषयक उल्लेख आढळले नाहीत. मात्र उपलब्ध दिगंबर साहित्यातील सर्वात प्राचीन प्राकृत भाषा जी 'जैन शौरसेनी' त्यामध्ये चाणक्याचे उल्लेख दिसतात. संख्येने आणि गुणवत्तेने महत्त्वाचे असलेले उल्लेख 'जैन महाराष्ट्री' भाषेत भाष्य, चूर्णी आणि टीका या श्वेतांबरीय ग्रंथात विशेषत्वाने दिसून येतात.

श्वेतांबर व दिगंबर दोघांनीही काळाला अनुसरून यथोचितपणे संस्कृत साहित्याची निर्मिती केलेली दिसते. त्यानुसार आठव्या शतकात 'हरिषेण' आणि बाराव्या शतकात 'हेमचंद्र' या प्रख्यात जैन आचार्यांनी आपापल्या परंपरेतील चाणक्याचे यथार्थ चित्र त्यांच्या संस्कृत ग्रंथात शब्दबद्ध केले.

दहाव्या-अकराव्या शतकानंतर दिगंबर परंपरेत अपभ्रंश भाषेतील 'कथानुयोग' साहित्यास खूप बहर आला. त्यामुळे 'चरिउ' या शीर्षकाखाली लिहिलेल्या अनेक चरितग्रंथात, काही कथाभागांच्या रूपाने चाणक्याचा वृत्तांतही ग्रथित झाला.

सारांश काय तर भाषिक दृष्ट्या चाणक्याचे संदर्भ जैन शौरसेनी, जैन महाराष्ट्री, संस्कृत आणि अपभ्रंश या चारही भाषांतून जागोजागी विखुरलेले दिसून येतात.

- चाणक्याची रूढ नावे तीन आहेत 'चाणक्य', 'कौटिल्य' आणि 'विष्णुगुप्त'. जैन लेखकांनी सर्वाधिक पसंत केलेले नाव 'चाणक्य' आहे. त्याखालोखाल पसंती 'कौटिल्य' या नावाला आहे. अर्थशास्त्राचा उल्लेख 'कौटिल्यकशास्त्र' असा अनेकदा येतो. त्यामानाने ब्राह्मणत्वाची छाप अधोरेखित करणारे 'विष्णुगुप्त'

हे नाव, केवळ एक-दोनदाच उपयोजित केलेले दिसते. कौटिलीय अर्थशास्त्राचे जगभरातील अभ्यासक नेहमीच हा विवाद उपस्थित करत आले आहेत की, 'या तीनही व्यक्ती खरोखर एक आहेत की भिन्न ?' हेमचंद्रांनी समानार्थक नावांच्या यादीत ही तीनही नावे देऊन, किमान जैनांच्या दृष्टीने तरी या विवादाला पूर्णविराम दिलेला दिसतो.

सर्व जैन उल्लेखांचा आढावा घेतल्यावर चाणक्य पुढील संदर्भात नजरेसमोर आला. त्याचे संमिश्र चित्र खालीलप्रमाणे मन:पटलावर उमटले.

- मगधाच्या प्राचीन इतिहासाच्या संदर्भात -
- पाटलिपुत्रातील तीव्र दुर्भिक्षाच्या संदर्भात -
- जैन आगमांच्या वाचनेच्या संदर्भात -
- त्रोटक उल्लेख, प्रसंग आणि समग्र चरित्राच्या स्वरूपात -
- चतुर्विध बुद्धींपैकी मुख्यत: 'पारिणामिकी' आणि क्वचित् 'वैनयिकीच्या' उदाहरणाच्या स्वरूपात -
- आदर्श मृत्यूचे उदाहरण म्हणून -
- आदर्श गुरु-शिष्याचे उदाहरण म्हणून -
- अर्थशास्त्राच्या कर्तृत्वाच्या संदर्भात -
- राजनीतिविषयक ग्रंथांच्या परंपरेत -
- बिंबांतरित राजाच्या रूपाने -
- आज्ञाभंग करणाऱ्यांचा कठोर शासक म्हणून -
- साम-दान-दंड-भेदाने शत्रूंचा नि:पात करणारा -
- सर्व पाषंडांविषयी कठोर वर्तनाचा -

- राजकोश भरण्यासाठी अनेक युक्त्या योजणारा –
- राजाच्या कर्तव्यांची आचारावली तयार करणारा –
- सामान्य नागरिक गृहस्थांच्या वर्तनाला शिस्त लावणारा –
- धर्म–अर्थ–काम या तीनच पुरुषार्थांना अग्रभागी ठेवणारा –
- साधु–आचारातील नियम–उपनियमांना प्रभावित करणारा –
- वेळप्रसंगी दूरदर्शित्वाचे आणि दीर्घद्वेषाचे दर्शन घडविणारा –
- मनुष्यस्वभावाची विलक्षण पारख असलेला –
- राजहिततत्पर अमात्याचा ठसा उमटवणारा –
- वेळप्रसंगी अहिंसेला पूर्ण दूर ठेवून, राज्यहितार्थ अनेकांना प्राणांतिक दंड देणारा –
- स्वत्वाला ठेच लागल्यावर पेटून उठणारा –
- अंगभूत विवेक, समयसूचकता आणि अनासक्तीमुळे तत्काळ निवृत्तीचा निर्णय घेणारा –
- मंत्र–तंत्र, योगसिद्धी, क्षेत्र–वास्तु–देवतांच्या अद्भुत शक्ती, जादूटोणा इ. अनेक गोष्टींचे अस्तित्व मानणारा –
- आणि त्यावरील तोडग्यांवर निपुण असणारा –

जैन साहित्याने चाणक्याच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकून, त्याचे जे दर्शन घडविले आहे, ते खरोखरच स्तिमित करणारे आहे. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट ही आहे की, जैन संदर्भातील जवळजवळ ९० ते ९५ टक्के संदर्भ हे निखालसपणे गौरवोद्गार आहेत. केवळ ५ टक्केच संदर्भ चाणक्यावर टीकात्मक–टिप्पणी करतात.

## या विषयाच्या चिकित्सेत का शिरावेसे वाटले ?

जैन साहित्यातील चाणक्यविषयक संदर्भांचा आढावा घेतल्यावर, साहजिकच अभिजात मराठीतील चाणक्याकडे वळावेसे वाटले. इतिहास, दंतकथा आणि प्रतिभाविलास यांचे सुयोग्य मिश्रण करून लिहिलेल्या दोन ललित कादंबऱ्या मराठीत आढळल्या. डॉ.रा.चिं.ढेरे यांची 'नृपनिर्माता चाणक्य' आणि श्री. वसंत पटवर्धन यांची 'आर्य'. दुर्दैवाने खूप शोध घेऊनही 'नृपनिर्माता चाणक्य' कादंबरी मिळू शकली नाही. 'भारतीय संस्कृतिकोशा'तील 'कौटिल्य' या विषयाखालील माहिती मुख्यत: 'नृपनिर्माता चाणक्य' या पुस्तकाच्या आधारे लिहिलेली दिसून आली. त्यात 'मुद्राराक्षस' नाटकातला चाणक्याच्या पर्णकुटीचा संदर्भही जणू वस्तुस्थिती असल्यासारखा वर्णिलेला दिसला. इसवीसनपूर्व चौथ्या शतकातील मगधाचा इतिहास अभ्यासून; ग्रीक आणि चीनी प्रवाशांच्या वर्णनाची जोड देऊन; बृहत्कथासरित्सागर, बृहत्कथामंजरी आणि विविध हिंदू पुराणांमधील हकिगती नजरेखालून घालून ; इतरही मौखिक परंपरेने चालत आलेल्या दंतकथा ध्यानी घेऊन; मुख्यत: आज उपलब्ध असलेल्या कौटिलीय अर्थशास्त्रातील बारकाव्यांमध्ये दिसणारी चाणक्याची वैशिष्ट्ये शोधून; विशाखदत्ताच्या 'मुद्राराक्षस' नाटकातील कथावस्तू, संवाद, श्लोक आणि व्यक्तिचित्रणे आधाराला घेऊन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कल्पनारम्यतेच्या सृष्टीत शिरून आपल्या अजोड प्रतिभेच्या सहाय्याने उपरोक्त कादंबरीकारांनी तसेच कौटिल्य ऊर्फ चाणक्याच्या दूरदर्शनवरील मालिकेतही वरील सर्व अंश अतिशय कल्पकतेने वापरलेले दिसतात.

या सर्व प्रयत्नांविषयी पूर्ण आदरभाव ठेवूनही असे म्हणावेसे वाटते की जैन साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या चाणक्यकथांची आणि वैविध्यपूर्ण संदर्भांची जोड

त्याला मिळाली असती तर ‘दुग्धशर्करा’ किंवा ‘मणिकांचन’ योगापेक्षाही आकर्षक संयोग घडून आला असता.

कौटिलीय अर्थशास्त्राची ब.रा.हिवरगावकर–करंदीकर–दुर्गा भागवत या त्रयीने तयार केलेली जी मराठी अनुवादसहित आवृत्ती आहे, त्यातील या तिघांच्या प्रस्तावना अतिविस्तृत आणि व्यासंगदर्शी आहेत. तथापि त्यातील हिवरगावकर–दुर्गा भागवत यांनी काढलेल्या अनेक उद्गारांनी आश्चर्यचकित होण्याची पाळी माझ्यावर आली.

हिवरगावकर म्हणतात, ‘‘ब्राह्मण, बौद्ध आणि जैन परंपरांमधील साहित्यात नि:संदिग्धपणे नमूद केले आहे की कौटिल्य हा सम्राट चन्द्रगुप्ताचा अमात्य होता. त्यापैकी बौद्ध आणि जैन साहित्यात चाणक्याविषयी निंदात्मक उल्लेख असून ब्राह्मण परंपरेत त्याच्याविषयीचा आदरभाव दिसून येतो.’’ पुढे ते याची कारणमीमांसा देताना म्हणतात, ‘‘चाणक्य स्वत: ब्राह्मण (आर्य, श्रोत्रिय) असल्याने आणि पाखंड्यांविषयी त्याचे धोरण अतिशय कडक असल्याने बौद्ध–जैन ग्रंथांत त्याची निंदा केली आहे तर ब्राह्मणसाहित्यात त्याची स्तुती दिसते.’’ हिवरगावकरांच्या पाहण्यात आलेल्या (तेही बहुधा सांगोवांगी) नंदीसूत्राचा हवाला देऊन ते म्हणतात, ‘‘जैनांच्या नंदीसूत्र ग्रंथात चाणक्याच्या कुटिलनीतिशास्त्राची गणना मिथ्याश्रुतात केली आहे.’’ (हिवरगावकर, प्रस्ता.पृ.४; पृ.२२) तरी बरे, हिवरगावकरांनी तत्कालीन राज्यपद्धतींचे विवेचन करताना जैनांच्या आचारांगसूत्रातील ‘राजशाही, गणराज्य, द्विराज्य आणि अराज्य’ या पदावलींचा तरी योग्य अर्थ लावला आहे.

दुर्गाबाई भागवतांनी अर्थशास्त्रातील काही संदर्भांची बौद्ध साहित्याच्या परिप्रेक्ष्यात मीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु जैन संदर्भांविषयी त्यांनी एकही वाक्य लिहिलेले नाही.

विशाखदत्ताच्या ‘मुद्राराक्षस’ नाटकाच्या आवृत्तीत, सुप्रसिद्ध संस्कृतज्ज्ञ आणि प्राच्यविद्यातज्ज्ञ डॉ.आर्.डी.करमरकर यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली आहे. मुद्राराक्षसाचे मूलस्रोत शोधताना त्यांनी ‘बौद्ध आणि जैन मूलस्रोतां’चा विचार केला आहे. त्यात त्यांनी बौद्धांच्या ४-५ किरकोळ उल्लेखांचा निर्देश केला आहे. तथापि जैन साहित्यातील एकही आधारभूत संदर्भ न पाहता आणि तपासता, बौद्ध उल्लेखांनाच जैन उल्लेख म्हटले आहे. (करमरकर, प्रस्ता.पृ.१३-१४)

गेल्या पिढीतल्या प्राच्यविद्याविशारदांची आणि भारतीय-विद्या-तज्ज्ञांची एक विशिष्ट विचारपद्धती ठरून गेलेली दिसते. ‘ब्राह्मणपरंपरेबरोबरच श्रमणपरंपरेतील विचारांची दखल घेतली पाहिजे’-याची जाणीव त्यांना दिसते परंतु श्रमणपरंपरेचा उल्लेख ते नेहमीच ‘बौद्ध आणि जैन’ असा करतात. वस्तुत: प्राचीनतेच्या दृष्टीने तो ‘जैन आणि बौद्ध’- असा असणे आवश्यक आहे. ‘जे जे बौद्धांनी म्हटले आहे ते ते जैनांनी म्हटलेले आहेच’-या मानसिक गृहीतकृत्यावर त्यांचे तर्क प्राय: आधारलेले दिसतात. ‘जैनांची मते, स्पष्टीकरणे, वैचारिक चौकट वेगळी असू शकते’-हे तथ्य ते मान्य करीत नाहीत. गेल्या दोन दशकांमध्ये जगभरातील विद्यापीठांत जैनविद्येचा अभ्यास अधिक मौलिकपणे सुरू झाला आहे. तो धागा धरून, जैनांच्या प्राकृत-संस्कृत ग्रंथांची दखल अधिक अर्थपूर्णतेने घेण्याचे उपक्रम सुरू झाले आहेत.

‘चाणक्याविषयी नवीन काही...’ हे प्रस्तुत पुस्तक त्या साखळीतील एक दुवा मानण्यास काहीच हरकत नाही. चाणक्याविषयीचे जवळजवळ ७० मूलगामी जैन संदर्भ शोधून, अनुवादित करून आणि त्यांची सांगोपांग विस्तृत समीक्षा करून हे पुस्तक परिश्रमपूर्वक तयार केले आहे.

‘जैनांचा चाणक्याशी संबंध काय?’;

'जैन कशाला चाणक्याला जपतील ?';

'साधुवर्गाविषयी कडक धोरण राबवणाऱ्या आर्य-श्रोत्रिय-वेदविद्यापारंगत चाणक्याविषयी जैन आचार्य कसे बरे गौरवोद्गार काढतील?';

''मोक्षलक्ष्यी जैन परंपरा 'अर्थमूलौ धर्मकामौ' अशा दृष्टिकोणाच्या 'कुटिलमति कौटिल्या'ची का दखल घेईल ?''-या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे, वाचकांना या पुस्तकातून आपोआप मिळतील.

केवळ जैनांनी चित्रित केलेला चाणक्य मांडून हे पुस्तक थांबणार नाही तर ब्राह्मण (हिंदू) साहित्यात प्रतिबिंबित असलेल्या चाणक्याची येथे चिकित्सा दिसेल. भारताचा प्रमाणित इतिहास मगधापासून सुरू होत असल्यामुळे मागध-साहित्यातील कौटिलीय अर्थशास्त्राचे स्थानही येथे चर्चिले जाईल. कौटिलीय अर्थशास्त्राच्या परंपरेतील सोमदेवकृत नीतिवाक्यामृताचा परामर्शही येथे घेतलेला दिसेल-जो एका प्रतिभावान जैन ग्रंथकाराने लिहिलेला आहे. 'चाणक्यावर प्रकाश टाकणारे एक अप्रतिम राजनैतिक नाटक'-अशी ज्या मुद्राराक्षसाची ख्याती आहे, त्यातील जैन धागेदोरे पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. 'कौटिलीय अर्थशास्त्र' हा ग्रंथ राजनीतिविषयक प्राचीन भारतीय विचारांचा मुकुटमणी मानला जातो. अर्थशास्त्राच्या गवाक्षातून समग्र जैन साहित्याकडे नजर टाकून नोंदविलेली निरीक्षणे या पुस्तकाच्या स्वतंत्र प्रकरणात असतील.

'जैनविद्येच्या तेजस्वी लोलकातून परावर्तित झालेले काही नवे किरण या पुस्तकातून वाचकांसमोर येतील'-अशा आशेसह ही भूमिका पूर्ण करते.

◆◆◆

## प्रकरण १

# ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि कौटिलीय अर्थशास्त्र

## प्रकरण १

# ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि कौटिलीय अर्थशास्त्र

**प्राचीन भारताचा प्रमाणित इतिहास :**

प्राचीन भारताचा इतिहास, प्राचीन भारतीय साहित्याच्या आधारे लिहिण्याचे प्रयत्न इतिहासकारांनी केलेले दिसतात. त्यासाठी मुख्यत: ऋग्वेदापासून प्रारंभ केला जातो. त्यानंतर वेदांगे, रामायण, महाभारत आणि षड्दर्शने यातून प्रतिबिंबित झालेल्या ऐतिहासिक अंशांची दखल घेतलेली दिसते. विशेषत: महाभारताला ऐतिहासिक काव्याचा दर्जा दिलेला आढळतो. तरीही प्रामुख्याने विश्वनिर्मिती, युगांचा क्रम आणि प्राचीन राजवंशांच्या वंशावळी देणारी मुख्य पुराणे, यांचा आधार इतिहासलेखनासाठी घेतलेला दिसतो. पुराणांमध्ये अनेकदा भविष्यकाळात

घडणाऱ्या घटनांचेही सूचन केलेले दिसते. साहित्याच्या आधारे इतिहासाची पुनर्रचना करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी, कल्पनाविलासाची जोड असल्यामुळे तसेच ब्राह्मणांनी तो पक्षपातीपणे लिहिलेला असल्यामुळे त्याची प्रामाणिकता, नि:संदिग्धपणे मान्य करता येत नाही. खऱ्या अर्थाने प्राचीन भारताच्या इतिहासाची पुनर्रचना अलेक्झांडरने भारतावर केलेल्या स्वारीपासून अधिक तर्कनिष्ठतेने करता येते. भारतीय विद्येच्या अभ्यासकांनी मगध प्रदेशाची प्राचीनता, ऋग्वेदापासून दाखविण्याचे प्रयास केलेले आहेत. ऋग्वेदकाळात हा प्रदेश 'कीकट' या नावाने ओळखला जात होता. वर्णव्यवस्थेला आणि यज्ञसंस्थेला महत्त्व न देणाऱ्या आणि तपस्येने आध्यात्मिक उन्नती करू पाहणाऱ्या, काही विशिष्ट ब्राह्मण आणि क्षत्रियांचा संदर्भ कीकट ऊर्फ मगध प्रदेशाशीच निगडित आहे. जैन, बौद्ध आणि हिंदू पुराणकारांनी तेथील शिशुनाग, नंद आणि मौर्यवंशाचे केलेले वर्णनही प्रमाणित मानण्यात येते.

**ह्युएन त्संगचे प्रवास–वृत्तांत :**

'ह्युएन त्संग' (युआन च्वांग) या चिनी प्रवाशाने इसवी सनाच्या ६२९ च्या सुमारास, बौद्धधर्माच्या अभ्यासासाठी भारताला भेट दिली. त्याच्या प्रवासवर्णनात त्याने मौर्य साम्राज्याचे चित्रण केले. विशेषत: चंद्रगुप्त मौर्य या सम्राटाचा त्याने उल्लेख केलेला दिसतो. विशेष गोष्ट अशी की, त्याने सम्राट चंद्रगुप्ताच्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या अमात्याचा अर्थात् चाणक्य ऊर्फ कौटिल्याचा, मात्र उल्लेख केलेला नाही. ह्युएन त्संगच्या प्रवास वर्णनाचा जेव्हा अनुवाद करण्यात आला, तेव्हा भारतीय इतिहासकारांनी तो अतिशय काळजीपूर्वक वाचला आणि पचवला. त्याआधारे त्यांना चाणक्याची ऐतिहासिकता सिद्ध करता न आल्यामुळे असा प्रवाद प्रचलित झाला की, जणू काही चाणक्य ऊर्फ

कौटिल्य नावाची कोणी व्यक्ती अस्तित्वातच नव्हती. चाणक्याच्या दंतकथा मौखिक परंपरेने चालत आलेल्या होत्या. कथासरित्सागर व काही पुराणे यातही काही दंतकथा लिखित स्वरूपात अस्तित्वात होत्या तरी चाणक्याच्या खऱ्याखुऱ्या अस्तित्वाविषयी इतिहासकारांना संदेहच होता.

**कौटिलीय अर्थशास्त्राच्या हस्तलिखिताचा शोध :**

इसवी सन १९०९ साली श्यामशास्त्रींना 'त्रावणकोर' येथे कौटिलीय अर्थशास्त्राचे 'तमिळ लिपीतील हस्तलिखित' सापडले. या ग्रंथाचे ते पहिलेच हस्तलिखित होते. श्यामशास्त्रींनी ते त्याच वर्षी प्रकाशित केले. कौटिलीय अर्थशास्त्राच्या हस्तलिखिताचा लागलेला शोध हा, प्राचीन भारतीय इतिहासाच्या दृष्टीने ह्युएन त्संगच्या प्रवासवर्णनापेक्षाही कितीतरी अधिक महत्त्वाचा ठरला. श्यामशास्त्रींची आवृत्ती प्रसिद्ध झाल्याबरोबर साऱ्या जगाचे लक्ष त्याकडे वेधले गेले. 'कौटिल्यन् स्टडीज्' नावाची एक स्वतंत्र विद्याशाखाच अस्तित्वात आली. श्यामशास्त्री, टी. गणपतिशास्त्री, डॉ. यॉली मेयर, डॉ. विन्टरनिट्झ, फादर झिमरमन, बी.आर्.हिवरगावकर, डॉ.आर्.पी.कंगले, डॉ.डी.आर्.भांडारकर —हे प्रामुख्याने या नव्याने उदयाला आलेल्या विद्याशाखेचे अग्रदूत बनले. यॉली आणि विन्टरनिट्झ यांनी असा दावा केला की, कौटिलीय अर्थशास्त्र हे सम्राट चंद्रगुप्ताचा अमात्य असलेल्या कौटिल्याने लिहिलेलेच नाही. त्यांच्या मते कौटिल्य ही एक काल्पनिक व्यक्तिरेखा असून, तो काही खराखुरा राजनीतिज्ञ नव्हता. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात कोणीतरी परंपरेने चालत असलेल्या राजनैतिक विचारांचा संग्रह केला आणि 'कौटिल्य' या टोपणनावाने तो लिहून काढला. तरीही डॉ. यॉली असे मान्य करतात की कौटिल्य नावाच्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या अमात्याविषयीच्या, काही अद्भुत हकिगती मात्र दंतकथांच्या रूपाने तोंडी प्रसिद्ध होत्या.

वरील निष्कर्ष यॉली प्रभृतींनी ज्याच्या आधारे काढला, ते होते मेगॅस्थेनिस नावाच्या ग्रीक प्रवाश्याचे वृत्तांत ! हा ग्रीक प्रवासी पाटलिपुत्रातील सम्राट चंद्रगुप्ताच्या दरबारात, दूत म्हणून राहिलेला होता. त्यानेही आपल्या प्रवासवृत्तांतात कौटिल्य अथवा चाणक्याचा उल्लेख न केल्यामुळे, उपरोक्त अभ्यासकांनी कौटिल्याला काल्पनिक व्यक्ती मानले. कंगले, हिवरगावकर आणि भांडारकर यांच्यासारख्या अभ्यासकांनी वरील मताची, खूप चिकित्सा आणि समीक्षा केली. तो संपूर्ण वाद, चर्चा, पुरावे विस्ताराने देण्याचे हे ठिकाण नव्हे. सारांशरूपाने असे म्हणता येईल की, अंतिमत: भारतीय अभ्यासक हे सिद्ध करण्यात यशस्वी ठरले की, आज उपलब्ध असलेल्या 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथाचा मुख्य गाभा, इसवीसनपूर्व चौथ्या शतकात होऊन गेलेल्या 'कौटिल्य' ऊर्फ 'चाणक्य' ऊर्फ 'विष्णुगुप्त' यानेच लिहिलेला आहे.

मेगॅस्थेनिसच्या प्रवासवृत्तांतात कौटिल्य आणि त्याचे अर्थशास्त्र यांचा उल्लेख नसण्याची अनेक कारणे देता येतात. मुख्य म्हणजे त्याचे प्रवासवृत्तांत सलग स्वरूपात उपलब्ध नाहीत. त्रुटित स्वरूपात उपलब्ध असलेल्या या वृत्तांतातील अनेक भाग अस्पष्ट, प्रक्षिप्त, संक्षिप्त आणि विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध आहेत. अशा ललितलेखनाला, ऐतिहासिक लेखन मानता येत नाही. शिवाय अनेकदा ते अपुऱ्या माहितीवर आधारलेले आहे. डॉ. श्वानबेक यांनी लिहिलेल्या 'मेगॅस्थेनिका इंडिका' या ग्रंथात ते म्हणतात की, ''हे वृत्तांत काही प्रमाणात प्रत्यक्ष वर्णनावर आधारित असले तरी, अनेकदा त्यामध्ये दुय्यम, ऐकीव स्रोतांचाही वापर केलेला दिसतो. म्हणून ते आहेत त्या स्वरूपात जसेच्या तसे स्वीकारणे योग्य ठरत नाही.'' (कौटिलीय अर्थशास्त्र, हिवरगावकर, प्रस्तावना, पृ.२३-२४)

**हरप्रसाद शास्त्रींची परखड समीक्षा :**

महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री हे, जागतिक कीर्तीचे भारतीय-विद्या-तज्ज्ञ होऊन गेले. इसवी सन १९२३ मध्ये त्यांनी एक अत्युकृष्ट पुस्तक लिहिले, त्याचे नाव 'मगधन् लिटरेचर'. त्या काळात कौटिलीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाला जणू काही बहर आलेला होता. हरप्रसाद शास्त्रींनी एक वेगळाच मुद्दा विचारार्थ घेतला. त्यांनी ह्युएन त्संगच्या प्रवासवर्णनातून दिसणारा भारत आणि कौटिलीय अर्थशास्त्रात प्रतिबिंबित झालेला भारत यांची अतिशय अर्थपूर्ण तुलना प्रस्तुत केली. त्याचा भावार्थ पुढील शब्दात देता येईल —

''ह्युएन त्संग हा इसवी सन ६२९ मध्ये भारतात आला आणि पुढील १६ वर्षे येथे राहिला. कौटिल्य हा भारतात जन्मला, वाढला, शिकला आणि व्युत्पन्न झाला. तसेच कौटिल्य हा ह्युएन त्संग पूर्वी जवळ-जवळ हजार वर्षे आधी होऊन गेला. ह्युएन त्संग केवळ एक 'प्रवासी' होता. फार तर बौद्ध तीर्थक्षेत्रांना भेटी देणारा 'यात्रेकरू' होता. कौटिल्य मात्र चौफेर परिपक्व बुद्धीचा आणि एका मोठ्या साम्राज्याचा 'महामात्य' होता. ह्युएन त्संगचा मुख्य रस 'बौद्धधर्मग्रंथांच्या अभ्यासात' होता. शिवाय सातव्या शतकातला बौद्धधर्म, एका वेगळ्याच संक्रमणावस्थेत होता. कौटिल्य मात्र जे जे म्हणून 'भारतीय' आहे, त्या सर्व धर्म, संप्रदाय, संस्कृति, भाषा व लोकजीवनाशी संबंधित होता. ह्युएन त्संग हा धार्मिक पठडीतील प्रवासी होता आणि त्याने समकालीन समाजाकडे, मुख्यत: 'धार्मिक' दृष्टिकोणातूनच बघितले. कौटिल्य हा एका मोठ्या साम्राज्याचा उत्कृष्ट प्रशासक आणि सर्वव्यापक दृष्टी असलेला 'घटनाकार' होता. परकीय आक्रमणांना थांबविणारा आणि भारतीयत्वाची प्रखर जाणीव असलेला कौटिल्य हा एक 'देशभक्त' होता. थोडक्यात काय तर ह्युएन त्संगचे प्रवासवृत्तांत 'आंशिक' आणि बऱ्याचदा 'पूर्वग्रहदूषित' आहेत तर कौटिल्य हा बऱ्याच प्रमाणात 'उदारमतवादी' आणि 'व्यापक'

दृष्टिकोणाचा आहे.'' (मगधन् लिटरेचर, लेक्चर ३, पृ.४९)

**अर्थशास्त्राचे कर्तृत्व :**

कौटिलीय अर्थशास्त्र, कौटिल्यानेच लिहिले आहे, हे उपलब्ध अर्थशास्त्रावरून निश्चित करता येते. अर्थशास्त्राच्या आरंभी, मधे व शेवटी नमूद केले आहे की, हा शास्त्रग्रंथ 'कौटिल्य' ऊर्फ 'विष्णुगुप्ताने' रचला आहे. अर्थशास्त्रात नि:संदिग्धपणे नमूद केलेल्या या उल्लेखांवर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही तर्कसंगत कारण दिसत नाही. अर्थशास्त्राच्या पहिल्या अधिकरणाच्या पहिल्या अध्यायात म्हटले आहे की —

**सुखग्रहणविज्ञेयं तत्त्वार्थपदनिश्चितम् ।**

**कौटिल्येन कृतं शास्त्रं विमुक्तग्रन्थविस्तरम् ।।**

भावार्थ असा की, ''कौटिल्याने हा शास्त्रग्रंथ लिहिला आहे. त्यातील वैशिष्ट्यपूर्ण पारिभाषिक पदावलींची अर्थनिश्चिती केलेली आहे. त्यामुळे या ग्रंथाचा अर्थ सहजपणे जाणता येतो. तसेच ग्रंथात अनावश्यक विस्तार प्रयत्नपूर्वक टाळला आहे.''

अर्थशास्त्राच्या दुसऱ्या अधिकरणाच्या दहाव्या अध्यायाच्या अखेरीस म्हटले आहे की —

**सर्वशास्त्राण्यनुक्रम्य प्रयोगमुपलभ्य च ।**

**कौटिल्येन नरेन्द्रार्थे शासनस्य विधि: कृत: ।।**

भावार्थ असा की, ''पूर्वसूरींकडून प्राप्त अशा सर्व शास्त्रांचा आढावा घेऊन आणि त्यांचा प्रत्यक्षातील उपयोग बघून कौटिल्याने नरेन्द्रासाठी (राजासाठी) शासनपद्धतीचा विशिष्ट विधी घालून दिला.''

अनेकांनी असा आक्षेप उपस्थित केला आहे की, येथे 'चन्द्रगुप्तार्थे' असा शब्द न घालता 'नरेन्द्रार्थे' असा शब्द घातल्याने, 'कौटिल्य हा चंद्रगुप्ताचा अमात्य होता की

नाही ?' अशी शंका उत्पन्न होते. परंतु हा काही मोठा आक्षेप मानता येत नाही कारण ग्रंथाचे एकंदर स्वरूप पाहता, तो सर्वच राजांना उपयुक्त असल्याने, 'नरेन्द्रार्थे' हा शब्दप्रयोगही अर्थपूर्ण ठरतो.

प्रस्तुत शंका दूर करण्यासाठी दंडी कवीच्या दशकुमारचरिताच्या (इ.स. ८ वे शतक) आठव्या प्रकरणातील पुढील उल्लेख अतिशय अर्थपूर्ण ठरतो —

**अधीष्व तावत् दण्डनीतिम् । इयमिदानीम् आचार्यविष्णुगुप्तेन मौर्यार्थे षड्भि: श्लोकसहस्रै: संक्षिप्ता ।**

''दंडनीतीचे अध्ययन करावे. हे दंडनीतिशास्त्र आचार्य विष्णुगुप्ताने मौर्यासाठी ६००० श्लोकप्रमाण ग्रंथात संक्षेपाने संगृहीत केले आहे.''

दंडीच्या या उल्लेखावरून स्पष्ट दिसते की विष्णुगुप्ताने अर्थात् कौटिल्याने हा ग्रंथ मौर्यासाठी अर्थात् चंद्रगुप्त आणि त्याच्या वंशजांसाठी लिहिला.

अर्थशास्त्राच्या पंधराव्या अधिकरणाच्या अखेरीस म्हणजे ग्रंथाची समाप्ती करताना म्हटले आहे की —

**दृष्ट्वा विप्रतिपत्तिं बहुधा शास्त्रेषु भाष्यकाराणाम् ।**
**स्वयमेव विष्णुगुप्तश्चकार सूत्रं च भाष्यं च ।।**

''वेगवेगळ्या शास्त्रांवर, वेगवेगळे भाष्यकार जेव्हा भाष्य करतात, तेव्हा त्यात अनेकवेळा मतभिन्नता दिसून येते. हे टाळण्यासाठी विष्णुगुप्ताने स्वत:च सूत्रेही लिहिली आहेत व त्यावरील भाष्यही लिहिले आहे.''

वरील सर्व संदर्भ बघता हे नक्की होते की कौटिल्य आणि विष्णुगुप्त या दोन्ही व्यक्ती एकच आहेत. आता हा प्रश्न उपस्थित होतो की, 'इसवीसनपूर्व चौथ्या शतकात

होऊन गेलेल्या चंद्रगुप्त मौर्याचा हा महामात्य होता की नाही?' अर्थशास्त्राच्या दुसऱ्या अधिकरणाच्या दहाव्या अध्यायाच्या सहाय्याने ही शंका सहजपणे दूर करता येते. म्हटले आहे की —

**येन शस्त्रं च शास्त्रं च नन्दराजगता च भू: ।**

**अमर्षेणोद्धतान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम् ।।**

भावार्थ असा की, "क्रोधाच्या आवेशात ज्याने शस्त्र आणि शास्त्राच्या सहाय्याने, नंदराजाची राजवट त्वरेने उलथून टाकली, त्यानेच हे अर्थशास्त्र रचले आहे."

**कामन्दकीय नीतिसारातील चाणक्यविषयक उल्लेख :**

कौटिलीय अर्थशास्त्राच्या परंपरेत नंतरच्या काळात अनेक ग्रंथ निर्माण झाले. त्यापैकी पहिला आणि सर्वात महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'कामन्दकीय नीतिसार'. एक परंपरा असे सांगते की कामन्दक हा स्वत: चाणक्याचा शिष्य होता आणि त्याने कौटिलीय अर्थशास्त्राचे संक्षिप्त संस्करण पद्यरूपात लिहिले. अभ्यासकांमध्ये कामन्दकाच्या काळाविषयी मतभेद असले तरी आपल्याला हे मान्यच करावे लागते की, राजनीतिशास्त्रातील ही एक अधिकारी व्यक्ती होऊन गेली. त्याने चाणक्याविषयीची संक्षिप्त माहिती, ग्रंथारंभीच नमूद करून ठेवली आहे. त्यात म्हटले आहे की, "विष्णुगुप्ताने अभिचार (मंत्रतंत्र)रूपी वज्राने, नंद नावाचा पर्वत आघातपूर्वक तोडून टाकला. कार्तिकेयाप्रमाणे त्याने एकट्यानेच मंत्रशक्तीने हे कार्य करून चंद्रगुप्ताला पृथ्वीचे राज्य मिळवून दिले. अर्थशास्त्रविषयक ग्रंथांच्या महासागरातून त्याने, कौटिलीय अर्थशास्त्ररूपी अमृत बाहेर काढले. त्या बुद्धिमान विष्णुगुप्ताला वंदन असो." (कामन्दकीय नीतिसार १.४ ते १.७)

विष्णुगुप्ताला केलेल्या या वंदनातून एक गोष्ट स्पष्ट होते की, 'चाणक्याकडे असलेली मंत्रतंत्रविद्या', येथे विशेष अधोरेखित केली आहे. कथासरित्सागरातही या अभिचारविद्येचा विशेष उल्लेख येतो.

कौटिलीय अर्थशास्त्राच्या पुढील संस्करणांमध्ये विशेष उल्लेखनीय आणि अभ्यासकांनी दखल घेतलेले संस्करण म्हणजे सोमदेवसूरींचे 'नीतिवाक्यामृत' होय. 'यशस्तिलकचम्पू' हे सोमदेवसूरींचे चम्पूकाव्य संस्कृत साहित्यातही आपल्या गुणवत्तेने उठून दिसते. इसवी सनाच्या दहाव्या शतकात होऊन गेलेले सोमदेव, एक दिगंबर जैन साधू होते. नीतिवाक्यामृतातून आणि त्याच्या टीकेतून मिळणाऱ्या अर्थशास्त्रविषयक आणि चाणक्यविषयक माहितीचे संकलन, याच पुस्तकात, 'दिगंबरीय ग्रंथात प्रतिबिंबित चाणक्य' या प्रकरणात, स्वतंत्रपणे केलेले आहे.

**ब्राह्मण परंपरेत अर्थशास्त्राची घटती लोकप्रियता :**

ब्राह्मण परंपरेतील विविध साहित्याचा आणि विशेषकरून धर्मशास्त्रविषयक ग्रंथांचा आढावा घेतला तर असे दिसते की, कौटिल्याचे अर्थशास्त्र आणि कौटिल्याची नीति यांची लोकप्रियता क्रमाक्रमाने घटत गेली. त्याच्या प्रमुख कारणांचा येथे ऊहापोह केलेला आहे. अर्थशास्त्राची लोकप्रियता घटत-घटत इतक्या टोकाला पोहोचली की, अंतिमत: भारतीय राजनैतिक विचारांचा आणि समकालीन समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचा हा अमूल्य खजिना कित्येक शतके अंधारात पडून राहिला. इसवी सन १९०९ मध्ये सापडलेल्या हस्तलिखितानंतरच तो पुन्हा प्रकाशात आला. त्यानंतर मात्र प्राचीन भारतीयांच्या विचारवैभवाविषयी शंका घेणारी अनेक मते या ग्रंथाने जमीनदोस्त केली.

पतञ्जलीने 'व्याकरण–महाभाष्यात' नमूद केले आहे की, मौर्य राजे संपत्तीला लालचावलेले होते आणि त्यांनी अनेक भल्याबुऱ्या मार्गांनी राजाचा खजिना भरला.

भासाच्या एकांकिकांमध्ये कौटिलीय अर्थशास्त्रातील, अनेक पारिभाषिक पदावली, संकल्पना आणि मिथके यांचा प्रचुर प्रमाणात वापर केलेला दिसतो. 'प्रतिज्ञायौगन्धरायण' व 'अविमारक' या नाटकातही भासाने, कौटिल्याने वापरलेल्या अनेक युक्त्यांचे नाटकीय घटनांमध्ये उपयोजन केलेले दिसते. भासाच्या 'पञ्चरात्र' आणि 'अभिषेक' या नाटकामधील, अर्थशास्त्रीय पदावलींचा शोध संस्कृत नाटकांच्या अभ्यासकांनी घेतलेला आहे. भासाने कौटिल्य अथवा विष्णुगुप्ताचा साक्षात् गौरव केलेला नसला, तरी कौटिलीय अर्थशास्त्राविषयीचा त्याचा अभ्यास आणि आस्था यातून दिसून येते.

कालिदासाने कौटिलीय अर्थशास्त्राचे अध्ययन केले असावे, असा अंदाज त्याच्या साहित्यातून, विशेषत: 'रघुवंश' या महाकाव्यातून व 'शाकुन्तल' या नाटकातून दिसतो. कालिदासाची शकुन्तला, दुष्यन्ताला उपरोधिकपणे म्हणते की –

**परातिसन्धानमधीयते यै: विद्येव ते सन्तु किलाप्तवाच: ।**

भर दरबारात दुष्यन्ताने शकुन्तलेला झिडकारल्यावर ती उद्गारते, ''दुसऱ्यांना फसविण्याची कला ज्यांना विद्या म्हणून शिकविली जाते, त्यांच्या विश्वसनीयतेविषयी काय बोलावे ?'' या उद्गारावरून स्पष्ट दिसते की, कालिदासाच्या काळात, अर्थशास्त्रातील कुटिलता व धूर्ततेविषयी एकंदर अनादराचा दृष्टिकोण तयार झाला असावा.

बाणभट्टाच्या कादंबरीतही कौटिलीय अर्थशास्त्रातील कुटिलनीतीचा धिक्कारच केलेला दिसतो. कादंबरीत असे उद्गार येतात की, ''त्या राजाविषयी काय बोलावे, ज्याचे मंत्रीच राजाला दुसऱ्यांना फसविण्यासाठी उद्युक्त करतात.'' बाणभट्टाने कथेच्या

ओघात विशिष्ट अमात्याला चाणक्यासारखे 'नृशंस, क्रूर आणि निर्घृण' असे संबोधले आहे.

महाकवी दण्डी आणि पञ्चतन्त्रकाराने, कौटिलीय अर्थशास्त्राचा केलेला उल्लेख इतका मोघम आणि सामान्य आहे की, त्यातून अर्थशास्त्राविषयीचा आदरणीय अथवा अनादरणीय कोणताच भाव फारसा व्यक्त होत नाही. पञ्चतन्त्रात, आरंभीच धर्म–अर्थ–काम या तीन पुरुषार्थांवर आधारित, कोणकोणत्या शास्त्रीय ग्रंथांची निर्मिती झाली, त्याचा मोघम उल्लेख करताना म्हटले आहे की —

**ततो धर्मशास्त्राणि मन्वादीनि, अर्थशास्त्राणि चाणक्यादीनि, कामशास्त्राणि वात्स्यायनादीनि ।**

पञ्चतन्त्रकाराचा हा उल्लेख खास महत्त्वाचा आहे कारण अर्थशास्त्राचे कर्तृत्व त्याने 'चाणक्याला' दिले आहे. इतर सर्व ब्राह्मण आणि जैन ग्रंथकारांच्या संदर्भांमध्ये, अर्थशास्त्र हे 'कौटिल्यकृत' असल्याचेच उल्लेख सापडतात.

कौटिलीय अर्थशास्त्राचे सर्वात अधिक जवळचे नाते जर कोणाशी असेल तर ते विशाखदत्ताच्या 'मुद्राराक्षस' या नाटकाशी आहे. विशाखदत्ताच्या अर्थशास्त्रविषयक सखोल अभ्यासाची प्रचिती या नाटकात वारंवार येते. चाणक्य, चंद्रगुप्त आणि अमात्य राक्षस या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखांवर आधारित, हे शुद्ध राजनैतिक नाटक शृंगाररसप्रधान अशा संस्कृत नाटकांच्या परंपरेत, आपल्या वेगळेपणाने निश्चितच उठून दिसते. या प्रदीर्घ नाटकातील सर्व घटना मुख्यत्वेकरून चाणक्याभोवतीच गुंफलेल्या आहेत. विशाखदत्ताने 'चाणक्य' या नावालाच प्राधान्य दिले आहे. एका वेगळ्या विषयावरील नाटक म्हणून मुद्राराक्षसाची महत्ता कितीही मोठी असली तरी, नाटकातून एकंदरीतपणे

उमटणारा ठसा, चाणक्याविषयीचा पूर्ण आदर व्यक्त करणारा आहे, असे निखालसपणे म्हणता येत नाही. मुद्राराक्षसातले 'कौटिल्य: कुटिलमति:' हे उद्गार इतके विलक्षण लोकप्रिय झाले की, त्यानंतर कौटिल्य हा शब्द कुटिलतावाचकच बनला. चाणक्याची नाटकातली एकंदर देहबोली, चंद्रगुप्ताला उद्देशून त्याने वारंवार 'वृषल' या काहीशा अपमानास्पद संबोधनाचा केलेला उपयोग आणि तिसऱ्या अंकात चंद्रगुप्ताशी केलेला कृतक-कलह — हे सर्व असे सूचित करतात की, मुद्राराक्षसातून चाणक्याचे बुद्धिमान, गर्विष्ठ आणि कुटिल असेच चित्रण मनात ठसते. सारांश काय तर, चाणक्याच्या उतरत्या लोकप्रियतेच्या टप्प्यातील हा एक मैलाचा दगड मानता येतो.

अर्थशास्त्राच्या लोकप्रियतेवरील सर्वात मोठा आघात म्हणजे स्मृतिशास्त्रांचा झालेला उदय हा होय. 'मनुस्मृति' आणि 'याज्ञवल्क्यस्मृति' या ग्रंथांनी धर्मपुरुषार्थाला विलक्षण महत्त्व दिले. सर्व वर्णाश्रमांसाठी कर्तव्यांची आचारावली तयार केली. अर्थशास्त्रातील अनेक विचार स्मृतींमध्ये परिवर्तित केले. धर्मशास्त्राची साचेबद्ध चौकट तयार करून, अर्थ-काम या पुरुषार्थांना दुय्यम लेखले. वर्णाश्रमव्यवस्था स्वीकारूनही चाणक्याचा, तुलनेने उदार आणि सामाजिक न्याय देणारा व्यवहार बहुधा स्मृतिकारांना रुचला नाही. चाणक्य म्हणतो, 'व्यवहारानुलोमो धर्म:' तर स्मृतिग्रंथ म्हणतात, 'धर्मानुलोमो व्यवहार:' म्हणजे धार्मिक आणि आचारात्मक नियमांची एक साचेबद्ध चौकट तयार करून स्मृतिकारांनी ती समाजमनावर बिंबविली. अर्थशास्त्रातील नैतिक मूल्यांना छेद देऊन, ही धार्मिक मूल्ये अधिकाधिक प्रचलित झाली. अर्थशास्त्रातील राजधर्मासंबंधीचे विवेचन कमी करीत-करीत स्मृतिकारांनी आचार, व्यवहार आणि प्रायश्चित्त यांवर सर्वाधिक भर दिला. परिणामी हळूहळू औपचारिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमातून कौटिलीय

अर्थशास्त्र मागे ढकलले जाऊन, स्मृतिकारांचा प्रभाव विलक्षण वाढला. याज्ञवल्क्याने कितीतरी संकल्पना व पदावली कौटिल्याच्या अर्थशास्त्रातून घेऊनही, त्याचे श्रेय कौटिल्याला दिले नाही. लोकप्रियतेबाबत मात्र त्याने अर्थशास्त्रावर मात केली.

'कथासरित्सागर' आणि 'बृहत्कथामञ्जरी' या ग्रंथांमध्ये असे दाखवले आहे की, चाणक्य हा वेदविद्यापारंगत ब्राह्मण असला तरी, मंत्रतंत्रादि अद्‌भुत विद्यांमध्ये अर्थात् अभिचारशास्त्रात तो प्रवीण होता. चंद्रगुप्ताच्या सहाय्याने पराक्रमाने मगध साम्राज्य जिंकणे आणि जारण-मारणाने नंदाला ठार मारणे, या दोन गोष्टी वस्तुत: अतिशय भिन्न आहेत. उपरोक्त दोन ग्रंथांतील उल्लेखांमुळे चाणक्याची 'अभिचारक्रियाच' अधिकाधिक अधोरेखित झाली. खुद्द अर्थशास्त्रातही गूढपुरुष-प्रणिधि, योग-वामन, उप-जाप, अपसर्प-प्रणिधि, दुर्ग-लम्भोपाय व पर-घात-प्रयोग इ. अनेक विषयांना शेवटच्या काही अध्यायात स्थान दिलेले दिसते. कदाचित् हे सर्व प्रकरण प्रक्षिप्त असेल किंवा चाणक्याचा कदाचित् या सर्वांवर विश्वासही असेल. परंतु कथासरित्सागराच्या लोकप्रियतेनंतर समाजमनावर एकंदरीत असा काही परिणाम झाला की अर्थशास्त्रातील एकाहून एक सरस आणि नैतिक संकल्पना झाकोळल्या जाऊन चाणक्याच्या व्यक्तिमत्वाचा असा नकारात्मक ठसा उमटत राहिला. परिणामी कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या अध्ययनाची परंपरा लोप पावत गेली.

जैन साहित्यात शतकानुशतके जपलेल्या आख्यायिकांच्या आणि चाणक्याविषयीच्या प्राय: व्यक्त केलेल्या आदरयुक्त दृष्टिकोणाच्या पार्श्वभूमीवर, जर आपण चाणक्याच्या, ब्राह्मण परंपरेतील घटत्या लोकप्रियतेचे मूल्यांकन केले, तर काही वेगळीच तथ्ये नजरेसमोर येऊ लागतात.

मगधामध्ये लिहिल्या गेलेल्या शास्त्रीय साहित्यात, कौटिलीय अर्थशास्त्र हा एक

महत्त्वाचा शास्त्रीय ग्रंथ आहे. मगधाचा श्रमण परंपरेशी असलेला संबंध, हे एक सिद्ध झालेले ऐतिहासिक तथ्य आहे. नंदवंशातले राजे जैन धर्मानुकूल होते. शेवटच्या नंदाचा मंत्री (अमात्य) शकटाल हा, उत्कृष्ट जैन श्रावक होता. त्याचे पुत्र स्थूलभद्र यांनी जैनदीक्षा धारण केली आणि ते श्रमण संघाचे मुख्य बनले. चाणक्याच्या व्यक्तिमत्वातही जैनांनी श्रावकत्वाचे रंग भरण्याचा प्रयत्न केला असला तरी, त्याचे 'श्रोत्रिय ब्राह्मणत्व' कोठेही लपत नाही. चंद्रगुप्त मौर्य हा देखील जैनांना अनुकूल असलेला दिसतो कारण अर्धमागधी आगमांची पहिली वाचना, त्याच्या मदतीअभावी पाटलिपुत्रात चंद्रगुप्ताच्या कार्यकाळात होऊ शकली नसती. ब्राह्मण परंपरेत चंद्रगुप्ताला मुरा दासीचा पुत्र अर्थात् 'शूद्र' म्हटले आहे. मुद्राराक्षस नाटकात चाणक्य हा चंद्रगुप्ताला 'वृषल' या नावाने संबोधतो. मुद्राराक्षसाचे टीकाकार स्पष्ट सांगतात की, हे संबोधन नीचगोत्रवाचक आहे. चंद्रगुप्ताचा पुत्र 'बिंदुसार' प्राय: जैनांना अनुकूल असावा. बिंदुसाराचा प्रपौत्र 'संप्रति' हा जैनधर्मी होता असे इतिहासकारही मान्य करतात. बिंदुसाराचा मुलगा सम्राट 'अशोक' हा बौद्धधर्मी होता. सारांश काय तर मगधाच्या राजवंशातील जवळजवळ सर्वच राजे श्रमण परंपरेशी संबंधित होते. वेदविद्यापारंगत चाणक्याने अब्राह्मण आणि अक्षत्रिय अशा जैनधर्मानुकूल चंद्रगुप्त मौर्याला, मगधाचा सम्राट बनविण्यात इतकी महत्त्वाची भूमिका बजावावी आणि अर्थ-काम या दोन पुरुषार्थांना खूप महत्त्व देऊन बऱ्याच अंशी धर्मनिरपेक्ष वाटावा असा अर्थशास्त्रासारखा ग्रंथ लिहावा — ही गोष्ट ब्राह्मण परंपरेतील धर्मशास्त्रकारांना अजिबात रुचली नसावी. धर्मशास्त्रकारांनी कौटिलीय अर्थशास्त्राकडे दुर्लक्ष करण्याचे, हे देखील एक महत्त्वाचे कारण असू शकते.

ऐतिहासिक पृष्ठभूमी

◆◆◆

## प्रकरण २

# ब्राह्मण परंपरेतील चाणक्य

## प्रकरण २

# ब्राह्मण परंपरेतील चाणक्य

चाणक्य, कौटिल्य ऊर्फ विष्णुगुप्त याच्या व्यक्तिमत्वाचा जेव्हा आपण शोध घेऊ लागतो तेव्हा आपल्याला ब्राह्मण परंपरेतील साहित्याचा प्रथम विचार करावा लागतो. कारण 'चाणक्य' हा शब्द उच्चारल्याबरोबर प्रथमदर्शनी डोळ्यात भरते, ते त्याचे 'ब्राह्मणत्व'. शतकानुशतके भारतीय मनावर चाणक्याचे एक विशिष्ट चित्र कोरलेले आहे. चाणक्याची ती सुप्रसिद्ध 'शिखा' (शेंडी), त्याची वेदविद्येतील पारंगतता, त्याची विलक्षण बुद्धिमत्ता, अहंकाराची छटा असलेला त्याचा स्वाभिमान, त्याची धूर्तता आणि सूडबुद्धी — हे सर्व गुणविशेष ब्राह्मण परंपरेने विशेष अधोरेखित केल्यामुळे अर्थातच त्या साहित्यात प्रतिबिंबित झालेला चाणक्य येथे प्रथमत: शब्दांकित केला आहे. वस्तुत: चाणक्याचे प्राचीन उल्लेख जैनांमध्ये इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून सुरू

होतात. तरीही भारतीय विचारवंतांची एक पठडीच अशी पडून गेली आहे की, कोणत्याही महत्त्वाच्या मुद्यावर आधी ब्राह्मण अथवा हिंदू परंपरा नोंदवायची, नंतर बौद्धांचा शोध घ्यायचा व शेवटी शक्य झाल्यास जैन उल्लेखांची छाननी करायची. त्या पठडीला अनुसरूनच येथे आधी ब्राह्मण परंपरेतील उल्लेख नोंदविले आहेत. अन्यथा जैन परंपरेने प्राचीन काळापासून कसोशीने जपलेला चाणक्य, या पुस्तकाच्या वाचनानंतर वाचकांच्या समोर येईलच.

## १) महाभारत (आदिपर्व) :

आदिपर्वाच्या परिशिष्टात, नीतिनिपुण विदुराच्या तोंडी, कौटिल्याचा निर्देश पुढीलप्रमाणे केला आहे —

**विदुरो धृतराष्ट्रस्य जानन्सर्वं मनोगतम् ।**
**केनायं विधिना सृष्टः कौटिल्यः कपटालयः ।।**

महाभारत (आदिपर्व), परिशिष्ट ८५.१०.२

या श्लोकात कौटिल्याचा उल्लेख 'कपटाचे आलय (निवासस्थान)' असा केला आहे. मागचा पुढचा संदर्भ पाहता, 'चाणक्याची काही तरी हकिगत येथे आढळेल'— अशा अपेक्षेने पाहिले तर पदरी निराशाच येते. भांडारकर प्राच्यविद्या संस्थेने तयार केलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीत, मूळ संहितेतून हा भाग वगळला आहे. कालविपर्यास दिसत असल्यामुळे अर्थातच हा उल्लेख प्रक्षिप्त म्हणून गाळला असावा. कारण इसवीसनपूर्व चौथ्या शतकात होऊन गेलेल्या चाणक्याचा उल्लेख, महाभारतातील विदुराच्या तोंडी घालणे, हे कालदृष्ट्या अतिशय विपरीत ठरेल. ब्राह्मण परंपरेत चाणक्याविषयी निंदात्मक सूर आळवला जाऊ लागल्यानंतर म्हणजे इसवी सनाच्या सातव्या-आठव्या शतकानंतर, महाभारतात हा श्लोक घुसडला असावा. महाभारताच्या

'शांतिपर्वातील' ५९ व्या अध्यायात चार अर्थशास्त्रकारांची नावे येतात. ती अशी— विशालाक्ष, बाहुदन्ती, बृहस्पति आणि उशनस् (शुक्र). ही चारही नावे कौटिलीय अर्थशास्त्रात पूर्वसूरींची नावे म्हणून नोंदविली आहेत. हे पाहून प्रस्तुत श्लोकाचा प्रक्षेप करणाऱ्याने त्याच्याच जोडीला, कौटिल्याचेही नाव घुसडले असावे.

सारांश काय तर, विदुराच्या मुखातून कौटिल्याचा केलेला उल्लेख, प्रमाणित मानता येत नाही.

## २) स्कन्दपुराण आणि मत्स्यपुराणातील राजर्षि चाणक्य :

'स्कन्दपुराणाच्या' रेवाखंडाच्या १५५ व्या अध्यायात शुक्लतीर्थ नावाच्या तीर्थक्षेत्राचा महिमा सांगण्यासाठी, एक छोटासा कथाभाग दिला आहे. तेथे म्हटले आहे की— 'इक्ष्वाकुसंभवो राजा चाणक्यो नाम धार्मिक:' अर्थात् फार प्राचीन काळी इक्ष्वाकुवंशात चाणक्य नावाचा धार्मिक राजा होऊन गेला. कथाभागाच्या अखेरीस म्हटले आहे की, आयुष्याच्या शेवटी तो शुक्लतीर्थास गेला. त्याने अतिशय उदारपणे गोदान आणि सुवर्णदान केले. त्याने त्याच ठिकाणी सिद्धी प्राप्त केली.

'मत्स्यपुराणाच्या' १९२.१४ मध्ये हाच आशय पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे —

**शुक्लतीर्थं महापुण्यं नर्मदायां व्यवस्थितम् ।**

**चाणक्यो नाम राजर्षि: सिद्धिं तत्र समागत: ।।**

या उल्लेखावरून कोणाही सुबुद्ध माणसाला सहज कळून चुकेल की, चाणक्य हे नामसाम्य असले तरी इक्ष्वाकुवंशात जन्मलेल्या या ऋषितुल्य राजाचा, चंद्रगुप्त मौर्याचा अमात्य असलेल्या ब्राह्मण चाणक्याशी काडीमात्र संबंध नाही. तथापि हरिषेण या

प्रख्यात दिगंबर जैन आचार्यांनी 'बृहत्कथाकोष' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथात 'चाणक्यमुनिकथानकम्' या कथेत स्कन्द आणि मत्स्यपुराणातील वरील उल्लेख ग्राह्य मानून म्हटले आहे की, **'चकार विपुलं राज्यं चाणाक्यो निजबुद्धित:'** (बृहत्कथाकोष, चाणक्यमुनिकथानकम्, श्लोक ७१)

हरिषेणाच्या चाणक्यकथेवरील अनेक निरीक्षणे प्रस्तुत ग्रंथात पुढे दिली असल्यामुळे येथे त्यावर टिप्पणी करणे टाळले आहे. पुराणात येणाऱ्या चाणक्य राजर्षीमुळे पुढेही अनेकांच्या मनात असाच संभ्रम निर्माण झालेला दिसतो. पं. महादेवशास्त्री जोशींनीही भारतीय संस्कृतिकोशात, चाणक्याच्या मृत्यूचे वर्णन करताना, पुराणातील हा प्रसंग ग्राह्य मानला आहे. गैरसमजुतीमुळे नवनवीन काल्पनिक कथांची निर्मिती होते, ती अशीच !

### ३) विष्णु, वायु आणि मत्स्यपुराणात चाणक्याचा त्रोटक उल्लेख :

चाणक्यावर संशोधन करणाऱ्या प्राय: प्रत्येक अभ्यासकाने पुराणांचा आणि विशेषत: उपरोक्त तीन पुराणांचा उल्लेख केलेला दिसतो. परंतु आपण प्रत्यक्ष शोध घेतला असता, आपल्या पदरी पूर्ण निराशाच येते. 'विष्णुपुराणाने' मगधाच्या इतिहासाचा प्रारंभ शिशुनागवंशाच्या वर्णनाने केला आहे. बरीच वंशावळ सांगून झाल्यावर नंतर त्याने नंदी, महानंदी आणि महापद्मनंदी या राजांचे उल्लेख केले आहेत. त्यांच्या मते महापद्म हा, क्षत्रिय राजाला शूद्रेपासून झालेला पुत्र होता. महापद्म आणि त्याच्या पुत्रांनी १०० वर्षे राज्य केले. आता येथे कौटिल्य ब्राह्मणाचा प्रवेश होतो. असे म्हटले आहे की त्याने नऊ नंदांचा नाश केला आणि चंद्रगुप्त मौर्याला राज्यावर बसविले. त्यानंतर मौर्यवंशातील राजांनी १७३ वर्षे राज्य केले. विशेष गोष्ट अशी की हा सर्व इतिहास भविष्यकाळात नोंदविला आहे आणि ही सर्व वंशावळ 'वायुपुराणात' व 'मत्स्यपुराणातही' तशीच्या

तशी अनुवृत्त केली आहे. (विष्णुपुराण अंश ४, अध्याय २४, श्लोक २० ते ३२; वायुपुराण खंड २, प्रकरण ६१, श्लोक १८८ ते १९२; मत्स्यपुराण २७२.२१).

सारांश काय तर वर वर्णन केलेल्या एका वाक्याशिवाय चाणक्याच्या व्यक्तित्वाविषयी आणि कर्तृत्वाविषयीच्या, कोणत्याही आख्यायिका पुराणात आढळून येत नाहीत.

## ४) कथासरित्सागरातील चाणक्य–वृत्तांत :

पुराणांपेक्षा चाणक्याविषयी बरीच जास्त माहिती आपल्याला कथासरित्सागरातून मिळते. ज्याला अनेक उपकथानकांचे सरितारूपी प्रवाह येऊन मिळालेले आहेत, असा हा कथारूपी सागर असलेला ग्रंथ सोमदेवाने इसवी सनाच्या अकराव्या शतकात संस्कृतमध्ये लिहिलेला आहे. जरी तो ग्रंथ ब्राह्मण परंपरेतील मानला गेला असला तरी तो खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष आहे. सोमदेवाचा हा ग्रंथ, स्वतंत्र ग्रंथ नसून गुणाढ्याने 'पैशाची' भाषेत लिहिलेल्या कथासंग्रहाचे हे संस्कृत रूपांतरण आहे. पैशाची ही भाषा प्राकृत भाषांमधील एक प्राचीन भाषा मानली जाते. गुणाढ्य हा सातवाहन राजांशी संबंधित आहे. म्हणून 'बड्डकहा' (बृहत्कथा) या ग्रंथाचा काळ इसवी सनाचे दुसरे–तिसरे शतक ठरतो. बड्डकहा या ग्रंथातील आख्यायिकांचा उपयोग, वस्तुत: हिंदू, जैन आणि बौद्ध या सर्वांनीच मोठ्या प्रमाणावर करून घेतलेला दिसतो. जैनांचा 'वसुदेवहिंडी' हा ग्रंथ भारतीय विद्येच्या सर्वच अभ्यासकांनी, अभिजात प्राकृतचा उत्कृष्ट नमुना असल्याचे मान्य केले आहे. या ग्रंथाचा बड्डकहा ग्रंथाशी अतिशय निकटचा संबंध आहे.

चाणक्याच्या संदर्भात पुराणांमध्ये शोध घेतला तर त्यात वंशावळी व राजांना प्राधान्य दिले आहे. चाणक्याचा उल्लेख त्रोटक आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने कथासरित्सागर

हाच हिंदू परंपरेतील चाणक्यकथांचा मूळ आधारग्रंथ ठरतो. कथासरित्सागरातील (१.५.११४) चाणक्यकथेचा सारांश पुढीलप्रमाणे देता येईल —

पाटलिपुत्रात 'नंद' राजे राज्य करीत होते. त्यांच्यातील शेवटचा राजा योगनंद हा होता. (त्याला योगनंद हे नाव कसे पडले त्याची पूर्ण कथा येथे दिली आहे.) शकटाल हा त्याचा मंत्री होता. काही कारणाने शकटालाला योगनंदाचा सूड घ्यायचा होता. (त्याची हकिगत विस्ताराने दिली आहे.) एक दिवस शकटालाला असे दृश्य दिसले की, चाणक्य नावाचा एक ब्राह्मण 'कुश' नावाचे गवत, खोलवर खणून मुळापासून उखडून टाकत आहे. याचे कारण असे की, त्या गवताचे टोक त्याच्या पायाच्या टाचेत घुसले आहे. कोणत्याही कारणाचा मुळापासून शोध घेण्याची चाणक्याची वृत्ती, शकटालाने ओळखली. मनात खूणगाठ बांधली की योगनंदाचा सूड घेण्यासाठी, ही व्यक्ती अतिशय योग्य आहे. त्याने चाणक्याला नंदाच्या राजवाड्यात श्राद्धभोजनासाठी खास आमंत्रण दिले आणि सांगितले की, 'तू मुख्य ब्राह्मण असल्यामुळे तुला दक्षिणेत एक लाख सुवर्णमुद्रा मिळतील.' चाणक्याने त्या दिवशी भोजनशाळेत जाऊन अग्रासन पटकाविले. खरे तर ते मानाचे आसन सुबंधु ब्राह्मणासाठी राखीव होते. शकटालाने ही गोष्ट नंदाला सांगितली. नंदाने म्हटले की, सुबंधूशिवाय दुसरा कोणीही येथे बसणार नाही. शकटालाने नंदाचे म्हणणे चाणक्याला सांगितले आणि आसन सोडण्याची विनंती केली. या अपमानाने चाणक्य संतापाने बेभान होऊन उठला. त्याने त्वरेने आपली बांधलेली शेंडी सोडली आणि सर्वांसमक्ष प्रतिज्ञा केली की, 'सात दिवसाच्या आत मी नंदाचा सर्वनाश करीन आणि मगच माझ्या शेंडीला पुन्हा गाठ बांधीन.' नंदराजा क्रोधाने संतप्त झाला. परंतु त्याने कोणतीही कार्यवाही करण्याआधीच, चाणक्य तेथून पळून गेला. शकटाल जणू

काही याचीच वाट पहात होता. त्याने चाणक्याला शोधून आपल्या घरात आश्रय दिला. शकटालाने चाणक्यासाठी जारण-मारण विधीची (कृत्या साधना) सर्व व्यवस्था केली. त्या काळ्या जादूचा परिणाम नंदावर लगेचच दिसू लागला. त्याला दाहज्वर झाला आणि सात दिवसाच्या आत नंद मरण पावला. नंदाच्या मृत्यूनंतर शकटालाने नंदाचा पुत्र हिरण्यगुप्त याचा वध केला आणि चंद्रगुप्ताला राजा केले. चंद्रगुप्त हा पूर्वनंदसुत होता. शकटालाने चाणक्याचे मन वळवून वळवून त्याला चंद्रगुप्ताचे महामात्यपद दिले. कारण त्याला माहीत होते की चाणक्य हा बुद्धीने खरोखरच बृहस्पतीसारखा आहे. स्वत:चे जीवनकार्य पूर्ण झाल्यामुळे शकटाल वनात गेला. अशा प्रकारे त्याने आपल्या प्रिय पुत्रांच्या मृत्यूच्या दु:खावर विजय मिळविला आणि वनामध्ये शांतपणे आध्यात्मिक जीवन व्यतीत केले.

**कथासरित्सागरावरील निरीक्षणे :**

- कथानकाचा मुख्य भर 'शकटाल' अमात्यावर आहे. चाणक्याचा वृत्तांत त्या मानाने दुय्यम आहे.
- पुराणांपेक्षा चाणक्यवृत्तांत अधिक विस्ताराने येतो.
- 'श्राद्ध' आणि 'शिखा' हे संदर्भ चाणक्याचे ब्राह्मणत्व अधोरेखित करतात.
- जैन आख्यायिकांमध्ये सुबंधूचे चाणक्याविषयीचे शत्रुत्व सांगितले आहे परंतु त्याचे कारण दिलेले नाही. कथासरित्सागरातील प्रस्तुत वृत्तांत तो दुवा जोडण्यास मोलाची मदत करतो.
- जैन कथांमध्ये शकटालाची कथा प्रचलित आहे परंतु शकटाल आणि चाणक्याचा साक्षात् संबंध जोडलेला नाही, जो कथासरित्सागरात स्पष्ट होतो.
- हरिषेणाच्या चाणक्यमुनिकथेवर कथासरित्सागराचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

परंतु त्याने कथासरित्सागराचे पैशाची प्राकृतातील संस्करण वापरले असावे. कारण हरिषेणाचा काळ आठवे–नववे शतक आहे तर कथासरित्सागराचा काळ अकरावे शतक आहे.

- श्वेतांबर जैन साहित्यानुसार शकटाल हा शेवटच्या नंदाचा अमात्य होता. त्याला दोन पुत्र होते, 'स्थूलभद्र' व 'श्रीयक'. काळाच्या ओघात पुढे स्थूलभद्र हे, जैन भिक्षू बनले आणि जैन साधुसंघाचे प्रमुख झाले. कथासरित्सागरात असे नोंदविले आहे की, नंदाने काही एका अपराधाची शिक्षा म्हणून शकटालाला त्याच्या कुटुंबासह अंधकूपात ढकलून दिले. ही हकिगत जैन संदर्भांशी जुळत नाही. म्हणूनच बहुधा हा सर्व वृत्तांत देऊनही हरिषेणाने शकटालाच्या ऐवजी नंदाच्या मंत्र्याचे नाव 'कवि' किंवा क्वचित् 'कावि' असे दिले आहे.
- कथासरित्सागरात असे नोंदविले आहे की शकटालाने चंद्रगुप्ताला राज्यावर बसविले आणि त्याचा अमात्य होण्यासाठी चाणक्याचे मन वळविले. बृहत्कथामञ्जरी आणि श्वेतांबर कथांमध्ये असे नोंदविले आहे की चाणक्याने चंद्रगुप्ताला राज्यावर बसविले आणि स्वत:च त्याचा अमात्य झाला.
- कथासरित्सागरात चंद्रगुप्ताला 'पूर्वनंदसुत' म्हटले आहे. त्यातून लेखकाला चंद्रगुप्ताचे क्षत्रियत्व सूचित करावयाचे आहे.
- कथासरित्सागरानुसार चाणक्याने नंदाला मंत्रतंत्रविद्येच्या प्रयोगाने मारले. ब्राह्मण आणि जैन कथास्रोतांमध्ये मुख्य फरक हाच आहे. अभिचार–विद्येतील चाणक्याचे प्राविण्य रंगविले की त्याचे शौर्य, दूरदृष्टी, बुद्धिमत्ता आणि राजनैतिक डावपेचांमधील कौशल्य — हे सर्व एकदम शून्यवत् होऊन जाते.

## ५) क्षेमेन्द्रकृत बृहत्कथामञ्जरी :

काश्मिरी ब्राह्मण असलेल्या क्षेमेन्द्राने इसवी सनाच्या दहाव्या शतकात, गुणाढ्याच्या 'बड्डकहा' ग्रंथाचे, संस्कृत संस्करण तयार केले होते. परंतु आपल्या प्रवाही आणि बहारदार शैलीने, लोकप्रियतेच्या बाबतीत, मञ्जरीपेक्षा सरित्सागर ग्रंथ, कितीतरी अधिक लोकप्रिय झाला. शकटाल आणि चाणक्याची मञ्जरीतील कथा कथासरित्सागरासारखीच परंतु संक्षिप्त आहे.

मञ्जरीतील कथा मुख्यत्वाने वररुचि आणि शकटाल यांचा वृत्तांत अंकित करते. चाणक्याचे संदर्भ, मञ्जरीत केवळ चार श्लोकात येतात. (प्रकरण १, गुच्छ २, श्लोक २१४ ते २१७). कथा जवळजवळ कथासरित्सागरासारखीच आहे. फरक एवढाच की मञ्जरीनुसार चाणक्याने चंद्रगुप्ताला राज्यावर बसविले. आश्चर्याची गोष्ट अशी की चाणक्य अमात्य झाल्याचा उल्लेख मञ्जरीत आढळतच नाही.

सारांश कथासरित् आणि मञ्जरी दोघांनीही पुराणांच्या मानाने चाणक्यकथा बरीच विस्ताराने सांगितली आहे परंतु महत्त्व मात्र शकटालाच्या व्यक्तिरेखेला आहे. शिवाय एक महत्त्वाची गोष्ट अशी की दोघांनीही चाणक्याचा अर्थशास्त्राशी असलेला संबंध नोंदविलेला नाही.

## ६) मुद्राराक्षस नाटकातील चाणक्य : जैन साहित्याच्या परिप्रेक्ष्यात

इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकात विशाखदत्ताने लिहिलेले मुद्राराक्षस हे नाटक, हा ब्राह्मण परंपरेद्वारे चाणक्याला समजून घेण्याचा सर्वांत महत्त्वाचा स्रोत आहे. **'कौटिल्य: कुटिलमति:'** हा वाक्प्रचार विशाखदत्तामुळेच अत्यंत लोकप्रिय झाला. या नाटकातून उभा राहणारा चाणक्य इतका खराखुरा मानला जाऊ लागला की, अनेक

उत्तरवर्ती लेखकांनी त्यातील नाटकीय अंशांकडे दुर्लक्ष करून, ती जणू वस्तुस्थिती असल्यासारखेच गृहीत धरले व त्या दृष्टीने आपापली चाणक्य-चरित्रे प्रस्तुत केली.

येथे विशेष नमूद करावयाचे आहे की, संस्कृत नाटकांच्या तेजस्वी परंपरेतील हे एकमेव राजनैतिक नाटक, चाणक्य-चंद्रगुप्ताच्या आयुष्यातील, फक्त विशिष्ट घडामोडींवर प्रकाश टाकणारे आहे. स्त्री-पात्र विरहित असे हे सात अंकी नाटक, चाणक्याच्या बुद्धिमत्तेच्या आणि व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंवर झोत टाकते. चाणक्य, अमात्य राक्षस आणि चंद्रगुप्त या तीन मुख्य व्यक्तिरेखांभोवती ते कौशल्याने गुंफले आहे. नाटकातील अनेक दुय्यम पात्रांच्या तोंडी असलेले प्राकृत संवाद, संस्कृततज्ज्ञांबरोबरच, भारतीय विद्येच्या अभ्यासकांनाही आकृष्ट करून घेतात. परिणामी मुद्राराक्षस नाटकाचा, अनेक अंगांनी अभ्यास झालेला दिसतो. चाणक्याच्या आकलनासाठी मुद्राराक्षस सर्वाधिक महत्त्वाचे आहेच परंतु त्याबरोबरच मुद्राराक्षसातील जैन अंश, अभ्यासकांसमोर आणणे मला अत्यंत आवश्यक वाटले.

चाणक्य-चंद्रगुप्ताचे मगधाशी असलेले अति-निकटतेचे नाते; जैन परंपरेतील साहित्यात आवर्जून नोंदवला गेलेला मगधाचा प्रदीर्घ इतिहास आणि इसवीसनपूर्व दुसऱ्या शतकापासून चौदा-पंधराव्या शतकापर्यंत जैनांनी वेळोवेळी, विविध संदर्भात, आख्यायिकांच्या द्वारे जपलेला चाणक्य — हे सर्व लक्षात घेऊन, त्याच्या पार्श्वभूमीवर मुद्राराक्षसाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता मला भासू लागली. मुद्राराक्षसात अत्यल्प असलेले बौद्ध अंश अभ्यासकांनी पुढे आणले, परंतु विपुलतेने आढळणाऱ्या जैन उल्लेखांकडे दुर्लक्ष केलेले दिसते. ही कमतरता भरून काढण्यासाठी येथे समग्रतेने विचार केला आहे.

## अ) मुद्राराक्षसातील जैन व्यक्तिरेखा :

### (१) जीवसिद्धि क्षपणक :

मुद्राराक्षस नाटकाच्या संविधानरचनेत आणि घटनाक्रमात जीवसिद्धि क्षपणकाचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. 'जीवसिद्धि' हा समास 'जीव' आणि 'सिद्धि' या दोन पदांनी बनलेला आहे. ही दोन्ही पदे जैन तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत अर्थपूर्ण आहेत. जैन तात्त्विक ग्रंथात 'आत्मा' शब्दाऐवजी, प्रत्येक आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व दाखविणारा 'जीव' शब्द खास करून उपयोजित केला जातो. 'सिद्धि' म्हणजे निर्वाण, मोक्ष. 'जीवसिद्धि' शब्दाचा एकंदर भावार्थ असा — 'मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्नशील जीव'. 'क्षपणक' हा शब्द देखील जैन भिक्षूंची विशिष्ट आध्यात्मिक श्रेणी दर्शविणारा आहे. कर्मनिर्जरेसाठी क्षपकश्रेणीवर आरूढ झालेल्या भिक्षूचा निर्देश अनेकदा 'क्षपक' अथवा 'क्षपणक' असा केला जातो. दिगंबर परंपरेत हा शब्द विशेष रूढ असल्याने आणि नाटकात त्याच्या दिगंबरत्वाचा स्पष्ट उल्लेख असल्याने या व्यक्तिरेखेचे जैनत्व अधोरेखित होते. मुद्राराक्षसाच्या अभ्यासकांनी सुदैवाने ते निर्विवादपणे मान्य केले आहे.

अर्थात् नाटकातील क्षपणक खराखुरा दिगंबर जैन साधू नाही. चाणक्याला अमात्य राक्षसाच्या गोटातील इत्थंभूत माहिती काढावयाची आहे. त्यासाठी आपल्या 'इन्दुशर्मा' नावाच्या मित्राची तो योजना करतो. इन्दुशर्म्याने हेरगिरी करताना 'जीवसिद्धि क्षपणक' हे नाव व तसा वेष धारण करावा अशी चाणक्याची सूचना आहे. अमात्य राक्षस नन्दराजांचा पक्षपाती आहे. धनानन्दाचा विश्वासू अमात्य आहे. नंदराजे जैनधर्मी, निदान जैनानुकूल तरी असावेत. ओरिसातील सम्राट खारवेलाच्या शिलालेखातील, 'नंदराजांनी जिनप्रतिमा पळवून नेण्याचा' जो उल्लेख आहे, त्याच्या आधारे हे स्पष्ट

होते. राक्षसावर प्रभाव पाडण्यासाठी क्षपणकाचे सोंग घेतल्यास, त्याच्याविषयीच्या आदरभावामुळे क्षपणकाला थेट राक्षसाशी संपर्क साधता येईल असा चाणक्याचा अचूक अंदाज आहे. जैन व्यक्तिरेखेला दुय्यम तरीही महत्त्वपूर्ण भूमिका असलेले हे उदाहरण संस्कृत नाटकांमध्ये अगदी विरळाच मानले पाहिजे.

जीवसिद्धीची भाषा मागधी प्राकृत आहे. जीवसिद्धी सतत म्हणत असतो, '**अलहन्ताणं पणमामि**' (अर्हतांना प्रणाम असो) (अंक ५, पृ.१९२). चौथ्या अंकातही तो उद्‌गारतो, '**सासणमलिहन्ताणं पडिवज्जह मोहवाहिवेज्जाण** ' (मोहरूपी व्याधींचे जणू वैद्य असलेल्या अर्हतांच्या शासनाचा स्वीकार करा) (अंक ४, पृ.१८६). जीवसिद्धि क्षपणक अमात्य राक्षसास म्हणतो, 'श्रावकांची धर्मसिद्धी होवो.' यावरून स्पष्ट होते की अमात्य राक्षस जैनधर्मी श्रावक आहे. तो क्षपणकास आदरपूर्वक 'भदन्त' (भंते) असे संबोधतो. 'राक्षसाची बातमी काढण्यास क्षपणक किती उपयुक्त आहे' — याविषयी चाणक्य म्हणतो —

''**स मया क्षपणकलिङ्गधारी नन्दवंशवधप्रतिज्ञानन्तरमेव कुसुमपुरमुपनीय सर्वनन्दामात्यैः सह सख्यं ग्राहितो विशेषतश्च तस्मिन् राक्षसः समुत्पन्नविश्रम्भः।**'' (अंक १, पृ.१८)

चौथ्या आणि पाचव्या अंकात अमात्य राक्षस आणि क्षपणकाचे विपुल संवाद आहेत. क्षपणक, अमात्य राक्षसास एक विशिष्ट मुहूर्त काढून देतो. जैन साधु-आचारातील प्राचीन सूत्रात शकुन-निमित्त इत्यादी विद्यांमध्ये प्रवीण असलेल्या जैन साधूंचा वारंवार उल्लेख येतो.

सारांश काय तर जीवसिद्धि क्षपणकाच्या संवादांमधून तत्कालीन राजकीय वर्तुळामधील जैनांचे नाते विशेष स्पष्ट होते.

**(२) चन्दनदास :**

पाटलिपुत्राचा नगरश्रेष्ठी चन्दनदास जैनधर्मी श्रावक असल्याचा साक्षात् उल्लेख नाटकात आढळत नाही. अभ्यासकांनीही त्यावर प्रकाश टाकलेला नाही. तथापि चन्दनदासाच्या उद्‌गारांचा सूक्ष्मतेने विचार केल्यास त्याचे जैनत्व प्रकट झाल्याशिवाय रहात नाही.

जैन महाराष्ट्री प्राकृतात लिहिलेल्या प्राय: सर्वच कथांमधून नगरश्रेष्ठीपद वंशपरंपरेने जैन गृहस्थवर्गाकडेच चालत आलेले दिसते. त्यामुळे चन्दनदासही तसाच असावा असे मानण्यास हरकत नाही. पाटलिपुत्रातील अतिश्रीमंत व्यापाऱ्यांकडून चाणक्याने कोणकोणत्या युक्त्या वापरून पैसा काढून घेतला आणि राज्याच्या तिजोरीत कशा प्रकारे जमा केला– याच्या हकिगती मुद्राराक्षसाला समकालीन असलेल्या जैन ग्रंथांत आवर्जून नोंदविलेल्या दिसतात. व्यापारीवर्ग जैन असल्याखेरीज इतके विस्तृत वर्णन जैन साहित्यात कोठून येणार ? यावरूनही चन्दनदास जैन श्रावक असण्यास दुजोरा मिळतो. चन्दनदास हा मुद्राराक्षसानुसार ‘मणिकारश्रेष्ठी’ अर्थात् हिऱ्यांचा व्यापारी आहे. चाणक्याचे बोलावणे आल्यावर तो भीतीने चांगलाच दचकतो. ‘ज्ञाताधर्मकथा’ या अर्धमागधी ग्रंथातील ‘मणिकारश्रेष्ठी’चा उल्लेख जैन आख्यायिकांमध्ये सुप्रसिद्ध आहे. त्याचे नावही ‘नंद मणिकार’ आहे. (ज्ञाताधर्मकथा, अध्ययन १३)

जीवसिद्धि क्षपणकाप्रमाणे चन्दनदासही अमात्य राक्षसाचा अत्यंत विश्वासू आहे. किंबहुना तो अमात्य राक्षसाचा निकटचा मित्र आहे. राक्षसाने आपल्या कुटुंबाची जबाबदारी अत्यंत खात्रीपूर्वक त्याच्यावर सोपविली आहे. चन्दनदासाचा जवळचा नातेवाईक ‘धनसेन’ आहे, जे नाव जैन कथांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. (अंक १, पृ.३८)

पाचव्या अंकात चन्दनदासाचे एक स्वगत आहे. त्यातील अनेक पदावलींमधून

त्याचे जैनत्व सूचित होते. चन्दनदास शौरसेनी भाषेत बोलतो आणि स्वत:स **'चारित्तभंगभीरु'** असे म्हणवून घेतो. (अंक ६, पृ.२८६). 'चारित्र' ही एक विशिष्ट जैन पारिभाषिक संज्ञा असून तिचा अर्थ 'सम्यक् आचरण' असा आहे. मोक्षमार्गावर अग्रेसर करणाऱ्या त्रिरत्नांपैकी एक आहे 'सम्यक् – चारित्र'.

सातव्या अंकात, नाटकाच्या चरमोत्कर्षाच्या वेळी चन्दनदासाच्या तोंडी एक श्लोक घातला आहे (अंक ७, श्लोक ३, पृ.२८६). **'मोत्तूणं आमिसाइं '** अशी या महाराष्ट्री प्राकृतातील श्लोकाची (गाथेची) सुरुवात आहे. संदर्भ थोडा वेगळा असला तरी 'मांसाहाराचा पूर्ण त्याग' आणि 'तृणधान्यावर निर्वाह' या पदावलीतून चन्दनदासाचे जैनत्व जाणविल्याशिवाय रहात नाही.

### (३) सर्वार्थसिद्धि :

अमात्य राक्षस हा, मृत आणि परागंदा झालेल्या नंदवंशीयांपैकी 'सर्वार्थसिद्धि' नामक एकमेव जीवित वारसाला मगधाच्या सिंहासनावर बसविण्याच्या खटपटीत आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की जैन दैवतशास्त्रात, स्वर्गलोकातील श्रेष्ठ देवविमानांपैकी एका देवविमानाचे नाव 'सर्वार्थसिद्धि' असे आहे.

दुसराही एक जैन धागा येथे विशद करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम व सर्वमान्य असा जैन दार्शनिक संस्कृत-सूत्रबद्ध ग्रंथ जो 'तत्त्वार्थसूत्र', तो पारंपरिक मान्यतेनुसार आचार्य उमास्वातींनी कुसुमपुर (पाटलिपुत्र) येथे रचला होता. आचार्य पूज्यपादांनी त्यावर पाचव्या शतकात लिहिलेल्या सुप्रसिद्ध टीकेचे नावही 'सर्वार्थसिद्धि' आहे.

अमात्य राक्षसाने 'सर्वार्थसिद्धि' नामक नंदवंशीय व्यक्तीचा घेतलेला शोध, खचितच त्यातील जैन अंशावर प्रकाश टाकतो.

## ब) चाणक्य : मुद्राराक्षसातील आणि जैन आख्यायिकांमधील :

**१) चाणक्याची नावे :**

मुद्राराक्षस नाटकात 'विष्णुगुप्त' आणि 'कौटिल्य' ही नावे क्वचित दिसत असली तरी संवादांमध्ये व्यक्तिरेखांची जी नावे दिलेली असतात, त्यात संपूर्ण नाटकभर 'चाणक्य' हेच नाव आहे.

जैन साहित्यातही प्रामुख्याने 'चाणक्य' (चाणक्क, चाणिक्य, चाणाक्य) हेच नाव आढळते. 'कौटिल्य' (कोडिल्ल) आणि 'विष्णुगुप्त' ही नावे फारच कमी वेळा आढळून येतात.

**२) चाणक्याचे ब्राह्मणत्व :**

मुद्राराक्षसात चाणक्याला 'आर्य', 'बटु', 'ब्राह्मण', 'भट्ट', 'उपाध्याय' आणि 'विष्णुगुप्त' – या नावाने संबोधून त्याचे ब्राह्मणत्व अधोरेखित केलेले आहे. विशाखदत्ताने चाणक्याचे जैनत्व अधोरेखित करणारे, एकही विशेषण अथवा पद वापरलेले नाही.

जैन साहित्यात श्वेतांबरांनी चाणक्य हा 'श्रावक' असल्याचे म्हटले आहे. दिगंबरांनी आणि विशेषत: हरिषेणाने चाणक्याला जैनदीक्षा धारण केलेला आणि ५०० जैन साधूंचे नेतृत्व करणारा 'मुनी'–अशा स्वरूपात चित्रित केले आहे. हरिषेणाचे हे वर्णन अतिशयोक्त आहे, हे इतर संदर्भ पाहता सहज लक्षात येते.

**३) चाणक्याची शिखा :**

चाणक्याचे ब्राह्मणत्व स्पष्ट करणारा मुख्य मुद्दा म्हणजे त्याची लांब आणि काळी शिखा. ब्राह्मण परंपरेत रूढ असलेल्या सर्व लिखित आणि मौखिक परंपरांमध्ये, चाणक्याच्या वैशिष्ट्यपूर्ण शिखेचा उल्लेख अग्रक्रमाने येतो. नंदाच्या भोजनशाळेत अपमानित झालेला चाणक्य, रागाने बेभान होऊन, आपल्या शेंडीची गाठ सोडून,

नंदवंशाच्या समूळ उच्छेदाची प्रतिज्ञा करतो, ही घटना विशेषत्वाने नोंदविलेली दिसते. काही उल्लेखांवरून असे दिसते की चंद्रगुप्ताला मगधाच्या सिंहासनावर आरूढ केल्यानंतर, चाणक्य पुन्हा आपल्या शेंडीची गाठ मारतो.

मुद्राराक्षसात हा प्रसंग थोड्या वेगळ्या प्रकारे चित्रित केला आहे. अमात्य राक्षसाला त्याचे मन वळवून, चंद्रगुप्ताचा अमात्य म्हणून नेमणूक करेपर्यंत चाणक्य आपल्या शेंडीला गाठ मारत नाही. मुद्राराक्षसाच्या पहिल्या अंकात आरंभीच चाणक्याच्या शिखेचे भीतिदायक वर्णन पुढीलप्रमाणे दिलेले आढळते —

**नन्दकुलकालभुजगीं कोपानलबहुललोलधूमलताम् ।**

**अद्यापि बध्यमानां वध्य: को नेच्छति शिखां मे ।।**

(मुद्राराक्षस अंक १, श्लोक ९, पृ.८)

भावार्थ असा की, नंदकुलाला काळसर्पिणीसारखी भासणारी आणि माझ्या क्रोधरूपी अग्नीची जणू काही चंचल धूमलता असणारी ही शिखा, अजूनही मोकळ्या अवस्थेतच आहे. अजूनही कोणीतरी वध्य आहे याचेच सूचन ही शिखा करीत आहे.

मुद्राराक्षसाच्या अखेरच्या अंकात विविध युक्त्याप्रयुक्त्यांनी अमात्य राक्षसाची कोंडी करून, चाणक्य त्यास चंद्रगुप्ताचे अमात्यपद स्वीकारावयास लावतो आणि म्हणतो —

**पूर्णप्रतिज्ञेन मया केवलं बध्यते शिखा ।**

(मुद्राराक्षस अंक ७, श्लोक १७, पृ.३१०)

जैन लेखक, चाणक्याचे ब्राह्मणत्व अधोरेखित करीत नाहीत. उलट त्याला श्रावकत्व बहाल करतात. त्यामुळे प्रतिज्ञा करताना आणि प्रतिज्ञापूर्तीनंतर, चाणक्याच्या शेंडी सोडण्याच्या आणि बांधण्याच्या क्रियेचे वर्णन ते करीत नाहीत. आवश्यकचूर्णीत

शिखेच्या उल्लेखाचा पूर्ण अभाव आहे. परिशिष्टपर्वात हेमचंद्राने मूळ श्लोकात शिखेचा उल्लेख टाळला आहे. परंतु त्या पृष्ठावर एक तळटीप म्हणून शिखेचा उल्लेख, पुसटपणे केला आहे. मात्र ज्या ज्या जैन लेखकांनी चाणक्याची संक्षिप्त अथवा विस्तृत चरित्रे लिहिली आहेत त्यांनी पुढे दिलेला संस्कृत श्लोक आवर्जून नोंदविलेला आहे —

**कोशेन भृत्यैश्च निबद्धमूलं, पुत्रैश्च मित्रैश्च विवृद्धशाखम् ।**

**उत्पाट्य नन्दं परिवर्तयामि, हठाद् द्रुमं वायुरिवोग्रवेग: ।।**

(आवश्यकचूर्णी (१) पृ.५६०)

जैन साहित्यात वारंवार उद्‌धृत केलेला हा श्लोक, आम्ही कथासरित्सागर, पुराणे आणि मुद्राराक्षस यांमध्ये शोधण्याचा खूप प्रयास केला. ह्या तिन्हींमध्ये तो आढळला नाही. याचा अर्थ असा की, आवश्यकचूर्णीच्याही आधीपासून जैनांनी मौखिक परंपरेने जपलेला हा श्लोक, अतिशय महत्त्वाचा ठरतो.

### ४) चाणक्याची कडक शासनव्यवस्था :

चाणक्य आणि चंद्रगुप्ताच्या कडक शासनव्यवस्थेचे वर्णन मुद्राराक्षसात अनेक वेळा दिसून येते. विशेषत: शासनाने घालून दिलेल्या आज्ञेचा भंग अथवा उल्लंघन, चाणक्य आणि चंद्रगुप्त यांना अजिबात पटत नव्हते. आज्ञाभंगाच्या गुन्ह्यासाठी दंड ठोठावला जात असे. याबाबत मुद्राराक्षसातील पदावली अतिशय बोलक्या आहेत —

१) इदमनुष्ठीयते देवस्य चन्द्रगुप्तस्य शासनमिति – मुद्रा. अंक १, पृ.३६

२) राज्यन्यविरुद्धाभिर्वृत्तिभि: – मुद्रा. अंक १, पृ.४०

३) क्रियमाणेषु आज्ञाभङ्गेषु – मुद्रा. अंक २, पृ.९६

४) अस्खलितपूर्वं देवस्य शासनं – मुद्रा. अंक ३, पृ.११२

५) प्रथमं तावन्ममाज्ञाव्याघातः – मुद्रा. अंक ३, पृ.१३२

६) चन्द्रगुप्तेन आज्ञाभङ्गकलुषितेन – मुद्रा. अंक ४, पृ.१७६

७) कीदृशं तत्कार्यगौरवं यद्राजशासनमुल्लंघयति – मुद्रा. अंक ५, पृ.२१२

निशीथचूर्णीत 'अपराध' आणि 'आज्ञाभंग' याविषयीची एक कथा साधुआचाराच्या संदर्भात उद्धृत केली आहे. तिचे तात्पर्य असे आहे की, शिष्याच्या हातून चुकून एखादा अपराध घडला तर एकवेळ तो क्षम्य मानता येईल परंतु गुरूंनी स्पष्ट शब्दात दिलेल्या आज्ञेचा, जर शिष्याने जाणूनबुजून भंग केला, तर त्या गुन्ह्याला सर्वात कठोर प्रायश्चित्त दिले पाहिजे.

आज्ञाभंगासंबंधीचा हा नियम सांगत असताना चूर्णीकाराने, चाणक्य-चंद्रगुप्ताच्या आयुष्यातील एका विलक्षण प्रसंगाचे उदाहरण दिले आहे. निशीथचूर्णीतील हा प्रसंग पुढील काळात होऊन गेलेल्या जैन लेखकांनी अधिकाधिक रंगवून सांगितला आहे. चंद्रगुप्ताच्या क्षत्रियत्वावर प्रश्नचिह्न निर्माण करून, त्याच्या विरोधात कारवाया करणाऱ्या एका संपूर्ण गावाला, चाणक्याने आज्ञाभंगाच्या अपराधाखाली कसे जाळून टाकले, याची कथा निशीथचूर्णीत विस्ताराने दिली आहे. मुद्राराक्षसात नमूद केलेल्या आज्ञाभंगाचे एक उत्कृष्ट उदाहरणच जणू, जैन लेखकांनी कथास्वरूपात नमूद केले आहे. आश्चर्याची बाब अशी की वरकरणी अत्यंत निर्घृण वाटणाऱ्या या कृतीचे एक प्रकारचे समर्थनच चूर्णीकार करतो.

**५) चाणक्याची प्रखर बुद्धिमत्ता :**

प्रखर बुद्धिमत्ता हे चाणक्याच्या जीवनप्रवृत्तीचे सारसर्वस्व आहे. बुद्धिमत्ता, शहाणपण, तर्कशक्ती, धूर्तता—या आणि अशा अनेक छटा चाणक्याच्या व्यक्तिमत्वात दिसतात. मुद्राराक्षसाचे वैशिष्ट्य असे की, चाणक्याला स्वत:लाही या बुद्धिमत्तेची पूर्णपणे जाणीव आहे. मुद्राराक्षसाच्या पहिल्या अंकातील त्याचा प्रवेशच मुळी, स्वत:च्या बुद्धीचे मूल्यांकन करणाऱ्या पुढील श्लोकाने होतो –

**कौटिल्य: कुटिलमति: स एष येन**

**क्रोधाग्नौ प्रसभमदाहि नन्दवंश: ।**

(मुद्राराक्षस अंक १, श्लो ७, पृ.८)

पहिल्या अंकातील २५ व्या श्लोकात चाणक्य स्वत:विषयी म्हणतो की, 'माझ्यापासून माझे सर्व काही हिरावून नेले तरी चालेल. माझी बुद्धिमत्ता मात्र कोणीही हिरावून नेऊ शकत नाही.'

जैन ज्ञानमीमांसेत बुद्धीचे चार प्रकार सांगितले जातात. 'औत्पत्तिकी' ही जन्मजात बुद्धिमत्ता आहे. 'वैनयिकी बुद्धी' गुरुसेवेने व औपचारिक शिक्षणाने प्राप्त होते. अभ्यासाने प्राप्त केलेल्या कौशल्यास 'कर्मजा बुद्धी' म्हणतात तर 'परिणामिकी बुद्धी' हा अनेक अनुभवांमधून प्राप्त झालेल्या शहाणपणाचा परिपाक असतो. जैनांनी जपलेल्या चाणक्यकथांमध्ये आवश्यकचूर्णीचे स्थान अग्रगण्य आहे. चूर्णीकाराचे वैशिष्ट्य असे की त्याने चाणक्याचे सर्व चरित्रच, परिणामिकी बुद्धीचे उदाहरण म्हणून प्रस्तुत केले आहे. म्हणजेच त्याच्या मते, त्याच्या आयुष्यातील सर्व प्रसंग, त्याने घेतलेले निर्णय – – ह्या सर्वांमधून त्याच्या अनुभवसिद्ध बुद्धीचीच चमक दिसते. हरिभद्राने तर याच्याही पुढे एक पाऊल टाकून म्हटले आहे की, 'तो औत्पत्तिकी, वैनयिकी व परिणामिकी

अशा तीनही बुद्धींचा धारक होता.’

**‘कौटिल्य: कुटिलमति:’**– हा वाक्प्रचार अतिशय रूढ करण्यात मुद्राराक्षस नाटकाचा फार मोठा वाटा आहे. वस्तुत: मुद्राराक्षसानुसार चाणक्य आणि अमात्य राक्षस, दोघेही विलक्षण बुद्धिमान आहेत. परंतु कुटिलपणामुळे चाणक्य नेहमीच, एक पाऊल पुढे असलेला दाखविला आहे. जैन साहित्यात मात्र चाणक्याची कुटिलता सांगितली असली तरी त्याहून जास्त त्याची प्रखर बुद्धिमत्ता, अनासक्तवृत्ती आणि राज्यहिताची तळमळ अधोरेखित केली आहे.

### ६) चाणक्याचे चंद्रगुप्तास संबोधन :

मुद्राराक्षस नाटकात चाणक्य आणि चंद्रगुप्त यांचे अनेक संवाद आहेत. प्राय: प्रत्येक वेळी चाणक्य हा चंद्रगुप्ताला ‘अरे वृषल !’ असे संबोधित करतो. मुद्राराक्षसाच्या टीकाकारांनी आणि अभ्यासकांनी ‘वृषल’ शब्दाचा अर्थ, ‘शूद्र स्त्रीपासून उत्पन्न पुरुष’ असा केला आहे.

जैन साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या चाणक्याच्या गुणवैशिष्ट्यांवर नजर टाकली तर असे दिसते की, चाणक्य–चंद्रगुप्ताचे गुरु–शिष्य–संबंध लक्षात घेता, चाणक्य हा चंद्रगुप्ताला पावलोपावली ‘हीन जातीचा’–असे संबोधणे तर्कसुसंगत वाटत नाही. शिवाय जैन साहित्यात चंद्रगुप्ताच्या शूद्रत्वाचा उल्लेख अगदी क्वचितच जाणवतो. त्याऐवजी चाणक्य हा चंद्रगुप्ताला ‘वत्स’ किंवा ‘राजन्’ असे म्हणतो. चाणक्यासारखा बुद्धिमान आणि उत्तुंग व्यक्तिमत्वाचा धोरणी माणूस, चंद्रगुप्ताला पदोपदी हिणवत असेल, हे निश्चितच संभवत नाही. अर्थातच ‘वृषल’ शब्दाचा जैन परंपरेच्या संदर्भात, काही नवीन अर्थ लावणे, अपरिहार्य ठरते. पुस्तकात योग्य जागी तो विशद केला आहे.

### ७) चाणक्य–चंद्रगुप्त कलह :

मुद्राराक्षसाच्या तिसऱ्या अंकात चाणक्याच्या सूचनेनुसार घडवून आणलेला चाणक्य-चंद्रगुप्ताचा कृतक-कलह (खोटे भांडण), हा मुद्राराक्षसातील एक अत्यंत आकर्षक व कलाटणी देणारा प्रसंग आहे. काही अभ्यासकांनी अशी शक्यता व्यक्त केली आहे की, चाणक्याच्या वर्चस्वाला कंटाळून कदाचित् दोघांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात, अशा प्रकारचा विसंवाद खराखुराच घडला असावा. जैन साहित्यातील सर्व संदर्भांचे बारकाईने निरीक्षण केल्यावर असे दिसते की, अशा प्रकारचा खरा अथवा खोटा कलह त्यांच्यात कधीही घडून आला नाही.

श्वेतांबर साहित्यात चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर बिंदुसाराच्या मनातील गैरसमजामुळे त्याचा चाणक्याशी विसंवाद झालेला दिसतो. हा विसंवाद सुबंधूने हेतुपुरस्सर घडवून आणला — असे जैन आख्यायिका सांगते. जैन साहित्यातील सुबंधु हा, मुद्राराक्षसात अमात्य राक्षसाच्या रूपाने अवतरलेला दिसतो. बिंदुसाराशी झालेला हा विसंवाद अखेर चाणक्याच्या मृत्यूमध्ये परिवर्तित झाला, असे चित्रण जैन साहित्यात दिसते. मात्र मुद्राराक्षसाप्रमाणेच जैन साहित्यातही, डाव उलटवण्याच्या बाबतीत चाणक्य हा, सुबंधूपेक्षा एक पाऊल पुढेच दिसतो.

## क) मुद्राराक्षसातील विविध प्राकृत भाषा :

मुद्राराक्षस हे 'संस्कृत नाटक' म्हणून लोकप्रिय असले तरी, त्यातील प्राय: ५०% संवाद प्राकृतात आढळून येतात. ही एक लक्षणीय बाब आहे की, चाणक्य-चंद्रगुप्ताच्या जैन परंपरेतील आख्यायिका, इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून इसवी सनाच्या पंधराव्या शतकापर्यंत, प्राकृत भाषेत विपुलतेने आढळतात.

मुद्राराक्षसात मुख्यत्वेकरून 'मागधी', 'शौरसेनी' आणि 'महाराष्ट्री' या प्राकृत भाषांचे प्रयोग दिसतात. इतर प्राकृत बोली उपभाषांचा उपयोगही प्रसंगोपात्त केलेला

दिसतो. मुद्राराक्षसातील सोळा व्यक्तिरेखा प्राकृतात बोलतात. आहितुण्डिक ह्या गारुड्याचा उल्लेख करताना, 'तो प्राकृत कवी आहे', असे आवर्जून म्हटले आहे.

आहितुण्डिक गारुड्याने म्हटलेल्या प्राकृत पद्याला, अमात्य राक्षस 'गाथा' असे संबोधतो. अर्धमागधीतील प्राचीन पद्यरचनांना गाथा म्हणतात. प्राकृत भाषा आणि जैन परंपरा यांचे नाते अतिशय निकटचे आहे. चाणक्यकथा जैनांच्या प्राकृत साहित्यात इतक्या विखुरलेल्या आहेत की, विशाखदत्ताला नाट्यलेखनाच्या वेळी, त्या नक्कीच उपलब्ध असाव्यात. आवश्यकचूर्णी व मुद्राराक्षसाचे समकालीनत्व (इसवी सनाचे सातवे शतक) हीच गोष्ट सूचित करते.

**ड) मुद्राराक्षसातील मुख्य कथानकाचा जैन साहित्यात अभाव :**

धनानंदाचा अमात्य असलेल्या, अत्यंत बुद्धिमान, धोरणी अशा राक्षसाला, प्रसंगी मन वळवून तर प्रसंगी कोंडीत पकडून, चाणक्याने चंद्रगुप्ताचे अमात्यपद स्वीकारायला कसे भाग पाडले — त्याची विस्तृत हकिगत हा मुद्राराक्षसाचा मुख्य गाभा आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की, ही मुख्य घटना आणि त्यासाठी जुळवून आणलेल्या अनेक उपघटना, यांचा जैन साहित्यात समावेश केलेला दिसत नाही. मुख्य फरक असा की, जैन मतानुसार चंद्रगुप्ताच्या कार्यकाळात सुबंधु (राक्षस) चंद्रगुप्ताकडे आला नाही. सुबंधूची संपूर्ण घटनाच चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर, बिंदुसार राजा झाल्यावर, घडलेली आहे. याच्या उलट मुद्राराक्षसातील संपूर्ण नाट्य चाणक्य-चंद्रगुप्त व अमात्य राक्षस यांच्यामध्येच घडते.

जैनांच्या मते सुबंधु (क्वचित सुबुद्धि) हा नंदाचा मंत्री आहे. तो चाणक्यावर सूड

उगविण्यासाठी टपून बसलेला आहे. बिंदुसार राजाचे कान भरून तो त्याला, चाणक्याच्या प्रतिकूल बनवितो. बिंदुसाराच्या वर्तनाने व्यथित झालेला चाणक्य, दूर जाण्याचा निर्णय घेऊन 'गोकुलस्थानातील गोब्बरग्रामात' समाधीत स्थित होतो. अत्यंत कुटिलतेने सुबंधु त्याचा घात करतो. बहुधा जैनकथेत प्रसिद्ध अशा या निर्घृणतेमुळेच सुबंधूला विशाखदत्ताने 'राक्षस' संबोधले असावे.

जैन साहित्यात सुबंधूचा वृत्तांत दोन प्रकारे आलेला दिसतो. दिगंबरांच्या मते नंदाचा अमात्य सुबंधु हा चंद्रगुप्ताच्या विजयानंतर पाटलिपुत्रातून निघून गेला. चाणक्याने मुनिदीक्षा घेतली तेव्हा तो मोठ्या साधुसंघासह क्रमाने विहार करत क्रौंचपुरास आला. सुबंधूने त्याला ओळखून तेथेच त्याचा घात केला.

मुद्राराक्षसात जवळ-जवळ प्रत्येक अंकात, विविध उपायांनी चाणक्याने, चंद्रगुप्ताचा अमात्य होण्यासाठी राक्षसाचे मन कसे वळविले, त्याच्या अनेक हकिगती येतात. जैनांच्या चाणक्य-कथांमध्ये, यातील एकही हकिगत नोंदविलेली नाही. जैन लेखकांना बहुधा असे वाटले असावे की, नंदाशी एकनिष्ठ असलेला सुबंधु (राक्षस) कदापिही चंद्रगुप्ताचे अमात्यपद भूषविणे पसंत करणार नाही. मुख्य म्हणजे सुबंधूच्या सूडबुद्धीची पुरेपूर कल्पना असलेला चाणक्य, त्याला असे कृत्य करायला लावून, स्वत:च्याच पायावर कुऱ्हाड का मारून घेईल ?

सारांश, मुद्राराक्षस हे कितीही यशस्वी राजनैतिक नाटक असले तरी, जैन साहित्यात बाराव्या शतकातील हेमचंद्राचा अपवाद वगळता, कोणीही असे दाखविलेले नाही की, चाणक्यानेच राक्षसाला चंद्रगुप्ताचे अमात्य बनविले. हेमचंद्राच्या परिशिष्टपर्वातील उल्लेखही अतिशय ओझरता असून, मुद्राराक्षसातील कोणतेही घटनाप्रसंग

त्यात सांगितलेले नाहीत.

## इ) मुद्राराक्षसातील विशिष्ट संदर्भ : जैन परिप्रेक्ष्यात :

**(१) पाटलिपुत्र :** पाटलिपुत्र (पाडलिपुत्त, पाडलिउत्त, पाटलिपुर), कुसुमपुर, पुष्पपुर ही सर्व नावे मुद्राराक्षस आणि जैन साहित्यात, पर्यायी नावे म्हणून अनेक वेळा सहजपणे वापरलेली दिसतात. जैन दार्शनिक ग्रंथ तत्त्वार्थसूत्राच्या प्रशस्तीनुसार उमास्वातींनी हा अग्रगण्य तत्त्वग्रंथ कुसुमपुर ऊर्फ पाटलिपुरातच रचला.

**(२) चाणक्याची पर्णकुटी :** मुद्राराक्षसाच्या तिसऱ्या अंकातील पंधराव्या श्लोकात, चाणक्याचे निवासस्थान असलेल्या पर्णकुटीचा, अतिशय महत्त्वपूर्ण उल्लेख आढळून येतो. काही कामासाठी चाणक्याला घरी बोलवायला गेलेल्या नोकराच्या (कंचुकीच्या) मुखातून, चाणक्याच्या पर्णकुटीचे, त्याच्या साध्या राहणीचे आणि अनासक्त वृत्तीचे वर्णन नाटककाराने वदवून घेतलेले दिसते. वाळलेले कुश गवत आणि वाळलेल्या गोवऱ्यांचे वर्णन, हे जैन साहित्यातील वर्णनाशी तंतोतंत जुळते.

चाणक्याच्या निर्मोही आणि समाधानी व्यक्तिमत्वाचे वर्णन करताना, जैनाचार्य हेमचंद्र म्हणतात, **'स सन्तोषधनः सदा '**. हेमचंद्रांनी केलेले चाणक्याच्या मृत्युप्रसंगाचे वर्णनही, अत्यंत प्रभावी उतरले आहे. ते म्हणतात —

**धूपाङ्गारेणानिलास्फालितेन प्रोद्यज्ज्वाले द्राक्करीषस्थले तु ।**
**दारुप्रायो दह्यमानोऽप्यकम्पो मौर्याचार्यो देव्यभूत्तत्र मृत्वा ।।**

(परिशिष्टपर्व, सर्ग ८, श्लोक ४६९)

दिगंबर साहित्यातील चाणक्याचा सर्वात जुना उल्लेख, 'भगवती आराधना' या ग्रंथात येतो. तेथेही म्हटले आहे की, ''सुबंधूने चाणक्याला गोब्बरग्रामात जाळले. त्याने प्रायोपगमन मरणाचा स्वीकार केला होता. शेवटच्या भयानक वेदना त्याने शांतपणे सहन केल्या.''

(३) **पर्वतक आणि विषकन्या :** चाणक्याने विषकन्येच्या सहाय्याने पर्वतकाचा मृत्यू कसा घडवून आणला–याचा वृत्तांत मुद्राराक्षस आणि आवश्यकचूर्णी या दोन्हीत प्राय: समान प्रकारे आढळून येतो. पर्वतकाचा पुत्र असलेल्या मलयकेतूचा उल्लेख आणि तत्संबंधी प्रसंग, यांचा मात्र जैन साहित्यात अभाव दिसतो.

(४) **चाणक्याची निरीक्षणशक्ती :** चाणक्याच्या अत्यंत सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा उल्लेख, मुद्राराक्षसाच्या दुसऱ्या अंकात, अतिशय परिणामकारकतेने केला आहे. चाणक्य हा चंद्रगुप्ताच्या सुरक्षिततेविषयी, अतिशय सावध आहे. विशेषत: त्याचा भोजनकक्ष आणि शयनकक्ष हा सतत चाणक्याच्या निगराणीखाली आहे. एकदा चंद्रगुप्ताच्या शयनकक्षाच्या जाड, पोकळ भिंतींमधून, बारीक अन्नकण तोंडात धरलेल्या मुंग्यांची रांग, चाणक्याला दिसते. त्यावरून तो त्या पोकळीत लपलेल्या, घातकी हेरांचा छडा लावतो. त्यांचा योग्य बंदोबस्त करतो.

आवश्यकचूर्णीतही मुंग्यांना मारणाऱ्या नलदामाचा प्रसंग, निर्दिष्ट केला असून, नंतरच्या जैन लेखकांनी तो विशेष रंगविला आहे. फरक

इतकाच की, मुंग्यांचे वारूळ खोलवर खणून, त्यांचे समूळ उच्चाटन करणाऱ्या नलदामाला, चाणक्य हा स्वत: नगराचे कोतवालपद बहाल करतो. लपून बसलेली नंदाची माणसे शोधून त्यांचा नायनाट करण्याचे काम, नलदामावर सोपवितो. आवश्यकचूर्णीच्या ५६५ व्या पृष्ठावर म्हटले आहे की —

**तिदंडी बाहिरियाए णलदामं मुइंगमारगं दट्ठुं आगतो, रण्णा सद्दावितो, दिण्णं आरक्खं, वीसत्था कता, भत्तदाणे सकुडुंबा मारिया ।**

(५) **चाणक्य : बिंबातरित राजा ? :** चाणक्य-चंद्रगुप्ताचे मुद्राराक्षसातील संबंध आणि संवाद पाहिल्यावर असे दिसते की, चंद्रगुप्ताच्या प्रत्येक कृतीवर चाणक्याचे पूर्ण वर्चस्व आहे. चाणक्य स्वत:च म्हणतो की, चंद्रगुप्ताचे राज्य 'सचिवायत्त' आहे. त्यांच्या गुरुशिष्याच्या नात्याचा उल्लेखही मुद्राराक्षसात आहे. चाणक्याच्या आज्ञेचे उल्लंघन करण्याचे सामर्थ्य चंद्रगुप्तातही नाही, असे त्याच्याच उद्गारातून दिसते. तिसऱ्या अंकातील चाणक्य-चंद्रगुप्ताच्या कृतक-कलहातून तर, हे चाणक्याचे वर्चस्व उघडपणे दिसतेच परंतु अन्यत्रही छोट्या-छोट्या गोष्टींसाठी चंद्रगुप्त कसा चाणक्यावर अवलंबून आहे, हे देखील प्रत्ययास येते. मुद्राराक्षसाच्या सातव्या अंकात नाटककाराने एका रंगसूचनेतून, ही गोष्ट अधोरेखित केली आहे. ती रंगसूचना अशी, 'राजा चाणक्यमुखमवलोकयति'. चाणक्याच्या तोंडाकडे पाहण्याचा चंद्रगुप्ताचा स्वभाव अर्थातच यातून दिसतो.

जैन साहित्यात देखील चाणक्याचे प्रभुत्व आणि वर्चस्व अनेकदा नमूद केलेले दिसते. आवश्यकचूर्णीतही हे तथ्य प्रतिबिंबित झाले आहे. जैन लेखकांना असेही वाटले की, 'अधिकार गाजवण्याच्या त्याच्या व्यक्तिमत्वाचा संबंध, भविष्यवेत्त्यांच्या मुखातून लहानपणीच वर्तविलेला बरा', म्हणून जैन चाणक्यकथेत भविष्यकथन करणारे ज्योतिषी चाणक्याच्या मात्यापित्यांना सांगतात की, 'हे बालक एक तर राजाच होईल अथवा बिंबांतरित राजा तरी नक्कीच होईल.' जैन कथातही अनेकदा अमात्य चाणक्य, केवळ एक भुवई उंचावून चंद्रगुप्ताला रोखतो. पाटलिपुत्रातील व्यापाऱ्यांसमोर चाणक्य उघडपणे म्हणतो की, **'राया मे वसवत्ती'**. अर्थात् राजा माझ्या ताब्यात आहे. आवश्यकचूर्णी, निशीथचूर्णी इ. अनेक ठिकाणी चाणक्य-चंद्रगुप्ताचे गुरुशिष्य नाते, आवर्जून नमूद केलेले आहे. हेमचंद्र चाणक्य-चरित्राच्या अखेरीस त्याला 'मौर्याचार्य' असे संबोधतात.

बृहत्कथाकोषकार हरिषेणाने तर या अतिशयोक्तीचे इतके टोक गाठले आहे की, त्याच्या मते नंदांच्या पराभवानंतर चाणक्यानेच अनेक वर्षे राज्य केले आणि अखेरीस चंद्रगुप्ताला राज्य देऊन मुनिधर्म स्वीकारला.

**मुद्राराक्षसातील तात्पर्यात्मक निरीक्षणे :**

- मुद्राराक्षसाला आधारभूत असलेला मुख्य कथाभाग जैन आख्यायिकांमध्ये आढळून येत नाही. एखादा ओझरता उल्लेख तेवढा दिसतो.
- मुद्राराक्षसाचा काळ सातवे-आठवे शतक मानला तर त्याला समकालीन असलेल्या जैन चूर्णींमधील चाणक्यविषयक आख्यायिका आणि समाजातील मौखिक दंतकथा नाटककारांसमोर आहेत. परंतु नाटक आखीव-रेखीव, बांधेसूद होण्यासाठी विशाखदत्ताने त्यातील वेचक भाग निवडला आहे.

- ज्याअर्थी विशाखदत्ताने जैन आख्यायिकांमधील सुबंधूला 'राक्षस' असे संबोधले आहे, त्याअर्थी चाणक्याला जिवंतपणी जाळणाऱ्या सुबंधूच्या जैन आख्यायिका बहुधा त्याच्यासमोर असाव्यात.
- मुद्राराक्षसाचा अभ्यास विद्वानांनी विविध अंगांनी केला असला तरी, मुद्राराक्षसापेक्षा प्राचीन आणि समकालीन जैन आख्यायिकांच्या द्वारे त्या नाटकाचे आकलन अधिक अर्थपूर्णपणे करता येते. तसेच त्यात दडलेली नवनवीन तथ्येही डोळ्यासमोर येतात.
- निशीथचूर्णीच्या पुष्पिकेत नमूद केले आहे की ती 'विशाखगणींनी' लिहिलेली आहे. निशीथचूर्णीत साधूंच्या आचारावलीच्या संदर्भात वारंवार चाणक्य-चंद्रगुप्ताच्या हकिगती येतात. दिगंबर परंपरेत चंद्रगुप्ताने दीक्षेनंतर 'विशाखाचार्य' नाव धारण केलेले दिसते. मला कोणताही दावा करायचा नाही परंतु विशाखदत्तकृत मुद्राराक्षस आणि जैन परंपरा यांचे एक निकटचे नाते यातून सूचित होते.

सारांश काय तर, मेगॅस्थेनिस व ह्युएन त्संग यांच्या प्रवासवर्णनाच्या त्रोटक अंशातून चाणक्याच्या व्यक्तिमत्वावर आणि ग्रंथावर कुठलाच प्रकाश पडत नाही. हिंदू (ब्राह्मण) पुराणांमध्ये नंद आणि मौर्यवंशाच्या वंशावळींवर भर दिलेला असून, चाणक्याचा उल्लेख फक्त ओझरता आणि अतिशय दुय्यम आहे. कथासरित्सागर आणि बृहत्कथामञ्जरी या दोहोतून शकटालाच्या व्यक्तिमत्वावरच जास्त प्रकाश पडतो. नंदाच्या भोजनशाळेत चाणक्याचा झालेला अपमान आणि नंदवंशाच्या उच्छेदाची केलेली प्रतिज्ञा — याखेरीज चाणक्याच्या जीवनसामग्रीविषयी जवळ-जवळ कोणतीच माहिती मिळत नाही. अशा परिस्थितीत चाणक्याच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारा ब्राह्मण परंपरेतील पहिला लेखक ठरतो तो विशाखदत्त. एक विशेष लक्षणीय राजनैतिक नाटक

म्हणून ते मोलाचे असले तरी, चाणक्याच्या पूर्वायुष्यातील आणि उत्तरार्धातील घटनांसंबंधीचा बोधही त्यातून होत नाही. म्हणजेच चाणक्याचे संपूर्ण जीवनचरित्र समजून घेण्यासाठी एकमेव आधार उरतो, तो जैन परंपरेने जपलेल्या चाणक्यविषयक आख्यायिकांचा. म्हणूनच लगोलग यापुढच्या प्रकरणात, जैनांनी चित्रित केलेल्या चाणक्याच्या जीवनचरित्राचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

◆◆◆

## प्रकरण ३

# चाणक्याची समग्र जीवनकथा
# (जैन संदर्भांच्या आधारे)

## प्रकरण ३

# चाणक्याची समग्र जीवनकथा
## (जैन संदर्भांच्या आधारे)

**प्रस्तावना :**

चाणक्याची ही जीवनकथा, श्वेतांबर-दिगंबर जैन साहित्यात आढळून आलेल्या, अनेक संदर्भांच्या आधारे लिहिली आहे. जेथे मतभेद असतील तेथे, जास्तीत-जास्त तर्कसुसंगत पर्याय निवडला आहे. कथेला प्रवाहीपणा येण्यासाठी आणि रंजकतेसाठी थोड्याशा कल्पनाविलासाचाही आधार घेतला आहे. कल्पनारम्यता आणि अतिशयोक्ती ही मूळ संदर्भांशी विसंगत नसेल अशी खबरदारी घेतली आहे. चला तर मग, चाणक्य-चंद्रगुप्ताच्या विलक्षण जीवनकहाणीचा आपण वेध घेऊ या.

## (१)

## बालक विष्णुगुप्त आणि भविष्यकथन

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे ही ! म्हणजे नक्की किती वर्षापूर्वीची? येशू ख्रिस्ताच्या जन्माच्याही आधी चारशे वर्षापूर्वी घडलेली. ही गोष्ट आहे एका कर्तबगार राजाची आणि त्याच्या बुद्धिमान अमात्याची. त्या काळात आपल्या भारतवर्षाच्या सीमा, आजच्यापेक्षा कितीतरी अधिक विस्तारलेल्या होत्या. बिहार, बंगाल, ओरिसा या नावांऐवजी मगध, वंग, कलिंग अशी नावे प्रचलित होती. महावीर आणि गौतम बुद्ध हे दोन महापुरुष, मगध प्रांतात होऊन गेले होते. दोनशे वर्षात त्यांच्या धर्मप्रसाराचा ठसा, हळूहळू मगधाबाहेरच्या अंग-वंग-कलिंग या प्रदेशातही, उमटू लागला होता.

मगध राज्याला पराक्रमी राजांची मोठीच परंपरा लाभली होती. राजा प्रसेनजित - त्याचा पुत्र श्रेणिक (बिंबिसार) - त्याचा पुत्र कोणिक (अजातशत्रु) - त्याचा पुत्र उदायी (उदयन) या सर्वांच्या पाठोपाठ 'शिशुनाग' वंशातील राजांनी अनेक वर्षे राज्य केले. शिशुनागांच्या नंतर राज्यसत्ता 'नंद' घराण्याकडे आली. नऊ नंद राजांमधला शेवटचा राजा होता 'धनानंद'. त्याचा उल्लेख जैन साहित्यात 'नंद' असाच केला जातो. स्वत:चे भोगविलास आणि मोठेपणा मिरविण्यासाठी दिलेली मोठमोठी दाने — यांच्या योगाने नंद, राज्याचा खजिना वारेमाप उधळीत होता. नंदाचे अत्यंत विश्वासू असे तीन मंत्री होते - 'शकटाल', 'सुबंधु' आणि 'कवि'. त्याची राजधानी होती 'पाटलिपुत्र' (कुसुमपुर). प्राचीन वैभवाच्या खुणा तेथे जागोजागी विखुरलेल्या होत्या. ज्ञानार्जनाची केंद्रे असलेली लहान-मोठी विद्यापीठेही तिथे विकसित होत होती.

पाटलिपुत्रापासून काही योजने अंतरावर, 'गोल्ल' नावाचा एक भूभाग होता.

हिरवीगार वनराई आणि मधून-मधून डोलणारी शेते व वस्त्या, हे त्या प्रदेशाचे वैशिष्ट्य होते. तेथे 'चणकपुर' नावाचे एक टुमदार गाव होते. त्या गावात 'कपिल' ब्राह्मण आपल्या 'देविला' नावाच्या पत्नीसह सुखासमाधानाने रहात होता. वेदविद्येमधील पारंगतता त्याला पिढीजात लाभली होती. ज्ञानार्जनाची आस, निर्मळ चारित्र्य आणि संतोषी वृत्ती यामुळे एका निर्ग्रंथ मुनींच्या सान्निध्यात येऊन, तो जिनधर्माचा उपासक बनला होता. कपिलास एक बहीण होती. तिचे नाव 'बंधुमती'. अतिशय लावण्यवती आणि सुलक्षणी असलेल्या बंधुमतीला, नंदाच्या 'कवि' नावाच्या मंत्र्याने मागणी घातली होती. कपिल ब्राह्मणाने यथाशक्ती विवाह करवून, बहिणीची पाटलिपुत्रास पाठवणी केली होती. ते जोडपे तेथे सुखाने नांदत होते.

एका शुभ दिवशी देविलेने एका तेजस्वी आणि सुलक्षणी बाळाला जन्म दिला. मातापित्यांनी हर्षभरित होऊन बालकाचे नाव 'विष्णुगुप्त' असे ठेवले. बालकाचे निरीक्षण केल्यावर मातापित्यांना धक्काच बसला. त्या बालकाला जन्मत:च दाढा होत्या. त्यांना ही गोष्ट फार विचित्र वाटली. योगायोगाने दुसऱ्या दिवशी माध्याह्नी एक 'सिद्धपुत्र' (भविष्यवेत्ता) त्यांच्याकडे आला. साहजिकच कपिल व देविलेने बालकाला त्याच्या मांडीवर ठेवून त्याचे भविष्य विचारले.

सिद्धपुत्राने अतिशय बारकाईने बालकाच्या अंगप्रत्यंगांचे निरीक्षण केले. बालकाच्या मुखामधील दाढादेखील त्याने पाहिल्या. कपिल आणि देविला सचिंत नजरेने पहात होते. अचानक सिद्धपुत्राचा चेहरा प्रसन्नतेने भरून गेला. तो उत्स्फूर्तपणे म्हणाला, 'आपण उभयतांनी याची काळजी करू नये. बालकाच्या दाढांवरून हे स्पष्ट होते आहे की, हे बालक मोठेपणी राज्यपद प्राप्त करणार आहे. राजाच होणार आहे.'

सिद्धपुत्र निघून गेला. कपिल मोठ्या विचारात पडला. 'बाप रे ! हा राजा होणार

म्हणजे नाना कटकारस्थाने, युद्ध, हिंसा हे सर्व याच्या नशिबी येणारच. टाळताही येणार नाही. हा राजा न झालेलाच बरा.' भविष्य टाळण्यासाठी दोघांनी प्रयत्न करायचे ठरविले. बालकाला अंघोळ घालताना देविला अगदी नियमितपणे त्याच्या दाढा खसखसून घासू लागली. कालांतराने दाढा झिजल्या.

साधारण सहा महिन्यांनी पुन्हा एकदा सिद्धपुत्र आला. कपिलाने बालकाला दाखवून पुन्हा एकदा भविष्यकथन करण्यास सांगितले. सिद्धपुत्राने बालकाच्या घासलेल्या दाढा बघितल्या. त्याला हसू फुटले. तो म्हणाला, ''याने राजा होऊ नये म्हणून तुम्ही बरेच प्रयत्न केलेले दिसतात. प्रत्येकाच्या कर्मानुसार जे होणार असते ते असे वरवरच्या उपायांनी कधीच टाळता येत नाही. मी तुम्हाला एवढेच सांगतो की, हा विष्णुगुप्त स्वत: राजा झाला नाही तरी राज्याचा प्रमुख सूत्रधार असेल. स्वत:च्या मर्जीनुसारच राजाकडून कारभार करून घेईल. यालाच 'बिंबांतरित राजा' असे म्हणतात.'' भविष्यकथन करून सिद्धपुत्र निघून गेला.

◆◆◆

## (२)

## विष्णुगुप्ताचे शिक्षण आणि विवाह

तेजस्वी विष्णुगुप्त कलेकलेने मोठा होऊ लागला. वेदविद्यापारंगत पित्याने

आठव्या वर्षी विष्णुगुप्ताचे मौंजीबंधन केले. काही दिवस घरीच वेदांची 'संथा' देण्यास सुरवात केली. लवकरच त्याच्या लक्षात आले की, विष्णुगुप्त इतका कुशाग्र आहे की त्याला, इतरही कला आणि विद्या आत्मसात् करता येतील. त्याचे शारीरिक चापल्य, मानसिक परिपक्वता आणि प्रखर बुद्धिमत्ता यांना चांगले वळण लागावे म्हणून, कपिल आणि देविलेने एक महत्त्वाचा निर्णय घेतला. त्याला अधिक चांगल्या शिक्षणासाठी पाटलिपुत्रास पाठविण्याचे ठरविले. तेथे कपिलाची बहीण 'बंधुमती' आणि तिचे यजमान 'कवि', हे होतेच. क्रमाक्रमाने विष्णुगुप्ताचे प्रगत शिक्षण पाटलिपुत्रात सुरू झाले.

त्या पाठशाळेत इतरही अनेक ठिकाणाहून आलेली मुले होती. ती विष्णुगुप्ताला विचारू लागली, 'तू कोठून आलास ?' त्याने उत्तर दिले, 'चणकपुराहून आलो.' अशी प्रश्नोत्तरे पाच-दहा वेळा झाल्यावर सर्व मुले त्याला 'चाणक्य' म्हणू लागली. हे त्याचे नवे नाव इतके रुळले की, त्याचे मित्रच काय, त्याचे गुरूसुद्धा त्याला चाणक्यच संबोधू लागले. बारा वर्षे गुरुगृही राहून चाणक्याने वेदविद्येबरोबरच वेदांगे, अस्त्रविद्या, शस्त्रविद्या, मंत्रविद्या, भविष्यकथन, अश्वारोहणविद्या, आयुर्वेद आणि पूर्वसूरींनी नोंदवून ठेवलेली नीतिशास्त्रविषयक रहस्येही जाणून घेतली. यथोचित गुरुदक्षिणा देऊन चाणक्य, चणकपुरास आपल्या मातापित्यांकडे परत आला.

आपला तरणाबांड आणि विद्याकुशल पुत्र बघून कपिल व देविलेने त्याच्या गृहस्थाश्रम-प्रवेशाची तयारी चालू केली. लवकरच त्यांनी एका कुलीन ब्राह्मणाची रूपवती कन्या 'यशोमती' आपल्या पुत्रासाठी वधू म्हणून निवडली. सुस्वभावी यशोमतीचा गृहप्रवेश झाला आणि चाणक्याचे वैवाहिक आयुष्य सुरू झाले.

◆◆◆

## (३)

## चाणक्याचे पाटलिपुत्रास गमन

चाणक्याच्या पत्नीचे अर्थात् यशोमतीचे माहेर चांगले सुखवस्तू होते. यावर्षी त्यांच्याकडे तिच्या सर्वात धाकट्या बहिणीचे लग्न ठरले होते. यशोमतीच्या इतर

बहिणी चांगल्या श्रीमंत घरात दिलेल्या होत्या. माहेराहून महिनाभर आधी येण्याचे निमंत्रण होते. यशोमती उत्साहाने तयार झाली. चाणक्य विवाहाच्या वेळी येणार असे ठरले. सोबत बघून यशोमती माहेरी गेली. पाहते तो काय ! सर्व बहिणींनी आणि मेहुण्यांनी आधीच येऊन मुक्काम ठोकला होता. आईवडिलांनी यशोमतीचे स्वागत केले खरे, पण तिला ते खूपच निरुत्साही वाटले. ती घरात आली. सगळ्या बहिणी उंची वस्त्रे धारण करून आणि नखशिखांत दागिने धारण करून, ऐटीत इकडे-तिकडे वावरत होत्या. हिने जवळ जाऊन त्यांची विचारपूस केली. बहिणींनी कशीबशी उडत-उडत उत्तरे दिली. बहिणी आणि त्यांचे यजमान तोऱ्यात वावरत होते. यशोमती दु:खी झाली. एका कोपऱ्यात बसून राहू लागली.

एके दिवशी तो अपमान सहन न होऊन, स्वत:च आपल्या घरी म्हणजे चाणक्याकडे निघून आली. मुख्य विवाहसोहळा पार देखील पडला नव्हता. चाणक्याला तिचे मानसिक दु:ख जाणवले. तो पुन्हा-पुन्हा खोदून-खोदून कारण विचारू लागला. आपल्या गुणी आणि बुद्धिमान पतीला त्याच्या दारिद्र्याचे कारण सांगून दुखवावे, असे यशोमतीला मुळीच वाटत नव्हते. खूपच आग्रह केल्यावर अखेरीस माहेरी घडलेला सर्व प्रसंग तिने सांगितला. चाणक्य विचारात पडला. आपल्या पत्नीला कोणी गरिबीवरून हिणवावे, हे त्याच्या मानी स्वभावास पटले नाही. त्याला पाटलिपुत्राच्या धनानंदाची आठवण झाली. तेथील वास्तव्यात त्याला माहीत झाले होते की, प्रतिवर्षी एका विशिष्ट दिवशी धनानंद, विद्वान आणि गुणीजनांचा सत्कार करतो. सुवर्णदक्षिणा आणि कपिला गायींचे दान करतो. चाणक्याला वाटले, 'आपली विद्वत्ता सिद्ध करून हे दान मिळवावयास काय हरकत आहे ? आपले हे दारिद्र्य मग कायमचेच मिटेल.'

आपला हा मनोदय त्याने यशोमतीस सांगितला. यशोमती म्हणाली, 'असे असेल तर काही दिवस पाटलिपुत्रात वास्तव्य करावे लागेल. तुमची खाण्यापिण्याची आबाळ होईल. मी देखील तुमच्याबरोबर येते.' चाणक्याने मान्य केले. दोघांनी योग्य ती शिधासामग्री गोळा करून, पाटलिपुत्रास प्रयाण केले. नगराबाहेरील एका शुचिर्भूत ठिकाणी पर्णकुटीत राहू लागले.

◆◆◆

## (४)

## मंत्री 'कवि' याचे उपाख्यान

पूर्वी सांगितल्याप्रमाणेच नंद राजाचे (धनानंदाचे) तीन प्रमुख मंत्री होते. 'शकटाल', 'सुबंधु' आणि 'कवि'. नंदराजांचे सचिवपद शकटालाकडे वंशपरंपरागत चालत आलेले

होते. तो नंदाच्या अत्यंत विश्वासातला होता. शकटालाला 'स्थूलभद्र' आणि 'श्रीयक' असे दोन पुत्र आणि बुद्धिमान अशा सात कन्या होत्या. त्यापैकी स्थूलभद्र हे कालांतराने जैनसंघाचे आचार्य झाले. नंदाच्या दरबारात असलेल्या 'वररुचि' नावाच्या विद्वानाच्या कटकारस्थानामुळे, शकटाल हा राजाच्या मर्जीतून उतरला. राजाचा गैरसमज दूर करण्यासाठी आणि श्रीयकाला मंत्रिपद मिळवून देण्यासाठी शकटालाने निर्धारपूर्वक स्वेच्छामरण स्वीकारले.

सुबंधु या दुसऱ्या बुद्धिमान मंत्र्याचे, मंत्रिमंडळात एक विशेष स्थान होते. तो बुद्धिमान, धूर्त आणि राजनैतिक डावपेचांमध्ये कुशल होता. राजाचे जे विश्वासू मंत्री, रोज राजाबरोबर भोजन घेत असत, त्यामध्ये सुबंधूच्या आसनाचा मान पहिला होता. नंदाच्या या तीन मंत्र्यांपैकी, चाणक्याचा शेवटपर्यंत पाठपुरावा करीत राहिलेला हा दीर्घद्वेषी सुबंधु, एक वेगळाच नमुना होता.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे नंदाचा मंत्री कवि, हा चाणक्याच्या आत्याचा पती होता. चाणक्याच्या आयुष्यात कवीचे स्थान महत्त्वाचे असल्याने, त्याच्या आयुष्यातला, चाणक्याच्या संदर्भातला विस्तृत वृत्तांत येथे जाणून घेऊ.

भोगविलासात मग्न असलेल्या नंदाचे, राज्यकारभाराकडे लक्ष, एकंदरीत कमीच होते. त्यामुळे त्याच्या सीमावर्ती प्रदेशातील राजे मगधावर आक्रमण करण्याची तयारी करू लागले. संरक्षणात दक्ष असलेल्या कवीने, त्याच्या विश्वासू हेरांनी दिलेली ही महत्त्वपूर्ण माहिती राजाला गंभीरपणे निवेदन केली. कवीच्या सल्ल्यानुसार नंदाने धनपाल नावाच्या कोशाध्यक्षाला म्हटले की, 'शत्रुसैन्याच्या प्रमुखांना भरपूर मोठ्या रकमा पोहोचवा. त्यांना वश करून आक्रमण थोपवा.' नंतर कवीने त्या त्या सेनाप्रमुखांना एकेक लक्ष सुवर्णमोहरा गुपचूप पोहोचवल्या. एकदा नंदाला राजकोशाची पाहणी

करण्याची इच्छा झाली. त्याने खजिनदाराला बोलाविले. विचारले, 'राजकोशाची एकंदर हालहवाल काय आहे ?' धनपाल म्हणाला, 'महाराज ! सर्व खजिना जवळ-जवळ रिता झाला आहे. कारण आपल्याच विश्वासू मंत्र्याने अर्थात् कवीने शत्रूंना सर्व धन वाटून टाकले आहे.'

कोणताही मागचा-पुढचा विचार न करता नंदाने, ताबडतोब आपल्या रक्षकांना आज्ञा केली की, 'बायका-मुलांसकट कवीच्या मुसक्या बांधा आणि गावाबाहेरील अंधकूपात (पडीक विहिरीत) त्यांना ढकलून द्या. त्यांनी उपासमारीने मरू नये म्हणून, एक मातीची थाळी भाताने भरून, रोज विहिरीत सोडत जा.' आपल्या राजनिष्ठेचे असे फळ मिळालेले बघून प्रथम कवि अत्यंत दु:खी झाला. नंतर त्या दु:खाची जागा द्वेष आणि सूडाने घेतली. सर्वांना एकत्र करून तो म्हणाला, 'नंदराजाचा सूड घेण्यास जो समर्थ आहे त्याने एकट्यानेच, आपली शक्ती टिकविण्यासाठी हा थाळीभर भात खावा.' कवीच्या कुटुंबाने आपापसात विचार-विनिमय करून, कवीला निर्णय दिला की, 'पिताश्री ! हे कार्य करण्यास केवळ आपणच समर्थ आहात. आपल्या कार्यपूर्तीसाठी आम्ही मरण पत्करावयास तयार आहोत.'

विहिरीतून बाहेर पडण्यासाठी कवीने एक दीर्घ योजना आखली होती. अंधकूपाची कच्ची बाजू बघून, त्याला तेथून एक लांबलचक भुयार खणावयाचे होते. मिळतील त्या अणकुचीदार दगडांनी, सर्वांनी भुयार खणण्यास आरंभ केला. अन्नाच्या अभावी शक्तिपात होऊन, एकेक कुटुंबीय मरण पावला. इच्छा नसूनही द्वेषाने पेटलेला कवि, रोज थाळीभर अन्न खाऊन, सर्वशक्तीनिशी भुयार खणत राहिला.

तीन वर्षे लोटली. सर्व कुटुंब मरण पावले होते. कवीचे भुयार खणण्याचे काम

चालूच होते. शत्रूच्या गुप्तहेरांनी कवीवर गुदरलेल्या प्रसंगाची माहिती, सीमावर्ती प्रदेशातील राजांना दिली. राजाचा हितचिंतक आणि सल्लागार राजाजवळ नसल्याने, ते राजे हर्षभरित झाले. त्यांनी एकत्रित येऊन, पाटलिपुत्रालाच वेढा घातला. असा आणीबाणीचा क्षण आल्यावर, नंदराजाला तीव्रतेने कवीची आठवण आली. 'तो जगला-वाचला आहे का ?' हे बघायला राजा स्वत: अंधकूपाशी गेला. हलाखीच्या अवस्थेत असलेल्या कवीला, अंधकूपातून बाहेर काढले. त्याचे पाय धरून, अश्रुपूर्ण डोळ्यांनी त्याची क्षमा मागितली. त्याला पुन्हा मंत्रिपद भूषविण्याची विनंती केली. आपली द्वेषभावना तात्पुरती मनात दडपून कवि म्हणाला, 'राजन् ! एका अटीवर मी परत येईन. राज्याच्या आर्थिक व्यवहाराचे सर्व अधिकार, आपण माझ्यावर सोपविले पाहिजेत.' राजाला अट मान्य करण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. पालखीतून मिरवत त्याने कवीला दरबारात नेले. सर्वांसमक्ष आर्थिक व्यवहाराची सूत्रे, त्याच्याकडे सोपविली. कवीने आपल्या बुद्धिबलाने आणि हेरयंत्रणेच्या मदतीने, मगधावरील त्या महान संकटाचे निवारण केले.

◆◆◆

## (५)

## कवि आणि चाणक्य यांची भेट

असाच एकदा कवि पाटलिपुत्राच्या आसपासच्या प्रदेशात फेरफटका मारत होता. एका पर्णकुटीच्या जवळ त्याने एक दृश्य पाहिले. ते पाहून तो थबकलाच. एक तरणाबांड तेजस्वी युवक, जमिनीवर बसून बाभळीच्या जाड काट्याने, आपल्या पायाच्या टाचेत गेलेले कुसळ, काळजीपूर्वक काढत होता. कुसळ तर त्याने झटकन काढलेच पण एक अणकुचीदार हत्यार घेऊन, नंतर तो जमिनीत खोलवर रुजलेल्या

दर्भाची मुळे, खणून काढू लागला. आजूबाजूची माती अलगद खुरपत-खुरपत त्याने, हातभर जमीन खणली. शेवटच्या मुळापर्यंत खणून, त्याने ते दर्भाचे झुडूप, सावधानपूर्वक कडेला टाकून दिले. त्या सर्व हालचाली कवि निरखून पहात होता. थोड्याच वेळात त्याने, आपल्या बायकोच्या भाच्याला अर्थात् चाणक्याला ओळखले. परंतु ओळख न दाखविता, हात झटकून पर्णकुटीकडे जाणाऱ्या चाणक्याला अडविले. तो पुढे होऊन चाणक्याला म्हणाला, 'अरे ! त्या दर्भसूचीच्या इतका का मागे लागला होतास?' चाणक्य म्हणाला, ''मंत्रिमहोदय, पहा-पहा ! या दर्भसूचीने माझा पाय केवढा रक्तबंबाळ केला आहे. पुन्हा-पुन्हा हे घडू नये म्हणून, त्या दर्भाचे झुडूप मुळापासून उखडून टाकले. काटा काय आणि माणूस काय जो आपल्या निष्कारण वाटेला जातो, त्याचा समूळ उच्छेद वेळेवरच केला नाही तर तो आपलाच घात करतो. कोणत्याच गोष्टीचा मुळापासून बंदोबस्त केल्याशिवाय मी थांबत नाही.''

चाणक्याचा तो आवेश आणि निर्धार बघून, कवीच्या मनातली ती दीर्घकाळ दडपून टाकलेली द्वेषभावना, उसळून वर आली. नंदाचा सूड घेण्यासाठी आवश्यक वेळ आणि आवश्यक माणूस, याच्या शोधात तो होताच. शारीरिक सुदृढता, मनोबल आणि बुद्धिमत्ता हे तीनही गुण एकवटलेला चाणक्य, कवीच्या मनात भरला. त्याने चाणक्याला म्हटले, 'इथे राहायला आलेला दिसतोस ! तर मग नंदाच्या राजसभेत काही दिवस उपस्थिती लावीत जा. माझे लक्ष तुझ्याकडे आहेच.'

कविमंत्र्याच्या सांगण्यानुसार चाणक्य, राजसभेत हजर राहू लागला. राजसभेतील एका स्तंभावर कवीने एक श्लोक लिहिला —

**शक्यमेकसहस्रेण नयशास्त्रयुतेन च ।**

**व्यवसायेन युक्तेन जेतुं शक्या वसुन्धरा ।।**

अर्थात् – जे राजनीतिशास्त्रात निपुण आहेत आणि अत्यंत उद्यमशील आहेत, अशी एक हजार माणसे एकत्र आली तर, संपूर्ण पृथ्वीचे राज्य जिंकून घेऊ शकतात.

कवीच्या अंदाजानुसार चाणक्याचे लक्ष त्या श्लोकाकडे गेलेच. त्याने ताबडतोब त्याच्या समोरच्या स्तंभावर, दुसरा श्लोक स्वतःच्या हाताने लिहिला–

**नरेणैकशरीरेण नयशास्त्रयुतेन च ।**

**व्यवसायेन युक्तेन जेतुं शक्या वसुन्धरा ।।**

अर्थात् – नीतिशास्त्रात निपुण आणि अत्यंत उद्यमशील असलेला मनुष्य, केवळ एकट्याच्या बळावरसुद्धा पृथ्वीचे राज्य जिंकू शकतो.

कवीने समोरच्या स्तंभावर चाणक्याने लिहिलेला नवा श्लोक वाचला. केवळ एकच शब्द बदलून त्याने, जो आत्मविश्वास प्रगट केला होता, त्यामुळे कवि हा चाणक्यावर अतिशय संतुष्ट झाला. आपले ध्येय गाठण्याच्या दृष्टीने त्वरेने पावले टाकायला लागायची असा मनोमन निश्चय त्याने केला. त्या योजनेचा पहिला भाग म्हणून कवीने, चाणक्याला यशोमतीसह, आपल्या घरी भोजनाचे निमंत्रण दिले. चाणक्याला आश्चर्यच वाटले. तरी त्याचा मान राखावयाचा म्हणून दोघे, कवीच्या घरी भोजनासाठी गेले. कवीची योजना काही वेगळीच होती. त्याने दरम्यानच्या काळात चाणक्याच्या पर्णकुटीच्या जवळ, आपल्या माणसांना सांगून, खड्डा खणून, काही दीनार पुरण्यास सांगितले. दीनारांच्या थैलीत अशी चिठ्ठी टाकली की, 'प्रसन्न झालेल्या नंदराजाने आपणास हे दीनार दिले आहेत. आपला यथायोग्य गौरव करण्याचेही त्याच्या मनात आहे.' कवीच्या माणसांनी आपले काम चोख बजावले.

जेवण झाल्यावर चाणक्य आणि यशोमती दोघेही परत आले. यशोमतीला दिसले की अंगणात कोणीतरी घाईघाईने उकरले आहे आणि पुन्हा खड्डा बुजवला आहे. तिने चाणक्याला थांबविले. दोघांनी मिळून खड्डा उकरला. थैलीतील दीनार पाहिले. चिट्ठी वाचली. खरे तर चाणक्याला हे सर्व खूपच संशयास्पद वाटत होते. परंतु यशोमतीच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून, त्याने आपले मन आवरले. यशोमती म्हणाली, ''आर्य ! आपण ज्या हेतूने पाटलिपुत्रास आलो, तो हेतू सफल होण्याची वेळ आली आहे. आता आपण राजाच्या निमंत्रणाची वाट पाहू या. पुष्कळसे दीनार आणि कपिला गायी, तो नक्कीच आपल्याला देईल. दारिद्र्य संपण्याचा आपला योग आलेला दिसतो.'' चाणक्याने आपल्या पत्नीच्या मनात आलेली गोष्ट कवीला सांगितली.

◆◆◆

## (६)

## चाणक्याचा अपमान आणि प्रतिज्ञा

कवीच्या योजनेतील पुढच्या भागास आरंभ झाला. एकदा तो नंदास भेटायला गेल्यावर, त्याला असे दिसले की तो अतिशय प्रसन्न आहे. संधी साधून त्याने नंदास म्हटले की, 'महाराज ! आपल्या राज्यावरचे परचक्राचे संकट नुकतेच टळले आहे. कार्तिकी पौर्णिमेचा उत्सव अगदी जवळ आला आहे. आपल्या हातून काही पुण्यकर्म व्हावे अशी माझी इच्छा आहे. या प्रसंगी आपल्या राज्यातील पाच विद्वान ब्राह्मणांचा सत्कार करून, आपण विपुल पुण्य अर्जित करावे.' प्रसन्नचित्त नंदराजाने कवीच्या या प्रस्तावास तत्काळ संमती दिली. तसेही आर्थिक व्यवहाराचे अधिकार त्याने कवीकडे सोपविले होतेच. कवी तत्परतेने पुढील योजनेस लागला.

कार्तिकी पौर्णिमेचा दिवस उजाडला. नंदराजाच्या भोजनशाळेत राजा, राजपुत्र, मंत्रिगण आणि सत्कारार्थी ब्राह्मण यांची आसने सुव्यवस्थित पद्धतीने मांडून ठेवली होती. माध्याह्नकाळ झाला. चाणक्य सर्वांच्या आधीच तेथे आला. पंगतीतल्या अग्रासनावर म्हणजे प्रथम आसनावर आपले दर्भासन टाकून बसला. आसनव्यवस्थेची कल्पना नसल्यामुळे त्याने असा विचार केला की, पाच प्रमुख विद्वान ब्राह्मणांमध्ये माझी गणना केली असल्यामुळे, पाचपैकी कुठल्या ना कुठल्या आसनावर मला स्थान नक्कीच आहे. या हेतूने त्याने स्वत: बसलेले आसन सोडून, पुढील चार आसनांवर क्रमाने आपला कमंडलू, दंड, जपमाळ आणि जानवे ठेवून त्या जागाही अडवल्या. भोजनसमयाचा घंटिकानाद झाला. नंदराजा हा सिद्धपुत्र (नैमित्तिक) आणि इतर लवाजम्यासह, भोजनशाळेत प्रविष्ट झाला. कवीने सिद्धपुत्राला आधीच देऊन ठेवलेल्या सूचनेनुसार सिद्धपुत्र नंदराजास म्हणू लागला, 'महाराज, पहा पहा ! या श्रोत्रिय ब्राह्मणाची सावली, राजपुत्रांसाठी ठेवलेल्या आसनांवर पडली आहे. याची ही अशुभछाया नंदवंशासाठी अनिष्ट आहे. याला कृपया या आसनावरून उठवावे.'

नंदराजाने कवीला जवळ बोलाविले. सिद्धपुत्राचे भविष्य सांगितले. कोणत्यातरी युक्तीने चाणक्याला तेथून उठवायला सांगितले. कवि मनातल्या मनात खुश झाला. चाणक्याजवळ आला. झुकून नम्रतापूर्वक म्हणाला, 'महाराज सांगत आहेत की, हे आसन त्यांचे आहे. तेव्हा या आसनावर बसू नका. हे बघा ! हे बघा ! इतरही ब्राह्मण इकडेच येत आहेत.' चाणक्याने कमंडलू उचलला व दर्भासन टाकून दुसऱ्या आसनावर बसला. कवि पुन्हा जवळ आला व म्हणाला, 'नित्याच्या परिपाटीनुसार हे आसन सुबंधूसाठी राखीव असते. तुम्ही कृपया पुढच्या आसनावर बसा.' एकीकडे अतिशय

नम्रतेचा आव आणीत कवीने कौशल्याने चाणक्याला चार आसने सोडावयास लावली. मनावर अतिशय संयम ठेवून चाणक्य, पाचव्या आसनाकडे वळला. आता कवीच्या पूर्वसूचनेनुसार राजाची दासी, चाणक्याजवळ आली. तो पाचव्या आसनावर बसत असतानाच दासी म्हणाली, 'हे द्विजश्रेष्ठ ! हे आसन देखील, दुसऱ्या विद्वान ब्राह्मणासाठी राखीव आहे. मी असे सुचविते की, भोजनशाळेच्या बाहेरच्या बाजूला एक प्रतीक्षाकक्ष आहे. तेथे तुम्ही थांबा व भोजनाच्या निमंत्रणाची वाट पहा.'

आता मात्र चाणक्याच्या संयमाचा कडेलोट झाला. काठीने डिवचलेला नाग जसा फणा काढतो, त्याप्रमाणे चाणक्याचा स्वाभिमान डिवचला गेल्यामुळे, तो ताडकन उठून उभा राहिला. रागाने बेभान झाला. त्याचे डोळे रागाने आरक्त झाले. शेंडी हातात धरून, भोजनशाळेतील सर्वांनाच ऐकू जाईल एवढ्या मोठ्या कर्कश आवाजात नंदाला उद्देशून चाणक्य म्हणाला, 'महाराज ! आपण स्वत:ला मोठे न्यायी आणि विद्वान-पूजक मानता. सर्वार्थाने वेदविद्यापारंगत असलेल्या, माझ्यासारख्या ब्राह्मणाला, भर पंगतीत, असे ताटावरून उठविणे आणि भोजनशाळेच्या बाहेर काढणे, आपल्याला मुळीच शोभत नाही. आज मी अशी प्रतिज्ञा करतो की —

**कोशेन भृत्यैश्च निबद्धमूलं, पुत्रैश्च मित्रैश्च विवृद्धशाखम् ।**
**उत्पाट्य नन्दं परिवर्तयामि, हठाद् द्रुमं वायुरिवोग्रवेग: ।।'**

(राजकोश आणि भृत्यपरिवार ही ज्या वृक्षाची खोलवर रुजलेली मुळे आहेत, तसेच पुत्र आणि मित्र यांच्या शाखा-उपशाखांमुळे जो शोभायमान दिसतो आहे, अशा ह्या नंदरूपी महावृक्षाला झंझावाती वाऱ्याप्रमाणे मी मुळापासून उखडून टाकेन.)

चाणक्याच्या या भयंकर प्रतिज्ञेने प्रथम सर्व उपस्थित लोक स्तंभित झाले. दुसऱ्याच क्षणी नंदराजा भानावर आला आणि त्याने नोकरांना आज्ञा केली की, 'या उद्दाम ब्राह्मणाला गचांडी धरून, ताबडतोब राजवाड्याबाहेर हुसकावून लावा.' राजाचे बलदंड रक्षक त्याच्याकडे धावण्यापूर्वीच चाणक्य त्वरेने तेथून बाहेर पडला. कितीतरी वेळ क्रोधावेशाने धुमसत राहिला.

काही काळाने थोडा शांत झाल्यावर, तो नगराबाहेरील आपल्या पर्णकुटीत गेला. उत्सुकतेने वाट पाहणाऱ्या यशोमतीला, घडलेली हकिगत सांगितली. आपल्या पतीची ती घोर प्रतिज्ञा ऐकून, यशोमतीचा क्षणभर थरकाप झाला. प्रतिज्ञेपासून न हटण्याचा चाणक्याचा स्वभाव माहीत असल्याने, तिने मनोमन ठरविले की पतीला याबाबत पाठिंबाच द्यायचा. ती म्हणाली, ''आर्य ! शांत व्हा. आपल्यासारख्या कर्तृत्ववान व्यक्तीला काहीही अशक्य नाही. तसेही मी सासू-सासऱ्यांकडून ऐकलेच आहे की, तुमच्या लहानपणीच नैमित्तिकांनी असे भविष्य वर्तविले होते की, तुम्ही बिंबांतरित राजा व्हाल. बहुधा त्या भविष्याची वेळ जवळ येत चालली आहे. राजा बनण्यास योग्य अशा व्यक्तीचा शोध मात्र तुम्हास घ्यावयास पाहिजे.''

◆◆◆

## (७)

## भावी राजाचा शोध

चाणक्याची तैलबुद्धी आता त्वरेने कामाला लागली. त्याचा लोकसंग्रहही चांगला होता. आपली विश्वासू माणसे नंदाभोवती पेरून, तो बातम्या घेऊ लागला. नंदाच्या आश्रयाने जे अनेक कलानिपुण लोक रहात होते, त्यामध्ये मयूरपोषकांचा एक प्रमुख

आपल्या कुटुंबासह रहात होता. डोंगराळ भागात मूळ वस्ती करून राहणारा मयूरपोषक चपळ, हाडापेराने मजबूत आणि मोरांना चांगल्या प्रकारे वाढवून, प्रशिक्षण देण्यात तरबेज होता. उत्सवप्रसंगी, पिसारा फुलवलेल्या दोन मोरांना, काठ्यांवर घेऊन, त्यांच्या पायात नाजूक पैंजण बांधून, त्यांना नृत्य करावयास लावण्यात तो प्रवीण होता. त्याची रूपवती कन्या, एका क्षत्रियापासून गर्भवती होती. तिला घेऊन तो, डोंगराळ प्रदेशातील आपल्या मूळ गावाकडे गेला होता.

चाणक्याने काही आडाखे मनाशी बांधले. चांगला घोडा घेऊन, थोडा शिधा बरोबर घेऊन, तो मयूरपोषकाच्या शोधार्थ, डोंगराळ प्रदेशाकडे निघाला. चौकशी करता-करता त्याला, त्याचे नेमके स्थान सापडले. घोडा सुरक्षित ठिकाणी बांधून, त्याची व्यवस्था लावून, त्याने परिव्राजकाचा वेष धारण केला. वस्तीवर जाऊन मयूरपोषकाच्या घरापर्यंत पोहोचला. त्याने परिव्राजकाचे आगत-स्वागत केले. त्याला

भिक्षा देण्यासाठी आलेल्या त्याच्या गर्भवती कन्येला चाणक्याने न्याहाळले. लक्षणशास्त्रात प्रवीण असल्यामुळे, त्याच्या लक्षात आले की, हिला एक अत्यंत सुलक्षणी पुत्र होणार आहे.

त्याने मग तिच्या पित्याजवळ, तिची आस्थेने विचारपूस केली. मयूरपोषक सचिंतपणे म्हणाला, 'हे परिव्राजका ! माझ्या कन्येला काही विलक्षणच डोहाळे लागले आहेत. ती चंद्राचे पान करण्याचा (चंद्र पिण्याचा) हट्ट धरून बसली आहे.' चाणक्याच्या मनात एक अभिनव योजना साकारली. ती प्रत्यक्षात आणता येईल, असेही त्याला वाटले. तो आत्मविश्वासाने म्हणाला, 'एका अटीवर मी हिची दोहदपूर्ती करेन.' मयूरपोषकाने अट विचारली. चाणक्य म्हणाला, 'हिला होणारा पुत्र सहा-सात वर्षाचा झाल्यावर, जर तू माझ्याकडे सोपविणार असशील, तरच मी तिचे डोहाळे पूर्ण करेन.' मयूरपोषकाने संमती दिली. चाणक्य पुढील पूर्ततेस लागला.

पौर्णिमेची रात्र होती. चाणक्याने मोठ्या अंगणात एक पटमंडप घातला. पूर्णचंद्राचे योग्य स्थान लक्षात घेऊन, पटमंडपाच्या मधोमध एक छिद्र ठेवले. एका माणसाला आधीच सांगून, त्याने ते छिद्र झाडाच्या फांदीने तात्पुरते झाकले. एका पुरुषाला मदतीला घेऊन त्याने स्वत: आटीव दुधाची उत्कृष्ट खीर बनविली. पौर्णिमेचा पूर्ण चंद्र आकाशाच्या मधोमध आला. त्याने खिरीचे पात्र, त्या झाकलेल्या छिद्राच्या बरोबर खाली एका पाटावर ठेवले. मांडवावर चढलेल्या माणसाला, नजरेने संकेत दिला. त्याने त्या छिद्रावरील फांदी दूर केली. पौर्णिमेचा चंद्र आणि त्याचे शीतल चांदणे खिरीवर पडले. ती कन्या उत्सुकतेने आणि आनंदाने पहात होती. काही काळ त्याने चंद्रप्रकाश पडू दिला. पुन्हा संकेत दिल्यावर पुरुषाने छिद्र झाकून टाकले. चाणक्य हसत-हसत कन्येला म्हणाला, 'हे

कन्ये, बघ ! आता इथे चंद्र होता, आता तो लगेचच गुप्त झाला. तो खिरीत शिरला आहे. तू आता आनंदाने ही खीर पिऊन टाक.'

कन्या अतिशय प्रसन्न झाली. तिने खीर प्यायली. पाहणारे सर्वच जण चाणक्याच्या युक्तीने अतिशय प्रभावित झाले. दुसरा दिवस उजाडला. मयूरपोषकाचा निरोप घेताना चाणक्य म्हणाला, ''हे भल्या माणसा ! मला दिलेला शब्द तू लक्षात ठेव. मी सहा-सात वर्षांनी परत येईन. एक मात्र कर की, बालकाचे नाव 'चंद्रगुप्त' असे ठेव.'' सर्वांनी चाणक्याला आनंदाने निरोप दिला. चाणक्य घोडा ठेवलेल्या जागी आला. परिव्राजकाचा वेष सोडून त्याने वीरवेष धारण केला. आता त्याला आपली योजना तडीस नेण्यासाठी, आवश्यक ती आर्थिक व्यवस्था करायची होती.

त्याने माणसांची जमवाजमव केली. सोन्याच्या आणि चांदीच्या खाणींचे प्रदेश शोधत, त्याने खूप भटकंती केली. आपल्या खनिजविद्येच्या साहाय्याने खाणींची योग्य स्थाने शोधली. अनेकांचे सहकार्य घेतले. खाणीतील मौल्यवान धातूंचा योग्य तो वाटा देण्याचे मान्य करून, माणसे कामाला लावली. खाणीतील अशुद्ध धातू, शुद्ध करून घेतले. सोन्या-चांदीची नाणी पाडून घेतली. ती योग्य ठिकाणी सुरक्षित ठेवून व काही नाणी थैलीत बरोबर घेऊन, तो पुन्हा अनेक प्रदेशांचे आणि माणसांचे निरीक्षण करीत-करीत मयूरपोषकाच्या गावी येऊन पोहोचला. ही सगळी व्यवस्था करण्यात सहा-सात वर्षे उलटून गेली होती.

गावाबाहेरच्या आमराईत, चाणक्याला एक विलक्षण दृश्य दिसले. झाडाआड लपून तो ते दृश्य पाहू लागला. आठ-दहा लहान मुले, 'राजा-राजा' असा एक वेगळाच खेळ खेळत होती. दगडावर दगड ठेवून, एक उंच आसन तयार केले होते. पानाफुलांचा

मुकुट घालून आणि एक काठी राजदंड म्हणून हातात घेऊन, एक लहान मुलगा ऐटीत सिंहासनावर बसला होता. इतर काही मुलांना हत्ती आणि घोडे बनायला लावून, मधून-मधून त्यांच्यावर बसून, आपल्या राज्यात फेरफटका मारत होता. राजा बनल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर, आत्मविश्वासाचे तेज फाकले होते.

परिव्राजकाचा वेष धारण केलेला चाणक्य झाडाआडून बाहेर आला. त्यांच्या खेळाशी एकरूप होऊन, सिंहासनासमोर जाऊन, विनम्रपणे खेळातल्या राजाला तो म्हणाला, 'महाराज ! मला काहीतरी चांगली भिक्षा द्या.' बालकाला फारच आनंद झाला. त्याने ऐटीत आजूबाजूला निरखून पाहिले. चाणक्याला म्हणाला, 'हे द्विजश्रेष्ठ ! या बाजूला चरत असलेल्या गायींचा, हा मोठाच्या मोठा कळप, मी तुम्हाला दान देत आहे. हा कळप तुम्ही घेऊन जा.' चाणक्य घाबरल्यासारखे करून म्हणाला, 'महाराज ! मी या गायी कशा घेऊन जाऊ ? कळपाच्या स्वामीला जर हे कळले, तर तो मला झोडपूनच काढील.' बालक म्हणाला, ''हे ब्राह्मणा ! तुला घाबरण्याची काहीही गरज नाही. राजाने देऊ केलेल्या दानाला, नकार देण्याचे धाडस, कोणाच्या अंगी असते का ? शिवाय माझ्या पराक्रमाने मी या कळपाच्या स्वामीची, अन्य काही व्यवस्था करेनच की ! '**वीरभोज्या वसुन्धरा**' हे आपणास माहीत नाही का ?''

चाणक्याने तत्काळ ओळखले की, हा नक्की चंद्रगुप्त आहे. हा सुलक्षणी राजबिंडा तर आहेच, पण शिक्षणाचेही चांगले संस्कार यावर झालेले दिसतात. आपल्या ताब्यात आल्यावर, हा नक्कीच खराखुरा पराक्रमी राजा बनेल. चाणक्याने त्याच्या मित्रमंडळींजवळ अधिक चौकशी केली. त्या मुलांना आणि चंद्रगुप्ताला माहीत होते की, त्याच्या आजोबांनी चंद्रगुप्ताला, फार पूर्वीच एका परिव्राजकाकडे सोपविले आहे.

चाणक्य चंद्रगुप्ताचा हात धरून मयूरपोषकाकडे आला. मयूरपोषकाने नातवाच्या वियोगाचे दु:ख मनात लपवून, चंद्रगुप्ताच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्याला परिव्राजकाच्या अर्थात् चाणक्याच्या स्वाधीन केले.

बाहेर पडताच चाणक्य, चंद्रगुप्तासह घोड्यावर स्वार झाला. त्याला आत्मविश्वासाने म्हणाला, 'चंद्रगुप्ता ! इतके दिवस खेळातला राजा होतास. लक्षात ठेव, तुला पाटलिपुत्राचा खराखुरा राजा व्हावयाचे आहे. मी सतत तुझ्या पाठीशी राहीन.' त्या दृढनिश्चयी बालक चंद्रगुप्ताने, त्याच क्षणी चाणक्याला गुरुस्थानी मानले आणि खरोखरच अखेरच्या क्षणापर्यंत, त्याची ही गुरुनिष्ठा अभंग राहिली.

◆◆◆

## (८)

## पाटलिपुत्रावरील अयशस्वी स्वारी

आता चाणक्य, चंद्रगुप्तासह सैन्यातील पायदळ उभे करण्याच्या तयारीला लागला. त्याने प्राप्त केलेली सोन्या-चांदीची नाणी, या कामी त्याच्या उपयोगाला आली. पैशाच्या लोभाने पायदळात भरती झालेल्या, त्या तुटपुंज्या पायदळ सैन्याच्या मदतीने, त्याने चारही बाजूने पाटलिपुत्र नगरास वेढा घातला. त्या तुलनेने, खूप बलाढ्य सैन्य असलेल्या नंदसम्राटाने, आपले अनुभवी घोडदळ त्यांच्यावर पाठवून, हा हा म्हणता, चाणक्य-चंद्रगुप्ताचे भाडोत्री पायदळ हुसकावून लावले. आपली ही रणनीती अयशस्वी झाल्याचे पाहून, चाणक्याने चंद्रगुप्ताला घोड्यावर घातले. वायुवेगाने तेथून पलायन केले.

नंदाच्या सेनापतीने दोघेजण घोड्यावरून पळून गेल्याचे पाहिले. नंदाला निवेदन

केले. नंद म्हणाला, ‘त्यांना असे सहजी हातून निसटू देऊ नका. चार कुशल घोडेस्वारांना, सर्व दिशांना पाठवा. दिसता क्षणी, त्या दोघांना पकडून माझ्या स्वाधीन करा.’ नंदाच्या आज्ञेनुसार घोडेस्वार, चाणक्य-चंद्रगुप्ताच्या शोधासाठी निघाले. त्या अल्पशा विजयानेही नंदराजा हर्षभरित झाला आणि नगरजनांना उत्सव साजरा करायला सांगून, स्वत: भोगविलासात मग्न झाला.

◆◆◆

## (९)

## चाणक्य आणि चंद्रगुप्ताचा पाठलाग

पाठलाग करणाऱ्या घोडेस्वारांपैकी, सर्वात वेगवान घोडेस्वाराने, चाणक्य-चंद्रगुप्ताच्या घोड्याला दुरूनच पाहिले. चाणक्यालाही त्याच्या टापांची चाहूल लागली. क्षणार्धात त्याच्या बुद्धीने, एक निर्णय घेतला व ताबडतोब तो अमलात आणला.

दोघांनीही घोड्यावरून खाली उडी मारली. घोड्याला एका दाट झुडपात लपविले. समोर कमळांनी भरलेले एक तळे होते. चंद्रगुप्ताला त्या तळ्यात उडी मारून, लपून बसण्यास सांगितले. 'कमळाच्या पानाआडून माझ्याकडे लक्ष ठेव' - असेही सांगितले. स्वत: झटपट वेष बदलून, ध्यानस्थ योगी बनला. पद्मासन घालून ध्यान करू लागला.

नंदाचा घोडेस्वार चाणक्याजवळ येऊन पोहोचला. समाधीत बुडून गेलेल्या चाणक्याला पाहून, त्याला शंका देखील आली नाही. त्याने घोड्यावरूनच विचारले, 'अहो योगिमहाराज ! घोड्यावरून जाणारे दोघे, तुम्ही येथून पाहिलेत का ?' चाणक्याने मौनात असल्याचे भासवून, हाताने फक्त तळ्याकडे बोट दाखविले. घोडेस्वार आनंदित झाला. तो सावकाशीने घोड्यावरून उतरला. कपडे काढले. कमरेची तलवार शेजारी ठेवली. तळ्यात सूर मारणार तेवढ्यात, विजेच्या चपळाईने तीच तलवार उचलून, चाणक्याने घोडेस्वाराचा शिरच्छेद केला. शांतपणे हसत-हसत चंद्रगुप्ताला उद्देशून म्हणाला, 'वत्सा ! आता खुशाल बाहेर ये. धोका टळला.'

घोडेस्वाराचा सर्व पोषाख चढवून, कमरेला तलवार लावून, चाणक्य त्याच्याच घोड्यावर स्वार झाला. चंद्रगुप्ताला पुढे घेतले. वेगाने घोडा दौडविला. चाणक्याने चंद्रगुप्ताला प्रश्न विचारला, 'बाळा ! तू तळ्यात असताना, कमळाच्या पानाआडून काय पाहिलेस ?' तो म्हणाला, 'तुम्ही हाताने खूण करून, मी आत असल्याचे घोडेस्वाराला दाखविले.' चाणक्य म्हणाला, 'मग तू जिवाच्या भितीने बाहेर येऊन पळून का गेला

नाहीस ?' चंद्रगुप्ताने स्मितहास्य करीत म्हटले, 'गुरुजी ! मी क्षणभरही विचलित झालो नाही. मला पूर्ण खात्री आहे की, तुम्ही जे कराल ते माझ्या भल्यासाठीच आणि लगोलग तुम्ही तसे केलेतच की !'

◆◆◆

## (१०)

## दहीभाताचे भोजन

नंदाच्या घोडेस्वारांचा पाठलाग चुकविण्यासाठी, चाणक्य चंद्रगुप्तासह, सलग दोन दिवस रानावनातून घोडदौड करीत राहिला. त्या सहनशील कुमार चंद्रगुप्ताने हूं का चूं न करता, तहान-भूक आणि घोड्याचा वेगवान प्रवास सहन केला. तिसऱ्या दिवशी त्याचा भुकेने कळवळलेला म्लान चेहरा, चाणक्याला बघवेना. गावाची चाहूल लागताच, त्याने गावाबाहेरच घोडा थांबविला. त्याला सुरक्षित ठिकाणी ठेवून, चाणक्य भोजन शोधण्यासाठी, गावात जाण्याचा विचार करू लागला. इतक्यात गावाच्या वेशीवरून बाहेर येत असलेला, एक तुंदिलतनू ब्राह्मण त्याला दिसला. त्याच्या हातात पाण्याची लोटी होती. जानवे कानावर टाकले होते. नुकताच भरपेट जेवल्यामुळे, तडस लागलेल्या पोटावरून, तो हात फिरवत होता. चाणक्याच्या मनात एक कल्पना चमकून गेली. 'वा ! भोजन तर आयतेच समोरून चालत आले. गावात जा. भिक्षा मागा. अन्न मिळाले तर ठीक. पुन्हा परत जाण्यास वेळ लागला तर, नंदाने पाठलागावर सोडलेले घोडेस्वार, कदाचित् चंद्रगुप्ताला घेऊनही जातील. थोड्याशा गलथानपणामुळे, मोठेच नुकसान होऊन बसेल.'

क्षणार्धात चाणक्याने जवळचा अणकुचीदार चाकू काढला. ब्राह्मणाचे पोट अशा तऱ्हेने फाडले की, कोहळ्यातून त्याचा गर बाहेर यावा त्याप्रमाणे त्याच्या जठरातून, नुकतेच भोजन केलेला घट्ट दहीभात बाहेर आला. चाणक्याने एका जाड पानाचा द्रोण करून तो त्यात घेतला. अत्यंत प्रेमाने चंद्रगुप्ताला खाऊ घातला. जवळच्याच एका

तळ्यातले, त्यातल्या त्यात स्वच्छ पाणी बघून, द्रोणातून चंद्रगुप्ताला पाजले. त्याचक्षणी निद्रेच्या आधीन झालेल्या, चंद्रगुप्ताचे डोके मांडीवर घेऊन, त्याची झोप होण्याची वाट पाहू लागला. झाडाला टेकून स्वत:ही सावधपणे चाणक्याने डुलकी काढली.

## (११)

## म्हातारीचे चातुर्य

चंद्रगुप्ताला घेऊन चाणक्याचा प्रवास अजूनही चालूच होता. दुसऱ्या दिवशीची संध्याकाळ झाली. एका छोट्या वस्तीतले मिणमिणते दिवे, चाणक्याच्या नजरेस पडले.

त्याच्या जिवात जीव आला. घोडा दूर बांधून चाणक्य, चंद्रगुप्तासह गावात आला. त्याला एक शेतघर दिसले. घर कसले झापाची झोपडीच होती ती! चाणक्याने फटीतून आतील दृश्य पाहिले. एक म्हातारी चार नातवंडांना भोवती घेऊन, पळीने काहीतरी वाढत होती. 'आत जाण्यात काहीच धोका नाही'-असा अंदाज घेऊन चाणक्य, चंद्रगुप्तासह आत आला. म्हातारीने अतिथींचे हसतमुखाने स्वागत केले. चंद्रगुप्ताला आपल्या नातवंडांबरोबर जेवायला, मातीची पसरट थाळी दिली. चाणक्य एका कोपऱ्यात बसून सर्व दृश्य पहात होता.

घरात खूपच गरिबी दिसत होती. तरुण माणूस कोणीच नव्हता. म्हातारीने चुलीवर तांदळाची पेज कशीबशी रांधली होती. भुकेलेली नातवंडे आजी कधी वाढते, याचीच वाट पहात होते. आजीने पाचही मुलांना एक-एक ओगराळे भरून, गरम-गरम पेज वाढली. सर्वात छोट्या नातवंडाने पेजेच्या मधोमध हात घातला. बोटे भाजली म्हणून कळवळून रडू लागला. म्हातारीला प्रथम खूपच राग आला. त्याच्या पाठीवर चापट मारून, सहजच उद्गारली, 'त्या मेल्या चाणक्यासारखाच दिसतोस. पेज कडेकडेने खायची असते, हे तुला माहीत नाही का ?' चाणक्याने स्वत:ची ओळख न देता सहजपणे विचारले, 'म्हातारे ! चाणक्याला ग कशाला मधे आणतेस ? त्याने काय केले आहे ?' म्हातारी म्हणाली, 'दुसरे काय म्हणू ? आजूबाजूची गावे प्रथम जिंकत-जिंकत, नंतर मोठे सैन्य घेऊनच, पाटलिपुत्रावर हल्ला करायला हवा होता. एकदमच मधे हात घातला तर पोळल्याशिवाय राहील का ? यातली चूक मला कळते तर त्या बुद्धिमान म्हणवणाऱ्या चाणक्याला कळू नव्हे काय ?'

रात्री तेथेच आसरा घेऊन, दुसऱ्या दिवशी सकाळी, म्हातारीचे मन:पूर्वक आभार मानून, चंद्रगुप्ताला घेऊन चाणक्य निघाला. म्हातारीचे शहाणपण लक्षात घेऊन, त्याने

◆◆◆

आपली युद्धनीती, पूर्ण बदलण्याचा निश्चय केला. सैन्य उभारणीच्या वेगळ्या योजना आखल्या.

◆◆◆

## (१२)

## पर्वतकाचा शोध, भेट आणि सहाय्य

त्यानंतर चाणक्य, आजूबाजूच्या प्रदेशातील राजांच्या सैन्यबलाची, बित्तंबातमी काढू लागला. चाणक्याचा जनसंपर्क आणि खबरी दूतांचे जाळे अतिशय सक्षम होते. अशीच एके दिवशी एका खबऱ्याने बातमी आणली की, ''हिमालयाच्या डोंगराळ प्रदेशात, 'पर्वतक' नावाचा राजा आहे. त्याचे सैन्य अत्यंत शिस्तबद्ध आणि शस्त्रसज्ज आहे. पर्वतक स्वत: अतिशय पराक्रमी बुद्धिमान असून, तो शिस्तप्रिय आहे. व्यूहरचनेत कुशल आहे आणि दिलेल्या शब्दाला जागणारा आहे.''

चाणक्याने त्वरेने निर्णय घेतला की, पर्वतकाची भेट घेऊन त्याला प्रभावित करावयाचे. त्याच्याशी हातमिळवणी करून, त्याच्या सुसज्ज सैन्यबळाच्या आधारानेच, मगधाचे राज्य क्रमाक्रमाने जिंकून घ्यायचे. नंतर चाणक्याने डोंगराळ भागातील शूर तरुणांचे सैन्य उभारावयाची तयारी चालू केली. चंद्रगुप्तालाही तो स्वत:, व्यूहरचनेचे प्रशिक्षण देऊ लागला. पुरेसे सैन्य जमल्यावर, तो पर्वतकाच्या सीमावर्ती प्रदेशातील, एक गिरिदुर्गावर जाऊन राहिला. त्याने आपल्या खबऱ्यांमार्फत अशी बातमी पर्वतकापर्यंत पोहोचवली की, 'अमुक एका गिरिदुर्गावर, एक तल्लख बुद्धीचा अमात्य व एक विजिगीषु राजपुत्र – असे दोघे निवास करीत आहेत.' पर्वतकाच्या सल्लागाराने असा सल्ला दिला की, 'आपल्या राज्यविस्तारासाठी, त्या दोघांशी राजकीय संबंध प्रस्थापित करण्यास हरकत नाही.'

पर्वतकाने मैत्रीचा हात पुढे केल्यावर, चाणक्य आपल्या सामर्थ्यानिशी चंद्रगुप्तासह पर्वतकाच्या भेटीला आला. त्याने आपल्या वाक्चातुर्याने पर्वतकाला आपलेसे करून घेतले. दरम्यान चंद्रगुप्त सुमारे वीस वर्षाचा झाला होता. चाणक्याच्या सल्लामसलतींवर आणि चंद्रगुप्ताच्या युद्धकलेतील प्राविण्यावर, पर्वतक खुश झाला. चाणक्याने मगध राज्य, नंदराजे, त्याची पाटलिपुत्र ही राजधानी आणि नंदराजाची दुर्बल स्थाने - या सर्वांची इत्थंभूत माहिती पर्वतकाला दिली.साम-दान-दंड-भेद या चार राजनैतिक उपायांनी पाटलिपुत्र ताब्यात घेणे कसे शक्य आहे, हे चाणक्याने पर्वतकाच्या गळी उतरविले.

पाटलिपुत्रावर क्रमाक्रमाने चालून जाण्याची योजना बनविली. चाणक्याने पर्वतकाला म्हटले, 'आता आपली पुरेशी तयारी झाली आहे. आपण मगधावर आक्रमण करू. नंदराजाला समूळ उखडून टाकू. मी स्वत: मगधाचे राज्य, तुम्हा दोघांमध्ये अर्धे-अर्धे विभागून देईन.'

◆◆◆

## (१३)

## पर्वतकासह मगधावर स्वारी

मगधाच्या आजूबाजूची छोटी-मोठी राज्ये जिंकत-जिंकत, चंद्रगुप्त आणि पर्वतक यांची आगेकूच, पाटलिपुत्राच्या दिशेने चालू झाली. त्यातील एक छोटे राज्य इतके बलशाली होते की, त्याचा पराभव करता येत नव्हता. यात काहीतरी मेख आहे, हे चाणक्याने ओळखले. त्याने त्रिदंडी परिव्राजकाचा वेष घेतला. गावातील सर्व रस्त्यांवरून, बारकाईने निरीक्षण करीत फिरू लागला. एके ठिकाणी त्याला गावाचे रक्षण करणाऱ्या, इंद्रकुमारी देवतांच्या प्रतिमा दिसल्या. त्यांची विधिपूर्वक पूजा केली जात होती. चाणक्याला गावाचा पराभव न होण्याचे कारण लगेच समजले. त्याने काही सेवकांना, त्या प्रतिमा नीट उचलून, गावाच्या वेशीपासून दूर, एका झाडाच्या पारावर, नीट ठेवावयास सांगितल्या. दोनच दिवसात ते गाव जिंकता आले. चाणक्याची अटकळ खरी ठरली.

हे गाव जिंकल्यानंतर, पाटलिपुत्राकडे जाण्याचा मार्ग मोकळा झाला. चाणक्याने मग चंद्रगुप्त आणि पर्वतक या दोन महारथींना सांगितले की, 'आता आपल्या संयुक्त सैन्यदलाच्या सहाय्याने, पूर्ण पाटलिपुत्राला वेढा घाला. योग्य अस्त्र-शस्त्रांनी छोटे-

छोटे हल्ले करत, राजप्रासादापर्यंत जाऊन पोहोचा. माझ्या हेरांनी वश करून घेतलेली, नंदराजाची फितूर माणसे, तुम्हाला याबाबत सहाय्य करतील.' क्षीणकोष, क्षीणबल, क्षीणबुद्धी आणि क्षीणपराक्रम असा नंद, क्षीणपुण्य होऊन, नाकात दम येऊन चाणक्याजवळ आला आणि त्याने संपूर्ण शरणागती पत्करली.

नंदराजा म्हणाला, 'मी संपूर्ण शरण आलो आहे. माझे प्राण हरण करू नका. मला धर्मद्वार द्या. मी शांतपणे निघून जाईन.' चाणक्याने आज्ञा केली की, 'पराक्रमी माणसे शरणागताला नेहमीच अभय देतात. तू बरोबर एक रथ घे. त्या रथात तुला जेवढे काही बरोबर घेता येईल, तेवढे तू बरोबर घेऊन जाऊ शकतोस.' नंदराजाने आपल्या दोन पत्नी, एक कन्या आणि शक्य तेवढे मौल्यवान धन रथात ठेवले. नंदराजा नगराबाहेर पडू लागला. त्याचवेळी रथावर आरूढ झालेला चंद्रगुप्त, नगरात प्रवेश करीत होता. नंदकन्येने त्या तेजस्वी चंद्रगुप्ताकडे, प्रेमपूर्ण कटाक्ष टाकले. चंद्रगुप्ताला तिच्या नजरेतील, अभिलाषा

आणि प्रेम तत्काळ समजले. त्याची हृदयवीणा झंकारू लागली.

नंदानेही आपल्या कन्येचे मन जाणले. म्हणाला, 'वत्से ! तुझ्यासारखी स्वरूपसुंदर राजकन्या, स्वयंवरास पात्र आहे. प्राय: क्षत्रियकन्यांचे स्वयंवरच होत असते. हे आयुष्मती ! तू रथातून उतर. तुला प्रिय असलेल्या या योद्ध्याच्या रथावर आरूढ हो. तुला रथावर घेताना, हा तुला हात देईल. तुझे पाणिग्रहण पाहण्याचा लाभही मला मिळेल. तुला योग्य वर लाभल्याने, माझे हृदयशल्य दूर होईल.' नंदकन्या हर्षभराने रथातून उतरली. ती चंद्रगुप्ताच्या रथावर आरूढ होत असताना, एक मोठेच आश्चर्य घडले. चरकात पिळल्या जाणाऱ्या इक्षुयष्टींप्रमाणे अचानक चंद्रगुप्ताच्या रथाचे नऊ आरे, मोठा आवाज करून तुटून पडले. चंद्रगुप्ताच्या मनात आले, 'या अशुभलक्षणी कन्येला, मी रथावर का घ्यावे ?' त्याचा संभ्रम पाहून चाणक्य म्हणाला, 'चंद्रगुप्ता ! हिला अडवू नकोस. ही घडलेली घटना, हा शुभसंकेतच आहे. यातून असा शुभसंकेत मिळत आहे की, तुझ्या वंशातील नऊ राजपुरुष पाटलिपुत्राचे आधिपत्य करणार आहेत.'

चाणक्य खरोखरीच या अशुभ संकेताने हर्षभरित झाला. कारण नऊ नंदांच्या वंशक्षयाची त्याची प्रतिज्ञा, या संकेताने पूर्ण होणार होती.

त्यानंतर चंद्रगुप्त आणि पर्वतक यांचा, नंदाच्या प्रासादात प्रवेश झाला. राजसभेत दोन सिंहासने तयार करण्यात आली. हे दोन जिवलग मित्र, गुण्यागोविंदाने एकत्रितपणे राज्य करू लागले.

◆◆◆

## (१४)

## पर्वतकाचा वध आणि चंद्रगुप्ताचा राज्याभिषेक

नंदराजाच्या प्रचंड प्रासादातील सर्व दालनांची, काळजीपूर्वक पाहणी करत असताना, चाणक्याला एक आश्चर्यकारक गोष्ट दिसली. अंत:पुरातील एका गुप्त कक्षात, एका कन्येला नंदराजाने ठेवलेले दिसले. तिच्या सर्व लक्षणांवरून चाणक्याने जाणले की, ह्या कन्येला तिच्या जन्मदिवसापासून तारुण्यापर्यंत, रोज थोडी-थोडी विषाची मात्रा चढवून नंदराजाने ही विषकन्या तयार केली आहे. ही विषकन्या अतिशय लावण्यवती असून, बुद्धिमानही आहे. चाणक्याचे विचारचक्र जोरात चालू झाले. ती विषकन्या वारंवार पर्वतकाच्या नजरेस पडेल, अशी व्यवस्था त्याने केली. तिचे रहस्य मात्र अतिशय गुप्त ठेवले. पर्वतक, तिच्या अपूर्व लावण्यावर अनुरक्त झाला. एखाद्या देवतेप्रमाणे तिला हृदयात ठेवून, रात्रंदिवस तिचेच ध्यान करू लागला. चंद्रगुप्ताच्या लक्षात ही गोष्ट आली. चाणक्यानेही चंद्रगुप्ताशी ह्याबाबत मनमोकळी बातचीत केली. तिचे खरे स्वरूप मात्र, चंद्रगुप्तापासून लपविले. चंद्रगुप्त आणि चाणक्य यांनी मिळून, त्या दोघांच्या विवाहाची जोरदार तयारी चालू केली.

विवाहसोहळा चालू झाला. विषकन्येचा हात हातात घेऊन, पर्वतक होमाग्नीच्या भोवती सात फेरे घेऊ लागला. वातावरणात उष्णता होती. होमकुंडाच्या धगीने विषकन्येच्या हाताला, चांगलाच घाम फुटला. त्या घामाच्या जहाल विषारी स्पर्शाने पर्वतकाच्या अंगात हळूहळू विष भिनू लागले. त्याची गात्रे शिथिल होऊ लागली. आपल्याला भोवळ येईल, असे वाटू लागले. त्याने खूण करून प्रिय मित्र चंद्रगुप्ताला जवळ बोलावून, त्याच्या कानात सांगितले की, 'मित्रा ! माझी गात्रे शिथिल झाली आहेत. थोड्याच वेळात, मी मरून जाईन की काय, असे वाटते.' पर्वतकावरील त्या संकटाने, अतिशय भावनाविवश झालेला चंद्रगुप्त, त्याला सावरण्यासाठी तत्काळ पुढे धावला. चंद्रगुप्ताच्या

मनात असे होते की, वैद्य व मांत्रिकांकडून याच्यावर उपचार करणे आवश्यक आहे. परंतु कोणताही महत्त्वाचा निर्णय, चाणक्याच्या अनुमतीशिवाय तो घेत नसल्याने, त्याने चाणक्याकडे दृष्टिक्षेप टाकला. चाणक्याने डावी भुवई उंचावून, चंद्रगुप्ताला काहीही हालचाल न करण्याचा संकेत देऊन दटावले. चाणक्याचा आदेश जाणून चंद्रगुप्त स्तब्ध राहिला.

चाणक्याने यावेळी विचार केला की, ‘‘अर्ध्या राज्याचा भागीदार असलेल्या मित्राचा जर आपण वेळेवरच काटा काढला नाही, तर भविष्यकाळात तो आपला काटा

काढल्याशिवाय रहात नाही, असा राजनीतीतील सिद्धांत आहे. चंद्रगुप्तावर कोणताही कलंक न येता, अनायासेच जर पर्वतकाचा काटा दूर होतो आहे, तर चंद्रगुप्ताला मगधाचा एकमेव सम्राट बनविण्याचे माझे स्वप्न, आपोआपच पूर्ण होत आहे.'' यथाकाल हिमवंत शिखराचा राजा पर्वतक मरण पावला. चंद्रगुप्त दोन्ही राज्यांचा स्वामी झाला. त्याचे एकछत्री साम्राज्य घोषित करण्यासाठी, चाणक्याने महावीरनिर्वाणानंतर १५५ वर्षांनी चंद्रगुप्त मौर्याला मगधाच्या सिंहासनावर बसवून, राज्याभिषेक केला.

◆◆◆

## (१५)

## नलदामाकडून नंदपुरुषांचा बंदोबस्त

कुसुमपुरात (पाटलिपुत्रात) नवाच उपद्रव उद्‌भवला होता. नंदांच्या संपर्कातले स्वजन-परिजन, नोकर-चाकर, दास-दासी आणि आश्रित या सर्वांचा पोषणकर्ता अचानक निघून गेल्यामुळे, त्यांच्यापुढे उपजीविकेचा प्रश्न उभा राहिला. चाणक्याचे हेर पाळतीवर असल्याने, त्यांना उघडपणे कामधंदाही करता येईना. नगराच्या आसपास गुप्त ठिकाणी राहून, हे सर्व लोक रात्री-बेरात्री नगरात शिरून, चोऱ्यामाऱ्या करू लागले. त्यांच्यापैकी जे सशस्त्र होते, ते किरकोळ हल्ले करून, लूटमारही करू लागले. या सर्वांचा बंदोबस्त करण्यासाठी एका दक्ष कोतवालाची (नगररक्षकाची) आवश्यकता होती. नीट पारख केल्याशिवाय, कोणाचीही नेमणूक करावयाची नाही, हे चाणक्याचे तत्त्व होते. बलदंड शरीरयष्टीच्या, उग्र आणि बुद्धिमान माणसाचा, चाणक्य शोध घेऊ लागला.

एकदा चाणक्य असाच वेषांतर करून, नगराबाहेरील प्रदेशात फेरफटका मारत होता. त्याने पाहिले की, 'नलदाम' नावाचा एक उंचनिंच काटक आणि गंभीर चेहऱ्याचा

विणकर, अतिशय एकाग्रतेने मागावर सतरंजी विणण्याचे काम करीत होता. नलदामाच्या कुटुंबातील मुलेबाळे, समोरच्या अंगणात खेळत होती. अचानक त्यातील काही मुले, जोरजोराने किंचाळून रडू लागली. नलदाम त्वरेने अंगणात आला. मोठमोठ्या लाल मुंग्या त्या मुलांच्या हातापायाला, कडकडून चावल्या होत्या. मोठमोठ्या गाठी आल्या होत्या व आग होत होती. नलदामाने झटकन त्यांचे हातपाय धुतले आणि त्यांच्या दंशावर लाल मातीचा लेप लावला. काम बाजूला ठेवून त्याने, मुंग्यांच्या रांगेकडे लक्ष देण्यास सुरवात केली. शोध घेत-घेत बाजूला असलेल्या झाडाखाली, त्याला मुंग्यांचे भलेमोठे वारूळ दिसले.

शेजारच्या गोठ्यात जाऊन, त्याने शेणाच्या वाळलेल्या गोवऱ्या, त्या वारुळाभोवती हलक्या हाताने खणून, गोल मांडल्या. त्यांवर वाळलेल्या गवताचे भारे रचले. घरात जाऊन चुलीतले निखारे आणले. गोवऱ्यांवर आणि गवतावर ते ठेवताच, त्यांनी पेट घेतला. वारुळातून भराभर बाहेर पडलेल्या मुंग्या, त्या आगीत जळून भस्मसात् झाल्या. सर्व काम पूर्ण होताच, त्याने हंडाभर पाणी आणून, ती राखही शांत केली. मुलांना म्हणाला, ‘लेकरांनो ! तुम्हाला चावणाऱ्या मुंग्यांचा, कायमचा बंदोबस्त केला आहे. आता खुशाल अंगणात खेळा.’

नलदामाची शोधवृत्ती, निर्णयशक्ती, करारी मुद्रा आणि काम शेवटपर्यंत न्यायची चिकाटी पाहून, चाणक्याने मनोमन म्हटले, ‘वा ! मला हवा तसा नगररक्षक अखेर मिळाला तर !’ चाणक्य परत गेला. त्याने चंद्रगुप्ताच्या कानावर सर्व हकिगत घातली.

रीतसर दूत पाठवून, नलदामाला राजसभेत येण्याचे निमंत्रण दिले. योग्य तो सन्मान करून, आरक्षकपदाची सूत्रे त्याच्याकडे सोपविली. राजाच्या गुणग्राहकतेने भारावून गेलेला नलदाम, अत्यंत तडफेने, रात्रंदिवस नगराच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडू लागला.

काही दिवसांनंतर चाणक्याने नलदामाला बोलावून, त्याच्या मनातील अंतस्थ हेतू त्याला सांगितला. नलदामाने तत्परतेने होकार दिला. चाणक्याने काही चतुर हेरांची कुमक, नलदामाला दिली. नलदामाने त्यांच्या सहाय्याने, नंदांच्या उपजीव्य माणसांशी, अतिशय मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. त्यांना पूर्ण विश्वासात घेतले. सर्वांना एकत्रित येऊन, चंद्रगुप्ताची राजवट उलथून टाकण्याचे कारस्थान रचावयास सांगितले. त्यासाठी सर्वांना मुलाबाळांसकट, स्वतःच्या घरी, विशेष भोजनाचे निमंत्रण दिले. पूर्वीचे वैभव प्राप्त करण्याच्या आशेने, सर्वजण तत्परतेने, नलदामाच्या घरी भोजनासाठी आले. चर्चा खूपच रंगात आली. अखेर पंगत बसली. नलदामाने खास स्वतः तयार केलेली 'विषमिश्रित खीर', सर्वांना आग्रहाने वाढली. त्या विषमिश्रित भोजनाने, नंदपरिवारातील सर्व माणसे, मरण पावली. नंदराजाचा समूळ उच्छेद करण्याच्या प्रतिज्ञेचा, एक अतिशय मोठा भाग, चाणक्याने नलदामाच्या सहाय्याने पार पाडला होता.

◆◆◆

## (१६)

## आज्ञाभंगाचा परिणाम

पाटलिपुत्राची सुरक्षा साध्य केल्यानंतर, चाणक्याने आपले लक्ष, आजूबाजूच्या खेडेगावांवर केंद्रित केले. प्रत्येक गावाची पाहणी करण्यासाठी, हेरांच्या नेमणुका केल्या.

हळूहळू एकेका गावाची इत्थंभूत माहिती, चाणक्याकडे येऊ लागली.

एके दिवशी एका जवळच्या खेड्याची, पाहणी करून आलेल्या हेराने, चाणक्याची एकांतात भेट घेतली. त्याला निवेदन केले की, 'अमात्य ! या गावातील परिस्थिती फार गंभीर आहे. येथे फार मोठ्या प्रमाणात, क्षत्रियांची वस्ती आहे. ते सतत एकत्र येऊन, गावकऱ्यांना फितवत असतात. मयूरपोषकाच्या हलक्या कुळात जन्माला आलेल्या चंद्रगुप्ताच्या आज्ञा, गावकऱ्यांनी पाळू नयेत, अशा प्रकारे प्रोत्साहन देतात. सांप्रत जणू सर्व गावच बंडाळी करण्याच्या तयारीत आहे.'

चाणक्याला जाणवले की, मामला फारच गंभीर आहे. त्याने आपल्या तल्लख बुद्धीने, मोठीच उपाययोजना आखली. त्या गावाच्या एका बाजूला बांबूंची बेटे होती. दुसऱ्या बाजूला डेरेदार वृक्षांची आमराई होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन, त्याने तोंडी निरोप देऊन, एका दूताला पाठविले. चाणक्याने पढविल्याप्रमाणे तो दूत जाऊन ग्रामप्रमुखांना म्हणाला, महाराज चंद्रगुप्तांची अशी आज्ञा आहे की, 'तुम्ही सर्वांनी मिळून बांबूंच्या बेटाभोवती आम्रवृक्षांच्या लाकडांचे कुंपण घाला.' या आज्ञेत एक प्रतीकात्मकता होती. कुलीन क्षत्रिय हे आम्रवृक्षांचे प्रतीक होते. बांबू हे हीनकुलातील चंद्रगुप्ताचे प्रतीक होते. आज्ञेचा भावार्थ असा होता की, उच्चकुलीन क्षत्रियांनी, हीनकुलीन चंद्रगुप्ताला अनुकूल व्हावे व त्याचे संरक्षण करण्यास सहाय्य करावे.

ग्रामसभा भरली. क्षत्रियांनी त्या राजाज्ञेची खूप टिंगल उडविली. त्यांना त्यातील प्रतीकात्मकता मुळीच समजली नाही. ते म्हणाले, 'हा शूद्र जातीचा राजा, अतिशय मूर्ख दिसतो. किंवा कदाचित् तोंडी निरोप सांगणाऱ्याने उलटा निरोप सांगितला असावा. तेव्हा आपण बांबू तोडून, आमराईला कुंपण घालावे, हे बरे!'

काही महिन्यांनंतर खबरबात घेण्यासाठी, चाणक्याने हेराला पाठविले. त्याने परत येऊन, चाणक्याला सर्व वस्तुस्थिती सांगितली. चाणक्याला आनंद झाला. कारण राजाच्या आज्ञेचा भंग केल्याचा आरोप ठेवून, त्यांना कडक शासन करता येणार होते.चाणक्याने एक दूत पुरेशा सैन्यासह, त्या गावाकडे पाठविला. सैनिकांनी कुंपणाभोवती वेढा घातला. दूताने न्यायाधीशाची भूमिका बजावून, गावातील सर्व आबालवृद्धांवर आज्ञाभंगाचा गुन्हा दाखल केला. सैनिकांनी सर्व आबालवृद्धांना कुंपणाच्या आत टाकले. सर्व बाजूंनी कुंपणाला आग लावून दिली.

बंडाळी करण्याचा मनोदय बाळगणाऱ्या सर्वांना, अशी काही जरब बसली की, 'चंद्रगुप्त मौर्याच्या आज्ञेचा भंग म्हणजे साक्षात् मरणच'-असा संदेश मगधराज्यात

सगळीकडे पोहोचला.

◆◆◆

## (१७)

## कोशवृद्धीचे उपाय

**उपाय पहिला :**

अंतर्गत शत्रूंचा पूर्ण नि:पात केल्यावर चाणक्य, राज्याची आर्थिक स्थिती सुदृढ करण्याची, तजवीज करू लागला. प्रथम त्याने कोशागारात जाऊन, राज्याच्या खजिन्याची पाहणी केली. त्याच्या अंदाजाप्रमाणे तिजोरीत सगळा खडखडाटच होता. सप्तांग राज्याचे महत्त्वाचे अंग असते, 'राज्याचा कोश !' 'कोणत्या बरे उपायांनी, राज्यकोश वाढवता येईल ?' याचा विचार करता-करता चाणक्याला एक युक्ती सुचली.

प्रासादाबाहेरच्या विस्तृत प्रांगणात, त्याने एक मोठा मंडप टाकला. त्यात द्यूत (जुगार) खेळण्यासाठी, आवश्यक ती आसनव्यवस्था केली. नगरजनांमध्ये दवंडी पिटविली की, 'हे नागरिकांनो, राज्यातर्फे तुम्हाला धनप्राप्तीची एक अपूर्व संधी चालून आली आहे. मंडपात येऊन माझ्याबरोबर द्यूत खेळा. द्यूताचा 'पण' ऐका. प्रत्येकाने एक सुवर्णनाणे पणाला लावावे. त्याचवेळी मी थाळीभर सुवर्णनाणी पणाला लावेन. मी जिंकलो तर तुम्ही मला एक नाणे द्यावयाचे. तुम्ही जिंकलात तर मी तुम्हाला थाळीभर सुवर्णनाणी देईन. बहुसंख्येने या. या संधीचा लाभ घ्या.'

थाळीभर सुवर्णनाण्याच्या लोभाने, नागरिकांचे जथेच्या जथे मांडवाकडे लोटू लागले. चाणक्याने खेळणाऱ्यांची आणि प्रेक्षकांची, चोख व्यवस्था ठेवली होती. द्यूत एकेकाबरोबर खेळावयाचे होते. बाकी सर्वांची आसनव्यवस्था, दूर अंतरावर होती.

सतत आपल्याला अनुकूल असेच दान पडावे म्हणून चाणक्याने, विशिष्ट प्रकारे द्यूतपटाची आणि फाश्यांची व्यवस्था केली होती. फाश्यांच्या सर्व कंगोऱ्यांना विशिष्ट प्रकारे लोखंडाची कड बनवून घेतली होती. तसेच द्यूतपटाच्या खालच्या पोकळ भागात, विशिष्ट प्रकारे लोहचुंबकाच्या चकत्या बनविल्या होत्या. नागरिकांमध्ये हा प्रयोग करण्यापूर्वी, कोणत्या कोनातून फासे टाकल्यावर, आपल्याला हवे तेच दान पडेल, याचा पुष्कळ सराव आधीच करून, चाणक्याने ते कौशल्य प्राप्त केले होते.

निर्धारित दिवशी मांडवात द्यूताला आरंभ झाला. एका मागून एक, लोक द्यूत खेळण्यासाठी पुढे येऊ लागले. एकेक सुवर्णनाणे द्यूतात हरून, हिरमुसल्या चेहऱ्याने परतू लागले. काही दिवस हा खेळ चालू राहिला. त्या नगरात जुगारामध्ये अट्टल असलेले, काही व्यावसायिक जुगारीही होते. चाणक्याने स्वत:च्या मनासारखे दान पडण्यासाठी केलेली युक्ती, हळूहळू त्यांच्या लक्षात येऊ लागली. त्यांनी लोकांमध्ये जाऊन, कुजबूज सुरू केली. खेळायला पुढे येणाऱ्यांची संख्या घटू लागली. दरदिवशी जमा झालेल्या सुवर्णनाण्यांचा हिशेब, चाणक्याने केला. तो फारसा काही उत्साहवर्धक नव्हता. त्याने निर्णय घेतला की, पैसे मिळविण्याचा हा उपाय आता थांबवावा. दुसरा कोणता अधिक फायदेशीर उपाय मिळतो का, ते पहावे.

**उपाय दुसरा :**

आपल्या राज्यात असलेल्या धनिक व्यक्तींच्या अर्थार्जनाचा आढावा घेतल्यावर, चाणक्याला असे आढळले की, राज्यातले श्रीमंत व्यापारी, शेतकरी आणि पशुपालक हे त्यांच्या उत्पन्नाच्या मानाने ते योग्य तो कर भरत नाहीत. लाच-लुचपत करून करात

चोरी करतात. चाणक्याने सारासार विचार करून एक नामी उपाय शोधला. सर्व धनिकांचा गौरव करण्यासाठी, त्यांना राजातर्फे सन्मानभोजनासाठी, विशिष्ट दिवशी निमंत्रित केले. भव्य मंडप टाकला. आवडीनुसार खाद्यपेयांची रेलचेल उडवून दिली. संगीत, वादन, नृत्याचे आयोजन केले. ऋतूंना अनुकूल अशा उत्कृष्ट फळांच्या रसात, मद्य मिसळून सर्वांना यथेच्छ पाजले. स्वत: चाणक्य धनिक इभ्यश्रेष्ठीसारखा वेष धारण करून त्या समारंभात सामील झाला. सिंहाचे मुख असलेला सोन्याचा दंड हातात घेऊन, तो अभ्यागतासारखा प्रविष्ट झाला. सर्व धनिकांना एकत्रित करून त्याने घोषणा केली की, ''प्रथम आपण या सुमधुर पेयांचा आस्वाद घेऊ या. त्यानंतर सर्वजण एक क्रीडाप्रकार खेळू या. एकेकजणाने पुढे यायचे. हा दंड हातात घ्यावयाचा. अतिशय वेगळ्या आलंकारिक प्रकाराने, आपल्या धनवैभवाचे वर्णन करावयाचे. वर्णन करून झाले की बाजूला बसलेले वादक हे ढोल, नगारा आणि ताशा वाजवून त्याचे अभिनंदन करतील. प्रत्येकाच्या गळ्यात सुंदर पुष्पमाला घातली जाईल.''

''हे धनिकांनो ! प्रथम मीच पुढे येतो. हे बघा, मी मद्यरसाचा भरपूर आस्वाद घेतो. तालावर नाचून असे घोषित करतो की – माझ्या अंगावरील ही वस्त्रे, सोन्याचा कमंडलू आणि दंड एवढीच माझी संपत्ती आहे. परंतु राजाच्या रूपाने सर्वच संपत्तीचा मी स्वामी आहे. वादकांनो ! आता खुशाल ढोल वाजवा.''

पाठोपाठ वादकांनी ढोल वाजविले. एका राजपुरुषाने येऊन, चाणक्याच्या गळ्यात पुष्पहार घातला.

चाणक्याच्या भाषणानंतर ते सहन न होऊन, एक धनिक पुढे आला. पेयाचा आस्वाद घेऊन, नृत्याची पावले टाकत म्हणू लागला — ''एक सुलक्षणी हत्ती

धीरगंभीरपणे पावले टाकत, सात सहस्रयोजन अंतर जर चालून गेला आणि त्याच्या पावलापावलावर लाखलाख सुवर्णमुद्रा जरी मी टाकत गेलो, तरी माझी संपत्ती संपणार नाही. वादकांनो ! माझ्या नावाने ढोल वाजवा !''

ढोल-ताशांचा गजर झाला आणि पुष्पहाराने त्याचा सन्मानही केला.

नंतर एक धनाढ्य जमीनदार पुढे आला, म्हणाला — ''हे तर काहीच नव्हे. एक आढक माप भरून, मी तीळ पेरले. योग्य खतपाणी घालून, तिळाची शेते उंचच-उंच वाढवली. नव्याने निष्पन्न झालेल्या प्रत्येक तिळागणिक, एक-एक सहस्र सुवर्णमुद्रांइतकी एकूण संपत्ती माझ्याकडे आहे.''

''चला आता माझ्या नावाने ढोल वाजवा !!''

त्याच्यावर वरकडी करीत एक धनाढ्य पशुपालक पुढे आला, म्हणाला — ''मी कशा शब्दात बरे वर्णन करू ? समजा, धुंवाधार पावसाने एक गिरिनदी, प्रचंड वेगाने खळखळाट करीत, दुथडी भरून पुढे वाहत चालली आहे. माझ्याकडे एका दिवसात एकत्रित होणाऱ्या दुधाच्या ताकावर घुसळून वर आलेल्या लोण्याने, मी त्या नदीला बांध घालून अडवू शकतो.''

''चला आता माझ्या नावाने गजर होऊ द्या !!''

तो आसनस्थ होतो न होतो तेवढ्यात, एका अतिविशाल अश्वशाळेचा पालक पुढे आला. म्हणू लागला — ''माझ्या वैभवाची तर तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही. माझ्या अतिविशाल अश्वशाळेत, एका दिवसात जेवढी घोड्यांची शिंगरे जन्माला येतात, त्यांच्या अंगावरील मृदुमुलायम केसांनी, मी संपूर्ण आकाश झाकून टाकू शकतो. आता माझ्या नावाने वाद्यांचा खूप वेळ गजर करा !!''

वाद्यांचा जोरात गजर झाला.

शेवटचा धनिक गृहस्थ तोऱ्याने उभा राहिला. नृत्य करत-करत म्हणू लागला की — ''मला एकच पत्नी आहे. ती अतिशय पुण्यशील पतिव्रता आहे. पैसे मिळविण्यासाठी मला कोठेही प्रवासाला जावे लागत नाही. माझ्या मोठमोठ्या शेतात, अशा जातीचा तांदूळ उगवला आहे की, एकदा कापणी झाल्यावर, त्या तांदळाने शेकडो कोठारे भरतात. नंतर पुन्हा-पुन्हा लावणी न करताच, सुगंधी तांदळाच्या लोंब्यांनी माझी शेते सतत वाऱ्यावर डुलत असतात. त्यामुळे माझी सहस्र कोठारे पळभरही रिकामी रहात नाहीत. माझा सफल गृहस्थाश्रम, ही माझी महान संपत्ती आहे. हे वादकांनो ! या माझ्या सात्त्विक संपत्तीबद्दल जोरजोराने ढोल वाजवा !!''

समारंभ अतिशय उत्कृष्टपणे पार पडला. चाणक्याला प्रत्येकाच्या संपत्तीचा पूर्ण अंदाज आला. त्याने ह्या सर्वांना तसेच इतर धनिकांना, राजाची मुद्रा उमटवलेली आज्ञापत्रे दूताकडून पाठविण्याची व्यवस्था केली. त्यात त्याने लिहिले होते की, ''प्रत्येकाने आपापले एकेका दिवसाचे संपूर्ण उत्पन्न, दरमहा प्रामाणिकपणे राज्याच्या खजिन्यात कररूपाने भरावे.''

भर सभेत सर्व संपत्ती जाहीर केल्यामुळे, आता कोणालाही कर चुकविणे शक्य नव्हते. आज्ञापत्रानुसार सर्वांनी नियमितपणे कर जमा करण्यास सुरवात केली. पाहता-पाहता मगधाचा खजिना सोने, चांदी, हिरे, माणिक-मोती, धान्य आणि अनेक मौल्यवान वस्तूंनी काठोकाठ भरलेला राहू लागला. चाणक्याने अशा प्रकारे आपल्या बुद्धिचातुर्याने त्या विस्तृत साम्राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसविली.

**उपाय तिसरा :**

चतुरंग सैन्यबल सदैव सज्ज ठेवण्यासाठी, याहूनही अधिक संपत्तीची गरज लागणार होती. चाणक्याने आता आपले लक्ष, आजूबाजूच्या प्रदेशातील खनिजसंपत्तीने भरलेल्या, भूभागाकडे वळविले. सोने, चांदी, हिरे आणि वस्तुनिर्मितीसाठी लागणाऱ्या विविध धातूंच्या खाणी, तज्ज्ञांच्या सल्ल्याने शोधल्या. त्या त्या भागात योग्य त्याप्रकारे खाणकामगारांसाठी, नवनवीन वस्त्या आणि गावे वसविली. वृक्षसंपदेचे संवर्धन केले. काकिणीपासून दीनारापर्यंत सर्व किंमतीची नाणी, टांकसाळीत पाडून घेतली. योग्य प्रकारची वजने आणि मापे, तुलाध्यक्षाकडून प्रमाणित करून घेतली. काही वर्षातच मगधाचे राज्य एक बलाढ्य, धनाढ्य आणि सुनियंत्रित राज्य म्हणून नावारूपाला आले.मगधाच्या स्थिर शासनाची मुख्य कारणे होती — चाणक्याची राज्यहितैषी नि:स्वार्थ बुद्धिमत्ता; चंद्रगुप्ताचा पराक्रम आणि त्याचा चाणक्यावरील अढळ विश्वास !

◆◆◆

## (१८)

## द्वादशवर्षीय दुष्काळ

राजा आणि अमात्य हे दोघेही, राज्याची व्यवस्था लावण्यात कितीही कुशल असले तरी, निसर्गाचा प्रकोप थांबविणे हे कोणाच्याच हातात नसते. राज्याची सर्व घडी नीट बसते न बसते तोच, तीन-चार वर्षातच मगधावर वरुणराजाची अवकृपा झाली. सलग बारा वर्षे, आवश्यक तेवढा पाऊसच झाला नाही. शेवटच्या काही वर्षात तर दुष्काळाने अक्राळ-विक्राळ स्वरूप धारण केले. राज्यात भिक्षेवर निर्वाह करणारे, अनेक प्रकारचे साधू, संन्यासी, योगी, भिक्षू आणि परिव्राजक होते. गृहस्थांनाच जेथे

अन्न दुर्मिळ झाले, तेथे साधुवर्गाला भिक्षा कोठून मिळावी?

निर्ग्रंथ (जैन) साधूंचा एक मोठा संघ, त्यावेळी पाटलिपुत्रात निवास करीत होता. संघाच्या आचार्यांचे नाव 'सुस्थित' आचार्य असे होते. सर्वत्र अन्नान्न-दशा झालेली बघून, गात्रे शिथिल झालेल्या सुस्थितांनी, सर्व संघाला सुभिक्ष असलेल्या प्रदेशात विहार करण्याची आज्ञा दिली. स्वत: मात्र तेथेच राहण्याचा निश्चय केला.

आचार्यांना त्या अवस्थेत एकटे सोडून देशांतराला जाणे, सर्वांच्याच जिवावर आले होते. संघातील इतर साधूंचा पहिला मुक्काम पडला. आचार्यांवर विलक्षण भक्ती असलेले दोन 'क्षुल्लक' (दीक्षार्थी तरुण साधू), आचार्यांच्या भक्तीमुळे, पहिल्याच मुक्कामाहून मागे परत आले. आचार्य म्हणाले, 'तुम्ही का परत आलात ?' क्षुल्लक म्हणाले, 'गुरुचरणांचा विरह आम्ही सहन करू शकत नाही. आम्हाला एकवेळ मरण आले तरी बेहत्तर, परंतु आम्ही तुम्हाला सोडून जाणार नाही.' आचार्य म्हणाले, 'तुम्ही हा निर्णय काही योग्य घेतलेला नाही. येथे राहून उगाचच संकटात मात्र पडाल.' अखेरीस गुरूंच्या अनुज्ञेने त्यांची शुश्रूषा करत, ते दोघे तेथेच राहिले.

दुष्काळामुळे भिक्षा अतिशय कमी मिळत होती. त्या भिक्षेतील फारच कमी भाग, गुरू ग्रहण करीत. त्या दोघांनाही तो आहार, अतिशय अपुरा होता. रोजच भुकेले रहावे लागत असल्यामुळे, एक दिवस त्या दोघांनी आपसात विचारविनिमय केला. म्हणाले, ''एक दिवस संघाचा सांभाळ करणाऱ्या गीतार्थ साधूंना, आपल्या आचार्यांनी 'दिव्य अंजन प्रयोगाचा' मंत्र दिला होता. भिंतीआड उभे राहून आपण तो ऐकला होता. आजही तो आपल्याला पाठ आहे. दुष्काळाच्या या भीषण प्रसंगात, मिळालेली सर्व भिक्षा आपण गुरूंना देऊ आणि अंजनसिद्धीचा प्रयोग करून, आपण आपले अन्न त्या उपायाने

मिळवू. आपले पोट नीट भरले तरच आपण गुरुसेवा करू शकू.''

अंजनसिद्धीचा प्रयोग, चंद्रगुप्ताच्या भोजनकक्षातच जाऊन करावा, असे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे डोळ्यात अंजन घालून ते अदृश्य झाले. अदृश्य रूपातच चंद्रगुप्ताच्या भोजनशाळेत आले. त्यांनी चंद्रगुप्ताच्या जठरात प्रवेश केला. चंद्रगुप्ताने खाल्लेले भोजन जठरात पोहोचले की, ते दोघे अदृश्यरूपाने ते भोजन, भक्षण करीत असत. चंद्रगुप्ताच्या भोजनपात्रावर नेहमीच, चाणक्याची करडी नजर असे. चाणक्याला कळेनासे झाले की, व्यवस्थित भोजन घेऊनही हा चंद्रगुप्त, कृष्णपक्षातील चंद्राप्रमाणे कृश का होत चालला आहे ? चाणक्याने चंद्रगुप्ताला खोदून-खोदून विचारले. चंद्रगुप्त म्हणाला, 'मलाच कळेनासे झाले आहे. ताटभर अन्न पोटात गेले तरी पोट भरल्याची भावनाच येत नाही. मी सदैव भुकेलाच राहतो. मला वाटते की कोणीतरी भूतप्रेत माझ्यात शिरून, माझे अन्न खात असावे.'

चाणक्य हसला व चंद्रगुप्ताला म्हणाला, 'काहीतरी बोलू नकोस. मी लवकरच या भोजन चोरणाऱ्यांचा छडा लावतो. काळजी करू नकोस.' चाणक्याने खूप विचार करून, त्याच्या भोजनाच्या थाळी आणि आसनाभोवती, अत्यंत वस्त्रगाळ असे चूर्ण, हलक्या हाताने पसरले. चंद्रगुप्त नेहमीप्रमाणे भोजनासाठी बसला. चाणक्य समोर चौरंगावर

बसून निरीक्षण करीत राहिला. त्याच्या सूक्ष्म दृष्टीला त्या चूर्णावर उमटलेली हलकी पदचिह्ने दिसली. त्याने ओळखले की, अंजनसिद्धी प्राप्त झालेले कोणीतरी योगी, चंद्रगुप्ताच्या भोजनाचे हरण करीत आहेत.

दुसऱ्या दिवशी सारे काही असेच घडले. तेवढ्यात चाणक्याने त्या भोजनकक्षात, धूपाचा दाट धूर पसरविला. भोजन ग्रहण करण्यासाठी आलेल्या क्षुल्लकांच्या डोळ्यातील अंजन, त्या धुरामुळे तयार झालेल्या अश्रूंनी वाहून गेले. अंजनाचा प्रभाव नाहीसा होताच, दोघे क्षुल्लक तेथे दृश्य स्वरूपात प्रकट झाले. चंद्रगुप्ताने त्यांच्याकडे क्रोधपूर्ण कटाक्ष टाकला. चाणक्यानेही दोन राजपुरुषांना बोलावून, त्यांना ताब्यात घेतले. क्षुल्लक म्हणाले, 'महामात्य ! या प्रसंगाचा पूर्ण उलगडा होण्यासाठी, आमच्या सुस्थित आचार्यांकडे आपण चलावे.' चाणक्यालाही कुतूहल वाटले. तो त्या क्षुल्लकांबरोबर सुस्थिताचार्यांच्या निवासस्थानी गेला. क्षुल्लकांना पुढे घालून, चाणक्य आचार्यांना उपहासाने म्हणाला, 'वा ! आचार्य, दुसऱ्याच्या ताटातले चोरून खाण्याची चांगलीच विद्या, शिष्यांना पढविली आहेत की तुम्ही !' आचार्य विचक्षण होते. त्यांना तत्काळ सर्व प्रकार समजला. अधिकारवाणीने ते चाणक्याला म्हणाले, ''महामात्य ! आपली प्रजाहितदक्षता काय बरे वर्णावी ! या भीषण दुष्काळाच्या काळात, गलितगात्र गुरूंची निष्ठेने सेवा करून, अखंड धर्माराधना करणाऱ्या या दोन साधूंना, चार घास अन्न मिळणेही अशक्य व्हावे, हे आपणास शोभते का ? **'प्रजाहिते हितं राज्ञ:'** असे आपणच म्हणता ना !''

त्या तपोवृद्ध स्थविरांचे हे बोलणे ऐकून, चाणक्य लज्जित झाला. त्याने मन:पूर्वक आचार्यांची क्षमा मागितली. अशा अपवादात्मक प्रसंगी राजाने, साधूंची व्यवस्था केली पाहिजे, अशी त्याला जाणीव झाली. ''दुष्काळी परिस्थितीत, स्थलांतर करू न शकणाऱ्या भिक्षूंची व्यवस्था राजा करेल'', असे वचन चाणक्याने सुस्थिताचार्यांना दिले.

◆◆◆

## (१९)

## साधूंची परीक्षा

राजाने भिक्षूंची उपजीविका करण्याचे धोरण स्वीकारल्यावर, अनेक प्रकारच्या साधूंचे संघ राजाकडे याचनेसाठी येऊ लागले. कोणत्या साधूंवर अनुग्रह करावा आणि कोणत्या साधूंवर करू नये, असा मोठाच प्रश्न उभा राहिला. चाणक्याने ठरविले की, त्यांच्या साधुत्वाची परीक्षा घेऊनच, निर्णय घेतला पाहिजे.

पहिल्या दिवशी त्याने काही ब्राह्मण परिव्राजकांच्या संघाला, प्रासादात निमंत्रित केले. त्यांच्या प्रवचनाचे आयोजन केले. त्या परिव्राजकांच्या संघनायकाने तपस्या, मौन आणि विशेषत: इंद्रियविजयाचे महत्त्व समजावून सांगितले. श्रोतृवृंदाला इंद्रियदमनाचा उपदेश केला. त्यांच्या अस्खलित वक्तृत्वाने सर्वजण प्रभावित झाले. प्रवचनाच्या अखेरीस चाणक्याने त्यांना विनंती केली की, आज सायंकाळी आणि रात्री आपण येथेच निवास करावा. आपली शयनव्यवस्था अंत:पुराजवळच्या दालनात केली आहे.

चाणक्याने मुद्दामच साधूंचा शयनकक्ष आणि अंत:पुर, यांच्यामधील भिंतीला काही झरोके ठेवले होते. साधूंवर पाळत ठेवण्यासाठी, साध्या वेषातील गुप्तहेरांची नेमणूक केली होती. संध्याकाळ उलटून रात्र होऊ लागली. झरोक्यातून अंत:पुरातील दिव्यांचे किरण प्रकाशित होऊ लागले. स्त्रियांची कुजबूज आणि नूपुरांचे मंजुळ नाद येऊ लागले. परिव्राजकांना स्वस्थ बसवेना. ते उठून झरोक्यांजवळ गेले. पाय उंच करून-करून आतील दृश्य पाहू लागले. राजपुरुषांची थोडीशी चाहूल लागताच, गुपचूप आपल्या आसनांवर येऊन झोपले. अर्थातच हा सर्व वृत्तांत गुप्तहेरांनी चाणक्य व चंद्रगुप्ताला निवेदन केला.

दुसऱ्या दिवशी चाणक्याने निर्ग्रंथ (जैन) साधुसंघाला, प्रवचनासाठी आमंत्रण दिले. पूर्वीप्रमाणेच सर्व व्यवस्था केली. प्रवचन झाल्यानंतर कोणतेही आहारपाणी ग्रहण न करता, निर्ग्रंथ साधू आपापल्या आसनांवर, धर्मध्यान करीत बसले. योग्य तेवढी मोजकी निद्रा घेऊन, भल्या पहाटे अत्यंत शिस्तीने, त्यांनी आपल्या उपाश्रयाची वाट धरली.

सर्व वृत्तांत राजपुरुषांनी चाणक्य व चंद्रगुप्तास सांगितला. निर्ग्रंथांनी दाखविलेल्या संयमी वृत्तीमुळे, दोघांचाही निर्ग्रंथ संघावरील विश्वास दुणावला.

◆◆◆

## (२०)

## अर्धमागधी ग्रंथांची पहिली वाचना

दुर्भिक्षकाळ संपला. पाटलिपुत्र व आसपासच्या प्रदेशात, योग्य तेवढा चांगला पाऊस झाला. पुन्हा एकदा धरतीमाता, शेतांनी आणि अरण्यांनी भरून गेली. 'शकटाल' मंत्र्याचे जेष्ठ पुत्र 'स्थूलभद्र' हे, जैन मुनिसंघाचे आचार्यपद भूषवीत होते. त्यांचे पाटलिपुत्रास आगमन झाले. राजा चंद्रगुप्त आणि अमात्य चाणक्य, हे निर्ग्रंथधर्माला अनुकूल आहेत हे पाहून, त्यांनी दुष्काळामुळे देशांतराला गेलेल्या मुनिसंघांना, विशिष्ट वेळी पाटलिपुत्रात येण्याचे आवाहन केले. अर्थात् त्यावेळची वाहनव्यवस्था बघता आणि मुनिसंघाचा पदविहार ध्यानात घेता, हे निश्चितच आहे की, या सर्व नियोजनाला वर्ष-दोन वर्षे लागली असावीत.

स्थूलभद्र आचार्यांनी, अर्धमागधी आगमांचे जेवढे-जेवढे भाग, ज्या ज्या मुनींना मुखोद्गत होते, ते सगळे पाटलिपुत्रात एकत्रित केले. ते लिखित स्वरूपात आले की

नाही, याबद्दल निश्चित माहिती देता येत नाही. परंतु भ. महावीरांनी अर्धमागधीत केलेले उपदेश, अकरा मुख्य ग्रंथांमध्ये संकलित करून ठेवण्याचे कार्य, स्थूलभद्रांच्या अध्यक्षतेखाली झाले. महावीरवाणीचा एक मुख्य भाग 'दृष्टिवाद' नावाचा होता. त्याच्या अंतर्गत 'चौदा पूर्व' या नावाचा काही ज्ञाननिधी होता. त्यावेळी चौदा पूर्वांचे संपूर्ण ज्ञान, अर्थसहित मुखोद्गत असलेले छेदसूत्रकार 'भद्रबाहु', दुर्भिक्षाच्या काळात नेपाळ प्रदेशात, ध्यानसाधनेसाठी निघून गेलेले होते. अकरा अंगग्रंथांची वाचना झाल्यावर, आचार्य स्थूलभद्र काही जिज्ञासू मुनींसह, भद्रबाहूंच्या शोधार्थ नेपाळच्या दिशेने प्रस्थित झाले.

जैनधर्माच्या प्राचीन ग्रंथांच्या संकलनाचे महद्कार्य, चंद्रगुप्त आणि चाणक्य यांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होणे, शक्य नव्हते. अशा प्रकारे जैन इतिहासातील, एका ऐतिहासिक पर्वाचे साक्षीदार, चंद्रगुप्त आणि चाणक्य आहेत. जैनांनी चाणक्यकथा जपण्याचे, हे देखील एक महत्त्वाचे कारण आहे.

◆◆◆

## (२१)
## कौटिल्याचा ग्रंथरचनेस प्रारंभ

प्राचीन भारतातील अध्ययनाच्या परंपरेत, आध्यात्मिक शास्त्रांबरोबरच लौकिक शास्त्रांचाही, चांगल्या प्रकारे अभ्यास होत असावा. चाणक्यानेही आपल्या अध्ययनकाळात, त्याच्या पूर्वसूरींनी रचलेल्या अर्थशास्त्राचा उल्लेख केलेला दिसतो. 'चाणक्याच्या काळात लिपिविज्ञान अवगत होते की नाही?'–असा प्रश्न अनेक अभ्यासकांनी उपस्थित केला आहे. जैनग्रंथात आढळणाऱ्या 'चाणक्यी' लिपीच्या उल्लेखावरून, चाणक्याच्या आज्ञापत्रावरून आणि कौटिलीय अर्थशास्त्रात प्राप्त होणाऱ्या लेखनाच्या मार्गदर्शनावरून, चाणक्य ऊर्फ कौटिल्याने, त्याच्या आयुष्याच्या या टप्प्यावर, त्याच्या अर्थशास्त्रविषयक मतांची नोंद करावयास सुरवात केली असावी — असे म्हणण्यास फारसा प्रत्यवाय दिसत नाही.

जैनांनी तसाही चाणक्याच्या 'पारिणामिकी बुद्धीचा', वारंवार उल्लेख केला आहे. अंगभूत बुद्धिमत्तेला जेव्हा अनुभवांच्या परिपक्वतेची साथ मिळते तेव्हा एका वेगळ्याच झळाळीने, ते साहित्य लक्षणीय ठरते. कौटिलीय अर्थशास्त्र म्हणजे केवळ आजच्या अर्थाने अर्थशास्त्र नव्हे. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, राज्यघटनेसारखी नियमावली, अपराधासाठी दिलेली दंड-व्यवस्था, राजनीती, युद्धशास्त्र आणि त्याला जोडून आलेल्या दंतकथात्मक इतिहास-पुराणातील घटना — या सर्वांचे येथे अद्‌भुत मिश्रण आहे. चाणक्याने बहुधा त्याच्या आयुष्यातील शेवटच्या दहा वर्षात, सहायकाच्या मदतीने, आपल्या आयुष्यभरातील अनुभवांच्या आधारे, या ग्रंथातील प्रकरणांच्या नोंदी केल्या असाव्यात अशी दाट शक्यता, जैन साहित्याच्या अभ्यासाने नक्कीच व्यक्त करता येते.

◆◆◆

## (२२)
## बिंदुसाराची जन्मकथा

जसजसे मगधाचे राज्य वैभवाच्या शिखरावर चढत होते, तसतशी चाणक्याला चंद्रगुप्ताच्या सुरक्षिततेची अधिकाधिक काळजी वाटत होती. विशेषत: भोजनातून त्याला विषप्रयोग होऊ नये म्हणून, चाणक्य दक्ष राहू लागला. भोजनाच्या थाळीची अनेक उपायांनी विषपरीक्षा केल्याशिवाय, तो चंद्रगुप्ताला भोजनाची अनुमती देत नसे. ह्याच काळजीचा एक भाग म्हणून चाणक्य चंद्रगुप्ताला, स्वत:च्या हाताने भोजनातून, एक विशिष्ट रसायन देऊ लागला. त्या रसायनात असे सामर्थ्य होते की, त्यामुळे

यदाकदाचित् विषप्रयोग झाला तरी, रसायनाच्या प्रभावाने त्याची तीव्रता अतिशय कमी होईल.

चंद्रगुप्ताची 'धारिणी' नावाची प्रिय पत्नी गर्भवती झाली. त्या गर्भाच्या योगाने तिला डोहाळे लागले. ते पूर्ण होऊ शकत नसल्याने ती, दिवसेंदिवस म्लानमुखी दिसू लागली. राजाने एकांतात राणीला विचारले, 'प्रिये ! इतक्या मोठ्या राज्याची स्वामिनी असूनही आणि सर्व काही तुझ्या स्वाधीन आहे तरी, तू अशी चंद्रकलेप्रमाणे कृश का बरे होत आहेस ?' ती म्हणाली, 'आर्यपुत्र ! मला तुमच्या बरोबर बसून, एकाच ताटात भोजन करण्याची, तीव्र इच्छा होत आहे. तुमचे भोजन मात्र, अमात्य चाणक्यांच्या देखरेखीत, एकांतात होत असते. स्पष्ट दिसते आहे की, अमात्य या सहभोजनाला कधीच अनुमती देणार नाहीत.' चंद्रगुप्त म्हणाला, 'प्रिये ! इतकी क्षुल्लक गोष्ट आहे ना ? थांब! उद्या मी तुझ्या मनासारखे करतो.'

दुसऱ्या दिवशी त्याने चाणक्याला सहभोजनाविषयी विचारले. एकांत-भोजनाचा खरा उद्देश, चंद्रगुप्ताला सांगणे शक्यच नव्हते. मग चाणक्याने प्रचंड क्रोध आल्याचे नाटक करून, भुवई उंचावून आणि आवाज चढवून, चंद्रगुप्ताला म्हटले, 'अरे ! स्वतंत्रपणे निर्णय घेऊन, माझा आज्ञाभंग करण्याइतका शहाणा, कधीपासून झालास ? राणीसह एका थाळीत जेवण घेण्याची अनुमती, तुला कधीही मिळणार नाही.' चंद्रगुप्ताला मनातून खूप वाईट वाटले. राणीकडे बघून त्याचा जीव थोडाथोडा होत होता. दुसऱ्या दिवशी भोजनाची वेळ झाली. नेहमीप्रमाणे चाणक्याच्या देखरेखीखाली, चंद्रगुप्ताचे जेवण चालू झाले. तेवढ्यात काही विशेष निरोप घेऊन, एक हेर दालनाबाहेर आला. चाणक्य सल्लामसलत करण्यासाठी, थोडा वेळ दालनाबाहेर गेला. चंद्रगुप्ताने आधीच्या दिवशी ठरल्याप्रमाणे, राणीला त्वरेने

आत येण्याची खूण केली. चाणक्य बोलण्यात गुंतला आहे तोवर, चंद्रगुप्ताने अतिशय प्रेमभराने, आपल्या थाळीतील चार घास, तिला भरविले. त्याला माहीत नव्हते की विषाचा उतारा म्हणून जेवणातून दिले जाणारे रसायन राणीचा घात करील.

चाणक्य लगबगीने दालनात आला. समोरचे दृश्य पाहून त्याला धक्काच बसला. तोल सुटून तो जवळजवळ किंचाळलाच. 'अरे पाप्या ! माझी आज्ञा मोडून, असे पापाचरण करतोस ? कुठे गेली तुझी पराकोटीची गुरुभक्ती ?' क्षणाचाही विलंब न

करता, चाणक्याने कमरेचा धारदार चाकू बाहेर काढला. धारिणीला बिछान्यावर झोपवून, तत्काळ तिच्या उदरावर योग्य तेवढा छेद दिला. गर्भस्थ भ्रूणाला, आपल्या कुशल बोटांनी, अलगद बाहेर काढले. पटापट आज्ञा देऊन, ते बालक पुढील क्रियेसाठी, कुशल सुइणीकडे सोपविले. लगोलग धारिणीच्या पोटालाही टाके घातले.

प्रत्युत्पन्नमती चाणक्याची, अद्‌भुत निर्णयक्षमता बघून, चंद्रगुप्त स्तंभित झाला. परंतु त्याला दु:खावेग आवरता आला नाही कारण चंद्रगुप्ताने भरविलेल्या चार घासांमधील रसायनाने, आपला परिणाम साधला होता. धारिणी मरण पावली होती. चाणक्याने त्यावेळी स्पष्टीकरणासाठी कोणताही वेळ न दवडता, प्रथम बालकाकडे धाव घेतली. त्या विषारी रसायनाच्या प्रभावाने बालकाच्या कोमल टाळूवर, एक काळ्या रंगाचा बिंदू उतरून, तेथे कायमची खूण निर्माण झाली होती. अपुऱ्या दिवसाच्या त्या बालकाचे संवर्धन, चाणक्याने स्वत:च्या देखरेखीखाली करून घेतले. विषबिंदूचे चिह्न लक्षात घेऊन बालकाचे नाव ‘बिंदुसार’ असे ठेवले.

चंद्रगुप्तानंतर तोच राज्याचा वारस होता. त्यामुळे, चाणक्याने बिंदुसाराचे पोषण आणि योग्य ते शिक्षण, याची सर्व व्यवस्था जातीने पाहिली. यथावकाश चंद्रगुप्ताला सारे रहस्य समजावून सांगितले. आपल्या गुरूंविषयीचा त्याचा आदर अधिकच वाढला. बालकाला कळू लागल्यापासून, चंद्रगुप्त सतत त्याला सांगू लागला की, ‘पुत्रा ! मेरुपर्वतासारखे उत्तुंग व्यक्तिमत्व असलेल्या ह्या अमात्यांवर पूर्ण विश्वास ठेव. त्यांना रोज प्रणाम करून, त्यांचे आशीर्वाद घेत जा.’ हीच गोष्ट बिंदुसाराला त्याच्या अंबधात्रीनेही वारंवार सांगितली.

बिंदुसार चंद्रगुप्ताप्रमाणे तेजस्वी होता. मोठा राजा होण्याची चिह्ने त्याच्यामध्ये

दिसू लागली. आता त्याने यौवनात पदार्पण केले होते. काळाच्या ओघात चंद्रगुप्त दिवंगत झाला. चाणक्य आता दिवसेंदिवस वृद्धावस्थेकडे झुकू लागला होता. त्याने आपल्या देखरेखीखाली बिंदुसाराला राज्याभिषेक केला. हा नवा तेजस्वी राजकुमार प्रजेलाही खूप पसंत पडला.

◆◆◆

## (२३)

## सुबंधूचे आगमन आणि चाणक्याचे प्रायोपगमन

चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर, चाणक्य उतारवयाकडे झुकू लागलेला पाहून, चाणक्याविषयी दीर्घ द्वेष धारण करणारा, नंदराजाचा सचिव 'सुबंधु', याने मनाशी खूणगाठ बांधली की, आता आपली सक्रिय होण्याची वेळ आली आहे. नानाप्रकारच्या युक्त्या-प्रयुक्त्या करून, त्याने बिंदुसार राजाला एकांतात गाठले. कृत्रिमपणे दाक्षिण्याचा आव आणून, बिंदुसाराला म्हणाला, ''महाराज ! आम्हास विदित आहे की, आमच्याविषयी आपले मत फारसे चांगले नाही. आपल्या सिंहासनाविषयी आम्हाला कळकळ वाटते म्हणून, केवळ राज्यहितासाठी आम्ही आपल्यापर्यंत आलो. महाराज, नीट ऐकावे. तो चाणक्य मंत्री अतिशय क्षुद्र आणि खुनशी आहे. स्वत:च्या हाताने पोट फाडून, त्याने तुमच्या मातेला मारले. एवढेच सांगतो की त्याच्या मायावीपणाला भुलू नका. त्याच्यापासून आपल्या जिवाला धोका संभवतो.''

बिंदुसाराने अंबधात्रीला बोलावून एकच प्रश्न विचारला, 'अंब ! त्या चाणक्याने माझ्या मातेचे उदर फाडले, हे सत्य आहे का ?' तिने म्हटले, 'पुत्रा ! होय हे सत्य आहे.' बिंदुसाराने यावर कुठलाही अधिक प्रश्न न विचारता, अंबधात्रीला तेथून निघून

जाण्याची आज्ञा केली. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे चाणक्य, राजाच्या भेटीस आला. त्याचे सुहास्य वदनाने स्वागत आणि प्रणाम करण्याऐवजी, बिंदुसार चाणक्याकडे पाठ फिरवून बसला. हे वर्तन बघून, काहीही न बोलता चाणक्य तेथून लगोलग बाहेर पडला.

त्याच्या विश्वासू लोकांकडून त्याला कळले की, सुबंधु सचिव राजाची भेट घेऊन गेला आहे. त्याने विचार केला, ''चंद्रगुप्ताकडून जन्मभर एवढे सन्मान्य स्थान प्राप्त झाल्यावर, आता बिंदुसारासोबत अशा परिस्थितीत, अमात्यपद भूषवीत राहणे, अजिबात योग्य नाही. तसेही वृद्धापकाळाची सर्व चिह्ने, माझ्या शरीरावर दिसू लागली आहेत. आयुष्यभर मी दक्षतेने राजकार्य सांभाळले. आता कर्तव्यपूर्तीचा आनंद मनात ठेवून, स्वत:हून निवृत्ती पत्करणे अत्यंत श्रेयस्कर आहे. एक गोष्ट मात्र खरी की, ह्या राजविरोधी आणि द्वेषी सुबंधु सचिवाला, बिंदुसाराचे मंत्रिपद भोगू द्यायचे नाही. ते राजाच्या आणि राज्याच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. पूर्ण निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी, सुबंधु हा राजाला सोडून कायमचा निघून जाईल, याची व्यवस्था करतो. कधी ना कधी स्वत:च्या जन्माचा सत्य वृत्तांत बिंदुसारासमोर येईलच.''

राजप्रासादाच्या आवारात असलेल्या, आपल्या दालनात चाणक्य गेला. त्याने त्याच्या जवळ असलेली थोडीबहुत संपत्ती स्वजन-परिजन, दीन-अनाथ यांच्यामध्ये वाटून दिली. एक पेटी मात्र बरीच कुलपे लावून, दालनाच्या मधोमध ठेवली. अंतिम ध्यानयोगसाधनेच्या विचाराने नेसत्या वस्त्रानिशी, गावाबाहेरील पर्णकुटीत गेला. ती पर्णकुटी एका गोकुळस्थानात होती. बरेच दिवस वापरात नसल्यामुळे, पर्णकुटीच्या आजूबाजूला गुराख्यांनी, वाळलेल्या गोवऱ्यांचे ढीग रचलेले होते. सुकलेल्या गवताचे भारे, छपरांवर पसरलेले होते. चाणक्याने पर्णकुटीत जाऊन, आसनयोग्य जागा बनविली. प्रायोपवेशनाच्या निश्चयाने आसनावर आरूढ झाला आणि ध्यानमुद्रा लावली.

इकडे चाणक्य निघून गेलेला बघून, अंबधात्रीला अतिशय अस्वस्थ वाटू लागले. धीर गोळा करून, ती बिंदुसाराकडे आली. त्याला म्हणाली, ''पुत्रा ! अमात्यांवर असलेला तुझा क्रोध अनाठायी आहे. तुझ्या जन्माच्या वेळचा सर्व घटनाक्रम, मला माहीत आहे. अंगात विष भिनल्यामुळे, तुझ्या मातेचा मृत्यू अटळ होता. अमात्यांनी विलक्षण चपळाईने तुला वाचविले नसते तर, आज तू ह्या जगात नसतास. तू ह्या साम्राज्याचा राजा आहेस. क्षुद्र लोकांच्या नादी लागून, हलक्या कानाचा होणे, तुला शोभत नाही. अमात्यांचे उपकार ध्यानी घे. त्वरित त्यांच्याकडे जा. क्षमा मागून त्यांना परत घेऊन ये. अनंत उपकारकर्त्या अमात्यांची, वृद्धापकाळी नीट देखभाल करणे, तुझे कर्तव्य आहे.''

बिंदुसाराचे डोळे उघडले. तो परिजनांसहित चाणक्याकडे गेला. मन:पूर्वक क्षमा मागून पाया पडला. प्रासादात परत येण्याची कळकळीची विनंती केली. चाणक्य म्हणाला, ''ते आता शक्य नाही. मी सर्वस्वाचा त्याग केला आहे. प्रायोपवेशन धारण केले आहे.'' त्यांचा अटळ निश्चय जाणून, बिंदुसार निघून गेला.

हा वृत्तांत सुबंधूच्या कानावर गेला. सुबंधूने विचार केला, ''सत्य काय ते बिंदुसाराला कळले आहे. शिवाय चाणक्याचे मन बदलले, तर माझे काही खरे नाही.'' एक भयंकर कारस्थान, त्याच्या मनात आकार घेऊ लागले. पश्चात्तापाचा खोटा आव आणून, तो बिंदुसाराकडे गेला. म्हणाला, ''महाराज! माझ्या हातून चूक झाली. खरी हकिगत मलाही माहीत नव्हती. आता मी स्वत: अमात्यांकडे जातो. त्यांची क्षमा मागतो. त्यांची यथायोग्य पूजा आणि सत्कार करतो. शक्य झाले तर त्यांना परत घेऊन येतो.''

कोणालाही बरोबर न घेता, सुबंधु पर्णकुटीजवळ गेला. गंध, अक्षता, फुले, धूप–

दाणी, निरांजन असे सर्व पूजेचे सामान बरोबर घेतले. पर्णकुटीच्या आत गेला सुद्धा नाही. पर्णकुटीभोवती तीन फेऱ्या मारून निरीक्षण केले. गोवऱ्या आणि सुकलेले गवत पाहून, त्याला आसुरी आनंद झाला. धूपपात्रात पेटते निखारे घालून, त्यावर धूप टाकला. निरांजन पेटविले. आजूबाजूच्या गोवऱ्यांमध्ये आणि गवतावर ते सर्व ठेवले. त्वरेने घरी परतला.

सर्वच पदार्थ ज्वालाग्राही असल्याने, पाहता-पाहता चहूबाजूने पर्णकुटीने पेट घेतला. जागेवरून न उठण्याचा निश्चय केलेल्या चाणक्याने, त्या भयंकर दाहाच्या वेदना, मूकपणे सहन केल्या. राजकार्यासाठी कराव्या लागलेल्या, सर्व निष्ठुर उपायांबाबत, पश्चात्तापभाव व्यक्त केला. सर्व जीवमात्रांविषयी अंतिम क्षणी, करुणाभाव जागृत केला. ईश्वराचे स्मरण करीत असलेल्या चाणक्याचा देह अखेर भस्मीभूत झाला.

◆◆◆

## (२४)

## सुबंधूचा अंत

चाणक्य भस्मसात् झाल्याची खात्री झाल्यावर, सुबंधु बिंदुसाराकडे आला. म्हणाला, ''राजन् ! मी अमात्यांची खूप मनधरणी केली. ते परत येण्यास तयार नाहीत. उलट मलाच म्हणाले की, 'जे झाले ते झाले. आता तू माझ्या घरी जा. माझी जी काही संपत्ती आहे ती राज्याच्या कोशात जमा कर.' महाराज ! मला अमात्यांच्या घरी जाण्याची आज्ञा द्यावी. मी त्यांच्या मनासारखे करतो.''

बिंदुसाराने सुबंधूला तशी अनुमती दिली. सुबंधु चाणक्याच्या दालनात पोहोचला. त्याला दालनाच्या एका कोपऱ्यात, चारी बाजूने कुलपे लावलेली आणि लाखेने मुद्रित

केलेली, एक मोठी पेटी दिसली. सुबंधूला वाटले की त्यात हिरे, माणके आणि अनेक मौल्यवान वस्तू असतील. त्यातील बऱ्याचशा आपणच काढून घेऊ. त्याने घाईघाईने कुलपे तोडली. पेटी उघडली. आत एक छोटी पेटी होती. ती रक्तवस्त्रात गुंडाळलेली होती. त्याने घाईघाईने छोटी पेटी बाहेर काढली. अतिशय मोहक, तीव्र असा घमघमणारा सुवास सगळीकडे दरवळला. त्याने पेटीवरील वस्त्र दूर केले उघडून पाहिले तर त्यात एक मोठे भूर्जपत्र होते. ते भूर्जपत्र आणि त्यावरील शाई, दोन्ही खूपच सुगंधित होती. त्याने भूर्जपत्र हातात घेऊन, घाईघाईने त्याचा मनसोक्त वास घेतला. नंतर तो पत्र वाचू लागला. त्यावर अगदी मोजका मजकूर लिहिलेला होता. तो असा—

‘‘या भूर्जपत्राच्या विषारी गंधाचा आस्वाद घेतल्यानंतर, जी व्यक्ती आयुष्यात उत्तम सुगंध, शीतल पाणी, चमचमीत जेवण, उत्कृष्ट गायन-वादन-नृत्य या सर्वांचा आस्वाद घेईल आणि सर्वोच्च विषयसुख भोगेल तो विनाविलंब यमसदनी दाखल होईल. परंतु जर त्याने मुंडन करून, विषयत्याग करून, नीरस अन्नग्रहणाचे साधुव्रत स्वीकारले तर तो जगू शकेल. अन्यथा मरण हे नक्की आहे.’’

चाणक्याने स्वत:च्या मरणापूर्वीच, आपल्या मरणाची किंवा साधुत्वाची अशी तजवीज करून ठेवलेली बघून, सुबंधूला धक्काच बसला. त्याने विचार केला, ‘‘चाणक्याचे मतिमाहात्म्य अगाध आहे. जिवंतपणी मला मरण भोगायला लावणाऱ्या चाणक्याच्या बुद्धीचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. मी त्याच्या घरी जाऊन त्याची पेटी उघडणार, असा तर्क त्याने केव्हाच करून ठेवला होता. आता इच्छा नसतानाही मला, उपभोगरहित आयुष्य जगणे भाग आहे.’’

चाणक्याने लिहिलेल्या मजकुराची खात्री करावी म्हणून, त्याने आपल्या एक

नोकराला बोलाविले. त्याला त्या विषारी गंधाचा वास घ्यायला लावला. नंतर त्याला सुगंधी जलाने स्नान घातले. दिव्य माला व आभूषणे चढविली. मंद वाद्यांच्या सुरात त्याला पंचपक्वान्नाचे भोजन खाऊ घातले. चाणक्याचे भविष्य खोटे ठरण्याची वाट बघू लागला.

पूर्वी कधी न अनुभवलेल्या त्या सुखोपभोगांनी, त्या नोकराच्या डोळ्यांवर झापड आली. 'मी आता झोपतो', असे म्हणून तो तेथेच झोपी गेला. त्या झोपेतून पुन्हा तो उठलाच नाही. स्वत:च्या डोळ्यासमोर घडलेली ही हकिगत पाहून, सुबंधूला आपले भविष्य कळून चुकले. मनात नसतानाही बळेबळेच दीक्षा धारण करून, तो एकटाच विमनस्कपणे विहार करीत राहिला.

◆◆◆

## प्रकरण ४

# कथाबाह्य संदर्भ

प्रकरण ४

# कथाबाह्य संदर्भ

मागील प्रकरणात, जैन साहित्यात नोंदविलेले चाणक्यचरित्र आपण प्रसंगाप्रसंगानुसार गोष्टीरूपाने पाहिले. श्वेतांबर आणि दिगंबरांनी रंगविलेली वेगवेगळी चाणक्यकथा, योग्य तो समतोल साधून एकत्रित करून दिली. परंतु कथेत ज्यांचा समावेश होऊ शकत नाही, असे कितीतरी संदर्भ जैन साहित्यात विखुरलेले दिसतात. संशोधनप्रकल्प लिहित असताना जी विशिष्ट पद्धती आणि शिस्त पाळावी लागते, त्याचा अवलंब करून या प्रकरणात कालक्रमानुसार सर्व संदर्भ क्रमाने दिले आहेत.

## अ) कथाभागापेक्षा वेगळे श्वेतांबर संदर्भ व त्यावरील भाष्य

हे संदर्भ विखुरलेल्या स्वरूपात असल्यामुळे कालक्रमानुसार घेतले आहेत.

(१) **आर्य-रक्षितकृत अनुयोगद्वार** हा रूढ मान्यतेनुसार अर्धमागधी आगमग्रंथ असला तरी अभ्यासकांनी त्याची भाषा 'आर्ष प्राकृत' किंवा 'प्राचीन जैन महाराष्ट्री' मानली आहे. आर्य-रक्षितांचा काळ इसवी सनाचे पहिले-दुसरे शतक असा मान्य केलेला आहे. अनुयोगद्वाराच्या ४९ व्या सूत्रात म्हटले आहे की – –

**'से किं तं लोइयं भावसुयं ? जं इमं अण्णाणिएहिं मिच्छादिट्ठीहिं सच्छंदबुद्धि – मइविगप्पियं । तं जहा – भारहं रामायणं हंभीमासुरुक्कं कोडिल्लयं --- चत्तारि य वेदा संगोवंगा ।'**

प्रस्तुत सूत्रात, पाच प्रकारच्या ज्ञानांपैकी श्रुतज्ञानाची चर्चा चालू आहे. त्यापैकी 'लौकिक भावश्रुत' म्हणजे काय ? हे समजावून सांगताना म्हटले आहे की, ''ह्या अज्ञानी मिथ्यादृष्टींनी स्वच्छंद बुद्धीने जे मतिविकल्पित प्रगट केले आहे ते सर्व लौकिक भावश्रुत होय. जसे – भारत, रामायण, हंभीमासुरुक्क (?), कौटिल्यक (कौटिल्याचे अर्थशास्त्र) --- तसेच अंगउपांगसहित चार वेद (ऋक् – यजु – साम – अथर्व).''

- प्रथमदर्शनी असे वाटते की, आर्य-रक्षितांनी तत्कालीन अभ्यासक्रमातील ग्रंथांची जी संपूर्ण यादी येथे प्रस्तुत केली आहे तिचा समावेश श्रुतज्ञानात केला असला तरी, तो तुच्छता व अनादराचा भाव दर्शवितो. परंतु जेव्हा आपण व्यवहारनय आणि निश्चयनयाच्या अंगाने विचार करतो तेव्हा असे दिसते की, द्वादशांगी गणिपिटकांच्या तुलनेने आर्य-रक्षितांनी रामायण, महाभारत, कौटिल्यक, दर्शने, बहात्तर कला आणि अंगउपांगासहित वेदांना दुय्यम मानले असले तरी व्यवहारनयानुसार याला लौकिक शास्त्रांचा दर्जा देण्यात आला आहे. अशा

प्रकारचा एकत्रित अभ्यासक्रम अनुयोगद्वार व नंदीसूत्र सोडता, इतर कोणत्याही ग्रंथात दिसून येत नाही. बौद्ध आणि हिंदू ग्रंथांत सुद्धा अभ्यासक्रम नोंदविण्याची ही दृष्टी आढळत नाही.

आर्य-रक्षितांसारख्या स्थविरांना हे जाणवले आहे की, लौकिक अथवा भौतिक प्रगतीसाठी ही शास्त्रे उपयुक्त आहेत परंतु आध्यात्मिक प्रगतीसाठी मात्र जिनप्रणीत वाणीच उपयुक्त आहे.

- लौकिक ग्रंथांच्या यादीत आधी भारत आणि नंतर रामायणाचा उल्लेख करणे वैशिष्ट्यपूर्ण मानले पाहिजे. काही अभ्यासक असा तर्क करतात की, मौखिक स्वरूपात रामायण आधी असले तरी लिखित स्वरूपात महाभारत आधी आले. या तर्काला वरील उल्लेखावरून पुष्टी मिळते.
- महाभारताचा 'भारत' असा केलेला उल्लेखही लक्षणीय मानावा लागतो. कारण महाभारताच्या एकूण तीन संस्करणांपैकी मधल्या संस्करणाचे नाव 'भारत' असे होते. म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकातही महाभारताचे 'महाभारत' हे नाव रूढ झालेले नव्हते.
- संस्कृतचे अभ्यासक असे नोंदवितात की, आरंभी ऋक् - यजु आणि साम हे तीन वेदच शिष्टसंमत मानले जात होते. अथर्ववेदासारख्या लोकवेदाचा समावेश चार वेदांमध्ये उशिरा केला जाऊ लागला. अनुयोगद्वारातील प्रस्तुत उल्लेखावरून चार वेदांची गणना कधीपासून होऊ लागली, यावरही जाता-जाता प्रकाश पडतो. कदाचित प्राकृत भाषांच्या माध्यमातून जैनांची दिसून येणारी लोकगामिता अधोरेखित करण्यासाठी, आर्य-रक्षितांनी अथर्ववेदाचा उल्लेख केला असावा. आर्य-रक्षितांविषयीच्या जैन पारंपारिक कथेत ते जन्माने ब्राह्मण असल्याचा व वेदविद्यापारंगत असल्याचा उल्लेख येतो. त्यांच्या मातेच्या आग्रहाखातर त्यांनी

दृष्टिवादाच्या अध्ययनास आरंभ केला. त्याआधी जैनधर्माची दीक्षाही ग्रहण केली. अर्थात् यामुळेच त्यांनी वेदवेदांगांचा आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा लौकिक विद्यांमध्ये समावेश केला असावा.

- अनुयोगद्वार व नंदीसूत्रात आलेल्या 'कोडिल्लय' या शब्दाचा अर्थ लावताना, भारतीय विद्येचे काही अभ्यासक त्या ग्रंथातील कुटिलता सिद्ध करण्यास सरसावलेले दिसतात. परंतु कौटिल्य ऊर्फ चाणक्याविषयीची जैनांची एकंदरीत आदरदृष्टी लक्षात घेता प्रस्तुत संदर्भ कुटिलता अधोरेखित करणारा नसून, कौटिलीय अर्थशास्त्र या राजनीतिविषयक शास्त्राचा आहे असे म्हणावेसे वाटते.

(२) **द्वितीय भद्रबाहुकृत आवश्यकनिर्युक्ति** हा ग्रंथ देखील 'आर्ष प्राकृत' अथवा प्राचीन जैन महाराष्ट्रीत लिहिलेला असून, त्याचा काळ इसवी सनाचे तिसरे-चौथे शतक मानला जातो. भद्रबाहु म्हणतात,

**खवगे अमच्चपुत्ते चाणक्के चेव थूलभद्दे अ ।**

**-----------------------**

**पारिणामिअ - बुद्धीए एवमाई उदाहरणा ।।**

निर्युक्तिसंग्रह, गा.५१ (पृ.९३)

प्रस्तुत निर्युक्तीत क्षपक, अमात्यपुत्र, चाणक्य, स्थूलभद्र इत्यादी अनेक व्यक्तींची नावे पारिणामिकी बुद्धीच्या उदाहरणादाखल नोंदविली आहेत. पारिणामिकी बुद्धीचे आदर्श म्हणून भद्रबाहूंनी ही नावे निर्युक्तीत संक्षिप्त स्वरूपात जतन करून ठेवली आहेत. जैन ज्ञानमीमांसेनुसार 'चतुर्विध बुद्धि' या मतिज्ञानाचे आविष्कार असून त्या अनुक्रमे औत्पत्तिकी-वैनयिकी-कर्मजा-पारिणामिकी अशा आहेत. चाणक्य आणि त्याचे अर्थशास्त्र हा ग्रंथ भद्रबाहूंनी त्याच्या

पारिणामिकी बुद्धीचा द्योतक मानला आहे. पारिणामिकी बुद्धीचे वैशिष्ट्य असे की, जसजसे वय, चिंतन आणि अनुभव वाढतो तसतशी ती बुद्धी अधिकाधिक परिपक्व होत जाते.

- हिंदू परंपरेनुसार देखील, कौटिलीय अर्थशास्त्र हा राजनीतिशास्त्रावरचा अंतिम ग्रंथ मानला जातो. भद्रबाहूंच्या उल्लेखातही असे सूचित केले आहे की, चाणक्याने पूर्वसूरींचे चिंतन आणि राज्यव्यवस्थेचा स्वत:चा प्रदीर्घ अनुभव यामधून हा ग्रंथ लिहिला. चाणक्याने हा ग्रंथ त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिला असावा असेही सूचित होते. समकालीन राजनीतीचे सारसर्वस्व असलेल्या चाणक्याच्या ग्रंथाचा समावेश पारिणामिकी बुद्धीच्या अंतर्गत करून द्वितीय भद्रबाहूंनी त्याला दिलेले गौरवास्पद स्थान नक्कीच लक्षणीय आहे.
- आर्य-रक्षितांनी लौकिक भावश्रुतात गणना करून एक प्रकारे त्याचे थोडेसे दुय्यमत्व प्रकट केले असले तरी भद्रबाहूंनी मात्र खुल्या दिलाने चाणक्याचा उल्लेख अनुभवसंपन्न बुद्धिमत्तेच्या उदाहरणांमध्ये केला आहे.
- वस्तुत: चाणक्याच्या चरित्रातून त्याच्या उपजत बुद्धिमत्तेचे दिग्दर्शन अनेकदा होते. तरीही जैन लेखकांनी चाणक्याचा उल्लेख पारिणामिकी बुद्धीच्या संदर्भातच केलेला दिसतो. जैन परंपरेच्या दृष्टीने चतुर्विध बुद्धींचा आदर्श म्हणून श्रेणिकपुत्र अभयकुमाराचे उदाहरण दिले जाते. त्याच्या तुलनेत चाणक्याचे गौणत्व दाखविण्याचा जैन लेखकांचा हा सुप्त प्रयत्न दिसतो.
- श्वेतांबर आचार्यांनी चाणक्याला श्रावकत्व बहाल करून, त्याचे जैनीकरण करण्याचा प्रयत्न केला असला तरी अभयकुमाराच्या तुलनेत त्याचे दुय्यमत्व दाखवून एक प्रकारे चाणक्याच्या वैदिक परंपरेचे व ब्राह्मणत्वाचेही जाता-जाता

सूचन केलेले दिसते.

(३) **द्वितीय भद्रबाहूंच्या पिण्डनिर्युक्ति** या ग्रंथातील ५०० व्या गाथेत म्हटले आहे की,

**चुन्ने अंतद्धाणे चाणक्के पायलेवणे जोगे ।**

या गाथार्धात साधूंच्या आहाराविषयीचा एक प्रसंग अतिसंक्षिप्तपणे नोंदवून ठेवला आहे. टीकाकाराच्या मदतीशिवाय चाणक्यकथेतील त्याचा संदर्भ समजू शकत नाही. टीकाकार म्हणतो,

**चूर्णेनान्तर्द्धाने ऽ दृष्टीकरणे चाणक्यविदितौ क्षुल्लौ निदर्शनम् ।**

मगधात पडलेल्या तीव्र दुष्काळाच्या वेळी साधूंना भिक्षा मिळेनाशी झाली. त्यावेळी दोन तरुण शिष्यांनी चूर्णप्रयोगाने अंतर्धान पावून कशा प्रकारे अन्न प्राप्त केले व ते चाणक्याने कोणत्या युक्तीने जाणून घेतले— हा सर्व वृत्तांत येथे संक्षिप्तपणे सांगितला आहे. पिण्डनिर्युक्तीच्या तीन भाष्यगाथांमध्ये या संक्षिप्त कथेचा थोडा विस्तार केला आहे. निशीथचूर्णीत ही कथा त्याहून अधिक विस्ताराने सांगितली आहे. पुढे चौदाव्या शतकात क्षमारत्नाने लिहिलेल्या संस्कृत अवचूरीमध्ये प्राय: निशीथचूर्णीचाच संस्कृत अनुवाद प्रस्तुत केला आहे. निशीथचूर्णीतील कथेच्या विवरणाच्या प्रसंगी यातील सर्व तपशील पुढे दिलेले आहेत. एक गोष्ट मात्र यावरून नक्की ध्यानात येते की, जेथे जेथे चाणक्याचा संबंध संक्षिप्तपणे येतो, तेथे तेथे टीकाकारांनी क्रमाक्रमाने कथांचा विस्तार करीत करीत चाणक्याला चौदा-पंधराव्या शतकापर्यंत जीवित ठेवले आहे.

(४) **द्वितीय भद्रबाहुकृत ओघनिर्युक्तीत** ४१८ व्या गाथेत म्हटले आहे,

**उग्गहकाईयवज्जं छंडण ववहारु लब्भए तत्थ ।**

द्रोणाचार्यांच्या टीकेच्या आधारे या संक्षिप्त गाथेचे स्पष्टीकरण समजावून घ्यावे लागते. त्याचा आशय सामान्यत: असा आहे —

‘‘राजाच्या आदेशानुसार गृहस्थाने स्वत:च्या अगर दुसऱ्याच्या घराच्या अगदी निकट ठिकाणी मलमूत्र करण्यास मनाई केली होती. चाणक्याने म्हटले होते की, असे केल्यास राजदरबारी गुन्हा दाखल केला जाईल.’’

चाणक्याचा हा नियम लक्षात घेऊनही भद्रबाहूंनी साधुआचारातील परिष्ठापना-समितीत अथवा उत्सर्ग-समितीत तो नियम समाविष्ट करून घेतला. चाणक्याने घालून दिलेले नागरिकशास्त्राचे नियमही साधुआचारात विशेषत: छेदसूत्रात समाविष्ट करून घेतलेले दिसतात. इतर अनेक साधुआचारविषयक आणि श्रावकविषयक नियमांवरही अर्थशास्त्रातील कडक आज्ञांची छाया स्पष्टपणे जाणवते. याविषयीचा अधिक ऊहापोह या पुस्तकात पुढे स्वतंत्र प्रकरणात केला आहे.

मलमूत्रविसर्जन करताना घ्यावयाची खबरदारी, चाणक्याची पर्यावरणविषयक दृष्टी निश्चितच दाखवून देते. जैन परंपरेला हा नियम अतिशय योग्य वाटला कारण ‘षड्जीवनिकायांची रक्षा’ हा विषय प्राचीन अर्धमागधी ग्रंथातही वेळोवेळी अधोरेखित करण्यात आला आहे. आजूबाजूच्या वातावरणाला हानिकारक असे कोणतेही कृत्य जैन दर्शनाच्या तत्त्वज्ञानविषयक चौकटीत बसत नाही. म्हणूनच परिष्ठापना-समितीचा विशेष विचार तत्त्वार्थसूत्रासारख्या दार्शनिक ग्रंथातही समाविष्ट केलेला दिसतो.

मलमूत्रविसर्जनाचा नियम देताना टीकाकाराने चाणक्याचा आवर्जून केलेला उल्लेख, जैनांच्या चाणक्य-प्रेमाची जणू ग्वाहीच देतो.

**(५)** **धर्मदासगणींचा उपदेशमाला** हा ग्रंथ प्राचीन जैन महाराष्ट्रीत लिहिलेला असून, त्यामध्ये ५४२ द्वारगाथांमध्ये एकंदर ७० कथांची गुंफण केली आहे. हा ग्रंथ

इसवी सनाच्या चौथ्या-पाचव्या शतकातील असून, शीर्षकानुसार तो धार्मिक उपदेशाने भरलेला आहे. जैन परंपरेत चाणक्याची निंदा करणारे जे अतिशय अल्प उल्लेख आहेत त्यापैकी हा अतिशय महत्त्वाचा उल्लेख आहे. उपदेशमालेच्या १५० व्या द्वारगाथेत 'चंद्रगुप्तगुरूचा' अर्थात् चाणक्याचा निर्देश केला आहे. या गाथेची थोडी पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. विषय असा चालू आहे की, 'माणसाने खुद्द स्वतःच्या मुलावरही विश्वास ठेवू नये'. त्यासाठी आधी राजा श्रेणिक (बिंबिसार) आणि कूणिक (अजातशत्रू) यांचे उदाहरण दिले आहे. कूणिकाने आपल्या पित्यास तुरुंगात टाकले आणि अखेरीस श्रेणिकाला मृत्यूला कवटाळावे लागले— असा इतिहास जैन नोंदवितात. फसवणुकीने केलेल्या घाताचे उदाहरण म्हणून धर्मदासगणि पुढे म्हणतात —

**लुद्धा सकज्जतुरिआ, सुहिणोऽवि विसंवयंति कयकज्जा ।**

**जह चंदगुत्तगुरुणा, पव्वयओ घाइओ राया ।।**

याचा भावार्थ असा की, ''स्वतःची कार्यसिद्धी येनकेनप्रकारेण करणारे लोभी लोक एकदा आपले काम साधले की स्वकीयांच्या सुद्धा विरोधात जायला मागेपुढे पाहात नाहीत. आता हेच पाहा ना ! त्या चंद्रगुप्ताच्या गुरूने अर्थात् चाणक्याने राज्यप्राप्तीसाठी मदत करणाऱ्या पर्वतकाचा केवढा मोठा घात घडवून आणला !''

उपदेशमाला ग्रंथावर इसवी सनाच्या बाराव्या शतकात रत्नप्रभसूरींनी टीका लिहिलेली आहे. धर्मदासगणींच्या निंदाव्यंजक उल्लेखांचा आधार घेऊन टीकाकाराने एकूण १८२ गाथांमध्ये चाणक्याचे संपूर्ण चरित्र रंगविले आहे. मूळ लेखकाची भावना लक्षात घेऊन रत्नप्रभाने त्यात चाणक्याचा धूर्त, मायावी आणि कुटिल स्वभाव निदर्शनास आणला आहे. तसे उद्गारही वारंवार काढले आहेत. त्या संपूर्ण चरित्राचा परामर्श आपण पुढे

घेणारच आहोत. तूर्त १५० व्या द्वारगाथेवरील निरीक्षणे पुढीलप्रमाणे नोंदविता येतील –
–

- चंद्रगुप्ताचा गुरू म्हणून चाणक्याचा केलेला उल्लेख.
- पर्वतकाच्या (पुरूच्या ? सेल्युकसच्या ?) मदतीने चंद्रगुप्ताने मगध साम्राज्यावर मिळविलेला विजय.
- चाणक्याच्या सल्ल्यानुसार चंद्रगुप्ताने केलेला पर्वतकाचा घात.

वस्तुत: जिनदासगणींनी आवश्यकचूर्णीतही हा प्रसंग चित्रित केला आहे. तथापि याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोण धर्मदासगणींपेक्षा पूर्ण भिन्न आहे. चूर्णीकार याच घटनेकडे चाणक्याच्या पारिणामिकी बुद्धीचे उदाहरण म्हणून बघतात. चाणक्याच्या कृतींचे समर्थन न करणारा ग्रंथकार म्हणून धर्मदासगणी आणि रत्नप्रभसूरींचा विशेष विचार करावा लागतो.

(६) **देववाचकगणीकृत नंदीसूत्र** हा ग्रंथ इसवी सनाच्या पाचव्या शतकातला मानला जातो. ४५ अर्धमागधी आगमग्रंथांच्या यादीत चूलिकासूत्राच्या रूपाने याची गणना केली जाते. या ग्रंथातील ७२ व्या सूत्रात मिथ्याश्रुत समजल्या गेलेल्या ग्रंथांची एक यादी दिलेली आहे. अनुयोगद्वारसूत्राप्रमाणेच ही यादी भारत, रामायणापासून सुरू होते. आणि अंगउपांगसहित चार वेदांनी संपते. या समकालीन भारतीय अभ्यासक्रमाबाबतची सर्व निरीक्षणे अनुयोगद्वाराप्रमाणेच असल्याने त्यांची पुनरावृत्ती केलेली नाही. नंदीसूत्रकाराचे वेगळेपण असे की, त्याने एक अतिशय चांगली वेगळी पुस्ती या यादीला जोडली आहे. ती अशी की,

**एयाइं मिच्छद्दिट्ठिस्स मिच्छत्तपरिग्गहियाइं मिच्छसुयं, एयाणि चेव सम्मद्दिट्ठिस्स सम्मत्तपरिग्गहियाइं सम्मसुयं । अहवा मिच्छद्दिट्ठिस्स वि सम्मसुयं, कम्हा ? सम्मत्तहेउत्तणओ**

।

नंदीसूत्रकाराचा भावार्थ असा आहे की, ‘‘हे सर्व ग्रंथ जर मिथ्यादृष्टी असलेल्यांनी वाचले तर ते मिथ्याश्रुत ठरतात. अन्यथा सम्यक्दृष्टी ठेवून तारतम्याने वाचल्यास तेच ग्रंथ सम्यक्श्रुत ही ठरतात. इतकेच नव्हे तर, मिथ्यादृष्टी व्यक्तीने हे ग्रंथ वाचून जर सम्यक् बोध घेतला तर त्याही अर्थाने भारत, रामायण, कौटिलीय अर्थशास्त्र, वेद इत्यादी ग्रंथ सम्यक्श्रुत ठरतात.’’

- कौटिल्यशास्त्राला मिथ्याश्रुतांच्या यादीत टाकल्यामुळे काही अभ्यासकांचा असा गैरसमज झाला की नंदीसूत्रकाराला या सर्व ग्रंथांना झिडकारून फक्त जैनधर्मीय ग्रंथांची उपादेयता सांगावयाची आहे. अभ्यासकांनी काढलेला हा निष्कर्ष खरोखरच गैरसमजावर आधारित आहे. कारण ग्रंथांचे तात्पर्य शोधताना नंदीसूत्रकाराला निरपेक्ष तटस्थ परंतु उदारमतवादी दृष्टिकोण अपेक्षित आहे. अर्थातच कौटिल्याच्या अर्थशास्त्राकडेही तो याच दृष्टीने पाहतो. उत्कृष्ट राज्यव्यवस्थेचा आदर्श म्हणून व्यावहारिक किंवा लौकिक दृष्टीने अर्थशास्त्राला तो महनीय ग्रंथच समजतो.
- ‘मिथ्याश्रुत’ म्हणून बाजूला टाकलेल्या ग्रंथांकडे बघण्याची नवी दृष्टी नंदीसूत्रकाराने दिल्यामुळे पुढील काळात जणू विविध विषयांवर लिखाण करण्यासाठी जैन आचार्यांना एक नैतिक बळ प्राप्त झाले. त्यायोगेच त्यांनी रामायण, महाभारत, अर्थशास्त्र, षड्दर्शने किंबहुना इतर लाक्षणिक ग्रंथही अतिशय उत्साहाने लिहिले. अर्थात् हे करताना त्यांनी जैनीकरणाच्या प्रक्रियेचा आधार मात्र जरूर घेतला कारण त्यांच्या दृष्टीने तीच सम्यक्दृष्टी होती.
- नंदीसूत्रातील ‘मिथ्याश्रुत’ शब्दाकडे पूर्वग्रहदूषितपणे न पाहता व्यावहारिकपणे पाहण्याचा नंदीसूत्रकाराचा सल्ला मोलाचाच म्हटला पाहिजे. जैन कथासाहित्यात

चाणक्याला वारंवार उद्धृत करण्यामागेही हेच कारण असावे.

- एक शेवटची टिप्पणी म्हणून असेही म्हणता येईल की, जैन लेखकांनी विशेषत: श्वेतांबरांनी चाणक्याला 'परम श्रावक' असे संबोधून कौटिलीय अर्थशास्त्र हे सम्यक्श्रुत असल्याचे सूचित केले आहे.

(७) ज्याचा लेखक **अज्ञात** आहे असे **आतुरप्रत्याख्यान** नावाचे **प्रकीर्णक** प्राचीन जैन महाराष्ट्रीतील एक जुने प्रकीर्णक म्हणून ओळखले जाते. प्रकीर्णके या प्राय: स्थविरकृत रचना प्रकरण-ग्रंथासारख्या असून, पारंपरिक ४५ अर्धमागधी आगमांमध्ये त्यांचा समावेश इसवी सनाच्या पाचव्या शतकात केला गेला असावा, असे अभ्यासकांचे मत आहे. प्रकीर्णकांची संख्या यानंतरही वाढतच गेली. विशेष गोष्ट अशी की, अनेक प्रकीर्णकांमध्ये प्रामुख्याने पंडितमरणाचा विचार केलेला आहे. अनशन, प्रायोपगमन, भक्तप्रत्याख्यान, पादपोपगमन, इंगिनीमरण अशा नावांनी प्रसिद्ध असलेल्या मृत्युप्रकारांचे वर्णन त्यात येते. संस्तारक अथवा संलेखना या प्रक्रियेच्या अंतर्गत स्वीकारलेल्या मरणांचा सांगोपांग विचार या प्रकीर्णकात येतो. आदर्श मरणाचे चित्रण करताना प्रकीर्णक ग्रंथांनी वारंवार चाणक्याचे उदाहरण दिलेले आहे. प्रकीर्णकातील ही उदाहरणे क्रमाने पाहू.

आतुरप्रत्याख्यान (२) या प्रकीर्णकातील २३ व्या गाथेत म्हटले आहे की,

**एसो सुहपरिणामो चाणक्को पयहिऊण नियदेहं ।**

**उववन्नो सुरलोए, पच्चक्खायं मए सव्वं ।।**

ज्याने सर्व जीवनावश्यक गोष्टींचा संपूर्ण त्याग करून पंडितमरण स्वीकारले आहे, अशा व्यक्तीने काढलेले उद्गार प्रस्तुत गाथेत व्यक्त केले आहेत. ही व्यक्ती

म्हणते, ''चाणक्याने ज्याप्रमाणे शुभ भाव धारण करून आपल्या देहाला अग्नीच्या स्वाधीन केले आणि तो देवलोकात जन्मला त्याप्रमाणे मी अन्नवस्त्रादींचा त्याग करून, ममत्वभावनेचेही प्रत्याख्यान केले आहे.''

- कालक्रमानुसार प्रकीर्णकांच्या पूर्वी लिहिल्या गेलेल्या शिवकोट्याचार्यकृत भगवती आराधना नावाच्या ग्रंथात मृत्यूच्या संदर्भात चाणक्याचा केलेला उल्लेख, हा सर्वप्रथम मानला पाहिजे. श्वेतांबर परंपरेत प्रकीर्णकांमध्ये हा विचार चाणक्याच्या संदर्भात आणखीही वेगवेगळ्या प्रकारे मांडलेला दिसतो.

(८) **भक्तपरिज्ञा प्रकीर्णकातील** १६२ व्या गाथेत म्हटले आहे की,

**पाडलिपुत्तम्मि पुरे चाणक्को नाम विस्सुओ आसी ।**

**सव्वारंभनियत्तो इंगिणिमरणं अह निवन्नो ।।**

– या छोट्याशा गाथेतून सूचित होणाऱ्या गोष्टी पुढीलप्रमाणे नोंदविता येतील –

–

- चाणक्याचे पाटलिपुत्राशी असलेले घनिष्ठ नाते.
- चाणक्याचे नाव समाजात दंतकथा–आख्यायिकांच्या द्वारे सर्वविश्रुत असणे.
- मरणाच्या वेळी चाणक्याचे सर्व प्रकारच्या राजनैतिक उपक्रमातून स्वेच्छापूर्वक निवृत्त होणे. त्याने इंगिनीमरण या मृत्युप्रकाराचा स्वीकार करणे की ज्यामध्ये तो अंतिम अवस्थेतही कोणाचीही मदत स्वीकारत नाही.
- ही घटना पाटलिपुत्राच्या आसपासच घडलेली असणे.

ही गाथा अशीच्या अशी 'संस्तारक' प्रकीर्णकातही पुनरावृत्त झालेली दिसते. चाणक्याविषयीचा आदरभाव येथे स्पष्टपणे दिसून येतो.

(९) **मरणविभक्ति नामक प्रकीर्णकात** ४७९ व्या गाथेत हीच घटना पुढीलप्रमाणे नोंदविली आहे —

**गोब्बर पाओवगओ सुबुद्धिणा णिग्घिणेण चाणक्को ।**

**दड्ढो न य संचलिओ, सा हु धिई चिंतणिज्जा उ ।।**

अनेक तपशील एकत्रितपणे दिलेल्या या गाथेत, चाणक्याच्या विलक्षण धैर्याची प्रशंसा केली आहे. त्यातील इतर गोष्टी पुढीलप्रमाणे सांगता येतील—

- आधीच्या प्रकीर्णकांपेक्षा थोडी विशेष माहिती यातून मिळते.
- सुबुद्धि हा अत्यंत निर्घृण होता. त्याने जिवंतपणीच चाणक्याला जाळले. कदाचित म्हणूनच विशाखदत्ताने मुद्राराक्षसात त्याला 'राक्षस' म्हटले असावे. इतरत्र त्याचे नाव 'सुबन्धु' असे दिसते.
- ही घटना गोब्बर नावाच्या छोट्या गोकुलग्रामात घडली. भगवान महावीरांच्या वर्षावासांमध्ये त्यांनी ज्या ज्या ठिकाणी निवास केला, त्यामध्ये गोब्बरग्रामाचा उल्लेख आवर्जून केलेला दिसतो. म्हणजे या प्रकीर्णकाच्या मते सुद्धा, चाणक्याचा अंत मगधप्रदेशातच झाला.
- गोब्बरग्राम या नावाने चाणक्याच्या संस्तारकाच्या आसपास गोमयापासून बनलेल्या गोवऱ्या असाव्यात, असे सूचित होते. क्रूरबुद्धीच्या सुबुद्धीने पेटवून दिल्यानंतर गोवऱ्या ज्वालाग्राही असल्याने आग भडकली, तरीही चाणक्य आपल्या निश्चयापासून चलित झाला नाही. प्रत्येक संथाराधारक व्यक्तीने चाणक्याच्या अतुलनीय धैर्याचा विचार करावा, असा एकंदर आशय दिसतो. भगवती आराधना ग्रंथातून ही गाथा प्राय: तशीच्या तशी घेतलेली दिसते.

**(१०) संस्तारक प्रकीर्णकातील** ७३ वी गाथा, भक्तपरिज्ञा प्रकीर्णकातील गाथेप्रमाणेच आहे. ७४ व्या गाथेचा आशय जवळजवळ मरणविभक्ति-गाथेशी मिळताजुळता आहे. शब्द थोडे वेगळे आहेत. म्हटले आहे की, ''पूजा करण्याच्या निमित्ताने जवळ येऊन, चाणक्याच्या शत्रूने त्याचा देह जाळला. त्या जळत्या अवस्थेतही त्याने आपल्या उत्तमार्थाचा त्याग केला नाही.''

**(११) आराधनापताका नावाच्या प्रकीर्णकात** ८२४ व्या गाथेत हीच घटना पुढीलप्रकारे नमूद केली आहे —

**किं न सुओ चाणक्को सड्ढो गुट्ठे सुबंधुणा दड्ढो ।**
**इंगिणिमरणपवन्नो धीरो चलिओ न झाणाओ ।।**

या गाथेतून पुढील तथ्ये सूचित होतात —

- 'किं न सुओ' या शब्दांमधून समाजात मौखिक परंपरेने फिरणाऱ्या आख्यायिकांचे सूचन होते.
- 'सड्ढ' या शब्दाने चाणक्याचे श्रावकत्व सूचित केले आहे.
- 'गुट्ठ' या शब्दाने हे सूचित होते की हा भयानक प्रसंग गोठ्यात घडला.
- गोठ्याला आग लावण्याचे काम सुबंधूने केले.
- चाणक्याने स्वीकारलेले मरण 'इंगिनीमरण' नावाच्या प्रकारात मोडते.
- चाणक्याच्या अतुलनीय धैर्याचा गौरव 'धीरो' या शब्दाने केला आहे.
- या भयंकर प्रसंगी चाणक्य ध्यानमग्न होता. त्याचा ध्यानभंग झाला नाही.

एकंदरीत, प्रकीर्णकांमध्ये चाणक्याच्या मृत्यूविषयीची विधाने असली तरी चाणक्याच्या जीवनाची संपूर्ण पार्श्वभूमी प्रकीर्णकांच्या कर्त्यांना ज्ञात आहे हे स्पष्टपणे

जाणवते.

ब्राह्मण परंपरेने चाणक्याच्या मृत्यूबाबत मौनच पाळणे पसंत केलेले दिसते.

**(१२) व्यवहारभाष्य** या ग्रंथाचे अर्धमागधी आगमांवरील टीकासाहित्यात एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. अशी मान्यता आहे की कल्पभाष्य, निशीथभाष्य आणि व्यवहारभाष्य ही तीनही भाष्ये इसवी सनाच्या चौथ्या-पाचव्या शतकात आर्ष-प्राकृतात अथवा प्राचीन जैन महाराष्ट्रीत लिहिली गेली. या भाष्यगाथा, निर्युक्तिगाथांमध्ये मिश्रित स्वरूपात आढळून येतात. कल्प, निशीथ आणि व्यवहारसूत्रांचा मुख्य उद्देश, साधुआचाराची नियमावली तयार करणे हा असला तरी या भाष्यगाथांमध्ये दंतकथा, आख्यायिका आणि अनुश्रुति या संक्षिप्त स्वरूपात सूचित करून ठेवल्या आहेत. व्यवहारभाष्याच्या मूळ गाथांमध्ये तीन ठिकाणी चाणक्यविषयक घटनांचे सूचन केलेले दिसते. इसवी सनाच्या बाराव्या शतकात मलयगिरीने लिहिलेल्या टीकेच्या मदतीखेरीज त्यातील मूळ कथेचा गाभा उलगडणे, जवळजवळ अशक्य आहे. या ठिकाणी व्यवहारभाष्याने सूचित केलेली कथा केवळ संक्षिप्त स्वरूपात नोंदविलेली आहे.

**(अ)** व्यवहारभाष्य १.९१ (७१६) मध्ये असे म्हटले आहे की,

**नंदे भोइय खण्णा आरक्खिय घडण गेरु नलदामे ।**

**मुईग गेह डहणा ठवणा भत्ते सुकत्तसिरा ।।**

पाटलिपुत्रात गुप्तपणे नंदाची जी पक्षपाती माणसे रहात होती त्यांचा काटा काढण्यासाठी चाणक्याने नलदाम नावाच्या विणकराची नेमणूक केली. संकट मुळापासून नष्ट करण्याचा नलदामाचा स्वभाव ओळखून, चाणक्याने त्याला ‘आरक्षक’ पद दिले.

नंद-पक्षपाती माणसांना भोजनानिमित्त बोलावून, त्यांची मस्तके नलदामाने छाटून टाकली.

मलयगिरीने आवश्यकचूर्णीच्या आधारे संपूर्ण कथा विस्ताराने सांगितली आहे. त्याने चाणक्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे व तोही अत्यंत आदरपूर्वक !

**(ब)** व्यवहारभाष्य १.१३२ (९५२) मध्ये म्हटले आहे की,

**भंभीयमासुरुक्खे, माढरकोडिण्ण (? ल्ल) दंडनीतीसु ।**

**अथऽलंचऽपक्खगाही, एरिसया रूवजक्खा तु ।।**

या गाथेचा अर्थ काहीसा संदिग्ध असला तरी कौटिल्याच्या दंडनीतीचा स्पष्ट उल्लेख यात आहे. 'अलंच' या शब्दातून कौटिल्याने लाचखोरीला कसा आळा घातला होता हे स्पष्ट होते. 'अपक्खगाही' या शब्दातून चाणक्याचा निष्पक्षपातीपणा सांगितला आहे.

या भाष्यात चाणक्याविषयी (कौटिल्याविषयी) जे म्हटले आहे त्यातून त्याच्याविषयीचा आदरभाव व्यक्त होतो.

**(क)** व्यवहारभाष्य १०.५९२ (४४२०) मध्ये म्हटले आहे की,

**पडिणीय कोई, अग्गिं से सव्वतो पदेज्जाहि ।**

**पादोवगते संते, जह चाणक्कस्स व करिसे ।।**

चाणक्याच्या पादपोपगमन मरणाचा या गाथेत विचार केलेला आहे. त्याच्या शत्रूने त्याला कोणत्या प्रकारे जाळले, त्याचा निर्देश उपरोक्त प्रकीर्णकांमध्ये केलेल्या वर्णनापेक्षा फारसा भिन्न नाही.

**(१३)निशीथभाष्यांची** रचना **संघदासगणींनी** केली आहे, असे जैन परंपरा मानते. निशीथभाष्यात एकूण ६७०३ गाथा असून, त्या २० उद्देशकांमध्ये विभागलेल्या आहेत. या भाष्यगाथांमध्ये गाथांचे तीन संच असे आहेत की, ज्यामध्ये चाणक्यविषयक आख्यायिका संक्षेपाने सांगितल्या आहेत. या तीनही भाष्यसंचांवर निशीथचूर्णीत थोड्या अधिक विस्ताराने कथाभाग येतात.

**(अ)** निशीथभाष्याच्या ६१६ व्या गाथेत, अमात्य चाणक्याविषयीचा एक दृष्टांत येतो. विषपुष्पांचा गंध घेण्यास सुबंधूला भाग पाडून, चाणक्याने त्याचा कसा सूड घेतला — याची कथा येथे मोजक्या शब्दात दिली आहे.

**(ब)** निशीथभाष्याच्या ४४६३-६४-६५ या तीन गाथांमध्ये कुसुमपुरातील (पाटलिपुत्रातील) दुष्काळाचा संदर्भ येतो. गुप्तरूपाने चंद्रगुप्ताचा आहार भक्षण करणाऱ्या दोन तरुण जैन मुनींच्या, या कृत्याचा छडा, चाणक्य कशा प्रकारे लावतो, याची कथा येथे संक्षिप्त रूपात येते.

**(क)** निशीथभाष्याच्या ५१३७-३८-३९ या तीन गाथांमध्ये, मौर्यांच्या आज्ञेचा केलेला भंग आणि त्यांना चाणक्याने दिलेली ग्रामदाहाची शिक्षा याबद्दलचा उल्लेख सारांश रूपाने येतो.

**(१४) आवश्यकचूर्णी** ही **जिनदासगणि-महत्तरांची** एक वैशिष्ट्यपूर्ण साहित्यकृती मानली जाते. निशीथविशेषचूर्णी ही देखील जिनदासगणींची दुसरी महत्त्वपूर्ण कृती होय. या दोन्ही चूर्णी इसवी सनाच्या सहाव्या-सातव्या शतकात लिहिलेल्या असून, त्यांची भाषा अभिजात जैन महाराष्ट्री आहे. प्राकृतच्या अभ्यासकांनी जिनदासगणींच्या सहज ओघवत्या भाषेची विशेष दखल घेतली आहे. चाणक्याच्या

जीवनचरित्राच्या दृष्टीने आवश्यक आणि निशीथचूर्णी, हे खूपच महत्त्वपूर्ण मूलाधार गणले जातात. सहाव्या-सातव्या शतकापूर्वी उपलब्ध असलेले चाणक्यविषयक सर्व त्रोटक संदर्भ एकत्रित गुंफून आणि त्यांना कल्पनाशक्तीची थोडी जोड देऊन, या दोन्ही चूर्णींमध्ये मिळून चाणक्याचा जन्मापासून मृत्यूपर्यंतचा सर्व वृत्तांत येथे थोडा-थोडा विभागून दिला आहे. हेमचंद्राच्या संस्कृत चाणक्यचरित्राचाही हाच महत्त्वाचा मूलाधार आहे.

आवश्यकचूर्णीतील महत्त्वाचे उल्लेख याप्रमाणे आहेत —

**(अ)** आवश्यकचूर्णी (खंड १) पृ.१५६ :

कौटिल्यकृत अर्थशास्त्राचा संक्षिप्त उल्लेख.

**(ब)** आवश्यकचूर्णी (खंड २) पृ.२८१ :

चाणक्याने केलेली परपाषंडांची प्रशंसा आणि त्याचे परिणाम.

**(क)** आवश्यकचूर्णी (खंड २) पृ.५६३-५६६ :

चाणक्याच्या पारिणामिकी बुद्धीचे उदाहरण म्हणून, चाणक्याच्या जन्मापासून चंद्रगुप्ताचा राजकोष भरण्यापर्यंतचा विस्तृत वृत्तांत.

**(१५-१७) निशीथविशेषचूर्णी** हा ग्रंथ समकालीन भारतीय संस्कृती समजावून घेण्यासाठी, महत्त्वपूर्ण असा जैन महाराष्ट्री प्राकृतात लिहिलेला ग्रंथ मानला जातो. तो आकाराने इतका प्रचंड आहे की एकूण चार भागात तो प्रकाशित केलेला आहे. **जिनदासगणींनी** आधी स्वत:च लिहिलेल्या आवश्यकचूर्णीत चाणक्याच्या चरित्रातील जो कथाभाग लिहिलेला आहे तो ध्यानात घेऊन निशीथचूर्णीत अत्यंत विचारपूर्वक, चाणक्याच्या आयुष्याचा उत्तरार्ध नोंदविला आहे. अर्थात् साधुआचारातील विशिष्ट नियमांसाठी दिलेली उदाहरणे म्हणूनच

या चाणक्यकथा येतात.

निशीथचूर्णीतील चाणक्यविषयक उल्लेख याप्रमाणे आहेत —

**(अ)** निशीथचूर्णी (खंड २) पृ.३२-३३

**(ब)** निशीथचूर्णी (खंड ३) पृ.४२३-४२४

**(क)** निशीथचूर्णी (खंड ४) पृ.१०-११

**(१८) आचारांगचूर्णीचे** कर्तृत्व परंपरेने इसवी सनाच्या सहाव्या-सातव्या शतकात होऊन गेलेल्या **जिनदासगणींकडेच** जाते. तथापि आचारांगचूर्णीची भाषा आवश्यक व निशीथचूर्णीपेक्षा काही प्रमाणात वेगळी दिसते. आचारांगचूर्णीत फक्त एका ठिकाणी चाणक्याचा ओझरता उल्लेख येतो. शिवाय तेथे आवश्यकचूर्णीचा संदर्भ अजिबात दिलेला नाही.

**अ)** चाणक्याच्या पत्नीचा तिच्या गरिबीमुळे अपमान झाल्याने, चाणक्याच्या कानावर ही गोष्ट गेल्यावर, त्याने नंदवंशाचा उच्छेद केला — असा उल्लेख आचारांगचूर्णीच्या ४९ व्या पृष्ठावर येतो.

आचारांगाच्या १.१.२.१ मध्ये म्हटले आहे की, 'माता-पिता --- पत्नी इत्यादींमध्ये आसक्त असलेले लोक प्रमादास प्रवृत्त होतात.' या वाक्याच्या स्पष्टीकरणासाठी चाणक्याचा वर दिलेला ओझरता उल्लेख येतो.

- आवश्यकचूर्णीत जो चूर्णीकार चाणक्याचे जीवनचरित्र अत्यंत गौरवाने सांगतो तोच चूर्णीकार आचारांगचूर्णीत चाणक्याच्या आसक्तीसंबंधी आणि प्रमादासंबंधी इतके अनुदार उद्‌गार काढेल, हे तर्कबुद्धीला पटत नाही. हीच गोष्ट सूत्रकृतांगाच्या चूर्णीलाही लागू पडते. त्यामुळे सर्व उपलब्ध चूर्णी जिनदासगणींनी लिहिल्या, या पारंपारिक मताबाबत विवाद उत्पन्न होऊ शकतो. परंतु प्रस्तुत संदर्भात त्या

विवादात न शिरणेच योग्य ठरेल.

- आचारांगचूर्णीत 'गोल्ल' देशाचा उल्लेख येतो. डॉ. जगदीशचंद्र जैन यांच्या मते, हा प्रदेश गोदावरीच्या तीरावर आहे. त्यांनी गोल्ल देशातील काही वैशिष्ट्ये आणि खाद्यपदार्थ सांगितले आहेत. (प्राकृत साहित्य का इतिहास, जे.सी.जैन, पृ.२१३).
- आवश्यकचूर्णीत 'गोल्ल' देशाचा उल्लेख चाणक्याचे जन्मस्थान म्हणून येतो. परंतु तेथे गोल्ल देशाची वैशिष्ट्ये नोंदविलेली नाहीत. आचारांगचूर्णीत गोल्ल देशाची विशेष माहिती येते. परंतु चाणक्याचे जन्मस्थान म्हणून त्याचा उल्लेख येत नाही. परिणामी चाणक्याच्या जन्मस्थानाचे वैशिष्ट्य व भौगोलिक स्थान, हे एक गूढच राहते. गोल्ल देशाच्या माहितीत समन्वय नसणे, ही गोष्टही आचारांगचूर्णी आणि आवश्यकचूर्णीचे कर्ते 'वेगळे' असल्याचेच सूचित करते.

(१९) **सूत्रकृतांगचूर्णीच्या** पृ.१६७ वर म्हटले आहे की, ''मायावी माणसे फसवणूक करून कामभोग प्राप्त करतात. चाणक्य अर्थात् कौटिल्याने लिहिलेल्या अर्थशास्त्रातून लोक असे शिकतात की, लोकांची फसवणूक कशी करावी. यानुसार वणिक् आदि लोक लाच देणे, फसवणूक करणे इत्यादी मार्गांने पैसा गोळा करतात.''

या उद्‌गारातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे अर्थशास्त्राचा लेखक म्हणून कौटिल्य व चाणक्य या दोन्ही नावांचा उल्लेख असणे. दुसरी गोष्ट म्हणजे, 'चाणक्य हा फसवणुकीच्या कलेचा उद्‌गाता होता, असा दृष्टिकोण मांडणे.'

सूत्रकृतांगचूर्णीच्या पृ.१७७ वर देखील प्राणिघातासाठी ज्या गोष्टी शिकल्या जातात त्यांमध्ये कौटिल्यशास्त्राची गणना केली आहे.

एकंदरीत, आचारांग आणि सूत्रकृतांगचूर्णीत चाणक्याविषयी जे प्रतिकूल आणि अनुदार उद्‌गार काढले आहेत त्याची दखल चाणक्याच्या आख्यायिका

आणि चरित्रे लिहिणाऱ्या कोणत्याही लेखकांनी घेतलेली नाही. हरिभद्र, शीलांक, अभयदेव, मलयगिरि, जयसिंह आणि हेमचंद्र यांनी आवश्यक आणि निशीथचूर्णींचा यथोचित वापर करून घेतला आहे. परंतु मंत्रतंत्र, माया, वंचना हे दुर्गुण सांगणाऱ्या आचारांग-सूत्रकृतांग-चूर्णींकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे.

(२०) **दशवैकालिकचूर्णीत** पृ.८१-८२ वर नंदाच्या सुबंधु नावाच्या अमात्याची कथा आली आहे. त्याने चाणक्याचा घात कसा केला आणि हे सर्व आधीच ओळखून चाणक्याने सुबंधूला कसा धडा शिकविला, हा सर्व कथाभाग येथे येतो. आवश्यकचूर्णीत आलेल्या कथाभागाचा जणू तो उत्तरार्धच आहे.

दशवैकालिकाच्या 'सामण्णपुव्वयं' या दुसऱ्या अध्ययनावर लिहिलेल्या चूर्णीत 'अर्थकथा' या कथाप्रकाराचे स्पष्टीकरण देत असताना काही दृष्टांत दिले आहेत. 'चाणक्याने कोणकोणत्या उपायांनी राजाचा कोष भरला' — याविषयीची कथा चूर्णीकार देतो.

(२१-२३) **हरिभद्र** हे इसवी सनाच्या आठव्या शतकात होऊन गेलेले जैन लेखक (आचार्य) होत. ते त्यांच्या बहुमुखी प्रतिभेमुळे सर्व जैन साहित्यिकांमध्ये वेगळेपणाने उठून दिसतात. संस्कृत, जैन महाराष्ट्री आणि अपभ्रंश या तीनही भाषांवर त्यांचे समान प्रभुत्व होते. साहित्याची जेवढी म्हणून अंगे असतात, त्या सगळ्यांमध्ये त्यांनी आपली लेखणी चालविली. मुळात ते एक वेदविद्यापारंगत ब्राह्मण असल्यामुळे त्यांनी कौटिलीय अर्थशास्त्राचा अतिशय बारकाईने अभ्यास केला असावा. म्हणूनच त्यांच्या टीकाग्रंथात, उपदेशपर ग्रंथात किंबहुना खंडकाव्यातही चाणक्यविषयक उल्लेख विपुल प्रमाणात आढळतात. एक अतिशय

प्रतिभावान, नि:ष्पक्षपाती दार्शनिक असल्यामुळे जैन आणि अजैन दोन्ही वर्तुळात त्यांचे नाव आदरपूर्वक घेतलेले दिसते.

**(अ) आवश्यक** आणि **दशवैकालिक टीकेतील** चाणक्यविषयक कथांश —

१) आवश्यकटीका पृ.३४२ : मनुष्यत्वाच्या दुर्लभत्वासाठी दिलेल्या दहा दृष्टांतात चाणक्याने अर्थप्राप्तीसाठी तयार केलेल्या यंत्रपाशकाची कथा.

२) आवश्यकटीका पृ.४०५: चाणक्याने साधूंच्या धर्मपरीक्षेसाठी चंद्रगुप्ताशी केलेल्या विचारविमर्शाची संक्षिप्तकथा.

३) आवश्यकटीका पृ.८१८: चाणक्याने केलेल्या परपाषंडांच्या प्रशंसेची कथा.

४) दशवैकालिकटीका पृ.४३५ : पाटलिपुत्रातील प्रमुख व्यापाऱ्यांकडून, त्यांची संपत्ती वदवून घेऊन, चाणक्याने राजाचा कोष कसा भरला त्याची कथा.

**(ब) उपदेशपद** ग्रंथातील द्वारगाथा —

उपदेशपदातील ७; ५०; १३९; १९६ या चार द्वारगाथांमध्ये अनुक्रमे दुर्लभ मनुष्यत्व, पारिणामिकी बुद्धी, चाणक्याचे वनगमन आणि चाणक्य-चंद्रगुप्ताचे गुरुशिष्य नाते - यांविषयीच्या कथांचे सूचन एकेका गाथेत केलेले आहे.

**(क)** हरिभद्राचे **धूर्ताख्यान** हे खंडकाव्य, व्यंग-उपहासप्रधान काव्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून, प्राकृतच्या अभ्यासकांकडून नेहमीच वाखाणला जातो. या काव्यात पाच धूर्त राजांची कथा आली आहे. धूर्तांचा मुकुटमणी म्हणून समजली जाणारी खंडपाना नावाची एक धूर्त स्त्री देखील त्यात रंगविली आहे. धूर्ताख्यान ५.१ (पृ.२४) वर म्हटले आहे की, ''खंडपाना ही बुद्धीने सर्वांच्या वरचढ असून अतिशय धूर्त होती. ती जणू काही अर्थशास्त्राची निर्मातीच होती.''

बुद्धिमान आणि धूर्त अशी कोणतीही व्यक्तिरेखा रंगवताना हरिभद्राला चाणक्याच्या अर्थशास्त्राची आठवण आल्याशिवाय रहात नाही.

**(२४) कुवलयमाला** ही **उद्योतनसूरींची** गद्यपद्यमय कादंबरीवजा प्रदीर्घ कथा आहे. जैन महाराष्ट्री भाषेत लिहिलेली ही कादंबरी अभिजात जैन महाराष्ट्रीचा उत्कृष्ट नमुना असून समकालीन सांस्कृतिक संदर्भांचा जणू काही खजिनाच आहे.

**(अ)** कुवलयमालेच्या पृ.५६ वर वाराणसी नगरीचा उल्लेख असून म्हटले आहे की, **जहिं च णयरीहिं जणो देयणओ अत्थ-संगह-परो य, --- सिक्खविज्जंति जुवाणा कलाकलावइं चाणक्कसत्थइं च ।** या उल्लेखात, वाराणसी नगरातील युवक चाणक्यशास्त्र अर्थात् कौटिलीय अर्थशास्त्राचे अध्ययन करीत असत, असे म्हटले आहे.

- 'चाणक्य आणि कौटिल्य हे दोन्ही वेगळे आहेत की एकच ?' असा प्रश्न अभ्यासकांनी उपस्थित केलेला दिसतो. तसेच, 'चाणक्य नावाची कोणी वेगळी व्यक्ती होऊन गेली आणि अर्थशास्त्र मात्र कौटिल्याने रचले', असा ज्या अभ्यासकांचा गैरसमज आहे त्यांना जैन साहित्यातील उल्लेखांवरून योग्य ते उत्तर मिळते. चाणक्य, कौटिल्य आणि विष्णुगुप्त, या तीनही एकच व्यक्ती असून तीच व्यक्ती चंद्रगुप्त मौर्याचा अमात्य आणि कौटिलीय अर्थशास्त्राचा लेखक होती — हे तथ्य जैन उल्लेखांवरून स्पष्ट होते.

**(ब)** दुसऱ्या एका ठिकाणी कुवलयमालेत १६ प्रकारच्या देशी भाषांचे व त्यांच्या प्रदेशांचे उल्लेख येतात. 'गोल्ल' प्रदेशातील व्यापाऱ्यांचे वर्णन करताना उद्योतनसूरि म्हणतात की, ''गोल्ल देशातील लोक वर्णाने काळे, कठोर बोलणारे, अतिशय विलासी, कलहशील आणि लज्जारहित असतात. ते बोलताना वारंवार 'अड्डे' या शब्दाचा वापर करतात.''

- ‘गोल्ल’ देश हा जर गोदावरी नदीच्या तीरावरील प्रदेश मानला आणि श्वेतांबर लेखकांनी चाणक्याच्या जन्मस्थानाचे नाव गोल्लदेश दिल्यामुळे, जर यात काही संगती गृहीत धरली तर त्या अर्थाने चाणक्य हा ‘दाक्षिणात्य’ ठरेल. कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे एकुलते एक हस्तलिखित तमिळ भाषेतील असून, ते त्रावणकोर येथे सापडले — ही घटना कदाचित् वरील संदर्भात अर्थपूर्ण असू शकेल. अशा परिस्थितीत निवृत्तीनंतर चाणक्य आपल्या जन्मदेशी अर्थात् दक्षिणेकडील गोल्लदेशात परत आला असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. दिगंबर लेखक हरिषेणाने आयुष्याच्या उत्तरार्धात चाणक्याला ‘दक्षिणापथगामी’ म्हटले असेल तर ते फारसे गैर ठरत नाही.

२५–२६)

**(अ) आचारांगटीकेच्या** पृ.१०० वरील एका ओळीत आलेल्या उल्लेखाचा भावार्थ असा आहे — ‘‘भार्येनिमित्त उत्पन्न झालेल्या रागद्वेषाचे हे उदाहरण आहे. बहिणी, मेव्हणे यांनी केलेल्या अपमानामुळे चाणक्याची पत्नी अपमानित झाली. त्यामुळे चाणक्य द्रव्य याचनेसाठी नंदराजाकडे गेल्यावर झालेल्या अपमानामुळे त्याने नंदकुलाचा नाश केला.’’

**(ब) सूत्रकृतांगटीकेच्या** १६९ व्या पानावर शीलांक म्हणतो,

**तथा चाणक्याभिप्रायेण परो वञ्चयितव्योऽर्थोपादनार्थम् ।**

शीलांकाचे असे मत दिसते की, चाणक्याच्या म्हणण्यानुसार पैसे मिळविण्यासाठी दुसऱ्याला फसवायला हरकत नाही.

- आचारांग आणि सूत्रकृतांगाच्या चूर्णीकाराने चाणक्याबद्दल जे निंदास्पद उद्‌गार

काढले आहेत त्याचाच अनुवाद शीलांकानेही केलेला दिसतो. आवश्यकचूर्णीतून चाणक्याची निंदास्पदता व्यक्त होत नाही. मात्र आचारांग-सूत्रकृतांगाच्या चूर्णीतून होते.

म्हणून पुन्हा एकदा नमूद करावेसे वाटते की, आचारांग-सूत्रकृतांगाचे चूर्णीकार आणि आवश्यकाचे चूर्णीकार ह्या दोन्ही वेगवेगळ्या व्यक्ती असाव्यात.

**(२७) जयसिंहसूरींनी** लिहिलेला **धर्मोपदेशमाला** हा ग्रंथ नवव्या शतकातील असून, द्वारगाथांमध्ये त्यांनी संक्षेपाने कथांचे सूचन केले आहे. या ग्रंथावरील 'विवरण' नावाच्या टीकेत सूचित केलेल्या कथा विस्ताराने दिलेल्या आहेत. विशेष म्हणजे, विवरणकाराने आवश्यकनिर्युक्ति, चूर्णी आणि टीकांचे उल्लेख केलेले आहेत.

**(अ)** ४० व्या द्वारगाथेत (पृ.१२९) चाणक्याने व्यापाऱ्यांकडून युक्तीने मिळविलेल्या धनार्जनाची कथा येते.

**(ब)** ५० व्या द्वारगाथेत (पृ.१३८) सुबंधु सचिवाची कथा येते.

- या दोन्ही कथा, या पुस्तकातील मुख्य कथाभागात दिल्यामुळे, येथे पुनरावृत्त केलेल्या नाहीत. तथापि विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, जयसिंहाचा आणि टीकाकाराचा चाणक्याविषयीचा आदरणीय दृष्टिकोणच या कथेत दिसून येतो.

२८) **जिनेश्वरसूरिरचित कथाकोषप्रकरण** हा ग्रंथ नावाप्रमाणेच अनेक पारंपरिक जैन कथांचा, जैन महाराष्ट्री प्राकृतात, इसवी सनाच्या अकराव्या शतकात लिहिलेला, एक लक्षणीय कथासंग्रह आहे. मुनी जिनविजयजींनी या ग्रंथाला

अतिशय अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लिहिली आहे. त्यांनी आवर्जून म्हटले आहे की, या कथानकांमध्ये आयुर्वेद, धनुर्वेद, नाट्यशास्त्र, कामशास्त्र आणि विशेषत: कौटिलीय अर्थशास्त्रातून घेतलेले अनेक मूलगामी संदर्भ जिनेश्वरसूरींच्या चतुरस्र बुद्धीची साक्ष देतात. (प्रस्तावना पृ.१२३-१२४).

**(अ)** सुंदरीनंदकथानक या कथेत, कौटिलीय अर्थशास्त्रातील शब्दावली, पदावली आणि वाक्येच्या वाक्ये कौटिलीय अर्थशास्त्रातून, जैन महाराष्ट्री प्राकृतात रूपांतरित केलेली दिसतात. त्यातील संबंधित परिच्छेदाचा भावार्थ पुढीलप्रमाणे देता येईल —

''राज्य करणे हे काय कापुरुषांचे (येरागबाळांचे) काम आहे का ? -- राजेपण स्वीकारले की खुद्द स्वत:च्या पत्नीवरही विश्वास ठेवून चालत नाही. स्वत:चे पुत्र, अमात्य आणि सामंत यांच्या एकनिष्ठतेची कसोटी पहावी लागते. महाश्वपति-संधिविग्राहिक-पाणिहारिक-महानसिक-स्थगिकावाहक-शय्यापाल-अंगरक्षक इत्यादी सर्वांच्या परीक्षापूर्वक नेमणुका कराव्या लागतात. प्रत्यंतवासी शत्रूंच्या राज्यात प्रधान, मंत्रिगण आणि सामंत यांच्यामध्ये भेदनीतीने फूट पाडावी लागते. -- तसेच आपलेच हेर शत्रुराज्यातील लोक असल्याचे भासवून कूटलेख लिहून, सोन्याचे आणि भूमीचे आमिष दाखवून, आपल्याच मंत्री आणि सामंतांची परीक्षा घ्यावी लागते. गुप्त मंत्रणेद्वारे आपल्याच राजपुत्रांना, मंत्री आणि सामंतांच्या द्वारे, प्रलोभन दाखवावे लागते की, 'तुझ्या पिताजींना हटवून आम्ही तुला सिंहासनावर बसवतो.'-- जकातनाक्यांवर आपले गुप्तहेर नेमून लाच देऊन करचुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर सरकारदरबारात खटले चालवावे लागतात. --थोडक्यात काय तर, सदैव इतरांच्या बद्दल अविश्वासच मनात धारण करावा लागतो. -- हे माते ! जो राज्यश्रीचे पालन करण्यास समर्थ आहे तो प्रव्रज्येचे पालन सहजच करू शकेल.'' (सुंदरीनंदकथानक पृ.१७६ १७७)

वरील परिच्छेदातील प्रत्येक वाक्य कौटिलीय अर्थशास्त्राशी निकटचे साम्य दर्शविते. जणू काही जिनेश्वरसूरींनी कौटिलीय अर्थशास्त्राच्या पहिल्या अधिकरणातील ८ ते २० या अध्ययनांचा सारांशच येथे प्रस्तुत केला आहे. विशेष गोष्ट अशी की, चाणक्याविषयीची अनादराची भावना जिनेश्वरसूरि कोठेही व्यक्त करीत नाही. प्रस्तुत परिच्छेद तर जैन परंपरेतील अर्थशास्त्राच्या मूलगामी अध्ययनाची अतिशय जिवंत अशी साक्ष देतो.

**(ब)** प्रस्तुत सुंदरीकथानकातील सागर नावाचा एक व्यापारी अर्थशास्त्राचे महत्त्व विशद करताना म्हणतो की, 'दान, भोग आणि इतर धार्मिक क्रिया सर्वस्वी अर्थाशी (पैशाशी) निगडित आहेत. सागरदत्ताच्या मुखातून जणू काही कौटिलीय अर्थशास्त्रातील एक महत्त्वाचे सूत्रच वदविले आहे. ते म्हणजे, '**अर्थमूलौ धर्मकामौ।**''

**(क)** जिनेश्वरसूरींचाच दुसरा एक ग्रंथ आहे— '**पंचलिंगीप्रकरण**'. त्यातील एक व्यक्ती दुसऱ्यास उपदेश देत आहे की, 'दयाळू अंत:करणाच्या सज्जन माणसाने चाणक्य, पंचतंत्र आणि कामंदक यांच्या कधीही वाटेला जाऊ नये. कारण त्यामध्ये फसवणूक, मायाचार आणि अविश्वासाच्या अनेक राजनैतिक युक्त्या-प्रयुक्त्या सांगितल्या आहेत.' (कथाकोषप्रकरण, प्रस्तावना, पृ.५६)

सारांशाने असे म्हणता येईल की, जिनेश्वरांनी चाणक्यविषयक संदर्भांची एक वेगळीच पद्धत अवलंबिली आहे. चाणक्याच्या पारंपरिक कथा जशाच्या तशा न देता, त्यांनी कौटिलीय अर्थशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास करून, त्यातील परिच्छेद प्राकृतात रूपांतरित करून, कथाप्रसंगांच्या ओघात अतिशय कौशल्याने गुंफले आहेत.

**२९-३१) अभयदेवाने** चित्रित केलेला कौटिल्य आणि त्याचे अर्थशास्त्र

इसवी सनाच्या अकराव्या शतकात होऊन गेलेला अभयदेव याने अर्धमागधी

आगमांच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे कार्य करून ठेवलेले दिसते. अर्धमागधीतील अकरा प्राचीन ग्रंथ 'अंगग्रंथ' म्हणून ओळखले जातात. त्यातील पहिल्या दोन ग्रंथांवर अर्थात् आचारांग व सूत्रकृतांगावर शीलांकाने आधीच आपल्या 'टीका' प्रस्तुत केल्या होत्या. उरलेल्या नऊ अंगग्रंथांवर अभयदेवाने टीकालेखनाचे काम पूर्ण केले. अभयदेवाचे वैशिष्ट्य असे की, त्याने पूर्वापार चालत आलेल्या चाणक्यकथांची पुनरावृत्ती केलेली नाही. चाणक्य ऊर्फ कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे त्याने केलेले उल्लेख प्रासंगिक आणि संक्षिप्त आहेत. भाषा संस्कृत आहे.

**(२९) स्थानांग** ४.४.३६१ (पृ.२८१)

या टीकेमध्ये अभयदेवाने चाणक्याचा विचारविमर्श घेऊन विविध संप्रदायांच्या साधूंची कशी परीक्षा घेतली व त्यात जैन साधू कसे कसोटीस उतरले — याविषयीची कथा एका ओळीत दिली आहे.

- अभयदेवाने हा वृत्तांत आवश्यकचूर्णीतून उद्धृत केला असला तरी तो साधूंच्या परिषहांच्या संदर्भात उपयोजित केला आहे. हेमचंद्राने परिशिष्टपर्वात ही कथा बऱ्याच विस्ताराने दिली आहे. आवश्यकचूर्णीत आणि परिशिष्टपर्वात दोन्ही ठिकाणी चाणक्य जैनधर्मी 'श्रावक' असल्याचे नमूद केले आहे. अभयदेवाने केलेल्या तीनही उल्लेखात चाणक्याचे श्रावकत्व अधोरेखित केलेले नाही.

**(३०) समवायांग** ३० गा.२६ (पृ.५५)

या टीकेमध्ये अभयदेव 'कथाधिकरणानि' या शब्दाचे स्पष्टीकरण देत आहे. येथे 'अधिकरण' हा शब्द 'हिंसात्मक क्रियेला प्रोत्साहन' अशा जैन पारिभाषिक अर्थानेच अभयदेवाने स्पष्ट केला आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात पशुपालन आणि शेती या दोन

व्यवसायांमध्ये कराव्या लागणाऱ्या अनिवार्य हिंसेचा उल्लेख येतो. म्हणून 'कथा' या शब्दाचा अर्थ 'वाक्य-प्रबंधक-शास्त्र' असा करून, कौटिलीय अर्थशास्त्रातील वरील उल्लेख नमूद केला आहे.

- कृषी, गोरक्ष इत्यादी व्यवसायांमध्ये पृथ्वीकायिक, अप्‌कायिक इत्यादी तसेच त्रसकायिक जीवांचा घात होत असल्यामुळे, हे सर्व व्यवसाय व्यक्तीच्या दुर्गतीला कारणीभूत ठरतात — असा अभयदेवाचा अभिप्राय दिसतो. पर्यायाने या व्यवसायांना उत्तेजन देणारे कौटिलीय अर्थशास्त्र सुद्धा त्याला निषिद्ध मानावयाचे आहे काय ? — असा प्रश्न उपस्थित होतो. अभयदेवाच्या या वाक्याचा अर्थ लावताना मागचापुढचा संदर्भ पाहणे अतिशय आवश्यक ठरते. प्रस्तुत संदर्भात साधूंसाठी विकथांचा त्याग करण्यास सांगितले आहे. हिंसेला प्रोत्साहन देणाऱ्या कथाधिकरणाचा निषेध साधूंसाठी आहे, श्रावकांसाठी नव्हे. कारण बहुतांशी वैश्यवर्णीय असलेल्या जैन गृहस्थांचेही कृषी, गोरक्ष, वाणिज्य हेच परंपराप्राप्त व्यवसाय होते. थोडा अधिक विचार केला तर असे दिसते की कृषी आणि पशुपालनातील हिंसेकडे बघण्याचा निषेधात्मक सूर जसजसा वाढत गेला तसतसा कृषी आणि पशुपालनाचा जैन गृहस्थांचा व्यवसाय मागे पडून, वाणिज्यालाच प्राधान्य येत गेले.

**(३१) ज्ञाताधर्मकथा** १.१५ (पृ.१२)

या टीकेत श्रेणिकपुत्र अभयकुमार कोणकोणत्या शास्त्रांमध्ये प्रवीण होता, त्याची खूप मोठी यादी दिली आहे. त्यात अर्थशास्त्राचाही उल्लेख आहे. अभयदेव म्हणतो,

**अर्थशास्त्रे – अर्थोपायव्युत्पादग्रन्थे कौटिल्यराजनीत्यादौ ।**

- वस्तुत: श्रेणिकपुत्र अभयकुमार भ. महावीरांना समकालीन आहे. त्यामुळे सुमारे

दोनशे वर्षांनंतर झालेल्या कौटिलीय अर्थशास्त्राचा अभ्यास अभयकुमार कसा करणार ?— असा विचार अभयदेवाने केलेला दिसत नाही. परिणामी केवळ नीतिशास्त्राचा उल्लेख न करता, कालविपर्यासाने तो कौटिल्य राजनीतीचाही करतो. यावरून असेही दिसते की, इसवी सनाच्या अकराव्या शतकात अर्थशास्त्रविषयक ग्रंथांमध्ये कौटिलीय अर्थशास्त्र ग्रंथाचाच सर्वाधिक बोलबाला होता.

सारांश काय तर, अभयदेवाचे चाणक्यविषयक तीनही उल्लेख तपासले तर असे दिसते की, लौकिक जीवनातील सुयोग्य शासनपद्धती आणि समृद्धी यासाठी गृहस्थ आणि राजकुलातील व्यक्ती यांच्यासाठी त्याने कौटिलीय अर्थशास्त्राचा पुरस्कार केला. तथापि अध्यात्मलक्ष्यी साधूने मात्र अर्थशास्त्रातील 'अधिकरणात्मकता' ध्यानी घेऊन, या ग्रंथापासून दूरच राहावे, असा अभयदेवाचा एकंदर अभिप्राय दिसतो.

**(३२) नेमिचंद्र ऊर्फ देवेंद्रगणींनी** केलेल्या साहित्यरचनांमध्ये **उत्तराध्ययनसूत्रावरील** त्यांनी लिहिलेली **सुखबोधाटीका,** प्राकृतच्या अभ्यासकांना अतिशय महत्त्वाची वाटते. प्राकृत व संस्कृतवर समान प्रभुत्व असलेल्या देवेंद्रगणींनी इसवी सनाच्या अकराव्या शतकात लिहिलेली ही टीका त्यांच्या अभिजात आणि शैलीदार जैन महाराष्ट्रीसाठी खूपच अभ्यासली गेली. उत्तराध्ययनातील गाथांची स्पष्टीकरणे संस्कृतात तर त्यासाठी पूरक म्हणून दिलेल्या कथा त्यांनी जैन महाराष्ट्रीत लिहिल्या.

या टीकेत चाणक्याचे दोन प्रमुख संदर्भ दृष्टोत्पत्तीस येतात.

**(अ)** त्यापैकी पहिला संदर्भ उत्तराध्ययन २.१७ वरील टीकेत येतो. हा संदर्भ

मगधाच्या इतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरतो. येथे नमूद केले आहे की, ''प्राचीन काळी क्षितिप्रतिष्ठित नावाचे नगर वैभवाच्या शिखरावर होते. जेव्हा त्याचे वैभव लयास गेले तेव्हा चणकपुर नावाचे नगर उदयाला आले. त्यानंतर ऋषभपुर वसविले गेले. त्यानंतर राजगृह , नंतर चंपा आणि नंतर पाटलिपुत्र नगराचा उदय झाला. शकटाल हा नवव्या नंदाचा मंत्री होता.''

शकटालाचे कथानक सांगताना देवेंद्रगणींनी म्हटले आहे की, **तहा कहाणयं आवस्सए दट्ठव्वं ।** (सुखबोधा पृ.३१) परंतु विशेष गोष्ट अशी की, विविध नगरींच्या उदयास्तांचा असा इतिहास आवश्यकटीकेत नोंदविलेला दिसत नाही.

**(ब)** उत्तराध्ययन ४.१ च्या टीकेत, देवेंद्रगणींनी जैन परंपरेत रूढ असलेले दुर्लभ मनुष्यत्वाचे दहा दृष्टांत दिले आहेत. त्यापैकी पाशक दृष्टांत देताना चाणक्याने तयार केलेल्या कूटपाशकयंत्राचा उल्लेख केला आहे. संबंधित कथाही थोडक्यात दिली आहे. फारसे काही औचित्य नसतानाही चाणक्याच्या आयुष्याच्या पूर्वार्धातील सर्व वृत्तांत देण्याचा मोह देवेंद्रगणींना आवरता आला नाही. पाशक-दृष्टांताचे निमित्त साधून त्यांनी आवश्यकचूर्णीतील कथाभाग विस्ताराने सांगून टाकला.

- ''विषकन्येचा प्रयोग करून चाणक्याने पर्वतकाचा घात केला. चंद्रगुप्त पर्वतकाला वाचविण्यासाठी धावला. चाणक्याने भुवई उंचावून चंद्रगुप्ताला परावृत्त केले. चंद्रगुप्त थांबला. पर्वतक मरण पावला.''— हा सर्व वृत्तांत देवेंद्रगणींनी आवश्यकचूर्णीतून जसाच्या तसा घेतला आहे. परंतु चाणक्याने कोणते राजनैतिक तत्त्व वापरून, ही कृती केली, हे सांगताना देवेंद्रगणींनी एक नवा संस्कृत श्लोक उद्धृत केला आहे. तो असा —

**तुल्यार्थं तुल्यसामर्थ्यं , मर्मज्ञं व्यवसायिनं ।**

**अर्द्धराज्यहरं भृत्यं , यो न हन्यात्स हन्यते ।।**

समान पराक्रम आणि समान महत्त्वाकांक्षा असलेल्या पर्वतकाला मारण्याचा चाणक्याने घेतलेला निर्णय कसा राजनैतिकदृष्ट्या योग्य होता, याचे समर्थनच जणू काही या श्लोकाद्वारे देवेंद्रगणींनी केले आहे. यावरून त्यांचा चाणक्याविषयीचा दृष्टिकोण कौतुकाचा आणि आदराचाच होता असे दिसून येते.

**(३३) ओघनिर्युक्तिटीका** इसवी सनाच्या अकराव्या शतकात **द्रोणाचार्यांनी** लिहिली. ओघनिर्युक्तीच्या ४१८ व्या गाथेवरील टीकेत चाणक्याचा उल्लेख येतो. त्या गाथेत व टीकेत मलमूत्रविसर्जनासंबंधी चाणक्याने घालून दिलेल्या कडक निर्बंधांचा आवर्जून उल्लेख केला आहे. निर्युक्तिगाथेतील संदर्भ त्रोटक असल्याने तेथे अर्थ लावताना द्रोणाचार्यांच्या टीकेचीच मदत घेतलेली आहे. वाचकांनी ओघनिर्युक्तीच्या विवेचनात हा संदर्भ पाहावा.

छेदसूत्रकार प्रथम भद्रबाहूंनी साधूंसाठी तयार केलेल्या नियमावलीत, कौटिलीय अर्थशास्त्रातील नियमांचे अनेक वेळा प्रतिबिंब उमटलेले दिसते. मलमूत्रविसर्जनासंबंधीचा उपरोक्त नियम हे त्याचेच एक उदाहरण आहे.

**(३४) व्यवहारभाष्यावर** इसवी सनाच्या बाराव्या शतकात लिहिलेली **मलयगिरीची टीका,** छेदसूत्रांवरील टीकेत महत्त्वाची मानली जाते कारण जैन परंपरेतील क्रांतिकारी कार्य केलेल्या अनेक व्यक्तिरेखांसंबंधीच्या कथा मलयगिरीने विस्ताराने दिल्या आहेत. एका अर्थाने या टीकेस 'व्यक्तिचित्रणांचा कथाकोश' असेही संबोधता येईल. आर्य रक्षित, आर्य कालक, राजा सातवाहन, अनार्य राजा मुरुंड, आचार्य पादलिप्त, अमात्य चाणक्य, मुनी विष्णुकुमार, रौहिणेय नामक चोर –

– या आणि अशा अनेक प्रभावी ऐतिहासिक व्यक्ती मलयगिरीने या टीकेत नमूद केल्या आहेत. 'व्यवहार' या शब्दाचे अनेक अर्थ होतात. उदाहरणार्थ दैनंदिन कर्मे, वर्तन, कार्य, व्यापार, वाणिज्य, खटले, पद्धती इत्यादी. परंतु जैन साधुआचाराच्या संदर्भात 'व्यवहार' हे दहा प्रायश्चित्तांपैकी एक 'प्रायश्चित्त'ही आहे.

**संदर्भ :** व्यवहारभाष्यगाथा ७१५ ते ७१८ यांवर टीकात्मक भाग लिहिताना मलयगिरीने 'प्रवचनरक्षा' हा विषय विस्ताराने मांडला आहे. प्रवचनरक्षा म्हणजे जिनांच्या उपदेशाचे आणि चतुर्विध संघाचे रक्षण होय. मलयगिरि सांगतात की, ''साधूने अतिशय सौम्य शब्दांनी राजाला जिनप्रवचनाच्या अनुकूल बनवावे. शक्यतो वादविवाद टाळावा. जिनांच्या उपदेशाकडे राजाचे लक्ष जावे म्हणून वेळ पडल्यास अद्‌भुत शक्ती, मंत्र अथवा वशीकरण चूर्णाचाही वापर करावा. जर इतके करूनही राजाची वृत्ती निर्दयी आणि द्वेषी राहिली तर प्रवचनाच्या आणि संघाच्या रक्षणासाठी इतरांच्या मदतीने त्याचा समूळ उच्छेद करावा.''

व्यवहारभाष्य ७१६ वरील टीकेत मलयगिरीने अमात्य चाणक्य आणि नलदाम विणकराची गोष्ट उदाहरणासाठी दिली आहे. आवश्यकचूर्णीत केवळ काही शब्दात सांगितलेली ही गोष्ट येथे विस्ताराने दिली आहे. राजाविरुद्ध काम करणाऱ्या नंदपक्षपाती लोकांचा चाणक्याने, नलदाम विणकराच्या सहाय्याने कसा काटा काढला, ते सांगून मलयगिरी अखेरीस लिहितो,

**यथा चाणिक्येन नन्द उत्पाटितो यथा नलदाम्ना मत्कोटकचोराश्च समूला उच्छदितास्तथा प्रवचनप्रद्विष्टं राजानं समूलमुत्पाटयेत् ।**

व्यवहारभाष्य गा.९१ (पृ.७७)

**काही निरीक्षणे :**

- मंत्रतंत्राच्या साह्याने राजसत्ता उलथून टाकण्याचा हा निर्देश प्रथमदर्शनी तरी धक्कादायक वाटतो. अहिंसा आणि संयमाला महत्त्व देणाऱ्या जैन साधुवर्गाला असा उपदेश देणे सकृद्दर्शनी तरी उचित वाटत नाही. परंतु मलयगिरींनी अतिशय विपरीत परिस्थितीत आणि जैन संघाच्या रक्षणासाठी सांगितलेला हा उपाय व्यवहारनयानुसार योग्यच मानावा लागतो. कारण जेव्हा अस्तित्वावरच गदा येते तेव्हा अहिंसेचा विचार थोडा दूरच ठेवावा लागतो. जैन विचारवंतांनी 'विरोधी हिंसा' या मुद्याच्या सहाय्याने, ती अतिविशिष्ट प्रसंगी संमत केलेली दिसते.
- हाच मुद्दा अधिक विशद करताना मलयगिरी पुढे म्हणतात की, अशा प्रवचनविरोधी राजाला समूळ उखडून टाकले तरी तो काही साधुआचारावरील कलंक नव्हे. पुढे ते असेही म्हणतात की, हे कृत्य केल्यावर जर तो साधू राजवाड्यात दोन किंवा तीन दिवसांपेक्षा जास्त राहिला तर त्या साधूला 'छेद' किंवा 'परिहार' प्रायश्चित्त घ्यावे लागेल. याचा अर्थ असा की, जिनशासनाच्या रक्षणासाठी केलेले हिंसक उपाय सुद्धा मलयगिरीला प्रायश्चित्तार्ह वाटत नाहीत. मात्र कार्यभाग साधल्यावर आसक्तीने तेथे जास्त चिकटून राहिल्यास प्रायश्चित्तविधान सांगितले आहे.
- भाष्यकाराला आणि मलयगिरीला, चाणक्य आणि नलदाम, हे इतके प्रशंसनीय वाटतात की, त्यांचे आदर्शभूत म्हणून केलेले प्रस्तुतीकरण येथे दिसते. सारांशाने असे म्हणता येईल की, चाणक्याचे उदात्त उद्दिष्ट लक्षात घेऊन, प्रसंगी त्याच्या कठोर उपाययोजनांची भलावणच येथे केलेली दिसते. चाणक्यसूत्रे आणि छेदसूत्रे यांमध्ये असलेल्या विशिष्ट संबंधाचेही सूचन, व्यवहारभाष्यातून आणि विशेषत:

मलयगिरीच्या टीकेतूनही होते.

३५) **वर्धमानसूरींच्या युगादिजिनेन्द्रचरिताचे** दुसरे नाव **आदिनाथचरित** आहे. त्यांनी सर्व वाङ्मयीन निर्मिती इसवी सनाच्या अकराव्या शतकात केलेली दिसते.

**संदर्भ :** या ग्रंथात मौर्यवंशातील सम्प्रति राजाचे चरित्र विशेष विस्ताराने सांगितले आहे कारण जैनांच्या मते सम्प्रतीने जैनधर्माचा स्वीकार आणि प्रसार केला होता. सम्प्रतीच्या निमित्ताने त्यांनी मगधातील मौर्य राजवंशाची संपूर्ण हकिकत दिली आहे. त्यामुळे त्याच ओघात चाणक्य-चंद्रगुप्ताचा वृत्तांत विस्ताराने येतो. (पृ.४९ ते ५५)

**भाषा आणि शैली :** अभिजात जैन महाराष्ट्री प्राकृतातील या विस्तृत चरितग्रंथात अनेक उपकथानके आणि आख्यायिका येतात. रसाळ वर्णने, संस्कृतचा यथोचित वापर, अलंकारिक शैली आणि चुरचुरीत संवाद ही त्यांच्या शैलीची वैशिष्ट्ये आहेत. जैन परंपरेतील सर्व चूर्णींमध्ये आलेल्या चाणक्यकथा त्यांना विदित आहेत. हरिभद्र आणि जयसिंह यांनी रंगविलेला चाणक्यही त्यांना माहीत आहे. विशेष म्हणजे विशाखदत्ताच्या मुद्राराक्षस नाटकातील काही संवादही ते जसेच्या तसे उद्धृत करतात.

**वर्धमानसूरींच्या चाणक्यकथेवरील काही निरीक्षणे :**

- जैन महाराष्ट्री भाषेत गद्यात लिहिलेले सर्वात मोठे चाणक्यचरित्र हे वर्धमानसूरींचे आहे.
- पारिणामिकी बुद्धी, मनुष्यत्वाचे दुर्लभत्व, आज्ञाभंग, राजकोष भरण— अशा विखुरलेल्या स्वरूपातील चाणक्यविषयक सामग्री त्यांनी, सलग साखळीत गुंफून एकरस चरित्र निर्माण केले आहे.
- वस्तुत: चाणक्याचे ब्राह्मणत्व उघड असले तरी जेथे जेथे संधी मिळेल तेथे तेथे

वर्धमानसूरि चाणक्याचे श्रावकत्व अधोरेखित करतात. विशेषत: अखेरीस चाणक्याने इंगिनीमरण स्वीकारण्याच्या प्रसंगी संस्तारक प्रकीर्णकांमध्ये आलेली दुष्कृतगर्हा, सुकृतानुमोदना, क्षमापना इत्यादि जैन विधी चाणक्याच्या तोंडी घालतात. पंडितमरण स्वीकारल्यामुळे चाणक्याचा उच्चतर स्वर्गातील जन्मही त्यांनी नमूद केला आहे.

- आवश्यकचूर्णीतील परपाषण्डप्रशंसा आणि निशीथचूर्णीतील दुर्भिक्षवृत्तांत हे दोन प्रसंग मात्र या चरितात अनवधानाने गाळलेले दिसतात.
- आवश्यकचूर्णीतील **'कोशेन भृत्यैश्च ---'** आणि सुखबोधाटीकेतील **'तुल्यार्थं तुल्यसामर्थ्यं ---'** हे दोन जैन परंपरेतील श्लोक वर्धमानांनी आवर्जून नमूद केलेले दिसतात.
- चाणक्याच्या मृत्यूचा प्रसंग विशेष विस्ताराने चित्रित केला आहे. या प्रसंगी चाणक्याचे स्वगत जैन पद्धतीने रंगविलेले आहे. क्षमाभाव व्यक्त करताना सुबंधूविषयीची द्वेषयुक्त भावना कायम ठेवून, त्याच्यावर घेतलेला सूड हा एक 'अगार' ठेवलेला आहे. त्यातूनच सूचित होते की, मृत्यूनंतरही चाणक्य सुबंधूचा (अर्थात् राक्षसाचा) सूड घेणार आहे.
- चाणक्याच्या मरणास एकदा 'अनशन' आणि दुसऱ्या ठिकाणी 'इंगिनीमरण' संबोधून त्या मरणाच्या धार्मिकतेवर शिक्कामोर्तब केले आहे.
- चाणक्याविषयी कोठेही अनुदार काढलेला नाही. त्याच्या कुटिलपणाची आणि मायावीपणाची निंदा केलेली नाही. कथेच्या शेवटी, 'त्या बुद्धिमान चाणक्याची कीर्ती या मनुष्यलोकात दीर्घकाळपर्यंत राहो !' अशी शुभेच्छा व्यक्त केली आहे.

**(३६) मलधारी हेमचंद्राची विशेषावश्यकभाष्यटीका** इसवी सनाच्या बाराव्या शतकात लिहिलेली आहे. विशेषावश्यकभाष्याच्या ४६४ व्या गाथेत 'सुबहुलिविभेयनिययं' या शब्दाचे स्पष्टीकरण करत असताना टीकाकार म्हणतो, **तत्र सुबह्व्यो या एता अष्टादश लिपयः शास्त्रेषु श्रूयन्ते, तद्यथा–हंसलिवी भूयलिवी ––– । तह अनिमित्ती य लिवी चाणक्को मूलदेवी य ।**

या परिच्छेदात एकूण अठरा लिपींचा उल्लेख असून, त्यातील 'चाणक्यी' ही एक लिपी आहे. ही एक सांकेतिक लिपी असून कौटिलीय अर्थशास्त्रात असा उल्लेख आढळतो की, 'हेरांनी आपल्याला प्राप्त झालेली माहिती सांकेतिक लिपीद्वारे आपल्या वरच्या अधिकारी हेराला कळवावी.' कौटिलीय अर्थशास्त्रात सांकेतिक लिपी तयार करण्याविषयी मात्र अर्थातच काही उल्लेख मिळत नाहीत.

डॉ. हिरालाल जैनांनी कामसूत्रावरील 'यशोधरा' टीकेच्या आधारे चाणक्यी लिपी उलगडण्याचे प्रयत्न केले आहेत. ते म्हणतात, ''या लिपीत प्रत्येक शब्दाच्या शेवटी 'क्ष' हे अक्षर जोडले जाते. शब्दातील ऱ्हस्व स्वरांचे दीर्घ स्वर व दीर्घ स्वरांचे ऱ्हस्व केले जातात. अनुस्वार आणि विसर्ग हे एकमेकांची जागा घेतात. फार प्राचीन काळापासून चाणक्यी आणि मूलदेवी या दोन लिपींचा वापर राजनैतिक कार्यांसाठी केलेला दिसतो.'' (भारतीय संस्कृति में जैनधर्म का योगदान, पृ.२८६)

नोंद घेण्याजोगी दुसरी एक गोष्ट अशी की, 'समवायांग' या अर्धमागधी ग्रंथातही अठरा लिपींचा उल्लेख आढळतो परंतु त्यात चाणक्यी आणि मूलदेवी या दोन्ही लिपी नोंदविलेल्या नाहीत. आख्यायिकांच्या बाबतीत म्हणाल तर, 'मूलदेव' या चतुर पुरुषाच्या आख्यायिकाही चाणक्यासारख्याच प्राकृत साहित्यात जागोजागी विखुरलेल्या दिसतात.

मलधारी हेमचंद्राने नोंदविलेला चाणक्यी लिपीचा उल्लेख अतिशय महत्त्वाचा

आहे कारण तो इतर कोणत्याही जैन अगर अजैन लेखकाने नोंदविलेला नाही.

**(३७) रत्नप्रभसूरींच्या उपदेशमालाटीका** या बाराव्या शतकातील ग्रंथात चाणक्याचे दोन उल्लेख आढळतात. पहिला संदर्भ अगदी ओझरता असून, दुसऱ्यात मात्र चाणक्याचे जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे जीवनचरित्र जैन महाराष्ट्री प्राकृतात पद्यबद्ध केलेले दिसते.

**(अ)** उपदेशमाला टीकेच्या पृ.३४७ ओळ ३ या संदर्भात म्हटले आहे की,

**अहो महिला । पगईए चेव चाणक्कवंकभावं विसेसेइ ।**

स्त्रियांच्या स्वभावावर केलेल्या या टिप्पणीत म्हटले आहे की, 'सामान्यातील सामान्य महिला सुद्धा स्वभावाच्या वक्रतेच्या बाबतीत चाणक्यावर मात करते.' रत्नप्रभांचा हा उल्लेख त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोणावर आणि चाणक्याच्या स्वभावावरही प्रकाश टाकतो. त्यातील निंदेचा सूरही स्पष्ट जाणवतो.

**(ब)** उपदेशमालाटीकेत १५० व्या द्वारगाथेवर रत्नप्रभांनी चाणक्याची प्रदीर्घ पद्यकथा लिहिली आहे. (पृ.३५४ ते ३६३) द्वारगाथेमध्ये श्रेणिकराजाचा घात करणाऱ्या कोणिकाचे उदाहरण दिले आहे. त्यात म्हटले आहे की, ''ज्या व्यक्ती लोभी आणि स्वार्थी असतात त्या आपल्या स्वार्थासाठी जवळच्या नातेवाईकाचा सुद्धा घात करण्यास प्रवृत्त होतात. आता हेच उदाहरण बघा ना, चंद्रगुप्ताच्या गुरूने अर्थात् चाणक्याने आपला कार्यभाग साधण्यासाठी (जवळचा मित्र असलेल्या) पर्वतकाचा घात केला.'' या द्वारगाथेने रत्नप्रभांना चाणक्याचे सर्व चरित्र देण्याची सुसंधी प्राप्त झाली. चाणक्याची गोष्ट सांगता सांगता रत्नप्रभ मधून मधून खास स्वत:ची टीकाटिप्पणीही देतात. या कथेत एकूण १८२ गाथा आहेत. जैन महाराष्ट्री बरोबरच आवश्यक तेथे संस्कृत आणि

अपभ्रंशाचा वापर केला आहे. कथेत फारसे नाविन्य नसले तरी रत्नप्रभांचा दृष्टिकोण समजावून घेण्यासाठी काही उदाहरणे पाहू —

**(१)** अगदी प्रारंभीच्या काळात चाणक्य चंद्रगुप्तासह हिंडत असतो. अतिशय प्रयासाने पैशाची आणि सैन्याची जमवाजमव करीत असतो. दिवस अतिशय कष्टप्रद असतात. एकदा तर चंद्रगुप्त बालकावर उपाशी राहण्याची वेळ येते. त्यावेळी त्याचा जीव वाचविण्यासाठी, चाणक्य नुकत्याच जेवलेल्या ब्राह्मणाचे पोट फाडून, प्राप्त केलेला दहीभात चंद्रगुप्ताला भरवितो. या प्रसंगी रत्नप्रभ म्हणतात,

**महासाहसिओ एसो, को सक्कइ बंभहच्चमिय काउं ।**(पृ.३५७ गा.६०)

ब्रह्महत्येचे पातक करणाऱ्या महासाहसिक चाणक्याविषयीचा काहीसा निंदेचा सूरच यातून दिसतो.

**(२)** उत्तम मित्र असलेल्या पर्वतकाचा घात करणाऱ्या चाणक्याला उद्देशून रत्नप्रभ म्हणतो,

**(तत्रापि मित्रोत्तमे) । कौटिल्यः कुटिलां क्रियामिति दधौ धिग्धिक् कृतघ्नान् जनान्**

**(पृ.३८५ गा.८६)**

**(३)** चाणक्याने केलेल्या ग्रामदाहाच्या प्रसंगी रत्नप्रभ चाणक्याला ‘क्रूरकर्मा’ म्हणतात. तसेच पुढे अशीही पुस्ती जोडतात की, ‘कटू आणि कुटिलमती असलेल्या चाणक्याच्या हातून घडलेला हा प्रमाद अतिशय निंद्य आहे.’ (पृ.३५९ गा.९८)

## रत्नप्रभसूरींचा तात्पर्यात्मक दृष्टिकोण

चाणक्याने आयुष्यात केलेल्या वेगवेगळ्या कृतींवर जरी रत्नप्रभांनी टीका केली असली तरी कथेचा शेवट मात्र जैन परंपरेला अनुसरूनच केलेला आहे. चाणक्याच्या

इंगिनीमरणाचा आणि पश्चात्तापाचा उल्लेख करून रत्नप्रभ अखेरीस म्हणतात —

**जह जह करीसजलणेण , तस्स धन्नस्स डज्झइ देहो ।**

**तह तह पलयं पावंति , कूरकम्माइं कम्माइं ।।**

(पृ.३६३ गा.१७५)

सारांश काय तर, तो दुष्ट, कृतघ्न, मायावी असूनही अखेरच्या अवस्थेत चाणक्याने ध्यानमग्न राहून, समताभाव मनात ठेवून, उपसर्ग सहन केल्यामुळे, तो अखेरीस उच्च देवयोनीत गेला, असेच रत्नप्रभ म्हणतात. त्यांच्या मताप्रमाणे जणू चाणक्याची सर्व क्रूरकर्मे त्या अग्नीत भस्मसात् झाली. म्हणजेच प्रसंगी कठोर टीका करूनही, अखेरीस रत्नप्रभांनी चाणक्याविषयीचा आदरभावच व्यक्त केला आहे.

**(३८-३९) मुनिचंद्रांनी उपदेशपदावरील टीका** इसवी सनाच्या बाराव्या शतकात लिहिलेली आहे. द्वारगाथांमध्ये सूचित केलेल्या कथा मुनिचंद्रांनी जैन महाराष्ट्रीत पद्यबद्ध केलेल्या आहेत.

**(अ)** द्वारगाथा १३९ मध्ये, चाणक्याचा थोडक्यात सांगितलेला जीवनवृत्तांत १७८ गाथांमध्ये संग्रहीत केला आहे. (पृ.१०९ ते ११४) कथेत फारसे नाविन्य नाही. परंतु त्यातील वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील —

- जेथे जेथे शक्य आहे तेथे तेथे चाणक्याचे श्रावकत्व अधोरेखित केले आहे. त्याचे समाधिमरण हा पारिणामिकी बुद्धीचा परिपाक दाखविला आहे.
- चाणक्याविषयी जैन परंपरेत रूढ असलेला **'कोशेन भृत्यैश्च ---'** हा श्लोक मुनिचंद्रांनीही उद्धृत केला.
- मुनिचंद्रांचे चाणक्यचरित्र नुसते विखुरलेल्या कथांचे एकत्रीकरण नसून, दोन घटनांमधील दुवे त्याने कौशल्याने जोडून सलगपणा आणला आहे.

- ‘चंद्रगुप्त आणि नंद यांच्यामध्ये झालेले भयंकर युद्ध’— हे मुनिचंद्रांच्या कथेचे बलस्थान आहे. त्यांनी असा विचार केला असावा की, चंद्रगुप्त आणि पर्वतकाचे शौर्य आणि विजिगीषू वृत्ती आवर्जून सांगणे आवश्यक आहे. अन्यथा अन्य जैन कथांवरून चंद्रगुप्त हा केवळ चाणक्याच्या हातचे बाहुले वाटतो.
- उपकथानके रंगवीत असताना, मुनिचंद्र हे रत्नप्रभाप्रमाणे आपली स्वत:ची मते व्यक्त करणे बहुतांशी टाळतात. परंतु ग्रामदाहाच्या प्रसंगी मात्र त्यांना चाणक्याच्या दुष्ट वृत्तीवर टीकाटिप्पणी करण्याचा मोह टाळता आलेला नाही. ते म्हणतात,

**बारनिरोहेण पलीविऊण गामो सबालवुड्ढो सो ।**

**दड्ढो दुवियड्ढमइत्तणेण चाणक्कपावेण ।।**

(पृ.१११ गा.८९)

- निशीथचूर्णीतील दुष्काळाच्या प्रसंगात जैन आचार्यांचे नाव ‘सुस्थित’ असे सांगितले आहे. मुनिचंद्रांनी त्यांचे नाव ‘संभूतविजय’ असल्याचे म्हटले आहे.
- मुनिचंद्रांचा चाणक्य संभूतविजय आचार्यांना वचन देतो की, ‘मी शासनपालक होऊन जैन प्रवचन आणि संघाची काळजी घेईन.’ याचाच अर्थ असा की, चाणक्याचे जैनीकरण करण्यास मुनिचंद्रांची पसंती दिसते.
- चंद्रगुप्ताच्या पत्नीच्या गर्भाला जेव्हा धोका उत्पन्न होतो तेव्हा चाणक्य स्वत: तातडीने शल्यक्रिया करून, त्या भ्रूणास बाहेर काढतो. हाच तो राजा बिंदुसार. इतर कोणीही चित्रित न केलेले चाणक्याचे शल्यचिकित्सेतील कौशल्यही, मुनिचंद्रांनी रंगविले आहे.
- ‘पंडितमरणाचा स्वीकार करण्याचा निर्णय घेण्याआधी चाणक्याने आपली संपत्ती पुत्र-पौत्र-प्रपौत्र आणि नातेवाईक यांच्यामध्ये वाटून दिली’, असे मुनिचंद्र म्हणतात. चाणक्याच्या पुत्रपौत्रांचा हा उल्लेख, जैन अगर अजैन अशा कोणत्याही

लेखकाने नोंदविलेला नाही. मुनिचंद्रच याला अपवाद आहेत.

- मुनिचंद्रांनी १७० व्या गाथेत 'अधिकरण' हा शब्द हेतुपूर्वक दोन अर्थांनी योजला आहे. त्याला त्यातून कौटिलीय अर्थशास्त्राची प्रकरणे तर नमूद करावयाची आहेतच. परंतु अधिकरण शब्दाला जैन तत्त्वज्ञानातील पारिभाषिक अर्थही सूचित करावयाचा आहे. जैन परंपरेत हिंसक क्रियांच्या उत्पत्तिस्थानाला 'अधिकरण' म्हणतात.
- मुनिचंद्र हे, चाणक्याची निंदा करणे शक्यतो टाळतात. चाणक्याच्या मृत्युप्रसंगी असे उद्गार काढतात की, 'त्या अग्निदाहात चाणक्याची पापकर्मेही क्रमाक्रमाने जळून निर्जरित झाली.'

**(ब)** उपदेशपदाच्या १९६ व्या द्वारगाथेत चाणक्य-चंद्रगुप्त या गुरुशिष्याच्या जोडीला आदर्शवत् मानले आहे. त्यावरील टीकेत मुनिचंद्र म्हणतात, ''आपले गुरू असलेल्या चाणक्यावर दृढ श्रद्धा ठेवल्याने जसा चंद्रगुप्त समृद्ध अशा राज्याचा भागी झाला त्याचप्रमाणे शिष्याने आपल्या गुरूंवर श्रद्धा ठेवल्यास उत्कृष्ट अशा आध्यात्मिक संपत्तीचा भागी होईल.''

सारांश काय तर, केवळ गृहस्थांनाच नव्हे तर साधूंनाही चाणक्याच्या चरित्रातून बोध घेतला पाहिजे, असा एकंदर अभिप्राय मुनिचंद्रांचा दिसतो.

(४०) **'कलिकालसर्वज्ञ'** या उपाधीने वाखाणले गेलेले **आचार्य हेमचंद्र** हे इसवीसन १०८८ ते इसवीसन ११७२ या काळात होऊन गेले. त्यांच्या विपुल संस्कृत ग्रंथरचनेत **'परिशिष्टपर्व'** ऊर्फ **'स्थविरावलिचरित्रम्'** या ग्रंथाचे स्थान अनन्यसाधारण आहे. या ग्रंथाच्या रूपाने हेमचंद्रांनी जणू पुढील काळात लिहिल्या

गेलेल्या ऐतिहासिक प्रबंधग्रंथांचा पायाच घालून दिला.

परिशिष्टपर्व हे मगधाचा राजनैतिक इतिहास उलगडण्याचे महत्त्वाचे साधन मानले जाते. भद्रबाहु आणि स्थूलभद्र यांची चरित्रे सांगत असताना हेमचंद्र हे नंद आणि मौर्यवंशांचा इतिहास कथानकाच्या ओघात लिहितात. श्वेतांबर परंपरेत मौखिक आणि लिखित स्वरूपात असलेल्या सर्व चाणक्यकथांचा चिकित्सकपणे अभ्यास करून हेमचंद्रांनी अमात्य चाणक्याचा समग्र जीवनवृत्तांत अभिजात संस्कृत शैलीत प्रभावीपणे लिहिला आहे.

परिशिष्टपर्वात आठव्या सर्गातील १९४ व्या श्लोकापासून चाणक्यकथेचा आरंभ होतो. त्या सर्गाच्या शेवटच्या ४६९ व्या श्लोकात चाणक्याच्या मृत्यूचा वृत्तांत पूर्ण होतो. सुबंधूचा वृत्तांत मात्र परिशिष्टपर्वाच्या नवव्या सर्गाच्या १३ व्या श्लोकापर्यंत चालू राहतो. खऱ्या अर्थाने चाणक्याचे चरित्र येथे संपते.

**परिशिष्टपर्वातील चाणक्यकथेची वैशिष्ट्ये**

- उपलब्ध प्राकृत कथांचे सुसूत्रपणे चाणक्याच्या जीवनचरित्रात रूपांतर (२८८ श्लोकात).
- श्वेतांबर परंपरेतले सर्वात प्रमाणित जीवनचरित्र.
- चंद्रगुप्ताचा अभिषेक आणि भद्रबाहूंचा मृत्यू यांचा काळ नोंदविल्यामुळे ऐतिहासिक महत्त्व.
- चाणक्य-चंद्रगुप्तांचा भद्रबाहु-स्थूलभद्र यांच्याशी साक्षात् संबंध नसणे.
- चंद्रगुप्ताच्या मृत्यूचे अत्यंत त्रोटक वर्णन.
- पाटलिपुत्राच्या जवळ चाणक्याने स्वीकारलेले पंडितमरण.

- मगधातील द्वादशवर्षीय दुष्काळाचा उल्लेख.
- दुष्काळप्रसंगी भद्रबाहु नेपाळकडे गेल्याचा उल्लेख.
- विष्णुगुप्त अगर कौटिल्य या नावापेक्षा ‘चाणक्य’ या नावाचाच बहुतांशी उपयोग.
- चाणक्याचे श्रावकत्व दर्शविणारे काही पारिभाषिक शब्द.
- चाणक्याच्या ब्राह्मणत्वसूचक वैशिष्ट्यांचे मधून मधून दर्शन.
- ‘शेंडीची गाठ सोडण्याच्या’ सुप्रसिद्ध प्रसंगाचा अभाव.
- हेमचंद्राला मुद्राराक्षसाचा असलेला परिचय सुबंधूच्या गुणवैशिष्ट्यांवरून सूचित.
- चाणक्याचे अर्थशास्त्र, भद्रबाहूंची छेदसूत्रे आणि श्वेतांबर आगमांची पाटलिपुत्रवाचना यांचे साक्षात उल्लेख नसणे.

**हेमचंद्राच्या चाणक्यकथेचे तौलनिक परीक्षण**

(१) ‘गोल्लदेश’–‘चणकग्राम’–‘चणीब्राह्मण’, हे तीन उल्लेख त्यांनी आवश्यकचूर्णीतून घेतलेले दिसतात. स्वत:च्या कल्पनेने आईचे नाव चणेश्वरी आणि त्याचे नाव चाणक्य असा विस्तार केला. चाणक्य या नावावरून ही सर्वच नावे कल्पनेने घेतलेली आहेत, हे उघड दिसते. हरिषेणाने बृहत्कथेत चाणक्याच्या मातापित्यांची नावे ‘कपिल आणि देविला’ अशी सांगितली आहेत.

(२) आवश्यकचूर्णीत कथन केलेला चाणक्यबालकाच्या भविष्यकथनाचा प्रसंग, हेमचंद्राने आवश्यकचूर्णीपेक्षा विस्ताराने आणि अधिकाधिक जैनीकरण करून प्रस्तुत केला आहे. जैन मुनी हे चणी ब्राह्मणाच्या घरी निवास करतात असेही दाखविले

आहे. हरिषेणाने हा प्रसंग उद्धृत केलेला नाही.

**(३)** चाणक्याचे श्रावकत्व विशेष शब्दात अधोरेखित केलेले दिसते जसेह्नह्न

**चाणक्योऽपि श्रावकोऽभूत्सर्वविद्याब्धिपारगः ।**

**श्रमणोपासकत्वेन स सन्तोषधनः सदा ।।**

(सर्ग ८ श्लोक २००-२१०)

हरिषेणाने चाणक्याचे श्रावकत्व दाखविलेले नाही. त्याने मुनिदीक्षा घेतली आणि '५०० जैनमुनींचे त्याने नेतृत्व केले' असे चित्रित केले आहे.

**(४)** आवश्यकचूर्णी आणि परिशिष्टपर्वात चाणक्याच्या पत्नीचे नाव दिलेले नाही. तिचा माहेरी झालेला अपमान आणि गरिबी दूर करण्यासाठी चाणक्याचे पाटलिपुत्रास नंदाकडे गमन — हा वृत्तांत प्राय: सर्व श्वेतांबर कथांमध्ये समान आहे.हरिषेणाने चाणक्याच्या पत्नीचे नाव 'यशोमती' असल्याचे म्हटले आहे. परंतु पत्नीचा अपमान इत्यादि कथा रंगविलेली नाही. शीलांकाने या प्रसंगावर टिप्पणी करताना म्हटले आहे की, यातून चाणक्याचा पत्नीवरील अनुराग आणि नंदाविषयीचा द्वेष दिसतो.

**(५)** नंदाच्या भोजनशाळेतील अपमानाचा वृत्तांत कार्तिकी पौर्णिमेला घडला, असे आवश्यकचूर्णी म्हणते. हरिषेणही हीच तिथी मान्य करतो. हेमचंद्राने मात्र या तिथीकडे दुर्लक्ष केले आहे. चाणक्याला अग्रासन सोडण्याची सूचना अंतिमत: नंदाची एक दासी देते, याबाबत सर्वांचे एकमत आहे. घटनाक्रम मात्र थोडा वेगळा आहे.

**(६)** आवश्यकचूर्णी आणि इतर उत्तरकालीन ग्रंथात उद्धृत केलेला 'कोशेन भृत्यैश्च ---' हा श्लोक जसाच्या तसा न देता हेमचंद्राने पुढीलप्रमाणे बदलला आहे --

**सकोशभृत्यं ससुहृत्पुत्रं सबलवाहनम् ।**

**नन्दमुन्मूलयिष्यामि महावायुरिव द्रुमम् ।।**

(सर्ग ८ श्लोक २२५)

हरिषेणाने श्वेतांबर परंपरेतील 'कोशेन भृत्यैश्च ---' हा रूढ श्लोक उद्धृत केलेला नाही.

**(७)** चाणक्याच्या अपमानाच्या प्रसंगी त्याने शेंडी मोकळी सोडून प्रतिज्ञा केली, असा उल्लेख कथासरित्सागरात आढळतो. शेंडीच्या उल्लेखाने ब्राह्मणत्व स्पष्ट होत असल्यामुळे हा उल्लेख हेमचंद्राने आणि हरिषेणाने टाळला आहे. त्याऐवजी दोघांनी 'चाणक्याने कात्री हातात घेऊन प्रतिज्ञा केली' असे म्हटले आहे. कात्रीचा उल्लेख याप्रसंगी तर्कदृष्ट्या अप्रस्तुत मानावा लागतो.

**(८)** नंदाचा सूड घेण्यासाठी चाणक्याने योग्य व्यक्तीचा घेतलेला शोध — हा वृत्तांत आवश्यकचूर्णी आणि परिशिष्टपर्वात अतिशय संक्षेपाने नमूद केला आहे. नंदाच्या आश्रयाने राहणाऱ्या मयूरपोषकाची मुलगी कोणापासून गर्भवती राहिली होती— हे रहस्य हेमचंद्रही कायम ठेवतात. त्या अनुषंगाने चंद्रगुप्ताच्या नीच जातीचा उल्लेख करणेही टाळतात.

हरिषेणाने तर चंद्रगुप्ताचाच उल्लेख करणे टाळले आहे. त्याऐवजी 'स नर:' असा ओझरता उल्लेख तो करतो. हरिषेणाचा चाणक्य, चंद्रगुप्ताचा शोध घेण्यास कोठेही जात नाही. चंद्रगुप्तच स्वत: येऊन चाणक्याच्या योजनेत स्वत:

सामील होतो. शोध घेण्याचा प्रसंग हरिषेणाने वेगळ्याच प्रकारे प्रस्तुत केला आहे. नंदाचा सूड घेऊ इच्छिणारा 'कवि' नावाचा मंत्री चाणक्याचाच शोध घेऊन, नंदाकडून त्याचा अपमान घडवून आणतो.

**(९)** पर्वतकाच्या मृत्यूनंतर चंद्रगुप्त हा मगधाचा एकछत्री सम्राट होतो. महावीरनिर्वाणानंतर १५५ वर्षे लोटल्यावर, चाणक्य हा चंद्रगुप्ताला राज्याभिषेक करतो — हे तथ्य परिशिष्टपर्वात नेमके नोंदविले आहे. याचा अर्थ असा की, श्वेतांबर परंपरा चंद्रगुप्ताच्या राज्याभिषेकाचे वर्ष इसवीसनपूर्व ३७२ असे मानते.

याबाबत हरिषेणाने काही वेगळीच माहिती लिहून ठेवली आहे. त्याच्या मते चाणक्याने एकट्यानेच युक्तीने नंदाच्या मंत्र्यांमध्ये भेद घडवून नंदाला ठार मारले. त्यानंतर चाणक्य स्वत:च मगधाचा राजा झाला. अनेक वर्षे राज्य करून त्या व्यक्तीला (?) राज्याभिषेक केला. स्वत: मुनिदीक्षा स्वीकारून ५०० मुनींच्या संघासह चाणक्य-मुनि दक्षिणापथाला गेले. हरिषेणाने चंद्रगुप्ताच्या राज्याभिषेकाचे वर्ष नोंदविलेले नाही.

**(१०)** नंदपक्षपाती माणसांचा बंदोबस्त करण्यासाठी चाणक्याने नलदाम कुविंदाच्या केलेल्या नियुक्तीचा वृत्तांत, आवश्यकचूर्णी आणि परिशिष्टपर्व दोन्हींमध्ये येतो. हरिषेणाने तो उद्धृत केलेला नाही.

**(११)** निशीथचूर्णीत आज्ञाभंगाचा प्रसंग ग्रामदाहाचे उदाहरण देऊन विस्ताराने रंगविला आहे. चूर्णीकाराने चाणक्याच्या कडक शासनाची तेथे स्तुती केली आहे. हेमचंद्रांनी हा प्रसंग तर रंगविला आहे परंतु त्याच्यावर आपले मत नोंदविणे टाळले आहे. हरिषेणाने चाणक्याच्या चरित्रातील कोणतेच बारकावे दाखविलेले नाहीत.

**(१२)** नंदाने खडखडाट करून ठेवलेला राजकोष वृद्धिंगत करण्याचे चाणक्याने केलेले

दोन प्रयत्न आवश्यकचूर्णी आणि परिशिष्टपर्वात चित्रित केले आहेत. कूटपाशकाचा प्रसंग आणि व्यापाऱ्यांकडून संपत्ती वदवून घेण्याचा प्रसंग, चूर्णीकाराने चाणक्याच्या पारिणामिकी बुद्धीची उदाहरणे म्हणून दिले आहेत. हेमचंद्राने त्यावर असे मत व्यक्त केलेले नाही. कूटपाशकाचा प्रसंग अनेकांनी मनुष्याचे दुर्लभत्व स्पष्ट करण्यासाठी रंगविला आहे. व्यापाऱ्यांकडून धन गोळा करण्याच्या प्रसंगी हेमचंद्र चाणक्याविषयी म्हणतो,

**चक्रे समर्थमर्थेन तेन मौर्यं चणिप्रसूः ।**

**धियां निधिरमात्यो हि कामधेनुर्महीभुजाम् ।।**

(सर्ग ८ श्लोक ३७६)

या श्लोकात हेमचंद्राने चाणक्य अमात्याला, 'मौर्याची जणू कामधेनूच' असे म्हटले आहे.

**(१३)** बारा वर्षाच्या दुर्भिक्षाच्या वेळी सुस्थिताचार्यांचे शिष्य असलेल्या दोन तरुण जैन मुनींनी अदृश्यरूपाने चंद्रगुप्ताचा आहार खाण्याचा प्रसंग निशीथचूर्णीत आणि परिशिष्टपर्वात विस्ताराने सांगितला आहे. हेमचंद्राने चाणक्याचे श्रावकत्व या निमित्ताने वारंवार अधोरेखित केले आहे.

**(१४)** परपाषण्डप्रशंसेच्या प्रसंगात हेमचंद्राने असे दाखविले आहे की चाणक्याचा जैनधर्मी साधूंवर दृढ विश्वास असतो. चंद्रगुप्त मात्र अन्यधर्मी संन्यासी आणि परिव्राजक यांना अनुकूल असतो. चंद्रगुप्त त्यांच्या जीवननिर्वाहासाठी राजकोषातून बराच खर्च करीत असतो. ही गोष्ट चाणक्याला रुचत नसते. सरते शेवटी, सर्व साधूंची परीक्षा घेऊन चाणक्य जैनधर्मी साधूंचे श्रेष्ठत्व सिद्ध करतो. त्यानंतर

चंद्रगुप्तही जैनधर्माला अनुकूल होतो.

आवश्यकचूर्णीत ही कथा अतिशय संक्षेपाने आणि थोडीशी वेगळी आली आहे. आवश्यकचूर्णीत चाणक्याच्या पत्नीची भूमिका महत्त्वाची मानली आहे. हेमचंद्राने तसे चित्रण केलेले नाही. जिनदासगणि, वर्धमानसूरि आणि अभयदेव यांनी ही कथा सम्यक्त्वाच्या दृढीकरणासाठी दाखविली आहे. हरिषेणाच्या चाणक्यकथेत हा प्रसंग नोंदविलेला नाही.

**(१५)** हेमचंद्राने चंद्रगुप्ताच्या मृत्यूस 'समाधिमरण' संबोधले आहे. या घटनेचे नेमके वर्ष आणि इतर बारकावे नोंदविलेले नाहीत. त्याचा मृत्यू पाटलिपुत्रातच झाला आहे. हरिषेणाने मात्र चंद्रगुप्ताची दीक्षा, त्याने भद्रबाहूंचे स्वीकारलेले शिष्यत्व, त्यांच्यासह दक्षिणापथास केलेले गमन आणि दक्षिणेत चंद्रगिरी या गुंफेत त्याने स्वीकारलेले समाधिमरण — या सर्वांचा उल्लेख 'भद्रबाहुकथानकात' केला आहे.

**(१६)** 'मुद्राराक्षस' नाटक हेमचंद्रासमोर असल्याने त्याने त्या नाटकातील मुख्य घटना यथार्थ मानून, आपल्या चाणक्यचरित्रात समाविष्ट करून घेतली आहे. तो म्हणतो, 'चंद्रगुप्ताच्या अनुमतीने चाणक्याने सुबंधूला मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेतले होते.'

**(१७)** चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर सुबंधूची महत्त्वाकांक्षा आणि मत्सर जागृत झाला. सत्यअसत्याचे मिश्रण करून त्याने बिंदुसार राजाला आपलेसे करून घेतले. चाणक्यावर नाराज झालेल्या बिंदुसाराने अनादरभाव व्यक्त करताच, चाणक्याने राजकारणातून निवृत्ती घेऊन, पाटलिपुत्राजवळील गोकुलस्थानात अनशन व्रत धारण केले. पुढे बिंदुसाराचा गैरसमज दूर झाल्यावर तो चाणक्याची पूजा करावयास

निघाला. बिंदुसाराला अडवून, चुकीबद्दल पश्चात्ताप व्यक्त करून, सुबंधु पूजेची थाळी घेऊन स्वत:च चाणक्याजवळ गेला. त्या स्थानाला आग लावून, त्याने त्या समाधी अवस्थेत चाणक्याला जाळले. व्रतस्थ असल्यामुळे चाणक्य अविचल राहिला. त्याने देवगती प्राप्त केली.

हेमचंद्राने हा वृत्तांत जवळजवळ २५ श्लोकांत वर्णन केला आहे. त्यानंतरच्या १३ श्लोकांत सुबंधूचे उर्वरित चरित्र वर्णिले आहे.

निशीथचूर्णीत आणि उत्तरवर्ती चाणक्यकथांमध्ये हा वृत्तांत प्राय: असाच्या असा आला आहे. निशीथचूर्णीचा संदर्भ मात्र किंचित वेगळा आहे. ''साधूने 'सचित्त गंध' घेऊ नये'' — हा नियम सांगण्यासाठी चूर्णीकार वरील संपूर्ण कथा उद्धृत करतो.

**(१८)** चाणक्याच्या मृत्यूचे अत्यंत उदात्त वर्णन हे सर्व श्वेतांबर संदर्भांचे वैशिष्ट्य आहे. कोणी त्यास 'अनशन' म्हटले आहे. कोणी 'इंगिनीमरण' म्हटले आहे तर कोणी 'प्रायोपगमनाचा' उल्लेख केला आहे.

चाणक्याच्या मृत्यूसंबंधीची कथा हरिषेणाने थोड्या वेगळ्या प्रकारे रंगविली आहे. नंदपक्षपाती असलेला सुबंधू चाणक्याच्या शब्दाखातर चंद्रगुप्ताचा मंत्री होऊ शकेल, असे हरिषेण मानीत नाही. शिवाय त्याच्या मते, ही सगळी घटना पाटलिपुत्राच्या आसपास घडतच नाही. चाणक्य-चंद्रगुप्ताचा कारभार चालू होताच, आपल्याला धोका आहे हे जाणून, सुबंधु तेथून पलायन करतो. दक्षिणेत जाऊन, क्रौंचपुराच्या राजाचा सचिव बनतो. चाणक्याच्या हालचालींवर मात्र लक्ष ठेवून असतो. मुनिदीक्षा धारण केलेला चाणक्य जेव्हा विहार करीत क्रौंचपुरास येतो तेव्हा आणि त्याचे पूजन करण्याच्या निमित्ताने सुबंधु त्या सर्व मुनींच्या वसतिस्थानाला आग लावून देतो. ते सर्व मुनी आणि

चाणक्य शुक्लध्यानात स्थित होतात. सर्व उपसर्ग समभावाने सहन केल्यामुळे चाणक्य सिद्धिगती प्राप्त करतो.

**(१९)** चाणक्याच्या मृत्यूनंतरचा सुबंधूचा वृत्तांत हरिषेणाने रंगविलेला नाही. आलंकारिक भाषेत हरिषेण वर्णन करीत म्हणतो की, 'स्वत:च्याच क्रोधाग्नीत जळून असंख्य पापराशींचे उपार्जन केलेल्या त्या सुबंधूने नरकगती प्राप्त केली.'

दक्षिणेतील क्रौंचपुरास घडलेल्या या घटनेला ऐतिहासिकता देण्यासाठी हरिषेण म्हणतो, ''त्या सर्व साधूंच्या स्मरणाप्रीत्यर्थ तेथे एक 'निषद्यका' निर्माण केली गेली. आजही विहार करणारे साधू तेथे जाऊन त्या निषद्यकेला वंदन करतात.''

**(२०)** हरिषेण आणि हेमचंद्र यांच्या चाणक्यकथेत मुख्य मुख्य कथाभाग समान असला तरी, त्यातील बारकावे मात्र वेगवेगळे आहेत. श्वेतांबर साहित्यातल्या छोट्या छोट्या चाणक्यकथा हरिषेणाने विचारात घेतलेल्या नाहीत. चाणक्याच्या समाधिमरणाबाबत एकमत असले तरी, वरीलप्रमाणे मतभिन्नता दिसते. चाणक्याविषयीचा निखळ आदर, मात्र दोघांमध्येही स्पष्ट प्रतिबिंबित झालेला दिसतो.

**(४१) अभिधान–चिन्तामणि–नाममाला** या ग्रंथात **हेमचंद्राने** चाणक्याविषयी अतिशय बहुमोल माहिती दिलेली आहे. तो म्हणतो,

**वात्सायने मल्लनाग: कौटल्यश्चणकात्मज: ।**

**द्रामिल पक्षिलस्वामी विष्णुगुप्तोऽङ्गुलश्च स: ।।**

(श्लोक ८५३)

या श्लोकात हेमचंद्राने एकूण ८ विशेषनामे नमूद केली आहेत. ती सर्व चाणक्याची

पर्यायवाची नावे आहेत. परिशिष्टपर्वात हेमचंद्राने 'चाणक्य', 'चणिप्रसू' आणि 'चणकात्मज' अशी तीन नावे छंदात बसविण्यासाठी वापरली आहेत. परिशिष्टपर्वात यापेक्षा वेगळे नाव तो देत नाही. अभिधान-चिन्तामणि-नाममालेवरील स्वोपज्ञ टीकेत हेमचंद्राने या सर्व समानार्थी नावांची व्युत्पत्ती, संबंधित व्याकरण-नियमांसकट दिली आहेत. त्याचे अधिक विश्लेषण करणे हा एक स्वतंत्र शोधलेखाचा विषय आहे. या ठिकाणी आपण महत्त्वाचे मुद्दे घेऊ.

- चाणक्य, कौटल्य आणि विष्णुगुप्त ही तीनही एकाच व्यक्तीची नावे आहेत - ही महत्त्वपूर्ण गोष्ट यातून समजते.
- अनेक अभ्यासकांचे असे मत आहे की येथे हेमचंद्राने कामसूत्रकार वात्सायन आणि अर्थशास्त्रकार कौटिल्य - या दोघांमध्ये गोंधळ केला आहे. परंतु हेमचंद्राने आपल्या टीकेत येथील वात्सायन हा कामसूत्रकार असल्याचे म्हटलेले नाही.
- 'द्रामिल' या नावाची व्युत्पत्ती देताना हेमचंद्र म्हणतो, 'द्रमिले देशे भवो द्रामिलः ।' यावरून चाणक्याचे जन्मस्थान तमिळ प्रदेशातील दिसते. परंतु हेमचंद्राने त्याच्या चाणक्यचरित्रात मात्र, तो 'दाक्षिणात्य' असल्याचे कोठेही सूचित केलेले नाही. याउलट हरिषेणाच्या चरित्रात मात्र, आयुष्याच्या उत्तरार्धात चाणक्य दक्षिणेस गेलेला दिसतो.
- 'अङ्गुल' या नावाची व्युत्पत्ती देत असताना हेमचंद्र म्हणतो की, चाणक्याला सहावे बोट असावे अथवा त्याच्या हाताच्या एका बोटात काहीतरी व्यंग असावे. आश्चर्याची गोष्ट अशी की, श्वेतांबर साहित्यात त्याच्या दाढांविषयीचा उल्लेख आढळतो. बोटांविषयीचा उल्लेख मात्र श्वेतांबर अगर दिगंबर दोघेही देत नाहीत.

- ‘कौटल्य’ या नावाची व्युत्पत्ती देताना हेमचंद्र म्हणतो, ‘‘कूट म्हणजे घट, घटांमध्ये धान्य साठविणारे म्हणजे कुम्भीधान्य लोक. त्यांच्या वंशात जे होऊन गेले ते कौटल्य.’’ अभ्यासकांनी असे मत व्यक्त केले आहे की ही व्युत्पत्ती अतिशय कृत्रिम आहे. या कृत्रिम गोष्टीवरून एक मात्र सिद्ध होते की, विशाखदत्ताने प्रसृत केलेला ‘कौटिल्य: कुटिलमति:’ हा वाक्प्रचार हेमचंद्राला अजिबात मान्य नसावा.
- ‘चणकात्मज’ या नावाविषयी लिहित असताना, हेमचंद्र चाणक्याच्या वडिलांना ‘ऋषि’ म्हणतो. या शब्दावरून चाणक्याच्या वडिलांचे ब्राह्मणत्व स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे चाणक्याच्या वडिलांचे आणि त्याचे श्रावकत्व हे जैनीकरणच असावे — या तर्काला पुष्टी मिळते.
- ‘मल्लनाग’ नावाविषयी हेमचंद्र म्हणतो, ‘नऊ नंदांच्या उच्छेदासाठी जो मल्लाप्रमाणे आहे आणि जो नाग अर्थात् हत्तीप्रमाणे पराक्रमी आहे, तो ‘मल्लनाग’ होय.’ हेमचंद्राची ही व्युत्पत्ती देखील कृत्रिम आणि आलंकारिक आहे.
- ‘पक्षिलस्वामी’ आणि ‘विष्णुगुप्त’ या दोन नावांविषयी तो फारशी लक्षणीय माहिती देत नाही.

सारांश काय तर, हेमचंद्राने जी माहिती यातून दिली आहे ती कोणत्याही दुसऱ्या जैन आणि हिंदू स्रोतांमधून मिळत नाही.

(४२) **संक्षिप्त-तरंगवती-कथा (तरङ्गलोला)** हे तांत्रिक दृष्टीने एक खंडकाव्य असून, **नेमिचंद्रगणींनी** ते इसवी सनाच्या तेराव्या शतकात जैन महाराष्ट्री भाषेत लिहिले आहे. नेमिचंद्राने तरङ्गलोलेच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, जैन प्रभावक आचार्य पादलिप्त यांनी लिहिलेल्या तरंगवती-कथा या अद्भुत प्रेमाख्यानावर

त्यांचे हे काव्य आधारित आहे. पादलिप्ताचार्य अंदाजे इसवी सनाच्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकात होऊन गेले. तरंगलोला काव्यात जेथे जेथे योग्य प्रसंग उद्भवेल तेथे तेथे नेमिचंद्रांनी अर्थशास्त्राचा किंवा अर्थशास्त्रातील काही विधानांचा उल्लेख केला आहे. पादलिप्ताचार्यही अर्थशास्त्राशी परिचित असावेत, असा अंदाज करण्यास हरकत नाही. तरङ्गलोलेच्या ८५३ व्या गाथेतील उल्लेख विशेष लक्षणीय आहे. तेथे म्हटले आहे की,

**तो भणति अत्थसत्थम्मि वण्णियं सुयणु सत्थयारेहिं ।**

**दूती परिभव-दूती न होइ कज्जस्स सिद्धिकरी ।।** गा.८५३

''हे सुकन्ये, शास्त्रकारांनी अर्थशास्त्रात असे सांगितले आहे की, जर स्त्री-दूती अपमानित झाली तर ती तिच्यावर सोपविलेले काम यशस्वीपणे करू शकत नाही.''

कौटिलीय अर्थशास्त्रात कोणत्या स्त्रियांना हेर आणि दूत म्हणून पाठवावेत यासंबंधीचे वर्णन येते. अर्थशास्त्राच्या पहिल्या अधिकरणातील सोळाव्या अध्यायात 'दूत-संप्रेषण' आणि 'दूत-कार्य' या शीर्षकाखाली तत्संबंधी माहिती नोंदविलेली आहे.

नेमिचंद्रगणींचे असे उल्लेख मध्ययुगात होऊन गेलेल्या जैन आचार्यांच्या शास्त्रीय ज्ञानाचे द्योतक समजले पाहिजेत.

(४३) **क्षमारत्नकृत पिण्डनिर्युक्ति-अवचूरि** ही **पिण्डनिर्युक्ति-भाष्यावरील संस्कृत टीका** असून ती चौदाव्या शतकात लिहिलेली आहे. पाटलिपुत्रातील भीषण दुष्काळ, सुस्थित आचार्य आणि त्यांचे दोन शिष्य यांची कथा अवचूरीत संस्कृतमध्ये लिहिली आहे. प्रामुख्याने ते निशीथचूर्णीतील कथाभागांचे संस्कृत रूपांतरण असले तरी त्यातील काही भेद पुढीलप्रमाणे नोंदविता येतील —

- येथे चाणक्याला 'अमात्य' न म्हणता 'मंत्री' म्हटले आहे.

- येथे चाणक्याला 'जैन श्रावक' म्हटलेले नाही. किंबहुना पूर्ण कथेतच जैनीकरणाचा अभाव दिसतो.
- क्षमारत्नांच्या संस्कृतमधील प्राकृतनिष्ठ संस्कृत शब्द (हायब्रीड संस्कृत) हे या अवचूरीचे वैशिष्ट्य आहे. क्षुल्लौ (दोन तरुण भिक्षु), विटालित (विटाळलेले, दूषित), मुत्कलिनौ (दोघांना मोकळे सोडले.) — हे काही शब्द नमुन्यादाखल सांगता येतील.

**(४४) जिनप्रभसूरींच्या विविधतीर्थकल्प** या ग्रंथाचे स्थान केवळ जैन साहित्यातच नव्हे तर भारतीय ऐतिहासिक साहित्यातही अनन्यसाधारण मानले आहे. भारतातील ४० तीर्थक्षेत्रांविषयीची दंतकथात्मक आणि पौराणिक माहिती, ४० प्रकरणांमध्ये (कल्पांमध्ये) लिहिली आहे. काही कल्प संस्कृतात आहेत तर काही कल्प प्राकृतात आहेत. चौदाव्या शतकातील या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा प्राकृतच्या, संस्कृतच्या आणि प्राच्यविद्येच्या विद्वानांनी खूप अभ्यास केलेला दिसतो.

'पाटलिपुत्र-नगर-कल्प' नावाच्या ३६ व्या प्रकरणात चाणक्याचा उल्लेख दिसतो. तेथे त्याला 'चाणिक्य' म्हटले आहे. जैन इतिहासाचा मगधाशी, पाटलिपुत्राशी आणि चाणक्याशी संबंध असल्यामुळे आपल्याला असे वाटते की, जिनप्रभांनी येथे चाणक्याविषयी विस्ताराने लिहिलेले असेल. परंतु आपला अपेक्षाभंग होतो. जिनप्रभ केवळ एकाच ओळीत सांगतात की,

**तत्रैव च चाणिक्य: सचिवो नन्दं समूलमुन्मूल्य मौर्यवंश्यं श्रीचन्द्रगुप्तं न्यवीविशद्विशंपतित्वे ।** (पृ.६९)

'तेथेच (पाटलिपुत्रातच) चाणिक्य सचिवाने नंदाचा समूळ उच्छेद करून, मौर्यवंशीय श्री चंद्रगुप्ताला सिंहासनावर बसविले.'

चाणक्याच्या जीवनकथेतील अगदी किरकोळ एक-दोन प्रसंगांचाच ओझरता उल्लेख जिनप्रभ करतो. चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीतील दुष्काळाचा उल्लेख जिनप्रभ आवर्जून करतो. त्यानंतर मौर्यवंशीय राजांची संक्षिप्त माहिती दिली आहे. सम्राट अशोकाचा उल्लेख अतिशय त्रोटक असून, राजा संप्रतीने केलेल्या जैनधर्माच्या प्रसाराचे वर्णन अधिक विस्ताराने येते. एक लक्षणीय गोष्ट अशी की, जिनप्रभाने चाणक्याचा उल्लेख 'विष्णुगुप्त' असाही केला आहे.

एकंदरीत असे दिसते की, तेराव्या-चौदाव्या शतकात श्वेतांबर कथासाहित्यातून चाणक्यकथांचे महत्त्व कमी-कमी होत गेले आहे. तरीही हिंदू परंपरेतील स्रोतांपेक्षा जैनांनी कमीत कमी पाच-सात शतकांहून अधिक काळ चाणक्याला आपल्या साहित्यातून जिवंत ठेवलेले दिसते.

◆◆◆

## (ब) कथाभागापेक्षा वेगळे दिगंबर संदर्भ व त्यावरील भाष्य:

हे संदर्भ विखुरलेल्या स्वरूपात असल्यामुळे कालक्रमानुसार घेतले आहेत.

(१) **आचार्य शिवकोटि** यांनी लिहिलेला **भगवती आराधना (आराधना/ मूलाराधना)** हा ग्रंथ जैन शौरसेनी पद्यांमध्ये लिहिलेला असून, दिगंबर संप्रदायातील प्राचीन ग्रंथांपैकी एक मानला जातो. इसवी सनाच्या अंदाजे तिसऱ्या चौथ्या शतकात लिहिलेल्या या ग्रंथात दिगंबर साहित्यातील चाणक्यविषयक पहिला उल्लेख सापडतो. विशेष म्हणजे तो चाणक्याच्या मृत्यूविषयी आहे. भगवती आराधनेपूर्वी लिहिल्या गेलेल्या श्वेतांबर ग्रंथात चाणक्याच्या अशा प्रकारच्या मृत्यूची नोंद नाही.

भगवती आराधनेच्या १५५१ व्या गाथेत म्हटले आहे की,

**गोट्ठे पाओवगदो सुबंधुणा गोब्बरे पलीविदम्मि ।**

**डज्झंतो चाणक्को पडिवण्णो उत्तमं अट्ठं ।।**

- चाणक्याचा भीषण अंत येथे नोंदवला आहे. तो अंत त्याचा प्रतिस्पर्धी सुबंधु याने घडवून आणला, असे म्हटले आहे.
- चाणक्याच्या मृत्यूच्या प्रकाराला येथे 'पादपोपगमन' संबोधले आहे. गोब्बर ग्रामामध्ये गोठ्यात हा प्रसंग घडला असेही नमूद केले आहे.
- भगवती आराधनेच्या २०७० व्या गाथेत महापद्मनंदाच्या दोन मंत्र्यांचा उल्लेख आहे. ते दोघे म्हणजे शकटाल आणि वररुचि. शकटालाने समाधिमरण स्वीकारले, असे म्हटले आहे. हा उल्लेख कथासरित्सागराशी मिळताजुळता आहे.
- भगवती आराधनेचे टीकाकार मात्र वरील दोन्ही गाथांचे अधिक विवेचन करीत नाहीत.

(२) **मूलाचार** हा ग्रंथ **आचार्य वट्टकेरकृत** मानला जातो. तो इसवी सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकातील मानला जातो. हा ग्रंथ दिगंबर साधुआचाराविषयीचा प्रमाणित ग्रंथ आहे. ग्रंथाच्या २५७ व्या गाथेत कौटिल्याचा ओझरता उल्लेख आहे. म्हटले आहे की,

**कोडिल्लमासुरक्खा भारहरामायणादि जे धम्मा ।**

**होज्ज व तेसु विसुत्ती लोइयमूढो हवदि एसो ।।**

याचा भावार्थ असा की —

कौटिल्याचे अर्थशास्त्र, आयुर्वेद आणि रामायण-महाभारत इत्यादि ग्रंथात जे धर्मासंबंधीचे विवेचन आले आहे त्याची गणना 'लौकिकमूढता' अशी करावी लागेल कारण लोकांना ते कुमार्गाला नेतात. (येथेच पुढे वेदांविषयीचा सुद्धा अनादरभाव व्यक्त

केला आहे.)

- वट्टकेराने ज्यास लौकिकमूढता असे म्हटले आहे तोच भाव अनुयोगद्वार आणि नंदीसूत्रात 'मिथ्याश्रुत' या शीर्षकाखाली नोंदविलेला आहे. नंदीकाराने त्याला स्वत:ची पुस्ती जोडून, वरील ग्रंथ सम्यक्‌श्रुतांच्या यादीत आणण्याचा प्रयत्न केला आहे. अकराव्या शतकात होऊन गेलेल्या वसुदेवनंदि नावाच्या मूलाचाराच्या टीकाकाराने मात्र, चाणक्याची तीव्र शब्दात निंदा केली आहे.

(३) **यतिवृषभकृत त्रिलोकप्रज्ञप्ति** हा ग्रंथ देखील जैन शौरसेनी भाषेत असून, अभ्यासकांच्या मते तो इसवी सनाच्या पाचव्या ते आठव्या शतकाच्या दरम्यान लिहिला गेला असावा. अनुयोग-विभागणीनुसार हा ग्रंथ 'करणानुयोगाच्या' अंतर्गत येतो. त्याचे एकूण ९ महाअधिकार (प्रकरणे) आहेत. त्यातील चौथ्या महाअधिकाराच्या १४८ व्या गाथेत म्हटले आहे की,

**मउडधरेसुं चरिमो जिणदिक्खं धरदि चंदगुत्तो य ।**

**तत्तो मउडधरा दु प्पव्वज्जं णेव गेण्हंति ।।**

मुकुटधारी राजांमध्ये चंद्रगुप्त हा शेवटचा सम्राट होऊन गेला की ज्याने जिनदीक्षा ग्रहण केली होती. त्याच्यानंतर कोणत्याही मुकुटधारी राजाने (सम्राटाने) मुनिप्रव्रज्या घेतली नाही.

- उपरोक्त संदर्भात चंद्रगुप्ताचा उल्लेख आहे परंतु त्यामध्ये आणि त्याच्या आधी आणि नंतर सुद्धा चाणक्य अथवा कौटिल्याचा उल्लेख नाही.
- अनेक अभ्यासकांनी असे नोंदविले आहे की या गाथेतील 'चंद्रगुप्त' हा मौर्यवंशातील चंद्रगुप्त नसून, नंतरच्या काळात होऊन गेलेल्या गुप्त वंशातील चंद्रगुप्त आहे.
- हा ग्रंथ जर सहाव्या शतकातला असेल तर त्याला समकालीन असे अर्धमागधी

ग्रंथ म्हणजे चूर्णी आणि काही टीका होत. चंद्रगुप्त मौर्याने जर खरोखरी जिनदीक्षा ग्रहण केली असती तर श्वेतांबरांनी त्याचा उल्लेख जरूर केला असता. हेमचंद्राने चंद्रगुप्त मौर्याविषयीची त्याला माहीत असलेली ऐतिहासिक तथ्ये आणि दंतकथा परिशिष्टपर्वात विस्ताराने दिल्या आहेत. तेथे चंद्रगुप्त मौर्याच्या मृत्यूविषयी तो म्हणतो,

**बिन्दुसारे प्रपेदाने वयो मन्मथवल्लभम् ।**

**समाधिमरणं प्राप्य चन्द्रगुप्तो दिवं ययौ ।।**

हेमचंद्राचे हे मत दिगंबर आचार्य हरिषेणापेक्षा अतिशय भिन्न दिसते. हरिषेण म्हणतो की, 'चंद्रगुप्ताने भद्रबाहूंकडून जिनदीक्षा घेतली आणि तो दक्षिणेस गेला.' हेमचंद्राने मात्र चंद्रगुप्त मौर्याचा आणि भद्रबाहूंचा प्रत्यक्ष संबंध नोंदविलेला नाही.

(४) इसवी सनाच्या आठव्या शतकात लिहिलेल्या **हरिषेणाचा बृहत्कथाकोष** म्हणजे उपलब्ध संस्कृत साहित्यातील सर्वात प्राचीन संस्कृत कथांचा पद्य-संग्रह होय. यात दिगंबर लेखक हरिषेणाने, भद्रबाहु, वररुचि, स्वामी कार्तिकेय इत्यादि प्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्तींच्या १५७ पारंपारिक कथा संग्रहीत केलेल्या आहेत. भगवती आराधनेत सूचित केलेल्या कथांमधील व्यक्तींवरून जणू काही स्फूर्ती घेऊन, हरिषेणाने हा ग्रंथ लिहिला.

बृहत्कथाकोषातील १४३ व्या कथेचे नाव 'चाणक्य-मुनि-कथानकम्' आहे. यात ८५ संस्कृत श्लोकांमध्ये चाणक्याचे संपूर्ण चरित्र वर्णिले आहे. हेमचंद्राच्या चाणक्यकथेपेक्षा हरिषेणाची चाणक्यकथा बरीच वेगळी आहे.

## हरिषेणाच्या चाणक्यमुनिकथेचे तौलनिक परीक्षण

- आवश्यकचूर्णी सातव्या शतकातील आहे. त्यातील 'चाणक्यचरित्र' हे श्वेतांबरीयांनी चौदाव्या शतकापर्यंत चाणक्यकथेचे मुख्य स्रोत म्हणून वापरले. हरिषेण हा आठव्या शतकातील आहे. बृहत्कथाकोषात त्याने लिहिलेल्या चाणक्यमुनिकथानकाचा दिगंबरीयांनी सोळाव्या शतकापर्यंत मुख्य स्रोतासारखा वापर केला.
- हरिषेणापूर्वीचे चाणक्यविषयक दिगंबर संदर्भ अगदी तुरळक आणि फक्त मृत्युविषयक आहेत. ८५ संस्कृत श्लोकातील ही दीर्घकथा, हरिषेणाने दिगंबर साहित्याला दिलेले योगदान आहे.
- जन्माने ब्राह्मण असलेल्या हरिषेणाने त्याच्या चाणक्यचरित्रासाठी स्कंदपुराण आणि मत्स्यपुराणाचा आधार घेतला आहे. कथासरित्सागराचे जे समकालीन संस्करण (बहुधा पैशाचीतील) हरिषेणाला उपलब्ध होते, त्याचाही वापर त्याने केलेला दिसतो.
- विशाखदत्ताच्या मुद्राराक्षसाचा थोडाही प्रभाव हरिषेणावर दिसत नाही.
- हरिषेणाने वृत्तात बसण्यासाठी 'चाणक्य' आणि 'चाणाक्य' अशी दोन्ही नावे वापरली आहेत. चाणक्याचे माता-पिता, जन्मस्थान इत्यादि सर्वांची नावे श्वेतांबर साहित्यापेक्षा अगदी निराळी आहेत. चाणक्याचा जन्म, शिक्षण, भविष्य, मुंज, विवाह यांचे तपशील हरिषेणाने पूर्णपणे गाळले आहेत. त्याचे ब्राह्मणत्व आणि

आचार्यत्व मात्र हरिषेण अधोरेखित करतो.

- हेमचंद्राच्या श्रावकत्वावर हरिषेणाचा भर नाही. त्यामुळे त्याने अचानक शेवटी जैन दीक्षा घेणे तर्कसंगत वाटत नाही. श्वेतांबरांनी तीन–चार कथांमधून चाणक्याचे 'श्रावकत्व' पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.
- 'चाणक्य' हे नाव सोडून हरिषेण एकदाही त्याला 'विष्णुगुप्त' अगर 'कौटिल्य' म्हणत नाही. त्याची कुटिलता, वक्रता, निष्ठुरता इत्यादि दुर्गुण हरिषेण सांगत नाही.
- दिगंबर परंपरेत बाराव्या शतकानंतर चाणक्याचे दुर्गुण सांगण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसते. आपण पूर्वीच हे नमूद केले आहे की, सातव्या–आठव्या शतकानंतर हिंदू परंपरेत चाणक्याची आदरणीयता धर्मशास्त्रकारांच्या प्रभावाने ढासळू लागलेली होती.
- आवश्यक आणि निशीथचूर्णीतील, चाणक्याच्या जीवनाविषयीचे अनेक छोटे प्रसंग हरिषेणाने विचारात घेतलेले दिसत नाहीत. त्याची तीन प्रमुख कारणे सांगता येतील —

  **i)** श्वेतांबरांनी रंगविलेले हे प्रसंग त्याला काल्पनिक आणि कृत्रिम वाटले असतील.

  **ii)** सांप्रदायिक अभिनिवेशामुळे श्वेतांबर संदर्भांकडे त्याने मुद्दाम दुर्लक्ष केले असेल. कारण दिगंबरांनी अर्धमागधी श्वेतांबर साहित्याला प्रमाणित मानलेले नाही.

  **iii)** श्वेतांबरांनी मान्य केलेले चाणक्य–चंद्रगुप्तांमधील गुरु–शिष्य नाते, हरिषेण मान्य करीत नाही. मुळातच चंद्रगुप्ताला तो 'मौर्य' असे एकदाही म्हणत

नाही. त्याऐवजी 'स नर:' असा ओझरता उल्लेख करतो. त्यामुळेच असेही वाटते की, हा चंद्रगुप्त कोणी वेगळाच असावा.

- हरिषेणाच्या बृहत्कथाकोषात १३१ वे कथानक भद्रबाहूंविषयी आहे. हरिषेणाने केलेल्या सर्व उल्लेखांवरून एकंदरीत असे दिसते की हे 'भद्रबाहु' छेदसूत्रकार भद्रबाहु नसून निर्युक्तिकार भद्रबाहु असावेत. तसेच हरिषेणाचा चंद्रगुप्त हा मौर्यवंशीय नसून, गुप्तवंशीय असावा. या चंद्रगुप्ताची दीक्षा, त्याचे 'विशाखाचार्य' हे नाव आणि दक्षिणापथास गमन— या गोष्टी हा चंद्रगुप्त वेगळा मानला तरच जुळतात. हरिषेणाचा चाणक्य श्वेतांबर चाणक्याशी जुळणारा नसून, जास्त करून स्कंदपुराण आणि मत्स्यपुराणातील 'राजर्षि' चाणक्य आहे.
- हरिषेणाचा चाणक्य स्वत:च अनेक वर्षे राज्य करून, एका व्यक्तीकडे राज्य सोपवून, मुनिदीक्षा घेऊन, दक्षिणेस जाऊन, समाधिमरण स्वीकारतो.
- हरिषेणाने कोठेही नमूद केलेले नाही की, या चाणक्याने राजनीतीवरील ग्रंथ लिहिला. वस्तुत: त्रिलोकप्रज्ञप्ति या ग्रंथात, कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा उल्लेख 'मूढ लौकिक शास्त्रांमध्ये' केला आहे. हरिषेणाने स्वत:च्या चाणक्यचरित्रासाठी हा उल्लेख ग्राह्य मानलेला नाही. याचाच अर्थ असा की, हरिषेणाचा चाणक्य बहुधा चंद्रगुप्त मौर्याच्या अमात्य चाणक्य ऊर्फ कौटिल्यापेक्षा वेगळा असावा.
- श्वेतांबर ग्रंथात चाणक्याला पारिणामिकी बुद्धीचे उदाहरण म्हणून मुख्यत: प्रस्तुत केले आहे. हरिषेणानेही अनेकदा चाणक्याच्या बुद्धिमत्तेचा, चातुर्याचा आणि शहाणपणाचा उल्लेख केला आहे. परंतु चतुर्विध बुद्धींपैकी 'पारिणामिकी बुद्धीच्या' संदर्भात, हरिषेणाने चाणक्याला प्रस्तुत केलेले नाही. याचे कारण असे की,

दिगंबर संप्रयादातील ज्ञानमीमांसेत चतुर्विध बुद्धींचे प्रारूप मांडलेले दिसत नाही.

- हरिषेणाचा चाणक्य, वेदविद्यापारंगत ब्राह्मण असला तरी तो स्वत: शूर क्रांतिकारक, अश्वारोहणात प्रवीण, राजनैतिक द्रष्टा आणि अतिशय कुशल प्रशासक होता– – अशी प्रतिमा हरिषेणाने निर्माण केली आहे. हरिषेणाने चाणक्याला 'राजर्षि' पदवी दिली आहे तर श्वेतांबरांच्या दृष्टीने तो बिंबांतरित राजा आहे. एकंदरीत हरिषेणाने रंगविलेले विविधांगी कर्तृत्व श्वेतांबरांच्या चाणक्याला जोडले तर त्याचे अधिकच यथार्थ चित्रण समोर येते. चाणक्याच्या उदात्त समाधिमरणाची स्तुती मात्र दोन्ही संप्रदायांनी एकमुखाने केली आहे.

(५) **सोमदेवाचा नीतिवाक्यामृत** हा ग्रंथ म्हणजे जैन परंपरेतील कौटिलीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा जणू परिपाकच होय. इसवी सनाच्या दहाव्या शतकात दिगंबर आचार्य सोमदेवांनी सूत्रबद्ध संस्कृतात लिहिलेला हा ग्रंथ म्हणजे जणू काही कौटिलीय अर्थशास्त्राच्या विस्तृत दालनाचे प्रवेशद्वारच होय. कौटिलीय अर्थशास्त्राची पुढील काळात जी अनेक संस्करणे तयार झाली त्यातील अत्यंत विद्वत्प्रिय असे संस्करण म्हणजे सोमदेवाचे नीतिवाक्यामृत होय. कौटिल्याचे अभ्यासक आर्. श्यामशास्त्री लिहितात,

**'सोमदेवसूरिणा नीतिवाक्यामृतं नाम नीतिशास्त्रं विरचितं तदपि कामन्दकीयमिव कौटिलीयार्थशास्त्रादेव संक्षिप्य संगृहीतमिति तद्ग्रन्थपदवाक्यशैलीपरीक्षायां निस्संशयं ज्ञायते ।'**

(नीतिवाक्यामृत, प्रस्तावना – पं.नाथूराम प्रेमी, पृ.५)

कौटिलीय अर्थशास्त्राच्या परंपरेतील हा महत्त्वाचा ग्रंथ सोप्या भाषेत लिहून, सोमदेवांनी कौटिल्य अर्थात् चाणक्याचा केलेला गौरव, हा आजही जैनांनी जपलेल्या

चाणक्यविषयक आदरभावाचा सर्वोच्च मानबिंदू आहे.

नीतिवाक्यामृत हा ग्रंथ कौटिलीय अर्थशास्त्राचे संक्षिप्त संस्करण असूनही, हे अतिशय लक्षणीय आहे की त्याने कौटिल्याचे अक्षरश: अनुसरण केलेले नाही तसेच जैनीकरणही कटाक्षाने टाळले आहे. कौटिल्याची जी सोपी अर्थवाही आणि सर्वसमावेशक सूत्रे आहेत ती सोमदेवाने आवश्यकतेनुसार जशीच्या तशी घेतली आहेत. परंतु क्लिष्टता आणि दुर्बोधता टाळली आहे. दोन्ही ग्रंथात समानतेने आढळणारी काही सूत्रे जिज्ञासू वाचकांनी नाथूराम प्रेमींच्या प्रस्तावनेतून अवश्य पाहावी (प्रस्तावना, पृ.६-७)

नीतिवाक्यामृताचा प्रारंभच सोमदेवांच्या क्रांतदर्शी प्रतिभेचे द्योतक आहे. कोणत्याही देवदेवतांना अगर धर्मनायकांना वंदन करण्याऐवजी, सोमदेव राष्ट्रवंदन करून म्हणतात, **'अथ धर्मार्थकामफलाय राज्याय नम: ।'** जैन मुनी असूनही त्यांनी कौटिल्याला अनुसरून धर्म,अर्थ आणि काम या तीन लौकिक पुरुषार्थावर तीन स्वतंत्र प्रकरणे लिहिली आहेत. जैनांची समता आणि अहिंसा ही दोन तत्त्वे सूत्रात कौशल्याने गुंफून, त्यांना सर्वसमावेशक नीतिमूल्यांचा दर्जा प्राप्त करून देतात. ते अतिशय सहजपणे लिहून जातात, 'सर्वसत्त्वेषु हि समता सर्वाचरणानां परमाचरणं ।'

कौटिल्याचे अनुसरण करून, सोमदेवाने जरी स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश इत्यादींवर प्रकरणे लिहिली असली तरी त्याची स्वतंत्र बुद्धिमत्ता आणि समभाव 'दिवसानुष्ठान', 'सदाचार' आणि 'व्यवहार' या तीन प्रकरणातून विशेषच व्यक्त होतो. खुद्द नीतिवाक्यामृतात आणि त्याच्या टीकेत, चाणक्याच्या व्यक्तिमत्वाविषयी काय माहिती मिळते, हा प्रस्तुतचा मुख्य विषय असल्यामुळे सोमदेवाच्या चाणक्यावरील काही निरीक्षणे आपण पाहू.

- सोमदेवाने अथवा त्याच्या टीकाकाराने आरंभी चाणक्य अथवा कौटिल्याचा

ऋणनिर्देश केलेला नाही.

- सोमदेव आरंभीच म्हणतो की, नीतिशास्त्र आणि अर्थशास्त्र शिकण्याचा मुख्य उद्देश 'जितेंद्रियता' प्राप्त करणे हा आहे. चाणक्यही अर्थशास्त्रात वारंवार जितेंद्रियतेचा उल्लेख करतो.
- मंत्रिसमुद्देशातील तिसऱ्या सूत्रात सोमदेव म्हणतो, 'श्रेष्ठ व्यक्तीने स्थापन केलेला दगड सुद्धा देवत्वास पोहोचतो मग माणसाबद्दल काय म्हणायचे?' हे विवेचन केल्याबरोबर सोमदेवाला चाणक्य आणि चंद्रगुप्ताची आठवण येते. तो लिहितो, **'तथा चानुश्रूयते विष्णुगुप्तानुग्रहादनधिकृतोऽपि किल चन्द्रगुप्तः साम्राज्यपदमवाप** ।' (नीतिवाक्यामृत १०.३-४) या सूत्रातील 'अनुश्रूयते' हा शब्द अतिशय बोलका आहे. या शब्दावरून त्याला असे सूचित करावयाचे आहे की, चाणक्य आणि चन्द्रगुप्ताविषयीच्या अनेक आख्यायिका आणि दंतकथा समाजात प्रचलित आहेत. ही गोष्ट खरीच आहे की, सोमदेवाच्या काळापर्यंत श्वेतांबर जैनांनी त्यापैकी अनेक दंतकथा प्राकृतमध्ये लिहिलेल्या होत्या.
- नीतिवाक्यामृताचा टीकाकार चाणक्याविषयीची अधिक माहिती देतो. त्याने आवर्जून म्हटले आहे की, विष्णुगुप्त आणि चाणक्य या दोन 'एकच व्यक्ती' होत.
- नीतिवाक्यामृतातील दहाव्या समुद्देशातील चौथ्या सूत्राच्या संदर्भात टीकाकार एक श्लोक उद्धृत करतो. त्यात त्याने चंद्रगुप्ताला उद्देशून 'हीन वृहल' असे म्हटले आहे. यातील 'वृहल' शब्द शूद्रतासूचक असून, तो शब्द मुद्राराक्षसात अनेकदा वापरला आहे. टीकाकाराच्या मते, चन्द्रगुप्त हा 'मौरिककुलोत्पन्न' असून, 'मौरिक' ही एक हीन जाती आहे.
- तेराव्या समुद्देशात सोमदेव लिहितो, **'श्रूयते हि किल चाणक्यस्तीक्ष्णदूतप्रयोगेणैकं**

**नन्दं जघानेति ।**' सोमदेवाचा हा संदर्भ विशेषच मानला पाहिजे कारण त्यातून त्यावेळची, इतरत्र न नोंदविलेली वेगळीच दंतकथा सूचित केली आहे. 'चाणक्याने तीक्ष्ण दूताचा प्रयोग करून नंद राजाचा वध केला'— असा उल्लेख जैन साहित्यात इतरत्र आढळत नाही. कथासरित्सागरात नोंदवले आहे की, 'चाणक्याने शकटालाच्या घरी राहून मंत्र-तंत्र-जादूटोण्याने नंदाला मारले.'

- अमात्यासंबंधीच्या समुद्देशात म्हटले आहे की, सूडबुद्धीने आणि द्वेषाने पेटलेला अमात्य मोठेच संकट उभे करतो. यासाठी सोमदेवाने शकुनि आणि शकटालाची उदाहरणे दिली आहेत. शकटालाने नंदाविषयीच्या द्वेषभावनेने चाणक्याला शोधून, त्याच्याकडून आपला सूड पूर्ण करून घेतला, अशी कथा दिगंबर परंपरेत हरिषेणाने रूढ केली होती. बहुधा हे विधान त्या कथेच्या संदर्भातच असावे. फरक इतकाच की हरिषेणाने ही कथा शकटालाच्या ऐवजी 'कवि' नावाच्या व्यक्तीशी जोडली आहे.
- व्यवहार-समुद्देशाच्या ३८ व्या सूत्रात सोमदेव म्हणतो, '**स सुखी यस्य एक एव दारपरिग्रहः ।**' सुखी आयुष्याच्या संकल्पनेच्या संदर्भात टीकाकार, चाणक्याचा एक श्लोक उद्धृत करतो. त्यात म्हटले आहे की, 'जर घरात दोन पत्नी असल्या तर कलह माजतो. गृहस्थाजवळ जेव्हा एक पत्नी, तीन मुले, दोन नांगर चालविण्याएवढी शेती, दहा गायी आणि पाच हजार सुवर्णनाणी असतील आणि तसेच जो गृहस्थ अग्निहोत्रादि धर्मकृत्ये करीत असेल तो खराखुरा सुखी समजावा.' सुखी आयुष्याची ही कल्पना येथे चाणक्याची म्हणून सांगितली आहे. आपण तात्पर्य एवढेच घ्यावयाचे की, जणू काही चाणक्याच्या संतोषवृत्तीचेच हे द्योतक आहे. श्वेतांबर-दिगंबर दोघांनाही चाणक्याचे असेच निरासक्त, अल्पसंतुष्ट

जीवन रंगविले आहे. सर्व अधिकार असलेल्या अमात्यपदाचा गैरफायदा घेऊन, चाणक्याने कधीही वैयक्तिक धनसंपत्ती जमा केली नाही. म्हणून तर जैन परंपरेने नेहमीच त्याचा आदर केला.

जैनांनी जपलेल्या चाणक्याचा शोध घेत असताना, नीतिवाक्यामृतात प्रतिबिंबित झालेल्या चाणक्याचे स्थान अतिशय लक्षणीय आहे हे नक्की.

(६) **श्रीचंद्राचा कथाकोष (कहकोसु)** हा ग्रंथ अपभ्रंश भाषेतला असून, इसवी सनाच्या अकराव्या शतकात लिहिलेला आहे. श्रीचंद्र हा संप्रदायाने दिगंबर आहे. त्याने भगवती-आराधना ग्रंथातील काही गाथा निवडल्या. त्या गाथांमध्ये सूचित केलेल्या कथा, अपभ्रंश भाषेत विस्ताराने पद्यबद्ध केल्या. परिषह सहन करण्याबाबतची चाणक्याची कथा त्याने कथाकोषात रसाळपणे मांडली आहे. (कहकोसु पृ.५०८ ते ५१२)

श्रीचंद्र मुख्यत: आपल्या कथेसाठी हरिषेणाच्या संस्कृत कथेचाच आधार घेतो. त्यात त्याने केलेले थोडे बदल आणि श्रीचंद्राची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील —

- आरंभी श्रीचंद्राने नंदांच्या तीन मंत्र्यांचा उल्लेख केला आहे — 'कवि' (क्वचित् 'कावि'), 'सुबंधु' आणि 'शकटाल'.
- चाणक्याच्या व्यक्तिमत्वातील 'ब्राह्मणत्व' अधिक स्पष्ट केले आहे आणि 'श्रावकत्व' स्पष्ट केलेले नाही.
- चंद्रगुप्ताचा स्पष्ट उल्लेख न करणे, श्रीचंद्राला मान्य झालेले नाही. तो म्हणतो,

**ता रज्जत्थिउ नंदहो केरउ, चंदगुत्तु नामे दासेरउ ।**

**पुट्ठिहे लग्गउ तं लेप्पिणु धणु, गउ चाणक्कु णंदमारणमणु ।।** (पृ.५११)

अर्थात् श्रीचंद्राच्या मते, राज्यावर स्थित असलेल्या नंदाचा चंद्रगुप्त हा 'दासीपुत्र' होता. नंदाला मारण्याचा मनोमन निश्चय केलेल्या चाणक्याच्या पाठोपाठ (बरोबर) तो धन घेऊन निघून गेला.

येथील वर्णन 'आवश्यकचूर्णी' आणि 'हरिषेण' यांच्यापेक्षा वेगळे आहे.

- चंद्रगुप्ताचे पर्यायी नाव 'शशिगुप्त' आहे. हे श्रीचंद्राचे आणि एकंदरीत अपभ्रंश भाषेचेच वैशिष्ट्य आहे.
- हरिषेणाने चाणक्याला स्वत:लाच राजा बनविले आहे. ते श्रीचंद्राला मान्य नाही. श्वेतांबर मान्यतेनुसार तो चाणक्याला 'अमात्य'च म्हणतो. श्रीचंद्राचा चाणक्य चंद्रगुप्ताला राजा बनवितो.
- चाणक्याच्या अर्थशास्त्राचा आणि कडक शिस्तीचा साक्षात् उल्लेख नसला तरी त्याचे यातील कौशल्य स्पष्ट करण्यासाठी श्रीचंद्र म्हणतो,

**अप्पणु पडिगाहिउ मंतित्तणु चिंतिउ देसु कोसु सुहि परियणु ।** (पृ.५११)

अर्थात् चाणक्याने स्वत: मंत्रीपद स्वीकारले आणि देशाची, कोषाची आणि हेर, दूत इत्यादि राजपरिवाराची खूप चिंता केली.

- सुबंधूच्या मनात चाणक्याविषयी असलेला द्वेषभाव आणि शत्रुत्व खूप रंगविले आहे.
- चाणक्याच्या मृत्यूला 'समाधिमरण' म्हटले आहे. त्याचे 'साधुत्व' आणि 'पश्चात्ताप' याचे वर्णन विस्ताराने करूनही, श्रीचंद्राने त्याला सिद्धिगतीला पोहोचविलेले नाही. तर त्याला 'सर्वार्थसिद्ध' स्वर्गात स्थान दिले आहे. श्रीचंद्राच्या मनात असलेले चाणक्याचे गौरवास्पद स्थान तो पुढील शब्दात प्रकट करतो –

–

**धीरधीरु गुरुगुणहिँ गुरुक्कउ , गउ सव्वट्ठहो मुणि चाणक्कउ ।** **(पृ.५१२)**

एकंदरीत, हरिषेणापेक्षा श्रीचंद्राचे चाणक्यचरित्र अधिक पटणारे आणि तर्कसंगत आहे. त्याने काही–काही श्वेतांबर संदर्भ आपल्या चरित्रात समाविष्ट करून घेतलेले दिसतात. मात्र चाणक्याच्या जन्मापासूनचा इत्थंभूत वृत्तांत त्याने रंगविलेला नाही.

**(७)** **मूलाचार** या ग्रंथावरील **टीका वसुनन्दि/वसुदेवनन्दि** याने इसवी सनाच्या अकराव्या शतकात शैलीदार संस्कृतात लिहिलेली आहे. मूलाचाराच्या २५७ व्या गाथेवर त्याने लौकिक श्रुताची निंदा करणारा खूप मोठा परिच्छेद लिहिला आहे. दुसऱ्या धर्मसंप्रदायांना 'मिथ्यात्व' आणि 'पाखंड' असे संबोधून चाणक्याच्या ग्रंथावर, अनेक गैरसमजुतींच्या आधारे टीकेची झोड उठविली आहे, ती अशी –

–

''कुटिलतेचा भाव म्हणजे कौटिल्य. कुटिलता हेच ज्याचे प्रयोजन आहे त्यास 'कौटिल्यधर्म' म्हणावे. त्यातील सर्व व्यवहार लोकांना ठकविणारे आणि लोकांशी प्रतारणा करणारे असतात. नगराची सुरक्षा करताना त्यामध्ये नगराचे रक्षक म्हणविणारे लोक छेदन–भेदन–ताडन–त्रासन–उत्पाटन आणि मारण हे सर्व उपाय वापरतात. अथवा कौटिल्यधर्म म्हणजे पुत्र–बंधु–मित्र–पितृ–मातृ–स्वामी या सर्वांचा घात करण्याचा उपदेश. तसेच चाणक्याने जीवनाच्या सुरक्षेसाठी मद्यमांसादि खाण्याचा उपदेश केला आहे. ––– अशा अनेक प्रकारांनी जे दुराचरणाचा उपदेश करतात त्यामुळे ऐकणाऱ्यांवर तसेच दुष्परिणाम होतात. हीच ती 'लौकिक मूढता' होय.''

- कौटिल्यशास्त्र आणि आसुरक्ष (? आयुर्वेदशास्त्र) या दोघांची केलेली यथेच्छ निंदा संपूर्ण जैन साहित्यात ही एकमेव आहे. चाणक्याचा इतका उघड निषेध अन्य कोणीही केलेला नाही. जैन साधुवर्गात चाणक्याकडे पाहाण्याचा असाही दृष्टिकोण होता — याचे दिग्दर्शन या परिच्छेदामध्ये होते.
- कौटिल्य आणि चाणक्य हे 'एकच' आहेत हे येथे स्पष्ट होते.
- राजनीतिशास्त्र (अर्थशास्त्र) आणि आयुर्वेद हे दोन्ही जवळजवळ एकच मानून ही टीका केली आहे. कौटिलीय अर्थशास्त्रातील आयुर्वेदविषयक भागाने कदाचित् त्याचे लक्ष वेधून घेतले असेल.
- धर्म-अर्थ-काम या त्रिवर्गांना महत्त्व देऊन, मोक्षाकडे दुर्लक्ष केल्यामुळे वसुनन्दीला चाणक्याचे प्रतिपादन आवडले नसेल. कारण जैन परंपरा संपूर्ण मोक्षलक्ष्यी आणि अहिंसाप्रधान आहे. कडक शासन आणि कठोर क्रूर शिक्षा मान्य नसल्यामुळे वसुनन्दीने अहिंसेच्या दृष्टिकोणातून त्यांना गर्हणीय मानले असावे.
- चाणक्यासंबंधी लिहिताना अनेक श्वेतांबर-दिगंबर पूर्वसूरींनी चाणक्याविषयी व्यक्त केलेला आदरभाव वसुनन्दीने पूर्ण नजरेआड केला आहे. चाणक्याची बुद्धिमत्ता, निरासक्त वृत्ती, सहनशीलता आणि स्वेच्छामरण — या सर्व गोष्टींची दखलही वसुनन्दि घेत नाही.

(८) **सिद्धांतचक्रवर्ती नेमिचंद्रांचा गोम्मटसार** हा सुप्रसिद्ध ग्रंथ जैन शौरसेनीत असून, तो इसवी सनाच्या अकराव्या शतकात लिहिलेला आहे. हे आचार्य दिगंबरसंप्रदायी असून, कर्नाटकातील 'गंग' राजवंशाशी, 'श्रवणबेळगोळ' या सुप्रसिद्ध स्थानाशी आणि 'चामुंडराय' या अमात्याशी जवळून निगडित होते. मूलाचारातील २५७ वी गाथा त्यांनी पहिला शब्द बदलून, जशीच्या तशी उद्धृत

केली आहे. कौटिल्याचा उल्लेख आणि राजनीतीची निंदा ग्रंथकाराने आणि टीकाकाराने संपूर्ण गाळली आहे. रामायण–महाभारतादि ग्रंथांना नेमिचंद्र 'श्रुत–अज्ञान' म्हणतो. परंतु त्या यादीत कौटिलीय अर्थशास्त्राची गणना करीत नाही. वर सांगितल्याप्रमाणे राजा–अमात्य या सर्वांशी संबंधित असल्यामुळे त्याला ही जाणीव असावी की, राजनैतिक व्यवहारामध्ये सुशासनासाठी अनेक कठोर उपाय अवलंबावेच लागतात. 'गंग' वंशाचे साम्राज्य त्या काळात खूप विस्तारलेले होते. या सर्व बाबी ध्यानी घेऊन, त्याने चाणक्याचा उल्लेख आणि त्यावरील कठोर टीका दोन्हीही हेतुपुरस्सर टाळलेले दिसते.

(९) **पुण्याश्रवकथाकोष** हा दिगंबर परंपरेतील संस्कृत ग्रंथ **रामचंद्र मुमुक्षूने,** इसवी सनाच्या बाराव्या शतकात लिहिलेला आहे. उपवासाच्या फलाचे वर्णन करण्यासाठी त्याने 'भद्रबाहु–चाणक्य–चंद्रगुप्त–कथा' ही ३८ वी कथा लिहिलेली आहे.

या गद्य कथेत शकटाल आणि चाणक्य यांचा वृत्तांत संक्षेपाने दिला आहे. नंदाच्या नाशासाठी शकटालानेच चाणक्यद्विजाची निवड केली, असे म्हटले आहे. नंदाच्या भोजनशाळेतील चाणक्याच्या अपमानाचा वृत्तांत संक्षेपाने दिला आहे.

लेखकाच्या मते, चंद्रगुप्त हा 'क्षत्रिय' आहे. चाणक्य आणि चंद्रगुप्ताने एकत्रित येऊन, प्रत्यंतवासी राजाच्या मदतीने नंदाचा नाश केला. चाणक्याने चंद्रगुप्ताला पाटलिपुत्राचा राजा बनविले, असे स्पष्ट म्हटले आहे.

प्रस्तुत कथेत, चाणक्याचे चरित्र अतिशय दुय्यम प्रकारे रंगविले आहे. कारण भद्रबाहु आणि राजा संप्रति यांचे वर्णन करणे, हा लेखकाचा मुख्य हेतू आहे.

'रइधू' या अपभ्रंश कवीने रामचंद्र मुमुक्षूची ही कथा आधारभूत मानून, त्याला 'कल्कि' राजांच्या कथानकाची जोड दिली आहे.

(१०) **प्रभाचंद्राचा आराधनाकथाप्रबन्ध** हा संस्कृत ग्रंथ इसवी सनाच्या तेराव्या शतकातील आहे. हा कथाकोषही भगवती-आराधना ग्रंथातील कथांवरच आधारित आहे. यातील ८० वी कथा चाणक्य-सुबंधूच्या वृत्तांतावर आधारित असून, चाणक्याच्या मरणाचे वर्णन 'प्रायोपगत मरण' असे केले आहे. हरिषेणाला आधारभूत मानूनच, प्रभाचंद्राने चाणक्यचरित्र गद्य संस्कृतात लिहिले आहे.

कवीचा उल्लेख सतत 'कावि' असा केला आहे. हरिषेणाप्रमाणेच याने 'चंद्रगुप्त' या नावाचा उल्लेख एकदाही केलेला नाही. चाणक्य स्वत:च नंदाला मारतो व दीर्घकाळ राज्यभोग घेतो, असे चित्रित केले आहे.

आराधनाकथाप्रबंधात अजूनही एकदा चाणक्याचा उल्लेख येतो. श्वेतांबरांनी वारंवार उल्लेख केलेले दुर्लभ मनुष्यत्वाचे दहा दृष्टांत, प्रभाचंद्राने या ग्रंथात वर्णित केले आहेत. श्वेतांबर साहित्यात, पाशकदृष्टांत चाणक्याच्या संदर्भात सांगितला आहे. परंतु येथे तीच कथा 'शिवशर्मा' नावाच्या वेगळ्याच ब्राह्मणाच्या नावावर सांगितली आहे. एक प्रकारे, चाणक्याचा ब्राह्मणत्वावर केलेले हे शिक्कामोर्तबच म्हणावे लागेल.

एकंदरीत, प्रभाचंद्राने हरिषेणापेक्षा फारसे काहीच वेगळे सांगितले नाही.

(११) **रइधूचे भद्रबाहु-चाणक्य-चंद्रगुप्त-कथानक** ही २८ कडवकांची एक छोटी सलग कविता आहे. हे लघुकाव्य इसवी सनाच्या चौदा-पंधराव्या शतकात लिहिलेले आहे.

२८ कडवकांपैकी दोन कडवकांमध्ये शकटाल-चाणक्य आणि

चंद्रगुप्ताची कथा संक्षेपाने नोंदविली आहे. चाणक्याचे संपूर्ण चरित्र रंगविणे, हे रइधूचे प्रयोजन नाही.

कुश गवत खोदण्याच्या निमित्ताने शकटाल आणि चाणक्याचा परिचय होतो. शकटालाच्या विनंतीवरून चाणक्य, नंदाच्या भोजनशाळेत सुवर्णाच्या आसनावर बसून, चाणक्य रोज भोजन घेऊ लागतो. एका विशिष्ट दिवशी शकटाल मुद्दामच सोन्याचे आसन बदलून, त्या जागी चटईचा तुकडा टाकतो. हे सर्व नंदाच्या आज्ञेने घडले, असे भासवतो. चाणक्याचा अपमान होतो आणि नंदाला उखडून टाकण्याची प्रतिज्ञा करतो. चाणक्य आणि चंद्रगुप्त पर्वतकाच्या साह्याने नंदाचा उच्छेद करतात. चाणक्य चंद्रगुप्ताला राज्याभिषेक करतो.

नंदाच्या भोजनशाळेतला प्रसंग येथे थोड्या वेगळ्या पद्धतीने सांगितलेला दिसतो. तसेच 'पाटलिपुत्र' या नावाऐवजी या कथानकात 'पाटलिपुर' या नावाचा उपयोग केलेला दिसतो.

(१२) **देवाचार्यकृत चाणक्यर्षिकथा** नावाच्या हस्तलिखिताचा उल्लेख प्रो.एच्.डी.वेलणकर योच्या जिनरत्नकोश या पुस्तकात आढळतो. जैन हस्तलिखितांची माहिती देणारा हा कॅटलॉग भांडारकर प्राच्यविद्या संस्थेने प्रकाशित केलेला आहे. या शीर्षकाचे हे एकमेव हस्तलिखित असून अद्याप प्रकाशित झालेले नाही. कॅटलॉगमध्ये विशेष तपशील दिलेला नसला तरी असा अंदाज करता येतो की बहुधा 'देवाचार्य' नावाच्या दिगंबर आचार्यांनी हरिषेणाच्या चाणक्यमुनिकथेवर आधारित असे हे चरित्र संस्कृतात लिहिलेले असावे. हस्तलिखित समक्ष पाहिले नसल्याने त्याविषयी अधिक भाष्य करणे उचित वाटत नाही.

(१३) **पंडित दौलतराम काशलीवाल** यांनी इसवी सनाच्या सोळाव्या शतकात,

अपभ्रंशाने प्रभावित अशा जुन्या हिंदीत **पुण्याश्रवकथाकोषावर** एक **टीकाग्रंथ** लिहिलेला आहे. खरे तर, संस्कृत पुण्याश्रवकथाकोषाचे हे प्राचीन हिंदीतील रूपांतर आहे. यात चाणक्याची कथा पृ.१५५ ते १५७ यामध्ये दिली आहे.

उपरोक्त कथेत वस्तुत: कोणतेही वेगळेपण नाही. परंतु दिगंबर परंपरेत इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या सोळाव्या शतकापर्यंत सातत्याने चाणक्यासंबंधी लेखन होत राहिले–ही गोष्ट यावरून सिद्ध होते.

◆◆◆

# कथाबाह्य संदर्भ

## प्रकरण ५

# अर्थशास्त्राच्या गवाक्षातून जैन साहित्य

# प्रकरण ५

# अर्थशास्त्राच्या गवाक्षातून जैन साहित्य

**प्रस्तावना**

कौटिलीय अर्थशास्त्राचा अभ्यास, देशाविदेशातील विद्वानांनी अनेक अंगांनी केला. जगातील सर्व प्रमुख भाषांमध्ये, त्याचे अनुवादही प्रसिद्ध आहेत. प्राचीन भारतीयांच्या ज्ञानप्रकर्ष दाखविणाऱ्या अनेक शास्त्रीय ग्रंथांमध्ये, कौटिलीय अर्थशास्त्राचे स्थान अग्रगण्य आहे. या ग्रंथाची महत्ता इतकी निर्विवाद आहे की, त्याची अधिक स्तुती करण्याची, अजिबात आवश्यकता नाही.

जैन साहित्यातील चाणक्याचा, खोलवर शोध घेत असताना, कौटिलीय अर्थशास्त्राशी त्याचे असलेले नाते, एखाद्या चित्रपटासारखे, डोळ्यासमोर हळूहळू उलगडत गेले. अशी आवश्यकता वाटू लागली की, कौटिलीय अर्थशास्त्रातील अनेक तपशिलांचा,

जैन साहित्याच्या संदर्भात पुनर्विचार करावा. अर्थशास्त्राच्या गवाक्षातून जैन साहित्याकडे बघत असताना, प्रमुख पाच मुद्दे नजरेसमोर आले. प्रस्तुत प्रकरणात त्यांचा क्रमाक्रमाने विचार केला आहे.

## अ) जैन साहित्यिकांनी अर्थशास्त्रातून घेतलेली कथाबीजे

आत्तापर्यंत आपण जैन साहित्यातील, चाणक्यविषयक कथांचा अनुवाद केला, परीक्षण केले आणि तुलनाही प्रस्तुत केली. येथे चाणक्यकथांचा कौटिलीय अर्थशास्त्राशी असलेला धागा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रथमदर्शनी हे नमूद केले पाहिजे की, कौटिल्याने अर्थशास्त्रात स्वत:च अनेक ठिकाणी, पारंपरिक ऐतिहासिक आख्यायिका, संक्षेपाने नोंदवून ठेवल्या आहेत. ही त्याची शैली ६ व्या, २० व्या आणि ९५ व्या अध्यायांमध्ये दिसून येते. ६ व्या अध्यायात अशा बारा व्यक्तींची नावे नमूद केली आहेत की ज्यांनी स्वत:च्या इंद्रियांवर ताबा नसल्यामुळे, स्वत:चा विनाश करून घेतला. २० व्या अध्यायात सांगितले आहे की, 'राणीच्या महालाची काळजीपूर्वक तपासणी केल्याशिवाय, खुद्द राजाने देखील तेथे प्रवेश करू नये.' भद्रसेन इ. सात राजांची उदाहरणे तेथे दिली आहेत की, ज्यांना त्यांच्या राण्यांनी घातपाताने ठार मारले. ९५ व्या अध्यायात राजाशी संबंधित अशा, सहा व्यक्तींच्या कथा एकेका ओळीत दिल्या आहेत, की ज्यांनी अतिशय छोट्याशा गोष्टीवरून, योग्य ती सूचना घेतली आणि राजाची खप्पामर्जी झाल्याचे ओळखून, वेळेवरच राज्यत्याग केला.

निर्युक्तिकार भद्रबाहूंनी इसवी सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकात, जैन परंपरेत अशाच प्रकारची शैली विकसित केलेली दिसते. आपल्या निर्युक्तींमध्ये त्यांनी अतिशय संक्षेपाने, पारंपरिक कथा नोंदविलेल्या दिसतात. पारिणामिकी बुद्धीची उदाहरणे आवश्यक

निर्युक्तीत नोंदविलेली आहेत आणि त्यामध्ये मुख्यत: चाणक्याच्याच कथा येतात. (आवश्यक निर्युक्ति क्र.५१, पृ.९३). पिण्डनिर्युक्तीच्या ५०० व्या गाथेतील उदाहरणामध्येही पुन्हा चाणक्याची गणना केली आहे. नंदीसूत्रातील ७४ व्या गाथेत पारिणामिकी बुद्धीची बारा उदाहरणे दिली आहेत. अर्थात् त्यात चाणक्य येतोच. आख्यायिका सूचित करणाऱ्या द्वारगाथा देण्याची परंपरा, नंतरच्या जैन साहित्यिकांनी सुरू ठेवली. उपदेशपद, उपदेशमाला, धर्मोपदेशमाला, आख्यानमणिकोश इ. अनेक कथासंग्रहांमध्ये द्वारगाथांत कथांचे सूचन येते. अर्थशास्त्र आणि जैन साहित्यात, हे शैलीगत साम्य असले तरी, एक निरीक्षण नोंदविणे आवश्यक आहे. चाणक्याने नमूद केलेल्या व्यक्तिरेखांच्या कथा, हिंदू परंपरेत आणि जैन साहित्यातही जवळजवळ आढळतच नाहीत.

जैन साहित्यातील चाणक्यकथा ह्या, कौटिलीय अर्थशास्त्रात व्यक्त केलेल्या आशयाशी, निकटचा संबंध ठेवून आहेत. असे जाणवते की, जैन साहित्यिकांनी कौटिलीय अर्थशास्त्राचा अभ्यास करून, त्यातून उत्कृष्ट अशी मिथके आणि कथाबीजे निवडली. शैलीदार कल्पनारम्यतेची जोड देऊन त्यातून अनेक कथा, उपकथा, आख्यायिका, दंतकथा, दृष्टांत इ.ची निर्मिती केली. या दृष्टीने कौटिलीय अर्थशास्त्राचा संपूर्ण शोध घेणे —हे एका मोठ्या संशोधन-प्रकल्पाचे काम आहे. प्रस्तुत ठिकाणी काही जैनकथांचा अर्थशास्त्रीय धागा, नमुन्यादाखल सांगितला आहे.

(१) अर्थशास्त्राच्या २३ व्या अध्यायात हत्तींसाठी संरक्षित वनक्षेत्रे जपण्याविषयी आणि त्यांचे संवर्धन करण्याविषयी, महत्त्वपूर्ण तपशील दिला आहे. कौटिल्य म्हणतो, ‘‘नर हत्तींचा माग काढायचा असेल तर, त्याबाबत मादी हत्तिणी अतिशय उपयुक्त ठरतात. हत्तींच्या मार्गावर आणि आजूबाजूच्या झुडपांना,

हत्तींच्या मूत्राचे सिंचन झाले असेल तर, हत्तीण त्याचा मार्ग काढू शकते.''

अभयकुमाराच्या कथेत आम्रदेवसूरींनी, हेच कथाबीज थोडा बदल करून वापरले आहे. जेव्हा उदयन हा राजा प्रद्योताच्या 'नलगिरि' नावाच्या हत्तीचे अपहरण करतो, तेव्हा अर्थशास्त्रातील हीच पद्धत वापरतो. उदयन हा नलगिरि हत्तीच्या मूत्राने, चार घडे भरून घेतो. विशिष्ट-विशिष्ट अंतराने ते खाली पाडत जातो. 'भद्रावती' नावाची हत्तीण, त्याचा वास घेत, त्याचा पाठलाग करते. याच युक्तीचा वापर करून उदयन आणि वासवदत्ता अवंतीपासून कौशांबीपर्यंतचा प्रवास पूर्ण करतात. अभयाख्यानात म्हटले आहे की —

**उस्सिंघइ जाव तयं हत्थी ता हत्थिणी पवणवेगा ।**
**पणुवीसजोयणाइं गया पुणो नलगिरी पत्तो ।।**
**तो अवरा मुत्तघडीउ तप्पुरो पाडियाओ जा तिन्नि ।**
**ता संपत्तो कोसंबिनियपुरिं उदयणनरिंदो ।।**

(आख्यानमणिकोश, अभयाख्यान, गाथा २४३-२४४, पृ.१६)

**(२)** अर्थशास्त्राच्या ३० व्या अध्यायात, वित्ताधिकाऱ्यांची परीक्षा कशी घ्यावी, ते सांगितले आहे. तेथे तीन प्रकारचे अधिकारी वर्णिले आहेत. 'मूलहर' या प्रकारचा अधिकारी सर्व पूर्वार्जित संपत्तीचे भक्षण करतो. 'तादात्विक' अधिकारी फक्त भांडवल सुरक्षित ठेवतो. त्यावरील लाभाचे भक्षण करतो. 'कदर्य' नावाचा अधिकारी स्वत:वर आणि दुसऱ्यावर खूप बंधने घालून कंजूषपणाने खूप पैसा साठवितो.

हे कथाबीज अर्धमागधी ग्रंथांमध्ये, मूलसूत्र म्हणून गणल्या गेलेल्या उत्तराध्ययनात, जवळजवळ जसेच्या तसे येते. त्याचा संदर्भ आणि तात्पर्य थोडे

वेगळे आहे. तीन व्यापारी, भांडवल घेऊन, व्यापारासाठी निघतात. एकाला त्यावर लाभ होतो. दुसरा फक्त मूळ भांडवलासकट परत येतो. तिसरा मूळ भांडवलसुद्धा गमावून परत येतो. व्यवहारातील ही उपमा, चार गतींना लावून दाखविली आहे. थोडक्यात म्हटले आहे की, 'मनुष्यजन्म हे मूळ भांडवल आहे. देवगतीची प्राप्ती हा लाभ आहे. मूलच्छेद केलेल्या जीवांना नक्कीच नरक-तिर्यंचगती प्राप्त होते.'

**जहा य तिण्णि वणिया , मूलं घेत्तूण निग्गया ।**
**एगोऽत्थ लभई लाभं , एगो मूलेण आगओ ।।**
**एगो मूलं पि हारेत्ता , आगओ तत्थ वणिओ ।**
**ववहारे उवमा एसा , एवं धम्मे वियाणह ।।**
**माणुसत्तं भवे मूलं , लाभो देवगई भवे ।**
**मूलच्छेएण जीवाणं , नरग-तिरिक्खत्तणं धुवं ।।**

(उत्तराध्ययन ७.१४,१५,१६)

उत्तराध्ययनाच्या 'सुखबोधा' टीकेत ही कथा, अतिशय चांगल्या प्रकारे रंगवून सांगितली आहे.

**(३)** अर्थशास्त्राचा ४८ वा अध्याय हा, गणिका आणि वेश्या यांच्याशी संबंधित आहे. गणिकाध्यक्ष, गणिकांचे मूल्य, गणिकांनी सरकारी तिजोरीत भरावयाचा कर इ. सर्वांची विस्तृत माहिती त्यात आहे. अध्यायाच्या शेवटी कौटिल्याने, गणिकांकडून अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की, अत्यंत महत्त्वाच्या राजकीय पेचप्रसंगी, गणिकांनी हेरगिरीचे काम करावे.

अभयाख्यानात चंडप्रद्योत आणि अभयकुमार दोघेही, एकमेकांच्या

अपहरणासाठी गणिकांचा वापर करतात. अभयाख्यानाच्या १९२ व्या गाथेत गणिका चंडप्रद्योताला म्हणते —

**तं निसुणिऊण विन्नवइ नरवइं चमरहारिणी गणिया ।**

**आइससु देवं ! मं झत्ति जेण बंधिय तमाणे हं ।।**

(ते ऐकून राजाची चमरधारिणी गणिका म्हणाली की, 'देव ! मला आज्ञा द्या. मी त्याला चटकन बांधून आणते.')

२६० व्या गाथेत असे म्हटले आहे की, अभयकुमार हा चंडप्रद्योताच्या अपहरणासाठी दोन गणिकांना घेऊन गेला. राजद्वारात दुकान खरेदी करून आणि त्या बहिणी असल्याचे भासवून, तो चंडप्रद्योताला पळविण्याच्या संधीची वाट पाहू लागला.

**गणियाओ दोन्नि घेत्तूण सा गओ नयरिमुज्जेणिं ।**

**गुडियकयावररूवो रायदुवारम्मि आवणं घेत्तुं ।**

**पारद्धो ववहरिउं अभओ अह अन्नदिवसम्मि ।।**

(आख्यानमणिकोश, अभयाख्यान, गाथा २६०-२६१, पृ.१६)

या कथेत शेवट असे रंगविले आहे की, अभयाने 'प्रद्योत' राजाला, प्रद्योत नावाच्याच एका नोकराच्या सहाय्याने पळविले. त्या नोकराने वेड लागल्याचे सोंग केले होते. हेच कथाबीज अर्थशास्त्राच्या १२ व्या अध्यायात नमूद केले आहे.

गणिकांविषयीची अधिक चर्चा याच प्रकरणात पुढे केली आहे.

**(४)** द्यूत आणि जुगारासंबंधीची नियमावली, अर्थशास्त्राच्या २२ व्या, ७७ व्या आणि ८७ व्या अध्यायात नमूद केली आहे. २२ व्या अध्यायाचा विषय आहे, 'नवीन गाव कसे वसवावे ?' त्यात सांगितले आहे की, तेथे जुगारावर पूर्ण बंदी

असावी. ७७ वा अध्याय पूर्णपणे द्यूत, जुगार आणि इतर गुन्हे यांच्यासंबंधी लिहिलेला आहे. त्यानुसार द्यूतगृहे ही सरकारी अखत्यारीत असावीत. खाजगी जुगाराच्या अड्ड्यांना पूर्ण मनाई असावी. ८७ व्या अध्यायात मुद्दाम नमूद केले आहे की, द्यूतासाठी बनावट फासे वापरू नयेत. या गुन्ह्यासाठी कडक शिक्षेची तरतूद केलेली आहे. 'काकणी' नावाचे फासेच फक्त अधिकृत असून बाकी फाश्यांवर बंदी आहे.

अर्थार्जनासाठी द्यूताचा वापर करणे, हे कथाबीज जैन आख्यायिकांमध्ये, अतिशय लोकप्रिय आहे. आवश्यकचूर्णीत ते चाणक्याच्या पारिणामिकी बुद्धीचे उदाहरण म्हणून दिले आहे. हरिभद्राने चाणक्याच्या कूटपाशकाचे वर्णन, मनुष्यत्वाच्या दुर्लभत्वासाठी दिले आहे.

आश्चर्याची गोष्ट अशी की, जैनांनी चाणक्यालाच बनावट फासे तयार करायला लावून, त्याच्या हातूनच नियमभंग करविला आहे. किंवा त्यांच्या मनात असे असेल की, चाणक्याला स्वत:ला हा अपराध, क्षम्य मानला पाहिजे कारण त्याने राजकोश भरण्यासाठी हा उपाय वापरला, स्वत: संपत्ती मिळविण्यासाठी नाही.

(५) अर्थशास्त्राच्या ८० व्या अध्यायात राष्ट्रावरील आठ अकल्पित संकटांचा उल्लेख केलेला आहे. त्यातील शेवटचे संकट आहे, 'यक्ष-भूत-प्रेतांचा उपद्रव'. या उपद्रवावर तोडगा काढताना चाणक्य म्हणतो, ''एका विशिष्ट पवित्र दिवशी, एक स्थंडिल उभारावे. ते चैत्यवृक्षाच्या खाली असावे. सुशोभित केलेले एक छत्र त्यावर लावावे. हस्तपताकांनी ते सजवावे. दुष्ट आत्म्यांचा प्रभाव नाहीसा करण्यासाठी, त्यावर बोकडाचा बळी द्यावा. अथर्ववेदातील अभिचारमंत्रात

प्रवीण असलेल्या ब्राह्मणाकडून त्या स्थंडिलावर हे सर्व विधी करून घ्यावेत.''

आर्ष-प्राकृतातील आद्य कथाग्रंथ जो 'वसुदेवहिंडी', त्यातील एका कथेत, अर्थशास्त्रातील हे वरील वर्णन जवळ-जवळ जसेच्या तसे, प्राकृतभाषेत अनुवृत्त केलेले दिसते. अर्थात् हा जैन कथाग्रंथ असल्याने, त्या गोष्टीच्या शेवटी असे रंगविले आहे की, ज्याने या बोकडाच्या बळीची प्रथा पाडली, त्या ब्राह्मणाची मुले जैन साधूंच्या उपदेशाने अहिंसक बनतात. अर्थशास्त्रातील तपशील वापरून, अनेक प्राकृत कथांमधून जैनधर्मातील अहिंसातत्त्वाचा विशेषत्वाने पुरस्कार केलेला दिसतो.

**(६)** ४४ व्या अध्यायात, सूत तयार करण्याच्या उद्योगावर लक्ष ठेवणाऱ्या राजाच्या अधिकाऱ्याचे वर्णन येते. चाणक्य असे म्हणतो की, 'ज्यांचे पती परागंदा झालेले आहेत, अशा स्त्रिया तसेच विकलांग, वृद्ध आणि अविवाहित कुमारिका तसेच ज्या दुसरी सेवाकार्ये करण्यास समर्थ नाहीत, तसेच ज्यांना स्वत: काम करूनच उदरनिर्वाह करावा लागतो, अशा स्त्रियांना सरकारी अधिकाऱ्याने सूत कातण्याचे काम, घरी जाऊन द्यावे. या कामासाठी स्त्रियांची नेमणूक करावी. त्यांनी अशा स्त्रियांकडून, काढून घेतलेले सूत, सरकारी कारखान्यात नेऊन जमा करावे.'

सूत्रकृतांगचूर्णीत आर्द्रककुमाराची एक पारंपरिक कथा येते. किंबहुना सूत्रकृतांगात 'आर्द्रकीय' नावाचे एक अध्ययनच आहे. चूर्णीकाराने ती कथा विशद केली आहे. गुरूंनी दीक्षा देण्यास नकार दिल्यामुळे, बळजबरीने गृहस्थाश्रम स्वीकारलेल्या आर्द्रकाची पत्नी, घरी सूत कातीत बसलेली असते. तिचा छोटा मुलगा विचारतो, 'आई ! माझे बाबा जिवंत असताना, तू हे काम का करतेस ?' ती म्हणते, 'बाबा रे ! तुझे पिता लवकरच मला सोडून जाणार आहेत. पोट

भरण्यासाठी, मला उद्योग करावाच लागणार आहे. घरी सूत कातण्याचा सराव, मी त्याची पूर्वतयारी म्हणून आधीच करीत आहे.' तेवढ्यात पित्याचे आगमन होते. आईने कातलेल्या सुताचा गुंडा घेऊन, मुलगा पित्याजवळ जातो. त्यांच्याभोवती सुताचे बारा वेढे देतो. पित्याला विनंती करतो की, 'अजून बारा वर्षे थांबा. मग मी कमावता होईन. आईला सूत कातावे लागणार नाही.' पिता मुलाचा हा बालहट्ट पुरवितो.

या कथेचे उदाहरण अशासाठी दिले की, जैन लेखकांनी कथेत विणलेले अर्थशास्त्रीय धागे, त्यात स्पष्ट दिसून येतात. शिवाय जाता-जाता समकालीन सामाजिक परिस्थिती आणि स्त्रियांचे स्थान, यावरही अतिशय चिंतनशील टिप्पणी ते नोंदवून जातात.

(७) अर्थशास्त्राच्या ८७ व्या अध्यायात गुन्हे आणि तत्संबंधी शिक्षांचे विवेचन येते. हात-पाय तोडणे, इतर शरीर-अवयव तोडणे इ. शिक्षांचा त्यात विचार केला आहे. अध्यायाच्या शेवटी म्हटले आहे की, ''न्यायाधीशाने गुन्हेगारांना शिक्षा देताना तरतमभाव ठेवला पाहिजे. गुन्हे तीन प्रकारचे असतात— अतिशय क्रूर, मध्यम आणि किरकोळ. न्यायाधीशाने सरसकट शिक्षा न ठोठावता गुन्ह्याचे कारण, उद्दिष्ट, वेळ, जागा, सामाजिक स्थान आणि राजदरबारची प्रतिष्ठा हे सर्व ध्यानात घेऊन, त्यानुसार शिक्षा करावी.''

'विजयकस्तूरसूरि' या आधुनिक जैन मुनींनी 'प्राकृत-विज्ञान-कथा' नावाचा प्राकृत कथासंग्रह प्रकाशित केला आहे. त्यातील 'जारिसो माणवो तारिसी सिक्खा' या कथेत असे चित्रित केले आहे की, गुन्हा एकच असूनही

न्यायाधीशाने विवेकबुद्धी बाळगून त्यांना वेगवेगळ्या शिक्षा दिल्या. इतरही अनेक जैन कथांतून, अर्थशास्त्राच्या या ८७ व्या अध्यायातील आशय डोळ्यासमोर ठेवून, कथांची मांडणी केलेली दिसते. जैन तत्त्वज्ञानात वारंवार अधोरेखित केलेले, 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव' हे प्रारूपही, अशा प्रकारच्या गोष्टी रंगविण्यात उपयुक्त ठरलेले दिसते.

(८) अर्थशास्त्राच्या ९२ व्या अध्यायात राजकोश भरण्यासंबंधीच्या अनेक उपायांचे संकलन केलेले दिसते. हा अध्याय जैन सहित्यिकांचा अतिशय आवडता अध्याय असावा. कारण कोशसंग्रह या अध्यायातून स्फूर्ती घेऊन, आवश्यकचूर्णीपासून परिशिष्टपर्वापर्यंतच्या अनेकविध लेखकांनी, हे कथाबीज वापरून चाणक्यकथांची निर्मिती केलेली दिसते. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे 'धर्मोपदेशमालाविवरण' या ग्रंथातील कोशसंग्रहाची कथा, लेखकाने अतिशय आकर्षक स्वरूपात चित्रित केलेली दिसते.

प्रस्तुत अध्यायात कौटिल्य म्हणतो, ''आर्थिक टंचाईच्या काळात राजाने श्रीमंत नागरिकांना दानासाठी आवाहन करावे. पाखंडी लोक, श्रोत्रियांखेरीज इतरांचे देवद्रव्य, श्रीमंत विधवा, जहाजाने परदेशी प्रवास करणारे व्यापारी — या सर्वांचे द्रव्य विशिष्ट परिस्थितीत राजा हिरावून घेऊ शकतो. एखाद्या राजपुरुषाने अशा परिस्थितीत, कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब करून, श्रीमंतांना आपले द्रव्य जाहीर करण्यास भाग पाडावे. त्यातील न्याय्य रक्कम राजकोशात भरणे अनिवार्य करावे. मात्र या मार्गाचा अवलंब एकदाच करावा. वारंवार करू नये.'' (अर्थशास्त्र अध्याय ९२)

आवश्यकचूर्णीच्या २८१ व्या पृष्ठावर 'परपाषंडप्रशंसा' नावाची

एक कथा येते. त्यात असा उल्लेख आहे की, चाणक्याने विशिष्ट प्रसंगी, पाखंडी लोकांच्या उपजीविका-वृत्तीचे हरण केले. चूर्णीकाराने हे नमूद करताना, जणू काही ते अर्थशास्त्रातूनच शब्दसाम्यासकट उद्धृत केलेले दिसते. अर्थशास्त्राच्या १८ व्या अध्यायातही परपाषंडांविषयी, असाच दृष्टिकोण प्रतिबिंबित झालेला दिसतो. जैन श्रावक हे प्रामुख्याने वैश्यवर्गीय असल्यामुळे, ही कथा बहुधा त्यांना अतिशय रोचक वाटत असावी. चाणक्याच्या चरित्रात जैन साहित्यिकांनी कोश भरण्याचा वृत्तांत आवर्जून घातला आहे.

**(९)** अर्थशास्त्राच्या ९४ व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो, ''प्रज्ज्वलित झालेला अग्नी, एकवेळ शरीर अथवा शरीराचा एक भाग, जाळून टाकू शकतो परंतु क्रोधित झालेला राजा त्या व्यक्तीला, त्याच्या कुटुंबासकट अथवा गावासकट, भस्मसात् करू शकतो.''

यापूर्वीच्या प्रकरणात दिलेल्या कथाभागात, निशीथ-भाष्यातील 'ग्रामदाहाची' कथा, विस्ताराने दिली आहे. त्यात असे रंगविले आहे की, विशिष्ट कारणाने चाणक्य एक संपूर्ण गाव पेटवून देतो. आश्चर्याची गोष्टअशी की, भाष्यकाराने चाणक्याच्या क्रूरतेवर येथे कोठेही टिप्पणी केलेली नाही. तसेच आवश्यकचूर्णी आणि परिशिष्टपर्वातील नलदामाच्या कथेवरही, अर्थशास्त्राच्या वरील अध्यायाची छाया दिसते. चाणक्याच्या कडक अनुशासनाची थोरवीही गायिलेली दिसते.

**(१०)** अर्थशास्त्राच्या ८४ व्या अध्यायात, आकस्मिक मृत्यू झालेल्या व्यक्तीची, परीक्षा घेण्याचे निकष नोंदविलेले आहेत. त्याच्या पाठोपाठ गुन्हेगार व्यक्तींच्या मृत्युकार्यासंबंधीची चर्चा येते. कौटिल्य म्हणतो, ''एखाद्या व्यक्तीने, मग ती स्त्री

असो वा पुरुष, जर का आत्महत्या केली आणि त्यावेळी जर तो क्रोधाच्या, सूडाच्या आणि इतर पापभावनांनी प्रेरित असेल, शिवाय जर एखाद्याने इतरांना सूडभावनेने प्रेरित केले असेल तर, अशा व्यक्तीच्या मृत्यूच्या उपरांत, त्याच्या पायाला एक दोरखंड बांधावा. एखाद्या नीचजातीय व्यक्तीने, तो दोर हाताला धरून त्या प्रेताला राजरस्त्यांवरून फरफटत न्यावे. अशा दुष्ट व्यक्तीच्या नातेवाईकांना, त्याचे धार्मिक श्राद्धविधी करण्यास मनाई करावी. या राजाज्ञेचे जो पालन करणार नाही, त्याला वरील प्रकारचीच शिक्षा द्यावी.''

अर्धमागधी भाषेतील भगवतीसूत्र नावाच्या ग्रंथामधील १५ व्या शतकात (प्रकरणात) 'गोशालक' नावाच्या व्यक्तीच्या दु:खद अंताचे, मृत्यूचे आणि प्रेतविधीचे विस्ताराने वर्णन आढळते. गोशालक हा महावीरांना समकालीन असलेल्या 'आजीविक' संप्रदायाचा नेता असून, त्याने अनेक वर्षे महावीरांबरोबर कडक तपस्या केलेली असते. मात्र आयुष्याच्या अखेरीस, तो महावीरांचा कट्टर प्रतिस्पर्धी बनतो. तपश्चर्येने प्राप्त केलेल्या 'तेजोलेश्या' नावाच्या शक्तीचा, अत्यंत दुष्टतेने तो महावीरांवर प्रयोग करतो. ती तेजोलेश्या उलटते. त्यालाच प्राणघातक ठरते. मृत्यू जवळ आलेला बघून, तो आपल्या निकटवर्तीयांना जवळ बोलावतो. आपल्या देहसंस्काराविषयी सर्वांना सांगतो की —

**नो खलु अहं जिणे जिणप्पलावी --- समणे भगवं महावीरे जिणे जिणप्पलावी --- तं तुब्भं णं देवाणुप्पिया ममं कालगयं जाणित्ता वामे पाए सुंबेणं बंधेह, बंधेत्ता तिक्खुत्तो मुहे उट्ठुभेह --- सावत्थीए नगरीए --- महापह-पहेसु आकट्ट-विकट्टिं करेह । --- महया अणिड्ढीअसक्कार-समुदएणं ममं सरीरगस्स नीहरणं करेज्जाह, एवं वदित्ता कालगए ।** (भगवती, शतक १५, सूत्र १४१)

गोशालकाच्या अशा आदररहित वर्णनात, जैन साहित्यिकांचा सांप्रदायिक आकस जरी स्पष्ट होत असला, तरी एवढे मात्र नक्की आहे की, अर्थशास्त्राच्या ८४ व्या अध्यायातील वर्णनाचे प्रतिध्वनी मात्र, या वर्णनात नक्कीच उमटलेले आहेत.

**(११)** 'ज्ञाताधर्मकथा' या ६ व्या अर्धमागधी आगमग्रंथात, काही कथा आहेत तर काही दृष्टांत आहेत. ज्ञाताधर्मकथेच्या पहिल्या श्रुतस्कंधाच्या १४ व्या अध्ययनात, 'तेतलिपुत्र अमात्य' नावाच्या व्यक्तीची कथा रंगविली आहे. आपण ती कथा जर अतिशय बारकाईने वाचली, तर आपल्याला असे दिसते की, अमात्य चाणक्याच्या जीवनकथेची जणू काही छायाच, या संपूर्ण अध्ययनावर पडलेली आहे. एक दुष्ट राजा–आपल्याच राजपुत्रांना व्यंग निर्माण करणे– राणीच्या सांगण्यावरून अमात्याने एका राजपुत्राचे रक्षण करणे – पित्याच्या मृत्यूनंतर त्याचा राज्याभिषेक करणे – काही वर्षे दोघांचे एकमताने अनुशासन – राजाचे अमात्याविषयी मन:परिवर्तन– अमात्याचे निपुत्रिक असणे आणि अमात्याचे स्वेच्छापूर्वक मरण — हे सर्व वर्णन अर्थातच आपल्याला, आवश्यक आणि निशीथचूर्णीत रंगविलेल्या, अमात्य चाणक्याच्या वृत्तांताचे स्मरण करून देते.

दुसरी लक्षणीय गोष्ट अशी की, 'ऋषिभाषित' नावाच्या अर्धमागधी ग्रंथात १० व्या अध्ययनात, तेतलिपुत्र अमात्याची वरील कथा, अतिशय संक्षेपाने दिली आहे. विशेष गोष्ट अशी की, तेथे त्याला 'नीतिशास्त्रविशारद' असे आवर्जून संबोधले आहे. त्यावरूनही चाणक्य–चरित्राशी त्याचे असलेले साम्य अधोरेखित होते.

**(१२)** अर्थशास्त्राच्या १४ व्या अध्यायात, चार उपप्रकरणे आहेत. त्यांचे नाव

'औपनिषदिक' असे आहे. यामध्ये अनेक प्रकारचे मंत्र, तंत्र, अभिचार, काळी जादू, घातक प्रयोग आणि घातक वनस्पतींचा उपयोग यांचे वर्णन येते. या अधिकरणाच्या आरंभीच नमूद केले आहे की, 'चातुर्वर्ण्याच्या पालनासाठी आणि गुन्हेगारांना शासन देण्यासाठी, वेळप्रसंगी अशा प्रकारच्या जारण-मारण विधींचा, वापर करावा.'

आचार्य वट्टकेरकृत मूलाचाराच्या टीकेत, जणू काही या १४ व्या अधिकरणावरील निषेधात्मक विवेचन, टीकाकाराने प्रस्तुत केले आहे. निशीथचूर्णीतील अंजनसिद्धीची कथा, यापूर्वीच नोंदविली आहे. सुबंधूच्या मरणासाठी चाणक्याने, विषारी सुगंधाने लिप्त अशा भूर्जपत्रांचा वापर, अत्यंत मायावीपणे करून ठेवला — याची कथाही निशीथचूर्णीने नोंदविली आहे. एकंदरीत असे दिसते की, श्वेतांबरांनी चाणक्याच्या या मायाचाराची निंदा केलेली नाही परंतु दिगंबर आचार्यांना हे मायाचार फारसे पसंत दिसत नाहीत.

सारांशाने असे म्हणता येईल की, चाणक्यकथांकडे अर्थशास्त्राच्या गवाक्षातून पाहिले असता असे दिसते की, अर्थशास्त्रात नमूद केलेल्या अनेक गोष्टी, जैन साहित्यिकांनी कथाबीजे म्हणून अत्यंत समर्थपणे वापरल्या आहेत. परंतु त्या कथांची प्रामाणिकता आणि ऐतिहासिकता, निखालसपणे स्वीकारणे अत्यंत कठीण आहे. याचे मुख्य कारण असे की, अर्थशास्त्रातून स्वीकारलेली मिथके कथारूपाने लिहिताना, 'हे सर्व खुद्द चाणक्याच्याच बाबतीत घडले आहे', अशी मांडणी जैन साहित्यिकांनी केलेली दिसते. कौटिलीय अर्थशास्त्र हा संपूर्ण ग्रंथच मुळी, चाणक्याच्या अनुभवाधार परिपक्व बुद्धीचा आविष्कार असल्यामुळे जैनांनी सगळ्याच चाणक्य-कथांना, पारिणामिकी बुद्धीचे उदाहरण

म्हणून रंगविले आहे. एक तटस्थ वाचक म्हणून आपण असे म्हणू शकतो की, या सर्व कथा म्हणजे दंतकथा-आख्यायिका आणि कल्पनारम्य प्रतिभाविलासाचे आनोखे संमिश्रण आहे. सुट्यासुट्या जैन आख्यायिका एकत्र करून, जैनांनी रंगविलेले चाणक्यचरित्र, कालक्रमाच्या दृष्टीने सुसंगत आणि तार्किक दृष्ट्या संभवनीय वाटत असले तरी, ते संपूर्णपणे ऐतिहासिकच असेल, असे मात्र म्हणता येत नाही.

## (ब) अर्धमागधी आगमग्रंथ आणि अर्थशास्त्र यातील सामाजिक-सांस्कृतिक साम्यस्थळे

श्वेतांबर अर्धमागधी आगमांची मौखिक परंपरा, इसवीसनपूर्व सहाव्या शतकात सुरू झाली. अकरा अंगग्रंथ हे आगमांच्या वाचनांनंतर, इसवी सनाच्या पाचव्या शतकात, लिखित स्वरूपात संकलित करण्यात आले. वेळोवेळी झालेले प्रक्षेप गृहीत धरले तरी, सामान्यत: असे म्हणता येते की, या अकरा ग्रंथांमधील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती, आज उपलब्ध असलेल्या कौटिलीय अर्थशास्त्रात निर्दिष्ट परिस्थितीशी, मिळतीजुळती अशीच आहे.

त्यातील प्रत्येक साम्यस्थळावर, जर भाष्य करावयाचे म्हटले तर, एक मोठा प्रबंधग्रंथ सहज तयार होईल. प्रस्तुत प्रकरणात त्याची थोडीशी झलक देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थशास्त्रातील अनेक पारिभाषिक पदे आणि पदावली, अर्धमागधी ग्रंथातील पदावलींशी काही वेळा भाषिक दृष्टीने, तर काही वेळा संकल्पनात्मक दृष्टीने साम्य राखतात. हे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ देण्यासाठी अतिशय सोपी पद्धती वापरली आहे. खूप महत्त्वाचे शब्द आधी नोंदविले आहेत. त्यामानाने कमी महत्त्वाचे असलेले संदर्भ नंतर एकत्रितपणे नमूद केले आहेत. ही साम्यस्थळे पुढीलप्रकारे देता येतील —

## (१) मुख्य आणि संमिश्र जातींचे उल्लेख

ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य–शूद्र ही पारंपरिक विभागणी, अर्थातच अर्थशास्त्र आणि आगमग्रंथात वारंवार उद्‌धृत केलेली दिसते. लक्षणीय बाब अशी की, अनेक उपजाती आणि आंतरजातीय विवाहामुळे झालेल्या संमिश्र जाती, यांचे संदर्भ दोहोतही, ठिकठिकाणी बघावयास मिळतात. विशेष म्हणजे त्यांच्याकडे गर्हणीय दृष्टीने पाहिलेले नाही.

अर्थशास्त्राच्या ६३ व्या अध्यायात, अनुलोम–प्रतिलोम विवाहाने उद्‌भवलेल्या विविध जाती नोंदविल्या आहेत. त्या अशा — अंबष्ठ, निषाद (पाराशव), उग्र, व्रात्य, क्षत्य, आयोगव, चांडाल, मागधव, पुक्कस, वैदेहक, सूत, कूटक, वैण, कुशीलव, श्वपाक आणि अंतराल. यातील अनेक उपजाती, प्रमुख अर्धमागधी ग्रंथात पाहावयास मिळतात. कोणत्या वर्णाचा पुरुष आणि कोणत्या वर्णाची स्त्री, यापासून ही प्रजा उत्पन्न झाली आहे, याचे विवेचन टीकाकारांची मदत घेतल्यास आपल्याला मिळू शकते.

**अ)** अंबट्ठ (अंबष्ठ) : सूत्रकृतांग १.९

**ब)** णिसाय (निषाद) : देशीनाममाला ४.३५

**क)** उग्ग (उग्र) : ज्ञाताधर्मकथा १.१०८, पृ.१०५ (ब्यावर);
धवला १३, पृ.३८७–३८९

**ड)** खत्त (क्षत्त) : सुपासनाहचरिय १९७

**इ)** चंडाल (चाण्डाल) : सूत्रकृतांग १.८ ; उत्तराध्ययन १.१० ; ३.४

**फ)** बोक्कस (पुक्कस) : उत्तराध्ययन ३.४

**ग)** वइएह, वेदेह (वैदेहक) : स्थानांग टीका, पृ.३५८

**ह)** सोवाग (श्वपाक) : उत्तराध्ययन १२.१ ; १२.३७

## (२) अंत:पुरातील नोकरवर्ग

राजांच्या आणि इभ्य, श्रेष्ठी, सार्थवाह इ. धनिकांच्या अंत:पुरात, नियुक्त केलेल्या स्त्री-पुरुष नोकरांची यादी, अर्धमागधी ग्रंथांत वारंवार उद्धृत केलेली दिसते. बालकांचे संगोपन करण्यासाठी, विविध प्रकारची कौशल्ये असलेल्या, अनेक स्त्रियांची नेमणूक केली जात असे. ज्ञाताधर्मकथेतील यादी प्रातिनिधिक समजून, पुढीलप्रमाणे देता येईल.

**तए णं से मेहे कुमारे --- बहूहिं खुज्जाहिं चिलाइयाहिं वामणि-वडभि-बब्बरि-बउसि-जोणिय-पल्लविय-ईसिणिय-धोरुगिणि-लासिय-लउसिय-दमिलि-सिंहलि-आरबि-पुलिंदि-पक्कणि-बहलि-मुरुंडि-सबरि-पारसीहिं ---चेडियाचक्कवाल-वरिसधर-कंचुइज्ज-महयरगवंद-परिक्खित्ते---सुहंसुहेणं**

**वड्ढइ ।** (ज्ञाताधर्मकथा १.१.९६ (पृ.९२) (ब्यावर)

अर्थशास्त्राच्या १२ व्या अध्यायात, राजाच्या अंत:पुरात नेमल्या जाणाऱ्या नोकरांची व हेरांची यादी, दोनदा उद्धृत केली आहे. अर्थात् यावरून हेच सिद्ध होते की, याप्रकारचे स्त्री-पुरुष अंत:पुरात काम करत असत आणि परराज्यातील अंत:पुरामधील घडामोडींचा छडा लावायचा असेल तर, याचप्रकारचे लोक हेरगिरी करण्यासाठी पाठविले जात असत. कौटिल्य म्हणतो-

**रसदा: (चारा:) कुब्ज-वामन-किरात-मूक-बधिरजडान्धछद्मानो --- स्त्रियश्चाभ्यन्तरं चारं विद्यु: । --- अन्तर्गृहचरास्तेषां कुब्ज-वामन-षण्डका: । शिल्पवत्य: स्त्रियो मूकाश्चित्राश्च म्लेञ्छजातय: ।**

अर्थशास्त्राच्या १२ व्या अध्यायात अशी विशेष माहिती मिळते की, वरील प्रकारच्या स्त्री-पुरुषांचे सोंग, वेषांतराने धारण करणारे कुशल हेर, त्या काळी अस्तित्वात

होते. अर्थशास्त्राच्या २१ व्या अध्यायात, राज्याच्या वैयक्तिक सुरक्षेसाठी, स्त्री–पुरुष नोकरांची नेमणूक, कशा प्रकारे केली जात असे, याचे उल्लेख येतात. त्यातील धनुर्धारी स्त्रियांचा आणि कुब्ज–वामन–किरातांचा उल्लेख विशेष लक्षणीय आहे.

अर्थशास्त्राच्या १२ व्या, ७० व्या आणि १४६ व्या अध्यायात, 'म्लेञ्छजातय:' असा उल्लेख वारंवार येतो. तेथे म्लेञ्छजातीत समाविष्ट होणाऱ्या, लोकांची यादी दिलेली नाही. 'प्रश्नव्याकरण' नावाच्या अर्धमागधी ग्रंथात, कोणकोणते लोक म्लेञ्छजातीत समाविष्ट होतात, त्याचे वर्णन केलेले आहे. तेथे म्हटले आहे की —

**इमे य बहवे मिलक्खुजाई, के ते ? सग–जवण–सबर–बब्बर–––पुलिंद–डोंब–––चीण–लासिय–खस–खासिय–––हूण–रोमग–रुरु–मरुया चिलायविसयवासी य पावमइणो ।**

## (३) सामाजिक उत्सव

अर्थशास्त्रात सामाजिक उत्सवांचे एकत्रित वर्णन आढळत नाही. ८० व्या अध्यायात आठ आकस्मिक संकटांच्या प्रतिकारासाठी करावयाच्या, पूजा–होम–बलि–स्वस्तिवाचन इ. उपायांचे वर्णन येते. अशा पूजांना सामाजिक देवकार्य म्हटले आहे. ऋतुमानाप्रमाणे निसर्गातील त्या त्या गोष्टींची पूजा केली पाहिजे, असे चाणक्य म्हणतो. त्यांची यादी पुढीलप्रमाणे — नदी, इंद्र, गंगा, पर्वत, वरुण, समुद्र, द्रह, नाग आणि चैत्यवृक्ष. अर्थशास्त्राच्या तुलनेत अर्धमागधी ग्रंथांमध्ये, सण–वार–उत्सव–यात्रा–जत्रा इ.चे उल्लेख, अधिक सजीवपणे चित्रित केले आहेत. ज्ञाताधर्मकथेत म्हटले आहे की – –

**अज्ज रायगिहे नयरे इंदमहे इ वा खंदमहे इ वा एवं रुद्द–सिव–वेसमण–नाग–जक्ख–भूय–नई–तलाय–रुक्ख–चेइय– इ वा उज्जाण–गिरिजत्ता इ वा ?**

(ज्ञाताधर्मकथा १.१.९६)

वरील परिच्छेदात 'मह' म्हणजे विविध सामाजिक 'उत्सव-महोत्सव' असून, 'जत्ता' या शब्दाने आम समाजातील 'जत्रा' अपेक्षित आहे. आचारांग आणि भगवतीसूत्रातही, जवळजवळ याच प्रकारचे उत्सव आणि यात्रा नोंदविलेल्या दिसतात. (आचारांग २.१०.२.३; भगवती ९.३३.१५८ (लाडनौ))

या सण-वार-उत्सवाच्या प्रसंगी, दोहोतील सामाजिक चालीरीतींचे निरीक्षण केले तर, त्यातील समकालीनता सहजच लक्षात येते.

## (४) देवदेवता

ब्राह्मण परंपरेतील दैवतसृष्टी आणि जैन परंपरेतील दैवतसृष्टी, या दोहोंवर नजर टाकली असता ही गोष्ट लक्षात येते की, जैनांच्या दैवतसृष्टीचे वर्णन अधिक क्रमबद्ध , सुसंगत आणि विस्ताराने रंगविले आहे. त्या तुलनेने वैदिक आणि पौराणिक दैवतसृष्टीत अनेक प्रकारची तफावत दिसून येते.

अर्थशास्त्राच्या २५ व्या अध्यायात 'किल्ला कसा वसवावा ?' याविषयीचे वर्णन आढळते. त्यामध्ये किल्ल्यावरील देवळांचा, आवर्जून उल्लेख केला आहे. कौटिल्य म्हणतो, ''दुर्गाच्या मधोमध अपराजिता (लक्ष्मी), अप्रतिहत (विष्णु), जयन्त (कार्तिक) वैजयन्त (इंद्र), शिव, कुबेर, अश्विनीकुमार, मदिरा (चामुंडा) इ. ची देवळे बांधावीत. त्या त्या मंदिरात विशिष्ट वास्तुदेवतांची स्थापना करावी. ब्रह्मा, इंद्र, यम आणि कार्तिक यांच्या प्रतिमा देवालयाच्या द्वाराशी स्थापित कराव्यात. दहा दिशांना, दहा दिशादेवतांची स्थापना करावी.''

प्राचीन जैनग्रंथांत कुबेराला 'वैश्रमण' आणि कार्तिकाला 'स्कन्द', असे म्हटलेले दिसते. अर्धमागधी ग्रंथांत विविध उत्सवांच्या संदर्भात, इन्द्र-स्कन्द-रुद्र-शिव-वैश्रमण

आणि मुकुन्द या देवतांचे उल्लेख येतात. या सर्व देवता अर्थातच ब्राह्मण परंपरेतील दिसतात. तत्त्वार्थसूत्रासारख्या जैन दार्शनिक ग्रंथात, जैनदृष्टीने देवतासृष्टीची मांडणी दिसते. देवांच्या श्रेष्ठ अधिवासांना 'विमान' अशी संज्ञा आहे. त्यांची नावे विजय-वैजयन्त-जयन्त-अपराजिता-सर्वार्थसिद्ध, अशी दिली आहेत (तत्त्वार्थसूत्र ४.२०). त्रिलोकप्रज्ञप्ति नावाच्या प्राचीन जैन शौरसेनी ग्रंथात (गाथा ३१७१), सोम-यम-वरुण-कुबेर — या चौघांना चार दिशांचे लोकपाल म्हटले आहे. 'जैनेंद्र-सिद्धांत-कोशात' दिक्कुमार, दिक्कुमारी आणि दिक्पाल देवांचे वर्णन येते. जिज्ञासूंनी हे वर्णन तेथून पहावे. प्रतिष्ठासारोद्धार नावाच्या विधिविधानात्मक जैनग्रंथात जया-विजया-अजिता-अपराजिता, या चार स्त्री-देवतांचे विशेष वर्णन येते. देवतांच्या नावांवरूनही अर्थशास्त्र आणि अर्धमागधी ग्रंथांची समकालीनता, सहजच ध्यानात येते.

## (५) एक सामाजिक चाल 'अर्चा'

आजमितीला 'अर्चा' हा शब्द मराठीत, स्वतंत्रपणे वापरला जात नाही. 'पूजाअर्चा' अशा जोडशब्दाच्या रूपानेच तो आढळतो व पूजा शब्दापेक्षा तो फारसा वेगळा मानला जात नाही. प्राचीन काळी 'अर्चा' या शब्दाला एक विशेष संदर्भ व अर्थ होता. तो पूजेपेक्षा निश्चित वेगळा होता. अर्थशास्त्राच्या हिवरगावकरांच्या प्रस्तावनेतील, २२ व्या पृष्ठावर ते नमूद करतात की, ''कौटिल्याच्या काळात धनप्राप्ती करण्यासाठी, अर्चा करण्याचा प्रघात होता. अर्चा या विधीमध्ये, पशुबळी दिला जात असे. अशोक हा अहिंसेचा पुरस्कर्ता असल्यामुळे, हा प्रघात त्याच्या काळात बंद झाला असावा. चंद्रगुप्त आणि बिंदुसार यांच्या राजवटीत मात्र ही प्रथा असावी. यावरून स्पष्टच होते की, कौटिलीय अर्थशास्त्र हे, अशोकाच्या आधी लिहिले असावे.''

हिवरगावकरांचा हा तर्क, आपण तेव्हाच यथार्थ मानू शकतो, जेव्हा त्याला दुसरा भक्कम पुरावा मिळेल. अर्धमागधी ग्रंथ, हा पुरावा देण्यास कितीतरी सक्षम ठरतात. अर्चा या शब्दाचा प्राकृत समानोच्चार शब्द 'अच्चा' हा आहे. सूत्रकृतांग (१.१३.१७ ; १.१५.१८ ; २.२.६) आणि स्थानांग टीका पृ.१९, या अर्धमागधी ग्रंथात 'अच्चा' हा शब्द 'शरीर' या अर्थाने आला आहे. आचारांगाच्या हिंसा-विवेक-पदात म्हटले आहे की, **'से बेमि-अप्पेगे अच्चाए वहंति, अप्पेगे अजिणाए वहंति ।'** (आचारांग १.१.६, सूत्र १४०, लाडनौ). याचा अर्थ असा आहे की, 'काही माणसे शरीरासाठी प्राणिवध करतात तर काही माणसे कातडी मिळविण्यासाठी प्राणिवध करतात.' वरील सर्व संदर्भांमध्ये 'अच्चा' शब्दाचा अर्थ 'शरीर' असल्यामुळे, अर्चेच्या प्रघातात पशुबळी आवश्यक मानला जात असावा व हा विधी पूजेनंतर केला जात असावा.

अर्चेसंबंधीचे हे सर्व जैन संदर्भ लक्षात घेतले तरच, अर्थशास्त्रातील अर्चाविधीचा नीट सुसंगत अर्थ लावता येतो.

## (६) 'कुलैडक' शब्दाचा विशेष अर्थ

आचारांगामुळे जसा वरच्या शब्दाचा विशेष अर्थ ठरविण्यास मदत होते, त्याप्रमाणे अर्धमागधी मूलसूत्र असलेल्या उत्तराध्ययनाची मदत, 'कुलैडक' शब्दाचा निश्चित अर्थ ठरविण्यासाठी होतो. कौटिलीय अर्थशास्त्राचे अभ्यासक असलेल्या ज.स.करंदीकरांनी, हिवरगावकरांच्या प्रस्तावनेनंतर, अर्थशास्त्रातील विशेष विवाद्य शब्दांवर आधारित असे परिशिष्ट जोडले आहे. 'कुलैडक' हा शब्द अर्थशास्त्राच्या १३७ आणि १४१ व्या अध्यायात येतो. त्याबाबत श्यामशास्त्री आणि गणपतिशास्त्री म्हणतात, 'या शब्दाचा अर्थ कळपातून चुकलेला एडका (बकरा) असा घ्यावा.' करंदीकरांनी या अर्थाला विरोध केला आहे कारण तो अर्थशास्त्रातील प्रस्तुत संदर्भांशी जुळत नाही. करंदीकरांच्या

मते, 'ज्याला घरात खाऊपिऊ घालून पोसला आहे आणि योग्य वेळी बळी देण्यासाठी उपयोगात आणला जाणार आहे, अशा एडक्यास किंवा बकऱ्यास 'कुलैडक' म्हणतात'.

उत्तराध्ययनाच्या 'एलइज्ज' (उरब्भिज्ज) अध्ययनाच्या संदर्भात, करंदीकरांचा वर सुचविलेला अर्थ, अधिक समर्पक सिद्ध होतो.

**जहाएसं समुद्दिस्स , कोइ पोसेज्ज एलयं ।**
**ओयणं जवसं देज्जा , पोसेज्जा वि सयंगणे ।।**
**तओ से पुट्ठे परिवूढे , जायमेए महोदरे ।**
**पीणिए विउले देहे , आएसं परिकंखए ।**

(उत्तराध्ययन ७.१,२)

जवस, ओदन इ. उत्तम खाद्य देऊन, घरात परिपुष्ट केलेल्या एडक्याचे वर्णन, येथे करण्यात आले आहे. असेही म्हटले आहे की योग्य असा पाहुणा येण्याचा काय तो अवकाश, तो एडका लगेचच त्यांच्या मेजवानीसाठी वापरला जाणार आहे. अर्थशास्त्रातील विशेष शब्दांचे स्पष्टीकरण, जैनांच्या अर्धमागधी साहित्यात मिळणे, ही बाब खरोखरच लक्षणीय मानली पाहिजे.

## (७) सप्ताङ्ग राज्य आणि चतुर्विध नीति

या दोन्ही संकल्पना कौटिल्य अर्थशास्त्राचा गाभा आहे. आपण अशी अपेक्षा करतो की, या संकल्पना प्राचीन जैन साहित्यात, अनेक वेळा सहजतेने आढळून येतील. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, तुलनेने उत्तरवर्ती समजल्या गेलेल्या ज्ञाताधर्मकथा या अंगग्रंथात, त्या आढळून येतात.

अर्थशास्त्रात राज्याच्या सात अंगांना 'प्रकृति' असे म्हटले आहे –

**स्वाम्यमात्यजनपददुर्गकोशदण्डमित्राणि प्रकृतयः ।** (अर्थशास्त्र, अध्याय ९७). साम, दान (उपप्रदान) दंड आणि भेद हे चार राजनीतीतले उपाय आहेत. शत्रुराज्यांना आणि मित्रराज्यांना हाताळताना, या चार नीतींचा यथायोग्य वापर कसा करावा, याचे स्पष्टीकरण अर्थशास्त्राच्या १३, १४ आणि ३१ व्या अध्यायात दिले आहे.

ज्ञाताधर्मकथेत श्रेणिकराजाचा पुत्र 'अभय' हा, त्या राज्याचा मंत्री देखील होता. त्याचे वर्णन करताना म्हटले आहे की —

**(अभए णामं कुमारे) सामदंडभेयउवप्पयाणणीइ -- अत्थसत्थमइविसारए --- सेणियस्स रण्णो रज्जं च रट्ठं च कोसं च कोट्ठागारं च बलं च वाहणं च पुरं च अंतेउरं च सयमेव समुपेक्खमाणे विहरइ ।** (ज्ञाताधर्मकथा १.१.१५, पृ.२२, ब्यावर)

हाच परिच्छेद जवळजवळ जसाच्या तसा, ज्ञाताधर्मकथेच्या १४ व्या अध्यायात, पुनरावृत्त केलेला दिसतो. तेथे हे वर्णन तेतलिपुत्र अमात्याच्या संदर्भात येते. आपण हे यापूर्वीच पाहिले आहे की, तेतलिपुत्र अमात्याच्या व्यक्तिमत्वावर, अमात्य चाणक्याची छाया स्पष्ट जाणवते.

सप्ताङ्ग राज्याचे उल्लेख अर्धमागधी साहित्यात, अगदी क्वचित् आढळण्याचे संभाव्य कारण असे देता येईल की, भ. महावीर आणि बुद्धांच्या वेळच्या भारतात, मगध आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशात, 'गणराज्य' पद्धती अस्तित्वात होती, असे समकालीन ऐतिहासिक उल्लेखांवरून दिसून येते. कदाचित् आगमांच्या अंतिम संस्करणापर्यंत, राजसत्ताक पद्धती अधिक प्रचलित झाली असावी.

## (८) अमात्य चाणक्य

अमात्य, मन्त्रि, सचिव आणि प्रधान ही बिरुदे अर्थशास्त्रात फार काटेकोरपणे वापरलेली दिसत नाहीत. त्यांची कार्ये, पद्धती आणि स्वरूप निश्चित केलेले दिसून येत

नाही. एक मात्र खरे की, अमात्याचे स्थान राजाच्या लगेचच पाठोपाठ येते. अर्थशास्त्राच्या 'अमात्योत्पत्ति' नावाच्या आठव्या अध्यायात, अमात्यांची कार्ये विस्ताराने दिली आहेत. अर्थशास्त्राच्या नवव्या अध्यायात, मंत्री आणि पुरोहित यांची कार्ये विशद करीत असताना, कौटिल्याने त्यांचा प्रारंभ मात्र, अमात्यांच्या गुणांनी केला आहे. दहाव्या अध्यायात अमात्यांच्या राजनिष्ठेच्या परीक्षेचे, अतिशय कठीण निकष नोंदविले आहेत. चाणक्याने अमात्यांना दिलेले हे महत्त्व लक्षात घेऊनच, बहुधा जैनांनी 'अमात्य चाणक्य', ही पदावली स्वीकारलेली दिसते. अनेक प्राकृत आख्यायिकांचा प्रारंभच मुळी, '**पाडलिपुत्ते चंदगुत्तो राया । अमच्चो चाणक्को ।**' अशा प्रकारे झालेला दिसतो. जैन साहित्यात चाणक्याला 'मंत्री' अगर 'सचिव', असे संबोधण्याचे प्रसंग फारच क्वचित् दिसतात.

## (९) भौगोलिक प्रदेश आणि राज्ये

मगधात लिहिल्या गेलेल्या साहित्यात, कौटिलीय अर्थशास्त्राचे स्थान अग्रगण्य आहे. जैनांचा प्राचीन इतिहास, मगध प्रदेश आणि अर्धमागधी भाषेशी संबंधित आहे. साहजिकच विविध राजकीय प्रदेशांची नावे आणि राज्ये याबाबत, कौटिलीय अर्थशास्त्र आणि अर्धमागधी साहित्यात निकटचे साम्य आढळते.

अनुयोगद्वार या ग्रंथात 'स्कन्ध' या संकल्पनेची दहा पर्यायी नावे दिली आहेत. (अनुयोगद्वार सूत्र ५८, पृ.५५, ब्यावर). त्यातील पहिलेच पर्यायी नाव 'गण' असे आहे. भारतीय विद्यांचे अभ्यासक असे म्हणतात की, गण हा शब्द प्राचीन भारतातील गणराज्यांचा द्योतक असून लिच्छवी, वज्जी, मल्ल इ. अनेक गणराज्ये त्यावेळी अस्तित्वात

होती.

अर्थशास्त्रात विविध आख्यायिका आणि दंतकथा नोंदविताना, कौटिल्याने पौण्ड्र, कोशल, मगध, अवन्ति आणि वङ्ग या प्रदेशांचा उल्लेख केला आहे. उज्जयिनीचा राजा प्रद्योत आणि त्याचा पुत्र पालक, याचा विशेष उल्लेख ९५ व्या अध्यायात केला आहे. वैदेहक आणि मागध नावाचे हेर, निश्चितच त्या त्या प्रांताशी निगडित आहेत (अर्थशास्त्र, अध्याय १२). कौटिल्य म्हणतो की, 'मगध, पौण्ड्र, काशी, वत्स आणि मालव हे प्रदेश कापसाच्या धाग्यांसाठी विशेष प्रसिद्ध आहेत. तसेच कलिङ्ग, अङ्ग, सौराष्ट्र, दशार्ण आणि पाञ्चनद (पंजाब) हे प्रदेश हत्तींसाठी प्रसिद्ध आहेत (अर्थशास्त्र, अध्याय १३)'. अर्थशास्त्रात वर उल्लेखलेले सर्व प्रदेश जैनांच्या अर्धमागधी आणि प्राचीन जैन महाराष्ट्री ग्रंथांमध्ये अक्षरश: शेकडो वेळा आढळून येतात. किंबहुना जैनांच्या सर्व पारंपरिक कथा, वर वर्णन केलेल्या जनपदांच्या नावानेच सुरू होतात.

## (१०) आणखी काही विखुरलेले सांस्कृतिक संदर्भ

- गणिकांविषयीची सर्व माहिती, अर्थशास्त्राच्या ४८ व्या अध्यायात येते. गणिका आणि रूपाजीवा (वेश्या) यांच्यातील फरक नोंदविलेला आहे. कौटिल्य म्हणतो की, 'गणिकेने आपल्या एका दिवसाच्या सेवेचे मूल्य, आधीच निर्धारित करून, जाहीर केले पाहिजे.' ज्ञाताधर्मकथेत म्हटले आहे की, एक विशिष्ट गणिका सहस्रलम्भा (जिचे एका दिवसाचे मूल्य १००० सुवर्णनाणी आहेत अशी) होती (ज्ञाताधर्मकथा १.३.४६). अनेक जैन महाराष्ट्री कथांमध्ये, गणिका आणि वेश्यांचे सामाजिक स्थान, नक्की केलेले दिसते. गुन्हेगारी विश्वातील त्यांचा सहभाग आख्यानमणिकोश, कुमारपालप्रतिबोध आणि मनोरमाकथासारख्या जैन

कथाग्रंथात अनेकदा चित्रित केलेला आढळतो.

- अर्थशास्त्राचा ४० वा अध्याय, 'प्रमाणित वजने आणि मापे' यांवर आधारित आहे. कौटिल्य असे सुचवितो की, मगध प्रदेशात बनलेली वजने आणि मापे, सर्वाधिक प्रमाणित मानावीत. अनुयोगद्वार ग्रंथात 'मागध प्रस्थाचा' विशेष उल्लेख येतो (अनुयोगद्वार २३०, पृ.४२३, ब्यावर).
- अर्थशास्त्राच्या ४६ व्या अध्यायात, मद्यविषयक उल्लेख येतात. मधु-मैरेय-सुरा-सीधु इ. मद्य प्रकार तेथे नोंदविले आहेत. ज्ञाताधर्मकथेतील द्रौपदी स्वयंवराच्या वर्णन प्रसंगी, मद्यप्रकारांची ही यादी, जशीच्या तशी आलेली दिसते (ज्ञाताधर्मकथा १.१६.११८).
- अर्थशास्त्राच्या ३८ व्या अध्यायात, विविध पशु आणि प्राण्यांची यादी दिली आहे. म्हटले आहे की, त्यांच्यापासून माणसे कातडी, दात, शिंगे, केस इ. अवयव प्राप्त करतात. प्राण्यांपासून मिळणाऱ्या उत्पादनांची हीच यादी आचारांगात पुनरावृत्त करून म्हटले आहे की, माणसाने अशा हिंसेपासून जाणीवपूर्वक निवृत्त व्हावे (आचारांग १.१.१४०, लाडनौ).
- अर्थशास्त्राच्या ३६ व्या अध्यायात, स्नेहवर्ग, क्षारवर्ग, लवणवर्ग, फलाम्लवर्ग, द्रवाम्लवर्ग, कटुकवर्ग, शाकवर्ग इ.ची माहिती दिली आहे. यातील बहुतांशी खाद्यपेय पदार्थ आचारांगाच्या दुसऱ्या श्रुतस्कंधातील पिण्डैषणा नामक अध्ययनात आढळून येतात. काही वेळा तर अर्थशास्त्रातील संस्कृत नावांशी मिळते-जुळते असे प्राकृत शब्द, जैनग्रंथात दिसून येतात. ३६ व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो, **'सैन्धवसामुद्रबिडयवक्षारसौवर्चलोद्भेदजा लवणवर्ग:।'** दशवैकालिक ३.८.११ मध्ये, साधूंना निषिद्ध असलेल्या पदार्थांच्या यादीत, प्राय: याच लवणवर्गाचा समावेश

केला आहे. म्हटले आहे की —

**सोवच्चले सिंधवे लोणे , रोमालोणे य आमए ।**

**सामुद्दे पंसुखारे य , कालालोणे य आमए ।।**

**सव्वमेयमणाइण्णं , णिग्गंथाण महेसिणं ।।**

- अर्थशास्त्राच्या ३२ व्या अध्यायाचे नाव आहे, 'कोशप्रवेश्यरत्नपरीक्षा'. यामध्ये राजकोशात जमा करावयाच्या अनेक प्रकारच्या मौल्यवान वस्तूंची यादी दिली आहे. त्यात मोती, दागिने, रत्ने, चंदन, सुगंध, कातडी, लोकर, रेशीम आणि मौल्यवान सुती कापडांचाही उल्लेख येतो. भारताच्या गतवैभवाचे दर्शन घडविणाऱ्या, ह्या मौल्यवान वस्तूंच्या वर्णनाने भरलेला, खास ग्रंथ म्हणून 'निशीथचूर्णीचा' विशेष उल्लेख करावा लागेल. खास करून चामडे, चंदन, लोकर आणि कंबल यांच्याविषयीचे असंख्य सूक्ष्म बारकावे अभ्यासकाला चकित करून सोडतात. हे उल्लेख इतके अगणित आहेत की, वाचकांनी याबाबत डॉ. मधु सेन यांचा, 'अ कल्चरल स्टडी ऑफ निशीथचूर्णी', हा ग्रंथ जरूर वाचावा.
- अर्थशास्त्राच्या ३३ व्या अध्यायाचा विषय आहे, 'खाणी-खनिजे-खनिजधातू-नाणी आणि टांकसाळी'. हा सर्व विषय धातुशास्त्राशी (मेटॅलर्जी) निगडित आहे. राज्याला समृद्ध करणारा हा विषय, चाणक्याने विस्ताराने मांडला आहे. आवश्यकचूर्णीने याची खास नोंद घेतली आहे. तेथे म्हटले आहे की, चंद्रगुप्ताला घेऊन बाहेर पडल्यावर, चाणक्याने प्रथम खाणींचा शाध घेतला **(सो धातुबिलाणि मग्गति ।)**. ३३ व्या अध्यायात, 'पण, माष आणि काकणी', या तीन नाण्यांचा विशेष उल्लेख येतो. अर्धमागधी ग्रंथांत 'पण' नाण्यांचा उल्लेख अगदी क्वचित् असला तरी, त्याच्याशी निगडित असे तीन शब्द वारंवार येतात, ते म्हणजे —

आपण, आपणविधि आणि आपणीय. माष आणि काकिणी हे शब्द प्राकृत ग्रंथात वारंवार दिसतात. उत्तराध्ययनात म्हटले आहे की —

**जहा कागिणिए हेउं , सहस्सं हारए नरो ।**

**अपत्थं अंबगं भोच्चा , राया रज्जं तु हारए ।।**

(उत्तराध्ययन ७.११)

अर्थात् एका काकिणीच्या लोभाने, माणूस जसा हजारोंचे नुकसान करून घेतो, तसे त्या राजाने कुपथ्यकारक आंब्याचे भक्षण करून, (प्राण गमावले आणि) राज्यही गमावले.

जसजसा लाभ वाढतो तसतसा लोभही वाढत जातो. 'दोन मासे सोने मागून घेईन' अशा विचाराने सुरवात केलेल्या त्या ब्राह्मणपुत्राचा लोभ, कोटीपर्यंत जाऊन पोहोचला तरी संपला नाही. उत्तराध्ययनाच्या आठव्या अध्ययनात याच अर्थाने म्हटले आहे की —

**जहा लाहो तहा लोहो , लाहा लोहो पवड्ढइ ।**

**दोमासकयं कज्जं , कोडीए वि न निट्ठियं ।।**

(उत्तराध्ययन ८.१७)

उपदेशपदाच्या ५४५ व्या गाथेत नमूद केले आहे की, एक काकिणी ही वीस कवड्यांच्या किंमतीची असते. कुमारपालप्रतिबोधात म्हटले आहे की—

**चंदगुत्त-पपुत्तो य , बिंदुसारस्स नत्तुओ ।**

**असोगसिरिणो पुत्तो , अंधो जायइ काकिणिं ।।**

(कुमारपालप्रतिबोध, पृ.१७०)

अर्थात् चंद्रगुप्ताचा पणतू, बिंदुसाराचा नातू आणि अशोकाचा पुत्र अंध असून, काकिणीची याचना करत आहे. या कथाभागात म्हटले आहे की, काकिणी या शब्दाचा

एक अर्थ 'नाणे' हा आहे, तसाच अजून एक अर्थ 'राज्य' असाही आहे. समवायांगाच्या १४ व्या प्रकरणात, चक्रवर्ती राजांच्या चौदा रत्नांचा उल्लेख आहे. त्यामध्ये 'काकिणी' नावाच्या मौल्यवान हिऱ्याचाही उल्लेख आहे.

उपरोक्त उल्लेखांमुळे दोन गोष्टी साध्य होतात. कौटिलीय अर्थशास्त्र आणि जैन साहित्यातील सांस्कृतिक साम्याचे दर्शन तर होतेच परंतु कौटिलीय अर्थशास्त्रात नमूद केलेल्या आणि हिंदू परंपरेत न आढळणाऱ्या अनेक गोष्टींचा खुलासा, जैन साहित्याच्या मदतीने अधिक अर्थपूर्णतेने होतो.

## (क) जैन आचारसंहिता आणि अर्थशास्त्रातील समान पारिभाषिक शब्द

जैन आचारशास्त्राचे दोन मुख्य भाग आहेत. ते म्हणजे 'श्रावकाचार' आणि 'साधुआचार'. दोहोंमध्ये आचाराचे विशिष्ट नियम आणि त्यांचे अतिचार, याची काळजीपूर्वक नोंद केलेली आहे. ज्या काळात जैनांचे हे आचारशास्त्र वृद्धिंगत होत होते, त्या काळात मगधात चाणक्यप्रणीत आचारसंहिता लागू होती. शिवाय जैन आचार्य अर्थशास्त्राचा अभ्यासही करू लागले होते. राज्यातील प्रत्येक व्यक्तीसाठी चाणक्याने घालून दिलेली नियमावली, अर्थातच जैन आचार्यांनी आपल्या द्विविध आचारसंहितेत समाविष्ट करून घेतली. प्रस्तुत मुद्यात नमुन्यादाखल अशा, साम्यदर्शक पारिभाषिक पदावलींचा परामर्श घेतला आहे. अधिक सूक्ष्मतेत शिरल्यास, ही साम्यस्थळे बऱ्याच विस्ताराने देखील नोंदविता येतील. येथे नमूद केलेली आठ-नऊ उदाहरणे केवळ नमुन्यादाखल आहेत.

### (१) शासन

अर्थशास्त्राच्या ३१ व्या अध्यायात, राजाच्या लिखित आज्ञांचा, विस्ताराने

विचार केला आहे. आरंभीच म्हटले आहे की, अशा लिखित आज्ञांनाच 'शासन' असे म्हणतात. राजाने वेळोवेळी असे शासनलेख काढावे आणि प्रजाजनांनी त्यांचे अचूक पालन करावे, असे म्हटले आहे. या आज्ञापत्रांच्या अनेक प्रकारांचा उल्लेख, कौटिल्याने केला आहे.

शासन आणि जिनशासन हे शब्द, अर्धमागधी ग्रंथांमध्ये अनेकदा पाहावयास मिळतात. जिनशासनाचे आणि तीर्थंकरशासनाचे पालन, साधूंनी अनिवार्यपणे केलेच पाहिजे, अशी अपेक्षा जैनग्रंथात व्यक्त केलेली दिसते. सूत्रकृतांगात म्हटले आहे की – –

**एवमेगे उ पासत्था , पण्णवेंति अणारिया ।**

**इत्थीवसं गया बाला , जिणसासणपरंमुहा ।।**

(सूत्रकृतांग १.३.६९)

अर्थात् स्त्रियांना वश झालेल्या जिनशासनपराङ्मुख अशा, अनार्य पार्श्वस्थांचा येथे आवर्जून उल्लेख केला आहे. दशवैकालिकात अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की, जिनशासनात पारंगत असलेल्या मुनीने, क्रोध इ. विकारांच्या आधीन होऊ नये. (आसुरत्तं न गच्छेज्जा सोच्चाणं जिणसासणं – दशवैकालिक ८.२५). जिनशासन ऐकलेल्याने, कोणत्याही विपरीत परिस्थितीत शांतचित्त रहावे, अशी अपेक्षा उत्तराध्ययन २.६ मध्ये व्यक्त केली आहे. उत्तराध्ययनातच 'संजय' नामक राजाचा असा उल्लेख येतो की, त्याने राज्यत्याग केला आणि तो जिनशासनात प्रविष्ट झाला (उत्तराध्ययन १८.१९). याच अठराव्या अध्ययनात जिनशासन शब्द अनेकदा पुनरावृत्त झाला आहे. जैनधर्मीयांचे एक पारंपरिक घोषवाक्य आहे, ते म्हणजे — **जैनं जयति शासनम्।**

## (२) अधिकरण

कौटिलीय अर्थशास्त्रात, प्रकरणाला 'अधिकरण' असे म्हणतात. अर्थशास्त्रात अशी १५ अधिकरणे आणि १५० अध्याय आहेत. संस्कृत कोश काढून बघितले तर अधिकरण या शब्दाचे, सात प्रमुख अर्थ नोंदविलेले दिसतात. परंतु संस्कृत साहित्यात, न्यायप्रविष्ट गोष्टींबाबत आणि व्याकरणाच्या संदर्भात, अधिकरण शब्द मुख्यत: वापरलेला दिसतो.

तत्त्वार्थसूत्रात म्हटले आहे की, '**अधिकरणं जीवाजीवा: ।** तत्त्वार्थ ६.८'. यानुसार आस्रवाचे अधिकरण अर्थात् साधन ठरणाऱ्या, दोन गोष्टी येथे सांगितल्या आहेत. जीवित वस्तू आणि अजीव वस्तू. नंतरच्या साहित्यात कर्मबंधकारक अशा १०८ उपायांचा निर्देश येतो. जैनांनी अधिकरणांचा विचार मुख्यत: हिंसेच्या साधनांच्या संदर्भात केला आहे. मूलाचार ग्रंथाच्या टीकाकाराने, अधिकरण शब्दाचे दोन अर्थ नोंदवून, अशी टिप्पणी केली की, 'अर्थशास्त्रातील अधिकरणे (प्रकरणे) इतकी माया आणि वंचनेने भरली आहेत की, ती खरोखरच हिंसात्मकतेमुळे कर्मबंधाची कारणे ठरतात.'

### (३) व्यवहार

कौटिलीय अर्थशास्त्रातील हा एक, वारंवार वापरला गेलेला शब्द आहे. संस्कृत कोशात 'व्यवहार' या शब्दाचे एकूण ११ अर्थ नोंदविलेले आहेत. समान अर्थछटा लक्षात घेऊन, त्यांचे मुख्यत: तीन गटात विभाजन करता येते. व्यवहार शब्दाचा पहिला अर्थ आहे, 'सामान्य कामकाज'; दुसरा अर्थ 'व्यापार' आणि 'वाणिज्याशी' जोडलेला आहे ; तिसरा अर्थ 'न्यायप्रविष्ट गोष्टी' आणि 'न्यायालयातील साक्षी पुरावे' इ.शी संबंधित आहे. कौटिल्याने विविध प्रसंगी वेगवेगळ्या अर्थांनी, हा शब्द वापरला असला तरी, अर्थशास्त्राच्या ५८ व्या अध्यायात तो विशेष महत्त्वाचा आहे. तेथे तो साक्ष आणि

पुरावे या संदर्भात येतो.

जैन साहित्यातही व्यवहार शब्द, वरील तीनही अर्थाने वापरण्यात आला असला तरी, एका विशिष्ट अर्थामध्ये, तो आपला वेगळेपणा दाखवितो. पहिल्या भद्रबाहूंनी कौटिल्याला प्राय: समकालीन असलेल्या काळात, मुनिआचाराची जी संहिता शब्दबद्ध केली, त्यास 'छेदसूत्रे' असे म्हणतात. त्यातील तीन सूत्रे अतिशय सुप्रसिद्ध आहेत. ती म्हणजे — कल्प, निशीथ आणि व्ययहार. व्यवहार हे भिक्षु-भिक्षुणींच्या वर्तनांचे कायदे, मर्यादा, मर्यादाभंग आणि प्रायश्चित्ते नोंदविणारे शास्त्र आहे. व्यवहारभाष्याच्या विशिष्ट अशा तीन गाथांवर नजर टाकली असता, आपल्या असे लक्षात येते की, त्यातील पहिली गाथा, चाणक्याशी संबंधित आहे; दुसरी गाथा चाणक्याच्या कडक शासनाचा निर्देश करते; तर तिसऱ्या गाथेत चाणक्याच्या उदात्त स्वेच्छामरणाचा उल्लेख आहे (व्यवहारसूत्र १.९१ ; १.१३२ ; १०.५९२). जैन आचारसंहितेचा कौटिलीय अर्थशास्त्राशी असलेला निकटचा संबंध, व्यवहारभाष्यातील या गाथांवरून स्पष्ट दिसून येतो.

## (४) पाषण्ड (पाखण्ड)

पाषण्ड आणि पाषण्डिन् हे दोन शब्द अर्थशास्त्राच्या जवळ-जवळ दहा अध्यायात वारंवार वापरलेले दिसतात. वैदिक नसलेल्या सर्व संप्रदायांना आणि उपसंप्रदायांना उद्देशून, कौटिल्याने हे शब्द वापरले आहेत. शाक्य (बौद्ध) आजीवक आणि जैन या सर्वांना तो 'पाषण्डी' म्हणतो. पाषण्डी गृहस्थांना आणि साधूंना दिलेली वर्तणूक, एकंदर कडकच दिसते. तापसवर्गावर, चाणक्य सतत करडी नजर ठेवून आहे. श्रोत्रिय (वैदिक) ब्राह्मणांबद्दल, तो थोडासा मृदू आहे तर अवैदिक तापसांबाबत त्याचे धोरण कडक आहे.

मुण्डी आणि जटिल दोन्ही प्रकारच्या भिक्षूंनी, वेषांतर करून, समाजात फिरून वेगवेगळ्या खबरी राजाला पोहचवाव्यात, अशी कौटिल्याची अपेक्षा आहे. याबाबत अर्थशास्त्रातीत पुढील विधाने खूपच बोलकी आहेत.

- पाषण्डी लोकांनी परराज्यात दूत म्हणून जाऊ नये. (अध्याय १६)
- गरज भासेल तेव्हा पाषण्डी लोकांची, धर्मकार्यासाठी जमविलेली रक्कम, हरण करून ती राज्याच्या कोशात भरावी. (अध्याय १८)
- पाषंडांची आणि चांडाळांची वस्ती, गावाबाहेरच्या स्मशानापलिकडे असावी. (अध्याय २५)
- पाषण्डी लोकांच्या वस्त्यांची वारंवार झडती घ्यावी. (अध्याय ५७)
- पाषण्डी लोकांनी आणि आश्रमवासींनी, शांततेने एकत्र रहावे. उपद्रव दिल्यास कडक शासन होईल. (अध्याय ७३)

पाषण्ड या शब्दाचा प्राकृत प्रतिशब्द, 'पासंड' असा आहे. आवश्यकसूत्रात सम्यक्त्वाच्या अतिचाराच्या संदर्भात, 'परपासंड' या शब्दाचा वापर केलेला दिसतो. कौटिलीय अर्थशास्त्राचे आणि समग्र आवश्यक साहित्याचे, एक विशेष नाते आहे हे पूर्वीच सांगितले आहे. इसवी सनाच्या ६-७ व्या शतकातील आवश्यकचूर्णीत, चाणक्याचे जवळ-जवळ पूर्ण चरित्रच येते. त्यानंतरच्या काही शतकांमध्ये जैन कथासाहित्यात, चाणक्याविषयीच्या आख्यायिकांनी, लोकप्रियतेचा कळस गाठलेला दिसतो. चाणक्याने वारंवार वापरलेल्या 'पाषण्ड' शब्दावर, जैन आचार्य अडखळलेले दिसतात. साहजिकच चूर्णीकाराने 'परपासण्डप्रशंसा', या शीर्षकाखाली चाणक्यालाच जैन श्रावक संबोधून त्याने ब्राह्मण साधूंची चुकीने स्तुती केली असे रंगविले आहे (आवश्यकचूर्णी भाग २,

पृ.२८१) . आवश्यकचूर्णीत प्रतिबिंबित झालेली ही प्रतिक्रिया चाणक्याच्या पाषण्डविषयक धोरणामुळेच उद्भवलेली दिसते. नंतरच्या जैन लेखकांनी परपासंड हा शब्द टाळून त्याऐवजी 'अन्यदृष्टि' असा शब्द वापरलेला दिसतो (तत्त्वार्थसूत्र ७.१८). तसेच अनेकदा पाषण्ड शब्द टाळून 'मिथ्यादृष्टि' आणि 'मिथ्यात्वी', असे शब्दही उपयोजित केलेले दिसतात.

या सर्व पृष्ठभूमीवर हे खूपच लक्षणीय आहे की, उदारमतवादी सम्राट अशोकाने आपल्या प्रस्तरलेखांमध्ये, 'पासंड' शब्द वेगळ्याच अर्थाने वापरला आहे. त्याच्या मते सर्व धर्मांच्या संप्रदाय-उपसंप्रदायांना 'पासंड' म्हणतात. तो नमूद करतो की, 'आत्मपासंडांइतकाच आदर परपासंडांचाही करावा'.

### (५) तीर्थ

'तीर्थ' ही संज्ञा, विशिष्ट अर्थाने अर्थशास्त्रात आली आहे. तीर्थ शब्दाचा व्युत्पत्तिसिद्ध अर्थ आहे – 'नदीचा घाट', 'उतार' अथवा 'रस्ता'. अर्थशास्त्राच्या १२व्या अध्यायात कौटिल्य '**अष्टादशेषु तीर्थेषु**', अशी पदावली वापरतो. त्याचा अर्थ आहे, 'राज्याची १८ वेगवेगळी खाती'. रामायणातही याच अर्थाने ही पदावली येते (अर्थशास्त्र, हिवरगावकर, प्रस्तावना, पृ.४३). कौटिल्याला अनुसरून 'महामात्र' हा, प्रत्येक खात्याचा प्रमुख असतो. त्या अर्थाने तो 'तीर्थंकर' म्हणून संबोधला जातो.

'नीतिवाक्यामृत' ग्रंथाच्या दुसऱ्या समुद्देशात, दिगंबर आचार्य सोमदेव म्हणतात, '**धर्मसमवायिनः कार्यसमवायिनश्च पुरुषाः तीर्थम् ।**' राज्यातील विविध खाती सांभाळण्याबरोबरच, सोमदेवाने धार्मिक बाबतीत निर्णय घेण्याऱ्या पुरुषाला 'तीर्थ' ही संज्ञा दिली आहे. त्याच्या मते अशा व्यक्ती धार्मिक आणि व्यावहारिक सर्वच बाबतीत वेगवेगळे पायंडे पाडतात आणि लोकांकडून त्यानुसार वर्तन करवून घेतात.

'तीर्थकर' किंवा 'तीर्थंकर' म्हणजे जैन मतानुसार, 'अर्हत्' अशी व्यक्ती असून आध्यात्मिक नीतिमूल्यांचे मार्गदर्शन करून, ते मोक्षाचा मार्ग दाखवितात. साधु-साध्वी-श्रावक-श्राविका, अशा चतुर्विध संघाला मार्गदर्शन करतात. याखेरीज अन्यतीर्थिक (समवाय ६०), तीर्थसिद्ध-अतीर्थसिद्ध (स्थानांग १) अशा विशेष संज्ञाही जैन साहित्यात दिसतात. 'पाखण्ड' असा निंदात्मक शब्द वापरण्याच्या ऐवजी, जैन साहित्यात इतर संप्रदायांच्या नेत्यांना, 'अन्यतीर्थिक' असे म्हटले आहे.

सारांश काय तर, कौटिल्याच्या मते 'तीर्थकर' हा राजशासनातील मुख्य घटक आहे, मात्र जैन मतानुसार 'तीर्थंकर' हे जिनशासनाचे सर्वोच्च प्रणेते आहेत.

## (६) संघ आणि गण

राजनीतिशास्त्रात 'संघ' आणि 'गण', हे दोन अत्यंत महत्त्वपूर्ण शब्द आहेत. तीर्थ शब्दाप्रमाणेच ब्राह्मण आणि श्रमण परंपरेत, हे दोन्ही शब्द किंचित् अर्थ बदलाने वारंवार उपयोजित केलेले दिसतात.

'संघ' हा शब्द कौटिल्य दोन अर्थांने वापरतो. १४ व्या अध्यायात तो म्हणतो की, **'तेन संघभूता व्याख्याता: ।'** आधीच्या वर्णनानुसार हे संघ म्हणजे, विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे समुदाय होत. जसे सोनारांचे, कुंभारांचे, शेतकाम करणाऱ्यांचे, बांधकाम करणाऱ्यांचे संघ इ. १७ व्या अध्यायात चाणक्य जेव्हा, **'कुलसंघो हि दुर्जय:'** असे उद्‍गार काढतो, तेव्हा त्याला एक विशिष्ट संघराज्यात्मक शासन, अपेक्षित असलेले दिसते. ज्या अभ्यासकांनी प्राचीन जैन आणि बौद्ध साहित्याचा अभ्यास केला आहे, त्यांचे असे मत आहे की, संघ आणि गण हे दोन शब्द, एका स्वतंत्र प्रजातंत्रात्मक राज्यपद्धतीचे निदर्शक आहेत. प्राचीन भारतात त्या काळी अशी अनेक संघराज्ये आणि

गणराज्ये होती (अर्थशास्त्र, हिवरगावकर, प्रस्तावना, पृ.३१-३२).

जैन आणि बौद्धांनी 'संघ' हा शब्द, खास करून 'विशिष्ट धार्मिक समुदायासाठी' वापरलेला दिसतो. 'बुद्ध, धम्म आणि संघ', ही बौद्धधर्मातील आदरणीय त्रिरत्ने आहेत. जैनांनी साधु-साध्वी-श्रावक-श्राविका, या चार धार्मिक आधारस्तंभांना 'चतुर्विध संघ' असे संबोधले. अर्थशास्त्रात आणि जैन साहित्यातही 'संघ' आणि 'श्रेणी' हे दोनही शब्द, कुशल कामगारांच्या संस्थात्मक व्यवस्थेसाठी समानतेने आलेले दिसतात. ज्ञाताधर्मकथेत कुंभकारश्रेणी आणि चित्रकारश्रेणी इ.चा आवर्जून उल्लेख केलेला दिसतो (१.८.८०, पृ.३८२); १.८.९०, पृ.३९०, ब्यावर). जैन दार्शनिक ग्रंथात, आध्यात्मिक गुणवत्ता दर्शविणाऱ्या पायऱ्यांनाही, 'श्रेणी' असे म्हणतात. षट्खंडागमासारख्या प्राचीन शौरसेनी ग्रंथात, गुणश्रेणीचा सिद्धांत तात्त्विक रूपाने, वर्णित केलेला दिसतो.

'गण' हा शब्द कौटिल्याने समुदाय या अर्थाने, अर्थशास्त्रात अनेक वेळा वापरला आहे. मात्र नोंद घेण्यासारखी बाब अशी की, संघराज्य आणि गणराज्य अशा संज्ञांचा, साक्षात् वापर मात्र तो करीत नाही. या दृष्टीने आचारांगातील उल्लेख अतिशय महत्त्वाचा ठरतो. विविध प्रकारच्या राज्यपद्धतींचे वर्णन करताना, आचारांगात म्हटले आहे की --

**अरायाणि वा गणरायाणि वा जुवरायाणि वा दोरज्जाणि वा विरुद्धरज्जाणि वा।**

(आचारांग २.१२.१.७, लाडनौ)

वर दिलेल्या या उल्लेखातील गणराज्यांची नोंद, ग्रीक इतिहासकारांच्या उल्लेखांच्या सहाय्याने, प्राच्यविद्येच्या अभ्यासकांनी केली आहे. त्या दृष्टीने आचारांगातील वरील उल्लेख, अतिशय मौल्यवान ठरतो. 'द्वैराज्य' म्हणजे दोन राजांच्या मदतीने चालणारे राज्य. याचा उल्लेख आवश्यकचूर्णीत असून तेथे चंद्रगुप्त आणि पर्वतकाचा आवर्जून

उल्लेख केला आहे. आचारांगात वर उल्लेखलेला 'अरायाणि वा', याचा अर्थ आजच्या दृष्टीने 'अराजक' असा नसून, 'लोकसमुदायाने चालविलेले राज्य', असा आहे.

'गण' हा शब्द जैन परंपरेत, साधु-साध्वींच्या मर्यादित समुदायासाठी वापरतात. अशा विशिष्ट साधुगणाचे, नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला 'गणधर', असे संबोधले आहे. महावीरांचे असे अकरा गणधर होते आणि त्यांनी अकरा अंगग्रंथांचे संकलन केले, असे जैन परंपरेत नमूद केले आहे. काळाच्या ओघात नंतर असे अनेक गण आणि गच्छ, जैन साधुसंघात बनले. तात्पर्य असे की, गण आणि संघ या दोन्ही शब्दांचा, एका बाजूने जैनधर्माशी आणि दुसऱ्या बाजूने मगध-अंग-वंग-कलिंग, या प्रदेशांच्या राजनैतिक इतिहासाशी, अतिशय अतूट संबंध आहे.

**(७) दण्ड**

हे सांगण्याची गरजच नाही की, कौटिल्याच्या दृष्टीने 'दण्ड' आणि 'दण्डनीति', या दोन शब्दांचे किती महत्त्व आहे ! २ ऱ्या अध्यायात प्रारंभी, चार विद्यांचा उल्लेख आहे, त्या म्हणजे आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता आणि दण्डनीति! ५ व्या अध्यायात कौटिल्य आवर्जून म्हणतो की, पहिल्या तीन विद्यांची सुस्थिती, सर्वस्वी दण्डनीतीवर अवलंबून आहे. ४ थ्या अध्यायात तीक्ष्णदण्ड, मृदुदण्ड आणि यथार्हदण्ड यांची चिकित्सा कौटिल्य प्रयत्नपूर्वक करतो. अर्थशास्त्राच्या ९० व्या अध्यायात 'अतिचारदण्डाचा' साक्षेपाने विचार केला आहे. १३ व्या अध्यायात असंतुष्टांना संतुष्ट करण्याचे, चार उपाय कौटिल्य नमूद करतो, ते म्हणजे साम-दान (उपप्रदान)-दण्ड-भेद. यातील दण्ड या उपायाचे विवेचन करताना कौटिल्य म्हणतो, 'वध करणे, छळ करणे आणि संपत्ती हिसकावून घेणे, याला दण्ड म्हणतात'. कौटिलीय अर्थशास्त्राच्या शेवटी जी सुप्रसिद्ध चाणक्यसूत्रे दिली आहेत, त्यात वारंवार दण्ड आणि दण्डनीतीचे

महत्त्व पटवून दिले आहे.

जैनांच्या धार्मिक आचारसंहितेत ‘दंड’ या शब्दाचा प्रयोग अनेक वेळा केलेला दिसतो, जसे – अर्थदंड, अनर्थदंड, मनोदंड, वचनदंड, कायदंड, द्रव्यदंड, भावदंड इ. त्यातील दंड या शब्दाचा मूलगामी अर्थ मात्र, जैन परंपरेने थोडा वेगळा लावला आहे. दंड म्हणजे ‘हिंसा’. ‘अर्थदंड’ म्हणजे कोणत्या तरी हेतूने अथवा कारणाने केलेली हिंसा. ‘अनर्थदंड’ म्हणजे निष्कारण केलेली हिंसा. मनाने, वचनाने आणि कायेने केलेल्या हिंसेला जैनांनी मनोदंड इ. विशेष नावे दिली आहेत. शारीरिक आणि मानसिक हिंसेला, त्यांनी अनुक्रमे द्रव्यदंड आणि भावदंड अशी नावे दिली आहेत. सर्व प्रकारच्या दंडांचा म्हणजे हिंसेचा त्याग करणे, हे जैन आचारपद्धतीत सर्वोच्च तत्त्व मानले आहे (उत्तराध्ययन ३१.४). ‘संपूर्ण दंडत्याग’ हे साधूचे ‘महाव्रत’ आहे तर ‘अनर्थदंडविरमण’ हे जैन श्रावकांचे ‘गुणव्रत’ आहे (तत्त्वार्थसूत्र ७.१६). ८० व्या आवश्यकसूत्रात अनर्थदंडाचे सर्व प्रकार, उपप्रकार साक्षेपाने नोंदविले आहेत. आवश्यकाचे अर्थशास्त्राशी असलेले नाते, यापूर्वीही अनेकदा स्पष्ट केले आहे. तात्पर्य काय तर, ‘दण्ड’ हा शब्द अर्थशास्त्र आणि जैन नीतिशास्त्र या दोघांमध्ये, समान असला तरी त्याचे अर्थाविष्कार किंचित् भिन्न आहेत. कौटिल्याचा दण्ड म्हणजे राजाने गुन्हेगारांना, गुन्ह्याला अनुसरून दिलेली शिक्षा आहे. जैनांनी आध्यात्मिक दृष्टीने या संकल्पनेचे वैश्वीकरण करून असे म्हटले आहे की, माणसांचे असंयमी वर्तन हे सर्व जीवसृष्टीला कळत-नकळत, शिक्षा देत असते. म्हणून साधकाने दंडत्यागाचे धोरण ठेवावे. म्हणजेच कौटिल्याचा दण्ड ‘व्यवहारनयानुसार’ आहे तर जैनांचा दंडत्यागाचा विचार ‘निश्चयनयाने’ महत्त्वपूर्ण ठरतो.

## (८) वृषल आणि वृषली

आता आपण अत्यंत विवाद्य अशा 'वृषल' आणि 'वृषली', या शब्दांचा अर्थशास्त्राच्या संदर्भात, मुद्राराक्षसाच्या संदर्भात आणि त्यांच्या प्राकृत प्रतिशब्दांच्या संदर्भात विचार करू. अर्थशास्त्राच्या १२ व्या अध्यायात, सतत फिरून हेरगिरी करणाऱ्या स्त्रियांचा विषय चालू आहे. तो म्हणतो —

**परिव्राजिका: --- प्रगल्भा ब्राह्मण्य: --- महामात्रकुलानि अधिगच्छेत्। एतया मुण्डा वृषल्यो व्याख्याता: ।**

या परिच्छेदात ब्राह्मण संन्यासिनींना, तो 'परिव्राजिका' असे संबोधतो. त्यांच्याकडून केल्या गेलेल्या हेरगिरीच्या अपेक्षा, तो मुंडन केलेल्या वृषलींकडूनही, समानतेने अपेक्षित करतो. कौटिल्याच्या अभ्यासकांनी 'वृषल्य:' या शब्दाचे भाषांतर, सामान्यत: नीच जातीच्या अर्थात् शूद्र स्त्रिया, असे केले आहे.

मुद्राराक्षसाच्या अभ्यासकांचे असे मत आहे की, चाणक्य जेव्हा चंद्रगुप्ताला वृषल असे संबोधतो तेव्हा, 'तो शब्द चंद्रगुप्ताच्या शूद्रतेविषयी आहे' – हे जे गृहीतकृत्य आहे, ते अर्थशास्त्राच्या सूक्ष्म अभ्यासाने अत्यंत अयथार्थ ठरते. कारण अर्थशास्त्रातील वृषल शब्दाचा अर्थ काही वेगळाच दिसतो. त्याने १२ व्या अध्यायात श्रमण हा शब्द, अवैदिक संप्रदायासाठी वापरला आहे. ७७ व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो —

**शाक्य–आजीवकादीन् वृषलप्रव्रजितान् देवपितृकार्येषु भोजयतरशत्यो दण्ड:।**

येथे 'वृषल' हा शब्द अशा भिक्षुवर्गासाठी योजला आहे की, जे बौद्ध, आजीवक व जैनसंघाचे आहेत. यातील भिक्षूंची जी यादी आहे, ती अवैदिकांची आहे हे खास. अर्थात् अवैदिक संप्रदायातील काही लोक, शूद्रांमधून आले असल्याची शक्यता आहे परंतु सर्वांनाच शूद्र असे म्हणून वृषल शब्दाचा अर्थच शूद्र आहे असे म्हणणे योग्य नाही.

प्राकृत–शब्द–महार्णवातील बुसि (वृषि, वृषिन्) तसेच वुसी (वृषी), या शब्दांवर

लक्ष केंद्रित केले आणि त्यासाठी दिलेले सर्व संदर्भ तपासले, तर असे दिसते की, हे शब्द अवैदिक संप्रदायातील, मुनी अथवा भिक्षूंविषयी योजले जात असावेत. सूत्रकृतांग आणि उत्तराध्ययन या ग्रंथांवरून हे स्पष्ट होते की, त्यात जेव्हा '**एस धम्मे वुसीमओ**' असे उद्‌गार येतात, तेव्हा ते वृषल शब्दाच्या अतिशय जवळ जातात (सूत्रकृतांग १.८.१९; १.८.१५ व उत्तराध्ययन ५.१८). विशेष गोष्ट अशी की कौटिल्यही वृषल, वृषलींचा संबंध अवैदिकांशी जोडतो.

मुद्राराक्षसात जेव्हा चाणक्य अनेकदा चंद्रगुप्ताला 'वृषल' म्हणतो, तेव्हा अशीही एक शक्यता व्यक्त होते की, तो कदाचित् चंद्रगुप्ताच्या अवैदिकतेशी निगडित असे शकेल.

प्रस्तुत मुद्यात जे आठ प्रातिनिधिक पारिभाषिक शब्द घेतले आहेत, त्यावरून असे दिसते की, तत्कालीन भारतीय संस्कृतीत ते शब्द आणि त्यांच्या संकल्पना चांगल्याच रुजल्या होत्या. अर्थशास्त्रात त्या राजनीतीच्या संदर्भात वळविल्या आहेत तर जैन परंपरेने त्या आपल्या आचारशास्त्राच्या आणि तत्त्वज्ञानाच्या चौकटीत नीट बसविल्या आहेत. दोहोतील समान संकल्पनांचा असा अभ्यास, अजून कितीतरी वाढविता येईल. कारण इंगितआकार, उंछ, एषणा, कापटिक, आवाप, परिहार — हे आणि असे कितीतरी शब्द, विचाराला भरपूर खाद्य पुरवितात.

## (ड) जैन आचारनियमांची अर्थशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात मीमांसा

या मुद्याखाली आपण जैन आचारशास्त्राचा, अर्थशास्त्राशी असलेला संबंध विशद करणार आहोत. जैन आचारशास्त्र हे दोन मुख्य मुद्यांत विभागलेले आहे — **(१)** जैन गृहस्थाचार अर्थात् श्रावकाचार आणि **(२)** जैन साधुआचार. जैन आचारशास्त्र ही एक क्रमाने विकसित झालेली साहित्यशाखा आहे. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक

काळात, ती क्रमाने परिष्कृत होत राहिली. भाषिक दृष्ट्या पाहिले तर, जवळजवळ सर्व इंडो आर्यन् भाषांमधून आणि आधुनिक काळात सर्वच भारतीय भाषांमधून ग्रंथकारांनी आपले आचारविषयक विचार व्यक्त केलेले दिसतात.

अर्धमागधी आगमांमधील अंग, मूलसूत्र आणि छेदसूत्र या नावाने प्रसिद्ध असलेल्या ग्रंथांमध्ये, आचारविषयक विवेचन आढळते. ही सर्व सूत्रे मगधाशी संबंधित आहेत. श्रावकाचार हा प्रामुख्याने अंगग्रंथांपैकी, उपासकदशेत आढळतो. मूलसूत्र आणि छेदसूत्रात साधुआचाराचे विवेचन आहे. आवश्यकसूत्रातून दोन्ही प्रकारच्या आचाराचे मार्गदर्शन मिळते. साधू असो अथवा श्रावक, तो मुळात देशाचा प्रजाजन असल्यामुळे, संपूर्ण देशासाठी तयार केलेली आचारावली, त्याने पाळणे अनिवार्य ठरते. कौटिलीय अर्थशास्त्र हा, अनेकविध राजकीय विषयांना कवेत घेणारा बृहत्‌कायग्रंथ असून, त्यातील काही विशिष्ट अध्यायांमध्ये प्रजेसाठी विशिष्ट नियम, त्यांचे अतिचार आणि त्यासाठी असलेल्या शिक्षेची अर्थात् दंडविधानाची नोंद केलेली आहे.

कौटिलीय अर्थशास्त्राच्या अनेक अभ्यासकांनी, कौटिल्याच्या भिक्षुविषयक धोरणाविषयी, आपली मते व्यक्त केलेली दिसतात. वेगवेगळ्या अध्यायांमध्ये कौटिल्याने अक्षरश: शेकडो वेळा, पुढील शब्द वापरले आहेत. जसे — संन्यासी, सिद्ध, तापस, श्रोत्रिय, ब्राह्मण, परिव्राजक, भिक्षु, क्षपणक, पाषंडी, मुंडी, जटिल इत्यादि. श्रोत्रिय-ब्राह्मण-परिव्राजकाविषयी, कौटिल्य थोडा पक्षपाती दिसला तरी, एकंदर भिक्षुवर्गावर त्याची करडी नजर दिसते. मुख्य म्हणजे कौटिल्याचीच अशी अपेक्षा दिसते की, संन्यासी असल्याचा फायदा घेऊन, या कोणालाही नियमपालनातून, कसलीही सूट मिळणार नाही. इतकेच नव्हे तर, समाजाच्या सर्व स्तरांमध्ये, यांना सहज प्रवेश असल्याने, आपल्या हेरांनी असे वेष धारण करून, समाजातील बित्तंबातमी मिळवावी, अशीही त्याची अपेक्षा दिसते. अर्थशास्त्राच्या ४ थ्या अधिकरणाचे शीर्षक, ‘कण्टकशोधन’

असे आहे. त्यात गुन्हेगारांचा कसून शोध आणि त्यांना ठोठावलेल्या कडक शिक्षांचे वर्णन येते.

## (१) जैन श्रावकाचार आणि कौटिलीय अर्थशास्त्र

अर्थशास्त्राच्या चौथ्या अधिकरणातील, ७८ व्या अध्यायापासून ९० व्या अध्यायापर्यंतच्या भागाचे, काळजीपूर्वक वाचन केले की, जैन अभ्यासकाला हे कळून चुकते की, जैन श्रावकाचाराशी ह्याचे अतिशय निकटचे नाते आहे. जैन श्रावकाचार मुख्यत: व्रते आणि त्यांचे अतिचार, यांच्या रूपाने मांडलेला आहे. आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट अशी की, कौटिल्याच्या ९० व्या अध्यायाचे नाव 'अतिचारदण्ड' असेच आहे.

श्रावकाकडून अशी अपेक्षा केली जाते की, त्याने पाच अणुव्रतांचे कसोशीने पालन करावे. प्रत्येक अणुव्रताच्या पाच-पाच अतिचारांच्या रूपाने, त्यातील मर्यादा स्पष्ट केलेल्या दिसतात. महाव्रतांपेक्षा असलेला भेद व्यक्त करण्यासाठी, अणुव्रतांच्या मागे स्थूल हा शब्द लावलेला दिसतो. कारण श्रावकाच्या व्यावहारिक मर्यादा लक्षात घेता, व्रतांचे पालन त्याला स्थूलतेने करणेच शक्य आहे. अणुव्रतांच्या विवेचनानंतर सांगितलेली, तीन गुणव्रते आणि चार शिक्षाव्रते, त्याला श्रावकधर्मात स्थिर करण्यासाठी उपयुक्त ठरतात. ही सात व्रते मुख्यत: धार्मिक आणि आध्यात्मिक दिसतात. पहिली पाच अणुव्रते मात्र नीतिमूल्यात्मक असून, ती जात-पात-धर्म-देश यांच्या सीमा ओलांडून, सर्व मानवप्राण्यांना आदर्शभूत ठरणारी अशी आहेत. या पाच अणुव्रतांपैकी सुद्धा 'परिग्रहपरिमाण' हे व्रत, बऱ्याच प्रमाणात व्यक्तीच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीवर अवलंबून आहे. त्यामुळे, 'अपरिग्रह किती प्रमाणात करायचा ?', याचे सर्वांसाठी सामान्यीकरण करता येत नाही. एकूण काय तर, पहिली चार अणुव्रते खऱ्या

अर्थाने शाश्वत नीतितत्त्वे असून, त्याबद्दलचे मार्गदर्शन जैन श्रावकाचारात आणि अर्थशास्त्रात, अतिशय परिणामकारकतेने दिसून येतात.

या विवेचनासाठी एका विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला आहे. प्रथम श्रावकाचारातील अणुव्रते आणि त्यांच्या अतिचारांची नावे दिली आहेत. त्यानंतर पाठोपाठ कौटिलीय अर्थशास्त्राच्या अतिचारदण्डातील, संबंधित भाग उद्धृत केला आहे. कोणाही सुबुद्ध वाचकाला, त्यातील साम्य स्तिमित करणारे ठरेल.

### पहिले अणुव्रत : स्थूल–हिंसा–विरमण

**अतिचार —** वध, बन्ध, छविच्छेद, अतिभार आणि भक्तपानविच्छेद.

* **वध :** व्यक्तीने कोणत्याही प्राण्याला मारपीट करू नये अथवा त्याचा वध करू नये.

**अर्थशास्त्र :** अर्थशास्त्राच्या ८८ व्या अध्यायात 'वध' या शीर्षकाखाली दुसऱ्या मनुष्यांसंबंधी व प्राण्यांसंबंधी केलेल्या गुन्ह्यांची, नोंद केली आहे. मारपीट आणि वधासाठी गुन्ह्याच्या कमी–अधिक तीव्रतेनुसार, शारीरिक शिक्षा आणि आर्थिक दंड सांगितला आहे. ५० व्या अध्यायात म्हटले आहे की, 'जो कोणी दुसऱ्यांचे, पशुधन चोरेल अथवा त्यांना मारेल, त्याच्याकडून जबर आर्थिक दंड वसूल करावा.' ७६ व्या अध्यायातही, स्वतःच्या आणि इतरांच्या पशुधनाचे नुकसान करणाऱ्यास, दंड ठोठावला आहे.

* **बन्ध :** व्यक्तीने कोणत्याही प्राण्याला बळजबरीने बांधून आणि जखडून ठेवू नये. त्यामुळे प्राण्यांना यातना होतात.

**अर्थशास्त्र :** ७४ व्या अध्यायात कौटिल्याने नमूद केले आहे की, 'जो कोणी एखाद्या पुरुषाला अथवा स्त्रीला, बळजबरीने बांधून ठेवेल, त्याला १००० पण

इतका दंड करावा.'

* **छविच्छेद :** कोणत्याही प्राण्याच्या, कोणत्याही अवयवाचे छेदन करू नये.

**अर्थशास्त्र :** 'छविच्छेद' या शीर्षकाखाली, ७६ व्या अध्यायात उदाहरणे दिली आहेत. हात, पाय, कान, दात इ. तोडणाऱ्या व्यक्तीला जबर शिक्षा फर्मावली आहे. केवळ मनुष्यप्राण्यांनाच नव्हे तर याच अध्यायात, हा छविच्छेदाचा नियम प्राणी आणि वृक्षांच्या बाबतीतही लागू केला आहे. या अध्यायातील 'दण्डपारुष्य' हा विषय, जणू काही जैन आचार्यांनी 'छविच्छेद' या अतिचाराखाली सारांशरूपाने मांडलेला दिसतो.

* **अतिभार :** कोणत्याही प्राण्यावर, त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक ओझे लादू नये.

**अर्थशास्त्र :** ५०, ५१ आणि ५२ या तीन अध्यायात क्रमाने बैल, घोडे आणि हत्ती यांच्यावर क्षमतेपेक्षा जास्त ओझे लादणे आणि त्यांच्या श्रमाची पिळवणूक करणे यासाठी कौटिल्याने, जबरदस्त दंड वसूल करण्यास सांगितले आहे.

* **भक्तपानविच्छेद :** कोणत्याही प्राण्याचा आहार तोडू नये आणि आहार घेत असताना त्याला अस्वस्थ करू नये.

**अर्थशास्त्र :** ५० व्या अध्यायात म्हटले आहे की, अर्धपोटी ठेवल्यामुळे जर का कोणत्याही प्राण्याचा मृत्यू झाला, तर त्या सांभाळणाऱ्या व्यक्तीला जबर दंड करावा. विशेषत: बछडे, वृद्ध गायी आणि आजारी प्राण्यांची मालकाने नीट काळजी घेतलीच पाहिजे.

स्थूल-अहिंसा-व्रताचे अतिचार वाचून, अनेक जैन अभ्यासकांनी

आश्चर्य व्यक्त केले आहे की, ही सर्व व्रते मूक प्राण्यांनाच विशेष लागू होतात आणि मनुष्यांचा विचार त्यात का केलेला नाही ? हे कोडे जर उलगडावयाचे असेल तर, अर्थशास्त्राच्या संबंधित विवेचनाची आपल्याला बहुमोल मदत होते. जैन श्रावकवर्ग हा मुख्यत: वैश्यवर्णीय होता आणि आजही आहे. कौटिल्याने ज्या चार विद्या सांगितल्या आहेत, त्यातील तिसरी विद्या आहे 'वार्ता'. कौटिल्य म्हणतो, '**कृषिपशुपाल्यवाणिज्या च वार्ता**' (अध्याय ४). अर्थात् शेती, पशुपालन आणि व्यापार या तिघांना वार्ता असे म्हणतात. तिसऱ्या अध्यायात कौटिल्य म्हणतो की, 'वैश्य हे या तीन साधनांनी उपजीविका करतात.' त्यामुळे साहजिकच पशुपालनासाठी बनविलेली नियमावली, जैन गृहस्थांसाठी महत्त्वाची ठरते. काळाच्या ओघात जैनांनी अनेक सामाजिक आणि धार्मिक कारणांनी, आपले लक्ष जास्तीत जास्त वाणिज्यावरच केंद्रित केले. अर्धमागधी ग्रंथात मात्र, शेती आणि पशुपालन या व्यवसायांनाही, समान महत्त्व दिलेले दिसते. काळाच्या ओघात जैनांचे व्यवसाय जरी बदलले तरी, त्यावेळी तयार झालेला श्रावकाचार तोच राहिला. अर्थातच कौटिल्याने नोंदविलेले पशुपालनाविषयीचे अतिचार, स्थूल-अहिंसा-व्रतात, अवशेषाच्या रूपाने तसेच राहिले. खरे सांगायचे तर कौटिल्याची 'अतिचारदण्ड' संकल्पना, जैनांना अहिंसेच्या सूक्ष्म पालनासाठी अतिशय उपयुक्त वाटली.

## दुसरे अणुव्रत : स्थूल-मृषावाद-विरमण

स्थूल-मृषावाद-विरमण-व्रताचे विवेचन दोन प्रकारे केलेले दिसते. सहसाअभ्याख्यान इ. पाच अतिचार, परंपरेने नोंदविले आहेत. उपासकदशा आणि आवश्यकसूत्रातून, त्यांचे दर्शन होते. या पाच अतिचारांपैकी पहिले चार, नीतिमत्तेच्या वैयक्तिक मूल्यांशी

निगडित आहेत. परंतु पाचवा अतिचार हा, सामाजिक दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरतो. त्याचे नाव आहे, 'कूटलेखकरण', अर्थात् खोटी कागदपत्रे बनविणे.

अर्थशास्त्राच्या ८० व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो, 'जे कोणी बनावट कागदपत्रे तयार करतील, त्यांना हद्दपारीची शिक्षा ठोठवावी'. ८६ व्या अध्यायात एक संपूर्ण परिच्छेद अशा लेखनिकासाठी आला आहे, की जो कागदपत्र बनविताना त्यातील वस्तुस्थिती बदलतो, शब्दावली बदलतो, काही नव्या गोष्टी त्यात टाकतो किंवा कागदपत्रांचा चुकीचा अन्वयार्थ काढतो. अशा प्रकारचे 'कूटलेख' तयार करणाऱ्याला आणि करविणाऱ्याला, जबर दंडाची शिक्षा दिली आहे. कौटिल्याने फसवाफसवीची लिखापढी करणाऱ्यांच्या, अनेक युक्त्या-प्रयुक्त्यांचा निर्देश आणि निषेध, याच अध्यायात केला आहे.

८९ व्या अध्यायात 'कन्याप्रक्रम' या शीर्षकाखाली, विवाहाच्या वेळी होणाऱ्या खोट्या गोष्टींवर, प्रकाश टाकला आहे. श्रावकाचारात 'कन्यालीक' या अतिचाराखाली, विवाहासंबंधीच्या अपलापांचा, चांगलाच समाचार घेतला आहे. पशूंच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात खोटेपणा करण्याच्या अतिचारास, जैनांनी 'गवालीक' असे म्हटले आहे. अर्थशास्त्राच्या ५०, ५१ आणि ५२ या अध्यायातील विवेचनात, पशुसंबंधींच्या व्यवहारातील खोटेपणाबद्दल, दंड वसूल करण्यास सांगितले आहे. जमिनीसंबंधीच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात खोटेपणा करणे म्हणजे श्रावकाचाराच्या दृष्टीने 'भूम्यलीक' होय. अर्थशास्त्राच्या ६४, ६५ व ६६ व्या अध्यायात, जमिनीसंबंधीच्या सर्व गुन्ह्यांची बारकाईने नोंद केली आहे. या अध्यायांमध्ये जंगम मालमत्ता, त्यांची खरेदीखते, चराऊ जमिनीबाबतची कागदपत्रे इ. जमिनीसंबंधीच्या अनेक गोष्टी, कौटिल्य विचारात घेतो. जैनांनी 'भूम्यलीक' या अतिचाराखाली, हे सर्व विषय संकलित केलेले दिसतात.

इतरांनी ठेव म्हणून ठेवलेल्या, धनाचा आणि वस्तूंचा अपहार करणे, म्हणजे 'न्यासापहार' होय. ८३ व्या अध्यायात कौटिल्य याविषयी खूप चर्चा करतो. तो म्हणतो, 'स्तेन-निधि-निक्षेप-आहारप्रयोग-गूढाजीविनामन्यतमं शङ्केतेति शङ्काभिग्रहः ।'

दुसऱ्या अणुव्रताच्या शेवटच्या अतिचारात जैनांनी 'कूटसाक्षी' अर्थात् शपथपूर्वक खोटी साक्ष देण्याचा निर्देश केला आहे. ८१ व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो, 'न्यायाध्यक्षांसमोर शपथपूर्वक खोटी साक्ष देणाऱ्यास, हद्दपारीची शिक्षा ठोठवावी'. त्याच अध्यायात 'कूट' आणि 'गूढ' या दोन शब्दांचा, वारंवार प्रयोग केलेला दिसतो. सर्व प्रकारच्या असत्य गोष्टींचा लेखाजोखा, या अध्यायात विस्तृतपणे मांडला आहे. नमुन्यादाखल काही कौटिल्यसूत्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- गूढजीविनं शङ्केत ।
- ग्रामकूटमध्यक्षं वा सत्री ब्रूयात् ।
- कृतकाभियुक्तो वा कूटसाक्षिणोऽभिज्ञाताऽनर्थवैपुल्येन आरभेत ।
- ते चेत्तथा कुर्युः 'कूटसाक्षिणः' इति प्रवस्येरन् ।
- कूटपणकारकाः, कूटरूपकारकं, कूटसुवर्णव्यवहारी इ.

सारांश काय तर, दुसऱ्या व तिसऱ्या अणुव्रतांच्या अतिचारात वापरलेला 'कूट' शब्द, अर्थशास्त्राच्या दृष्टीनेही तितकाच लक्षणीय ठरतो.

### तिसरे अणुव्रत : स्थूल-अदत्तादान-विरमण

'चोरी' या गुन्ह्याचा विचार, चाणक्याने एकूण सहा अध्यायात केला आहे (अध्याय क्र.७८,७९,८५,८६,८७,८८). ७८ व्या अध्यायाच्या शेवटी, एक लक्षणीय विधान केले आहे. वेगवेगळ्या व्यावसायिकांची, एक भली मोठी यादी दिली आहे. शेवटी म्हटले आहे की, ''आपण यांची गणना वस्तुतः चोरांमध्ये करू शकत नाही. पण

ते जवळ-जवळ चौर्यकर्मात सामील झाल्यासारखेच असतात. व्यापारी, उद्योग करणारे, कारागीर, भिक्षू, भाटचारण, गारुडी आणि मायाजालिक (जादूगार) या सर्वांवर बारकाईने नजर ठेवली पाहिजे.''

७९ व्या अध्यायाचे शीर्षक आहे, 'वैश्य आणि व्यापारीवर्गापासून प्रजेचे संरक्षण'. या अध्यायात जे तपशील दिले आहेत, त्यावरून हे लक्षात येते की, त्यातील अनेक गोष्टी, जैन गृहस्थाचारातील तिसऱ्या अणुव्रताशी, अतिशय मिळत्याजुळत्या आहेत.

- पहिला अतिचार आहे 'स्तेनाहृत' अर्थात् चोरीचा माल विकत घेणे. ८६ व्या अध्यायात याचा विविध अंगाने विचार केला असून, त्यासाठी जबरदस्त दंड किंवा प्रसंगी देहांताची शिक्षा ठोठावली आहे.
- 'तस्करप्रयोग' म्हणजे चोराला चोरीसाठी उत्तेजन देणे. याचा विचार ८८ व्या अध्यायात असून, चोराला निवासस्थान आणि अन्नपाणी देणाऱ्यास, जबर शिक्षा फर्माविली आहे.
- तिसरा अतिचार आहे 'विरुद्धराज्यातिक्रम' अर्थात् राजशासनाचे कर चुकविणे आणि राजशासनाविरुद्ध कट शिजविणे. या गुन्ह्याखाली येणाऱ्या अनेक गोष्टी ८८ व्या अध्यायात बारकाईने नोंदविल्या आहेत. हा गुन्हा करणाऱ्यांसाठी जाळून टाकण्याची किंवा जीभ बाहेर खेचून काढण्याची शिक्षा दिली आहे.
- चौथा अतिचार आहे 'कूटतुलाकूटमाप'. अर्थशास्त्राच्या ७९ व्या अध्यायात, खोटी वजनमापे तयार करणाऱ्यांना, अतिशय कठोर शिक्षा दिली आहे.
- 'प्रतिरूपकव्यवहार' या पाचव्या अतिचाराचे वर्णन, ८१ व्या अध्यायात विस्ताराने आले आहे. भेसळ करण्याचे आणि नकली माल बनविण्याचे, अनेक प्रकार-उपप्रकार, कौटिल्य या ८१ व्या अध्यायात देतो. शिवाय कोणकोणत्या गोष्टींमध्ये,

काय-काय भेसळ करण्याची शक्यता आहे, याचीही उदाहरणे देतो.

पहिले अणुव्रत आणि त्याचे अतिचार यांचे वर्णन, ज्याप्रमाणे विशेषेकरून पशुपालकांना लागू आहे, त्याप्रमाणे तिसरे अणुव्रत आणि त्याचे अतिचार यांचे वर्णन वैश्यांना लागू आहे. अर्थशास्त्राचा ७९ वा अध्याय, या दृष्टीने फारच महत्त्वाचा आहे.

### चौथे अणुव्रत : स्थूल-मैथुन-विरमण (स्वदारसंतोष)

अर्थशास्त्रातील ८९ व्या आणि ९० व्या अध्यायांमध्ये लैंगिक बाबींसंबंधी घडणारे गुन्हे नोंदविलेले आहेत. ८९ व्या अध्यायात अविवाहित महिलांविषयीचे अथवा कुमारिकांविषयीचे अपराध आणि त्यांच्यासंबंधीच्या शिक्षा यांचे विवेचन येते. बलात्कारासंबंधीचे गुन्हे ९० व्या अध्यायात येतात. अर्थशास्त्रातील हे विवेचन चौथ्या अणुव्रतातील अतिचारांच्या वर्णनाशी अनेकदा तंतोतंत शब्दश: जुळते. अणुव्रतांचे अतिचार पुढीलप्रमाणे आहेत —

- रखेलीबरोबर लैंगिक संबंध ठेवणे.
- अविवाहित स्त्री अगर विधवेबरोबर विवाहबाह्य लैंगिक संबंध ठेवणे.
- अनैसर्गिक आणि विकृत संभोग करणे, विशेषत: तिर्यंच आणि देवीदेवतांच्या प्रतिमांशी गैरकृत्ये करणे.
- विवाहित परस्त्रीविषयी लैंगिक सुखाची अभिलाषा ठेवणे.
- विवाह जमविताना दलालीची अपेक्षा करणे.

पुनरावृत्तीचा दोष पत्करून सुद्धा अर्थशास्त्राच्या ८९, ९० व्या अध्यायातील मुद्दे पुन्हा एकदा स्वतंत्रपणे नोंदविले आहेत. कारण त्यातील शब्दावलींचे साम्य थक्क करणारे आहे. कौटिल्याने पुढील गोष्टींना लैंगिक गुन्हे मानून कठोर शिक्षा ठोठावल्या आहेत —

- अविवाहित कन्येशी समागम.
- दुसऱ्याची पत्नी अथवा विधवेशी तिच्या संमतीशिवाय जबरी संभोग.
- वेश्यागृहाची मालकीण अथवा तिच्या कन्येशी तिच्या संमतीशिवाय संभोग.
- अनैसर्गिक अथवा विकृत लैंगिक संबंध.
- स्वत:च्या पत्नीशी बळजबरीने संभोग.
- पशुपक्ष्यांशी अनैसर्गिक संभोग.
- देवदेवतांच्या प्रतिमांशी अनैसर्गिक संभोग.

जैन आचारसंहितेत सर्वच गृहस्थांसाठी सप्तव्यसनांचा त्याग करावयास सांगितला आहे. त्यामध्येही वेश्यागमन तसेच परस्त्री/परपुरुष गमनाच्या त्यागाचा उल्लेख केला आहे. एकंदरीत, जैनांना ही जाणीव प्रखरतेने दिसते की, हे सर्व लैंगिक गुन्हे नीतिमत्तेच्या दृष्टीने तर अयोग्य आहेतच परंतु त्यात शासनाच्या आदेशाचे उल्लंघन असल्यामुळे सामाजिक दृष्ट्याही तो दंडपात्र अपराध आहे.

उपरोक्त जैन गृहस्थाचारासंबंधी अभ्यासकांनी जैनधर्माच्या स्वतंत्रतेच्या अनुषंगाने अनेकदा एक आक्षेप उपस्थित केलेला दिसतो. मुस्लीम किंवा ख्रिश्चन कायद्याप्रमाणे जैनांना त्यांची अशी स्वतंत्र आचारसंहिता दिसत नाही. त्यांना हिंदू लॉ कोड लागू होत असल्याने तो स्वतंत्र धर्म मानायचा का ? — असाही प्रश्न विचारला जातो. याला उत्तर असे आहे की, आपल्या इतर हिंदू बांधवांप्रमाणे जैन हे त्याच सामाजिक-सांस्कृतिक वातावरणात एकोप्याने रहात असल्यामुळे जैन आचार्यांना स्वतंत्र जैन कायद्याची आवश्यकता वाटली नसावी. उलट जैन कायदेतज्ज्ञांचे फार मोठे मोलाचे योगदान आहे की, त्यांनी समकालीन शासनाने घालून दिलेले कायदे आणि मर्यादा आपल्या दैनंदिन आचारव्यवहारात कौशल्याने समाविष्ट करून घेतल्या. हिंदू धर्मशास्त्रकारांनी सांगितलेला

गृहस्थधर्म किंवा बौद्धांचा पंचशीलांवर आधारलेला उपासकाचार या दोहोंपेक्षा कितीतरी अधिक सूक्ष्मतेने जैन गृहस्थाचार नोंदविलेला आहे. कोणत्याही प्रकारच्या जातिवर्णानुसार भेद न करता, जैनांनी कौटिलीय अर्थशास्त्रातील मुद्दे-उपमुद्दे ध्यानी घेऊन आपल्या गृहस्थाचाराची नीट मांडणी केलेली दिसते.

जैनांनी वापरलेला 'अतिचार' हा शब्द आणि कौटिल्याने योजलेला 'अतिचारण्ड' हा शब्द अतिशय बोलका असून, कौटिलीय अर्थशास्त्राचा त्यांच्या आचारसंहितेवरील परिणाम स्पष्ट करणारा आहे. अणुव्रतांच्या रूपाने जैनांनी शाश्वत नीतिमूल्यांना स्थान दिले आणि गुणव्रत-शिक्षाव्रतांच्या रूपाने त्यांच्या धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक आणि आचारप्रधान गोष्टींनाही पुरेसा वाव ठेवला.

## (२) जैन साधुआचार आणि कौटिलीय अर्थशास्त्र

भारतीय विद्यांचे अभ्यासक, सामान्यत: असे मत व्यक्त करतात की, भारतातील श्रमण परंपरा ही मुख्यत: निवृत्तिपर होती. ही गोष्ट जैन परंपरेला निश्चितच लागू पडते. ही परंपरा मुख्यत: वेदप्रामाण्य न मानणारी, कठोर तपस्येला व ध्यानाला महत्त्व देणारी आणि अध्यात्मवादी आहे. जैन परंपरेतील प्राचीन विचारवंतांचे आविष्कार, आचारांग, सूत्रकृतांग, भगवती, उत्तराध्ययन, आवश्यक आणि दशवैकालिक-या ग्रंथांत मुख्यत: आढळून येतात. साधुआचाराच्या दृष्टीने जैन साहित्याचा हा पहिला टप्पा आहे. याला आपण 'चाणक्यपूर्वयुग' असे म्हणू शकतो. साधु-आचाराच्या संदर्भातला दुसरा टप्पा आहे छेदसूत्रांच्या रचनेचा. प्रथम भद्रबाहुकृत निशीथ-कल्प-व्यवहारसूत्रे, अतिचार आणि प्रायश्चित्तांवर आधारित आहेत. ही सूत्रे प्राय: चाणक्य-समकालीन मानावयास हरकत नाहीत. या छेदसूत्रांवरील निर्युक्ति-भाष्ये-टीका आणि जैन शौरसेनीमधील मूलाचार-भगवती आराधना हे ग्रंथ साधु-आचाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असले तरी ते नक्की चाणक्योत्तर-काळातील आहेत. यावरून आपण या निष्कर्षाप्रत येतो की,

छेदसूत्रकार भद्रबाहु हे चंद्रगुप्त-चाणक्याचा इतिहास आणि कौटिलीय अर्थशास्त्राशी अतिशय जवळून संबंधित होते.

या सर्व पृष्ठभूमीवर आचारांग, उत्तराध्ययन, दशवैकालिक आणि निशीथ या ग्रंथांची मीमांसा, त्यांच्यावरील टीकासाहित्याच्या आधारे करणे, अतिशय लक्षणीय ठरते. शौरसेनी ग्रंथांमधील साधुआचार प्रामुख्याने, मूलगुण आणि उत्तरगुण यांच्या अनुषंगाने आलेला असून, अर्धमागधी ग्रंथातील साधुआचार मुख्यत: पाच महाव्रते, पाच समिति, तीन गुप्ति आणि दशविध-धर्मांच्या अंगाने आलेला दिसतो.

कौटिलीय अर्थशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात, साधुआचारातील सर्व बारकाव्यांची तपशीलवार मीमांसा करणे, जवळ-जवळ अशक्यप्राय आहे. तरीही प्रस्तुत ठिकाणी साधुआचारातील ठळक गोष्टींचा, काही उदाहरणे आणि निरीक्षणांसह, कौटिलीय अर्थशास्त्राशी असलेला संबंध, विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्थशास्त्रात कमीत कमी तीस वेळा, साधुवाचक विविध संज्ञांचा वापर केलेला दिसतो. ते शब्द पुढीलप्रमाणे—भिक्षु, साधु, परिव्राजक, सिद्ध, तापस, क्षपणक, मुनि, संन्यासी, पाषण्डी, मुण्डी, जटिल इ. यांची विभागणी कौटिल्याने, दोन प्रकारे केली आहे. काहींना तो ‘आश्रमवासी’ (आश्रमात वस्ती करणारे) म्हणतो. तर काहींना ‘चरपरिव्राजक’ (हिंडणारे साधू) असे म्हणतो. चाणक्यकालीन समाजात हा साधुवर्ग, इतक्या मोठ्या प्रमाणात होता की, चाणक्याला या सर्वांसाठी आचारसंहिता देणे क्रमप्राप्त होते.

(१) चाणक्य स्वत: कोणत्याही परंपरेचा असू दे, समाजातील सर्व प्रकारच्या साधूंविषयींचा त्याचा दृष्टिकोण एकंदरीत कडक आणि कठोर दिसतो. ७३ व्या अध्यायात चाणक्य स्पष्ट म्हणतो, ‘संन्याशांचे कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, क्षम्य मानले जाणार नाही. गुन्हा जरी संन्याशाने केला तरी, राजाच्या दृष्टीने तो

नक्कीच दंडपात्र ठरतो.'

आचारांगाच्या दुसऱ्या श्रुतस्कंधावर नजर टाकली तर असे दिसते की, पिण्डैषणा, शय्यैषणा, ईर्यैषणा, भाषैषणा, वस्त्रैषणा, पात्रैषणा, अवग्रहैषणा आणि उच्चारप्रसवणैषणा— या सर्वांच्या रूपाने जैन साधुआचाराने, या प्रत्येक बारीक गोष्टीतील विधि आणि निषेध, साक्षेपाने नोंदविले.

**(२)** आचारांगाचा दुसरा श्रुतस्कंध आणि दशवैकालिक, यांचा संबंध अतिशय निकटचा आहे. सामान्यत: असे दिसते की, दशवैकालिकातील प्राय: सर्व पद्यबद्ध आशय, आचारांग २ मधे, योग्य शीर्षके देऊन पद्धतशीरपणे गद्यात ग्रथित केला आहे. याचाच अर्थ असा की, आचारांग २ आणि दशवैकालिक हे दोन्ही ग्रंथ, चाणक्याचे भिक्षु-भिक्षुणीविषयक कडक नियम ध्यानात घेऊनच, आपली आचारावली बनवितात.

**(३)** साधू हे जरी धार्मिक आणि आध्यात्मिक साधना करणारे असले तरी, ते मुख्यत: देशाचे नागरिक असल्यामुळे, त्यांनी प्रजाजनांसाठी आखून दिलेल्या मर्यादेतच वर्तन करावे, अशी चाणक्याची अपेक्षा दिसते. राजाने प्रजेच्या सुस्थितीसाठी वेळोवेळी काढलेल्या आज्ञापत्रांना, कौटिल्याने 'शासन' असे संबोधले आहे. जिनांच्या आज्ञांना जैन आचार्यांनी, 'जिनशासन' असे संबोधले आहे. कायदे मोडणाऱ्यांसाठी अर्थशास्त्रात, ज्याप्रमाणे शिक्षा ठोठावल्या आहेत त्याप्रमाणे भिक्षु-भिक्षुणींसाठी घालून दिलेल्या नियमावलीचा, भंग करणाऱ्या भिक्षु-भिक्षुणींना, दहा प्रकारची प्रायश्चित्ते, दंडरूपाने सांगितली आहेत. निशीथ, कल्प आणि व्यवहार ही सूत्रे, प्रत्येक अतिचाराच्या प्रायश्चित्तांच्या वर्णनांनी भरलेली आहेत.

**(४)** अर्थशास्त्राच्या २२ व्या अध्यायात चाणक्य म्हणतो, 'जर एखाद्या व्यक्तीने

घरातल्या वडिलधाऱ्यांची अनुमती न घेता आणि कुटुंबाची भविष्यकालीन तरतूद न करता, गृहत्याग करून संन्यास स्वीकारला, तर त्याला जबरदस्त शिक्षा द्यावी.'

अंतकृद्दशेत कृष्ण वासुदेव घोषणा करतो की, 'जो कोणी या ऐहिक जीवनाचा त्याग करून, मुनिधर्मात प्रविष्ट होईल, त्याचा किंवा तिच्या कुटुंबाची भविष्यकालीन तरतूद, माझ्यातर्फे केली जाईल' (अंतकृद्दशा, वर्ग ५, पृ.१०३, ब्यावर). उत्तराध्ययनाच्या १४ व्या अध्ययनात असा प्रसंग रंगविला आहे की, दोन पुरोहितपुत्र आपल्या माता-पित्यांकडे, निर्ग्रंथ साधू बनण्याची अनुमती मागतात. माता-पिता त्यांना त्यांच्या वैवाहिक आणि कौटुंबिक कर्तव्यांची, वारंवार जाणीव करून देऊन, निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. ज्ञाताधर्मकथेच्या पहिल्या अध्ययनातही, मेघकुमाराबाबत हीच गोष्ट घडलेली दिसते.

**(५)** अर्थशास्त्राच्या ७७ व्या अध्यायात असे नमूद केले आहे की, 'जो कोणी घरातील देवकार्यात अथवा पितृकार्यात, जैन अथवा बौद्ध भिक्षूंना तसेच शूद्र व्यक्तींना, घरी आमंत्रित करेल, त्याला राजा कठोर शासन करेल.'

आचारांगात भिक्षु-भिक्षुणींसाठी, कोणत्याही प्रकारच्या सामूहिक भोजनाचा (संखडीचा), स्पष्ट शब्दात निषेध नोंदविला आहे —

**से भिक्खू वा भिक्खुणी वा --- इंदमहेसु वा खंदमहेसु वा --- तहप्पगारे महामहेसु वट्टमाणेसु --- असणं वा पाणं वा --- णो पडिगाहेज्जा ।**

(आचारांग २.१.२, पृ.२२, ब्यावर)

संखडीत भोजन करणाऱ्या साधु-साध्वीला निशीथसूत्रात मासिक उपवासाचे

प्रायश्चित्त दिले आहे. म्हटले आहे की —

**जे भिक्खू --- संखडिपलोयणाए असणं वा पाणं वा पडिग्गाहेइ --- तं सेवमाणे आवज्जइ मासियं परिहारट्ठाणं उग्घाइयं ।** (निशीथ, उद्देश ३, सूत्र १४)

एखाद्या गोष्टीची राजाने अथवा गणाने, साधूंवर बळजबरी केली तर तो अपवाद समजून, त्यासाठी प्रायश्चित्त देऊ नये, असाही एक व्यावहारिक विचार निशीथसूत्रात आलेला दिसतो —

**नन्नत्थरायाभिओगेण वा गणाभिओगेण वा बलाभिओगेण वा ।** (निशीथ, उद्देश ९)

एकंदरीत साधुआचाराची रचना करताना, जैनांनी राजसत्ताक राजांचे आणि गणसत्ताक राज्यांचे नियम, नीट ध्यानात घेतलेले दिसतात.

**(६)** ७३ व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो, 'मठ इ. निवासस्थानांमध्ये आश्रमवासी आणि पाखंडी यांनी, प्राथम्यक्रमानुसार आळी-पाळीने रहावे. या दोघांपैकी जे एकमेकांना उपद्रव देतील, त्यांचे वर्तन दंडपात्र ठरेल.'

आचारांग एक पाऊल पुढे जाऊन म्हणते की, 'ज्या वसतिस्थानी प्रवासी, इतर परिव्राजक यांचे सतत आवागमन चालू असते, अशा मठ इ. स्थानात जैन साधु-साध्वीने मुक्काम करू नये.'

**से आगंतागारेसु वा, आरामागारेसु वा, गाहावइकुलेसु वा, परियावसहेसु वा, अभिक्खण अभिक्खण साहम्मिएहिं उवयमाणेहिं णो उवइज्जा ।** (आचारांग २, उद्देश २)

**(७)** अर्थशास्त्राच्या ५७ व्या अध्यायात, अयोग्य जागी मलमूत्रविसर्जन करणाऱ्या व्यक्तीस, खूप मोठा दंड सांगितला आहे.

आचारांग २ चा संपूर्ण १० वा अध्याय, याच विषयाला अनुलक्षून लिहिला आहे. जैन आचारपद्धतीनुसार, मन-वचन-क्रियेच्या उचित क्रियांना

'समिति' असे म्हणतात. साधूने उच्चारप्रस्रवणसमितीचे पालन करीत असताना, प्रासुक स्थंडिलावरच मलमूत्रविसर्जन करावे, असा नियम नोंदविला आहे. आचारांगात म्हटले आहे की —

**से भिक्खू वा भिक्खुणी वा --- तहप्पगारंसि थंडिलंसि अचित्तंसि तओ संजयामेव उच्चारपासवणं परिट्ठविज्जा ।** (आचारांग २.१०, पृ.२५९, ब्यावर)

उत्तराध्ययनाच्या २२ व्या आणि २४ व्या अध्ययनातही, कोणत्या जागी मलमूत्रविसर्जन करणे टाळावे, अशा ठिकाणांची एक यादीच दिलेली आहे.

**(८)** दहा सद्गुणांचे वाचक असलेल्या दशविध धर्माचे पालन करणे, हा जैन साधुआचारातील एक महत्त्वाचा मुद्दा मानला जातो. तत्त्वार्थसूत्र ९.६ मध्ये जे दशविधधर्म सांगितले आहेत, ते प्रामुख्याने धार्मिक आणि आध्यात्मिक आहेत. स्थानांगसूत्रातील दशविधधर्म हे मुख्यत: सामाजिक परिप्रेक्ष्यातून सांगितलेले दिसतात. स्थानांग १०.१३५ मध्ये म्हटले आहे की —

**दसविहे धम्मे पण्णत्ते, तं जहा – गामधम्मे, णगरधम्मे, रट्ठधम्मे, पासंडधम्मे, कुलधम्मे, गणधम्मे, संघधम्मे, सुयधम्मे, चरित्तधम्मे, अत्थिकायधम्मे ।**

(स्थानांग १०.१३५)

वरील दहा धर्मांपैकी पहिले सात धर्म, सामाजिक दृष्टीने अन्वर्थक आहेत. स्थानांगाने स्थविर (थेर) शब्दाचे जे अनेक अर्थ दिले आहेत, त्यात खेडेगाव, नगर किंवा राज्याच्या प्रमुखासही, स्थविर असे संबोधले आहे. शिवाय दीक्षापर्यायाने उत्तम असलेल्या साधूलाही, स्थविर असे म्हटले आहे. वर दिलेल्या दशविधधर्मातील 'कुल', 'गण' आणि 'संघ' या तीनही शब्दांचे अर्थ, जैनधर्माइतकेच अर्थशास्त्राच्या संदर्भातही अतिशय महत्त्वपूर्ण ठरतात.

**(९)** अर्थशास्त्राच्या २० व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो, 'अंत:पुरातील स्त्रीवर्गाने,

मुंडी अथवा जटिल तापसांचा आणि मांत्रिक, गारुडी इ.चा, संपर्क कटाक्षाने टाळावा.'

याबाबत निशीथसूत्रातील एका विशिष्ट नियमाचे स्मरण होते. तो नियम असा —

**जे भिक्खू रायपिंडं गेण्हइ गेण्हंतं वा साइज्जइ --- तं सेवमाणे आवज्जइ चाउम्मासियं परिहारट्ठाणं अणुग्घाइयं ।** (निशीथ उद्देश ९, पृ.१८१, ब्यावर)

अंत:पुराबाबतची चाणक्याची कडक नियमावली लक्षात घेऊन, जैन आचार्यांनी असाच सामान्य नियम शोधून काढला की, 'इतर निमित्ताने तर राहूच द्या पण भिक्षा मागण्यासाठी सुद्धा राजवाड्याच्या आसपास जाऊ नये.'

अर्थशास्त्राच्या १५ व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो, 'श्रोत्रिय ब्राह्मण वगळता दुसरी कोणतीही व्यक्ती, वार्षिक श्राद्धाच्या प्रसंगी भोजनास योग्य नसते.' या कारणाने बहुधा निशीथसूत्रात साधूंसाठी, सर्व प्रकारच्या अग्रपिंडाचा त्याग करावयास सांगितला आहे. (निशीथ, उद्देश २, सूत्र ३२) टीकाकारांनी अग्रपिंड शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना श्राद्धभोजन, यज्ञक्रियाभोजन, देवताप्रीत्यर्थ नैवेद्य इ. अनेक गोष्टींचा समावेश केला आहे. जैन तत्त्वज्ञानाच्या आणि आचाराच्या दोन्ही दृष्टींनी, अशा प्रकारचे भोजन साधु-साध्वींना केव्हाही कल्पत नाही.

**(१०)** अब्रुनुकसानी करणे आणि शिव्याशाप देणे, या अपराधांचा विचार अर्थशास्त्राच्या ७५ व्या अध्यायात केला आहे. दोषी गुन्हेगारास कारावासाची अथवा जबर

दंडाची शिक्षा ठोठावली आहे. निंदा करणे, तिरस्कारयुक्त भाषा वापरणे, त्वेषाने अंगावर धावून जाणे, एखाद्याचा धर्म-संप्रदाय-जात-वंश-गोत्र अथवा राष्ट्र याबद्दल अनुदार उद्गार काढणे, एखाद्याच्या जवळच्या नातेवाईकांबद्दल शिव्याशाप देणे, हेतुपुरस्सर टोमणे मारणे, एखाद्याला त्याच्या व्यवसायावरून खिजविणे, निंदाव्यंजक अपशब्द उच्चारणे, शस्त्र दाखवून धमकावणे, हात उगारणे, अंगुलिनिर्देश करून चिडविणे, एखाद्याच्या शारीरिक व्यंगाचा उपहासपूर्वक उल्लेख करणे, एखाद्याला कुटुंब अगर समाजासमोर लज्जेने मान खाली घालावयास लावणे, घडून गेलेल्या अनुचित कृतींचे समर्थन करणे इत्यादि शेकडो उदाहरणे या बाबतीत दिली आहेत. गुन्ह्याच्या स्वरूपानुसार कमीजास्त प्रमाणात दंड अगर शारीरिक शिक्षा दिल्या आहेत. जैन साधुआचारात 'भाषैषणा' नावाचे स्वतंत्र प्रकरण आचारविषयक ग्रंथात साक्षेपाने नोंदविलेले दिसते. त्यातील सर्व गोष्टींचे अर्थशास्त्राच्या ७५ व्या अध्यायाशी असलेले साम्य बघून आपण खरोखर स्तिमित होतो.

आचारांग (२), उत्तराध्ययन आणि दशवैकालिक या ग्रंथांत साधूंच्या संदर्भात भाषासमिति आणि वचनगुप्तीचा विचार अतिशय सूक्ष्मतेने केला आहे. यांची भाषा अर्धमागधी असली तरी त्याचा आशय मात्र अर्थशास्त्राशी अतिशय मिळताजुळता आहे. आचारांगात म्हटले आहे की,

**से भिक्खू वा भिक्खुणी वा --- तहप्पगारं भासं सावज्जं सकिरियं कक्कसं कडुयं णिट्ठुरं फरुसं अण्हयकरिं छेयणकरिं भेयणकरिं --- भासं णो भासिज्जा ।**

(आचारांग २.४.१, पृ.१८१-१८२, ब्यावर)

अर्थात् अर्थशास्त्राप्रमाणेच येथेही सावद्य, सक्रिय, कर्कश, कटुक, निष्ठुर, परुष, आस्रवकरी, छेदनकरी आणि भेदनकरी अशा भाषेचा निषेध केला आहे.

आचारांग आणि दशवैकालिक दोहोंतही विशेषत्वाने नमूद केले आहे की, व्यक्तीच्या हीन सामाजिक दर्जाचे प्रदर्शन करणारे निंदाव्यंजक आणि अपमानास्पद वचन कोणाच्याही संबोधनासाठी वापरू नये. जसे —

**से भिक्खू वा भिक्खुणी वा --- णो एवं वइज्जा - होले त्ति, गोले त्ति वा, वसुले त्ति वा कुपक्खे त्ति वा, घडदासे त्ति वा, साणे त्ति वा, तेणे त्ति वा ।**

(आचारांग २.४.१, पृ.१८१-१८२, ब्यावर)

दशवैकालिकाच्या ७.१२ या गाथेवरून असा बोध होतो की, साधु-साध्वीने कोणाही व्यक्तीचा कधीही त्याच्या शारीरिक व्यंगावरून हिणवू नये. म्हटले आहे की,

**तहेव काणं काणे त्ति , पंडगं पंडगे त्ति वा ।**
**वाहियं वा वि रोगि त्ति , तेणं चोरेत्ति णो वए ।।**

उत्तराध्ययनाने आणखी एक पाऊल पुढे टाकून असे म्हटले आहे की, कोणत्याही प्रकारचे चांगले अथवा वाईट अन्न भिक्षेत प्राप्त झाले तरी साधूने त्या अन्नाची स्तुती अथवा निंदा करू नये. कारण त्यायोगे गर्व आणि लज्जा असे भाव देणाऱ्यामध्ये किंवा घेणाऱ्यामध्ये उत्पन्न होतात.

**(११)** सरोवर, नदी अथवा समुद्र ओलांडून जाण्यासंबंधीचे नियम अर्थशास्त्राच्या ४९ व्या अध्यायात आले आहेत. त्या अध्यायाचे नाव आहे ‘नावाध्यक्ष’. कौटिल्याने या अध्यायात होडीतून अथवा जहाजातून जलमार्गाने प्रवास करण्याविषयीचे

अनेक नियम दिले आहेत. बंदरे, मालावरील जकात आणि कर तसेच जलप्रवासाचे परवाने याविषयी कौटिल्य विस्ताराने आचारसंहिता नमूद करतो. तो म्हणतो, 'ब्राह्मण, पाषंडी, भिक्षु, लहान मुले, वृद्ध आणि आजारी माणसे, गर्भवती स्त्रिया आणि राजदूत या सर्वांना जलप्रवासाचे परवाने विनामूल्य द्यावेत.' भावार्थ असा की, परवाना बाळगणे सर्वांना अत्यावश्यक होते. काहींना ते 'सशुल्क' होते तर काहींना ते 'नि:शुल्क' होते.

जैन साधुआचाराच्या चौकटीत नाव अगर जहाजाने केलेला प्रवास ईर्यासमितीच्या अंतर्गत येतो. निशीथसूत्राच्या १२ व्या उद्देशकात हा विषय विस्ताराने चर्चिला आहे. त्यासाठी एकूण ४७ भाष्यगाथा खर्ची घातल्या आहेत. (गाथा क्र.४२०८ ते ४२५५) पाच महानद्यांचा उल्लेख वैशिष्ट्यपूर्ण आहे. तेथेच अंग, वंग, कलिंग आणि पंजाब या प्रदेशांचे उल्लेख आहेत. निशीथभाष्यातील वरील उल्लेखावरून असे दिसते की, इसवी सनाच्या पाचव्या-सहाव्या शतकात जैन साधु-साध्वींना नौकेने विहार करणे कल्पत असावे. निशीथसूत्र ३.१२ मध्ये म्हटले आहे की, 'भिक्षु-भिक्षुणींना नदी ओलांडणे निषिद्ध नाही. परंतु जर एका महिन्यात त्यांनी दोन-तीन वेळा जास्त नदी ओलांडली तर त्यांना विशिष्ट उपवास करण्याचे प्रायश्चित्त घ्यावे लागेल.'

समवायांगाच्या २१ व्या प्रकरणात म्हटले आहे की, साधु-साध्वी महिन्यातून एकदा नदी ओलांडू शकतात. नावागमनाचे उल्लेख आचारांग आणि उत्तराध्ययनात सुद्धा विपुल प्रमाणात आढळतात. (आचारांग २.३.१, पृ.१५६, ब्यावर; उत्तराध्ययन ३६.५०-५४) छेदसूत्रांच्या काळात जरी साधूंसाठी जलमार्गाने केलेला प्रवास निषिद्ध नसला तरी सांप्रत काळात मात्र जैन साधु-साध्वी कटाक्षाने

पायीच विहार करतात. नावेचा अगर जहाजाचा वापर करीत नाहीत.

**साधुआचारावरील निरीक्षणे**

- कौटिल्याने अर्थशास्त्रात नमूद केलेले वर्तनाचे अनेक कायदे आणि नियम जैन साधुआचारात कौशल्याने गुंफलेले दिसतात.
- आचारांग (२) मधील आठ एषणांवर नजर टाकली असता असे दिसते की, सामान्य नागरिकशास्त्राचे प्राय: सर्व नियम साधुआचारात या ना त्या रूपाने समाविष्ट केलेले आहेत.
- राजा किंवा त्यांच्या उच्च अधिकाऱ्यांशी होता होईतो जवळिकीचे संबंध टाळले आहेत.
- जैनेतर साधुवर्गाशी उद्‌भवणाऱ्या कलहप्रसंगांना बगल देण्यास सांगितले आहे.
- हेर किंवा दूत म्हणून साधु-साध्वींनी राज्यासाठी काम करावे अशी अपेक्षा कौटिल्य व्यक्त करतो. अनेकदा पाषण्डांचा वेष धारण करून हेरगिरी करावयास सांगतो. सामान्यत: जैन साधुवर्ग कितीही सामोपचाराने घेणारा असला तरी याबाबतीत मात्र त्यांनी तडजोड केलेली दिसत नाही. ते इतके व्यवहारी आहेत की हेर, दूत किंवा खबऱ्या म्हणून राजाने अथवा गणाने जर त्यांच्यावर त्या कामाची बळजबरी केली तर त्यांना अपवादस्वरूप मानून प्रायश्चितांमधूनही सूट दिलेली दिसते.
- कौटिल्याची न्यायबुद्धी कितीही मान्य केली तरी हे तथ्य मात्र स्वीकारावेच लागते की, श्रोत्रिय ब्राह्मणाविषयी त्याच्या भावना मृदू आहेत. पाषण्डांविषयी मात्र त्याच्या भावना कठोर आहेत.

- पुरोहितवर्ग, वेदविद्या, यज्ञकर्म, अथर्ववेद, उञ्छवृत्ती, दक्षिणा, आश्रमवासी, देवोत्सव, पितृकार्य, शांतिकर्म—या आणि अशा इतर उल्लेखांवरून स्पष्ट दिसून येते की, तो ब्राह्मणाभिमानी आहे. असा कौटिल्य ऊर्फ चाणक्य कदापिही जैन श्रावक अथवा साधू बनणे शक्य दिसत नाही. तात्पर्य काय तर, कौटिल्यावर लादलेले जैनत्व नक्कीच वरवरचे आहे.
- साधुआचाराचे विवरण करणाऱ्या जैन ग्रंथांत चाणक्याविषयीच्या अनेक आख्यायिकांना स्थान देऊन, जैन आचार्यांनी त्याचे कडक शासन, नि:स्वार्थ सेवा, सर्वसमावेशक दृष्टी आणि उदात्त मरणाचा गौरव केलेला दिसतो.
- अर्थशास्त्राच्या १४५ व्या अध्यायात कौटिल्य म्हणतो की, 'चातुर्मासातील विशिष्ट १५ दिवस राज्यात सर्वत्र पूर्ण अहिंसेचे पालन करावे.' कौटिलीय अर्थशास्त्राच्या शेवटी परंपरेने जी चाणक्यसूत्रे उद्धृत करण्यात येतात, त्यात म्हटले आहे की, '**अहिंसालक्षणो धर्म:**'.

कौटिल्याच्या ह्या वैश्विक नीतिमूल्यात्मक दृष्टीमुळेच, जैन आचार्यांना कौटिल्याच्या व्यक्तिमत्वाविषयी अखंड आकर्षण वाटले असावे हे निश्चित !

◆◆◆

## प्रकरण ६

# उपसंहार

# प्रकरण ६

# उपसंहार

ब्राह्मण अथवा हिंदू परंपरेत चित्रित केलेल्या चाणक्य ऊर्फ कौटिल्याच्या पार्श्वभूमीवर आपण आत्तापर्यंत जैनांनी जपलेल्या चाणक्याचा सुविस्तृत आढावा घेतला. त्या त्या प्रकरणात त्या त्या ठिकाणी तौलनिक निरीक्षणेही अत्यंत साक्षेपाने नोंदविली. या सर्व शोधयात्रेमध्ये अनेक विचारतरंग मनात उमटून गेले. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये एकत्रित केलेले विचारउन्मेष, शोभादर्शकाचा कोन बदलून, पुन्हा त्याच काचा नव्याने बघाव्यात त्याप्रमाणे उपसंहारात नोंदविले आहेत. यामुळे जैनांनी जपलेल्या चाणक्याची वैशिष्ट्ये सोळा मुद्यांच्या सहाय्याने पुन्हा एकदा भरीवपणे नजरेत भरतील.

## (१) विविधांगी पद्धतीचा वापर

कोणत्याही एका वस्तूकडे, व्यक्तीकडे अथवा घटनेकडे एकाच दृष्टिकोणातून न बघता, विविध अंगांनी त्यावर प्रकाश टाकला की, एक वस्तुस्थिती प्रामुख्याने नजरेत भरते. कोणतीही सद्-वस्तू कूटस्थ नित्य नसून, काही अंशांनी स्थिर तर काही अंशांनी परिवर्तनशील असते. जैन परिभाषेत यालाच 'द्रव्यत्वाने स्थिर' आणि 'पर्यायत्वाने परिवर्तनशील' मानले जाते. हेच तथ्य सैद्धांतिक दृष्टीने 'अनेकांतवाद' असे संबोधले जाते. जैनांनी विशेष विकसित केलेले हे पद्धतिशास्त्र, जैनांनी जपलेल्या चाणक्याला लावले तर ते अधिक अन्वर्थक होईल, असे वाटल्यामुळे अशी विविधांगी विचारपद्धती हे पुस्तक तयार करीत असताना उपयोजित केली.

प्रथमत: हिंदू संदर्भ नोंदविले. त्यानंतर जैन संदर्भांपैकी श्वेतांबर आणि दिगंबर संदर्भ जसे आहेत तसे नमूद केले. त्या सर्वांची कालक्रमाने जुळणी केल्यावर कथाभागांमध्ये खोलवर शिरून, त्यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. भाषांतर, अन्वयार्थ आणि निरीक्षणे देताना, तौलनिक दृष्टिकोणही नजरेआड केला नाही. यानंतर सर्व सुटे सुटे कथाभाग एकत्र करून, त्याला थोडी कल्पनारम्यतेची जोड देऊन, सलग चाणक्यचरित्र लिहून काढले. त्यावेळी फक्त 'रंजकता' हाच निकष डोळ्यासमोर ठेवला.

चाणक्याचे सलग रेखीव चरित्र ब्राह्मण परंपरेत उपलब्ध नसले तरी कौटिलीय अर्थशास्त्र ही त्याची अजरामर कृती उपलब्ध असल्याने, ती नजरेसमोर ठेवून, पुन्हा एकदा जैन साहित्यातील चाणक्याचा धांडोळा घेतला. हे करीत असताना तेच जैन साहित्य पुन्हा एकदा नव्याने निखरून नजरेसमोर आले. कौटिलीय अर्थशास्त्राचा अभ्यास करताना, त्यातील सूत्रांमध्ये बद्ध असलेली अर्थशास्त्रीय आणि राजनैतिक तथ्ये न पाहता, त्यातील सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक तपशिलांवर अधिक भर दिला. याचा फायदा असा झाला की, कौटिलीय अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी आजवर नजरेस

आणून न दिलेले, जैन परंपरेतील अनेक दुवे सांधून दाखवता आले. सारांश, अभ्यासाच्या विविधांगी पद्धतीने जैनांचा चाणक्य तर समजलाच परंतु कौटिलीय अर्थशास्त्रातील काही भागही जैन परिप्रेक्ष्यात उलगडत गेले.

## (२) अर्थशास्त्र आणि जैन साहित्याचा मगधाशी असलेला संबंध

प्राचीन भारताचा ज्ञात प्रमाणित इतिहास मुख्यत: मगध प्रांताशी संबंधित आहे. मगधात जी काही साहित्यनिर्मिती झाली त्यामध्ये कौटिलीय अर्थशास्त्र हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा मानला जातो. द्वादशवर्षीय दुष्काळानंतर अर्धमागधी आगमांची जी पहिली वाचना झाली ती चंद्रगुप्त मौर्याच्या राजवटीत पाटलिपुत्र येथे झाली, असे जैन इतिहासात नोंदविलेले आहे. भगवान महावीरांच्या पूर्वी आणि नंतर होऊन गेलेल्या मगधातील राजवंशांचा इतिहास जैन ग्रंथात साक्षेपाने नोंदविलेला आहे. राजा प्रसेनजित-श्रेणिक (बिंबिसार)-कोणिक (अजातशत्रू)-उदायी-नवनंद-चंद्रगुप्त (मौर्य)-बिंदुसार-अशोक-कुणाल आणि सम्प्रति — अशी वंशावली त्यांच्या राजवटीतील अनेक घटनांसह जैन कथाग्रंथ आणि प्रबंधग्रंथांत नमूद केलेली आहे. नवव्या नंदाचा अमात्य जो शकटाल तो प्रख्यात जैन आचार्य जे स्थूलभद्र त्यांचा पिता होता. स्थूलभद्रांच्या अध्यक्षतेखालील अर्धमागधी आगमांची वाचना पाटलिपुत्रात झाली. याच कारणाने या आगमांमध्ये प्रतिबिंबित झालेली राजनैतिक, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती साहजिकच समकालीन मगधाच्या इतिहासावर प्रकाश टाकते.

## (३) जैनांच्या प्राचीन चाणक्यकथा प्राकृतात का आहेत ?

श्रमण परंपरेचा उद्‌गम आणि विकास मगधाशी संबंधित आहे. प्रथमपासूनच श्रमण परंपरेचा मुख्य भर जनसामान्यांच्या बोलीभाषेवर असलेला दिसतो. याच कारणामुळे

भगवान बुद्धांचे उपदेश पालीभाषेत तर भगवान महावीरांचे उपदेश अर्धमागधी भाषेत आढळतात. जैन आगमांचे प्रथम संस्करण पाटलिपुत्रातच होणे अनिवार्य ठरते. छेदसूत्रकार भद्रबाहूंनी साधुआचाराची नियमावली देखील मौर्यांच्याच राजवटीत लिपिबद्ध केली. मूलसूत्रे आणि आवश्यकसूत्रेही या प्रदेशातच वारंवार परिष्कृत झाली.

जैनांचे प्रारंभिक टीकासाहित्य आर्ष प्राकृतात आहे. आजूबाजूच्या वातावरणात प्रचलित असलेल्या दंतकथा आणि आख्यायिका वेळोवेळी या टीकासाहित्यात समाविष्ट होत राहिल्या. त्यावेळी वातावरणात चाणक्याविषयीचा भीतियुक्त आदर आणि त्याच्या कडक अनुशासनाची ख्याती प्रचलित होती. जैन आचार्यांनी भगवान महावीरांचे भाषिक अनुकरण करून आपले साहित्य वेळोवेळी अर्धमागधी, शौरसेनी आणि महाराष्ट्री या प्राकृत भाषांमध्ये शब्दबद्ध केले. मौखिक परंपरेने चालत आलेला आख्यायिकांचा खजिनाही त्यांनी प्राकृतात आणला.

गुणाढ्याने पैशाची भाषेत लिहिलेली 'बड्डकहा' जैनांना भाषिक साम्यामुळे खूप आपलीशी वाटली. त्याच धर्तीवर त्यांनी 'वसुदेवहिंडी' या महाकाय कथासंग्रहाची निर्मिती केली. प्राकृत भाषांच्या एवढ्या साऱ्या पृष्ठभूमीवर पारंपरिक चाणक्यकथाही काळानुसार वाढत गेल्या. वेळोवेळी त्या कल्पनाविलासाने आणि जैनीकरणाच्या प्रवृत्तीमुळे वृद्धिंगत होत राहिल्या. आपल्या टीकासाहित्यात जैन आचार्यांनी उदाहरणादाखल चाणक्यकथांची कौशल्याने गुंफण केली. हे जैन आचार्यांचे योगदान लक्षणीय मानावे लागते.

कौटिलीय अर्थशास्त्रात आढळून येणाऱ्या संकरित संस्कृत शब्दांचा आणि देशी शब्दांचा शोध, जैनांच्या आवश्यक आणि निशीथचूर्णींच्या आधारे चांगल्या प्रकारे घेता येतो.

## (४) जैन साहित्यातील सर्वात प्राचीन चाणक्यविषयक संदर्भ

श्वेतांबरांचा 'अनुयोगद्वार' हा इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकातील ग्रंथ आहे. श्वेतांबर ग्रंथातील चाणक्यविषयक सर्वात प्राचीन उल्लेख अनुयोगद्वारात आढळतो. चाणक्याचा सर्वात जुना दिगंबर संदर्भ 'भगवती-आराधना' (इ.स.दुसरे-तिसरे शतक) या ग्रंथात आढळतो. दोन्हींमधल्या संदर्भांचे विषय मात्र वेगवेगळे आहेत. अनुयोगद्वाराने कौटिल्यक शास्त्राला 'मिथ्याशास्त्र' म्हटले आहे. तर दिगंबरांनी आपल्या पहिल्याच संदर्भात चाणक्याच्या धीरोदात्त स्वेच्छामरणाबाबत त्याची स्तुती केली आहे. अनुयोगद्वारामुळे कौटिल्याच्या अजैन असण्यावर स्पष्ट प्रकाश पडतो तर भगवती-आराधना चाणक्याच्या निर्लिप्त निरासक्त जीवनावर बोलके भाष्य करते.

## (५) नंदीकाराची अर्थशास्त्राकडे पाहण्याची दृष्टी

नंदीकार देववाचकगणींनी अनुयोगद्वारापेक्षा एक पाऊल पुढे टाकले. मिथ्याश्रुतांची गणना केल्यानंतर अखेरीस ते म्हणतात की, 'जर आपला दृष्टिकोण यथायोग्य अर्थात् सम्यक् असेल तर मिथ्याश्रुत सुद्धा सम्यक्-श्रुत ठरू शकते.' देववाचकगणींनी ही धारणा स्पष्ट केल्यानंतर इसवी सनाच्या सहाव्या-सातव्या शतकात आणि त्यानंतर लिहिलेल्या जैन साहित्यात त्याची योग्य प्रतिक्रिया उमटू लागली. जैन परंपरेत कौटिलीय अर्थशास्त्राचा अभ्यास होऊ लागला आणि टीकासाहित्यातही चाणक्यविषयक कथांना आणि दृष्टांतांना वाव मिळू लागला. या बदलत्या दृष्टिकोणाचे फलस्वरूप म्हणून जैनांनी जैन महाराष्ट्री, जैन शौरसेनी आणि संस्कृत साहित्यात चाणक्यकथा चांगल्याच जपल्या.

## (६) श्वेतांबर साहित्यात चाणक्य-संदर्भांचा कमी-अधिक विस्तार

उपलब्ध श्वेतांबर साहित्यात सुमारे ५० चाणक्यविषयक संदर्भ मिळाले. काही

ठिकाणी नुसता नामनिर्देश दिसला. काहींनी दोन-तीन ओळीत एखादाच प्रसंग चित्रित केलेला दिसला. चूर्णींमध्ये काही ठिकाणी प्राकृत गद्यात सलग चरित्र तर काही ठिकाणी सुटे प्रसंग दिसले. उपदेशपदटीकेत आणि उपदेशमालाटीकेत २००-२५० प्राकृत गाथांमध्ये संपूर्ण चाणक्यचरित्र आढळले. हेमचंद्राने अखेरीस संस्कृतात चाणक्यकथेचे संपूर्ण संकलन रसाळ पद्धतीने केलेले दिसले. श्वेतांबरांनी चढत्या क्रमाने जपलेला हा चाणक्याचा आलेख अभ्यासकास खूपच रंजक वाटतो.

### (७) श्वेतांबर आणि दिगंबर चाणक्य : एक तौलनिक दृष्टिक्षेप

दिगंबरांनी चाणक्याचा आदर मुख्यत: त्याच्या धीरगंभीर स्वेच्छामरणामुळे केलेला दिसतो. संदर्भांची संख्या पाहता, श्वेतांबरांच्या तुलनेत दिगंबर संदर्भ एक तृतीयांश आहेत. चाणक्याचे चरित्र रंगविताना दिगंबरांनी चंद्रगुप्त मौर्याच्या चरित्राकडे जवळजवळ दुर्लक्ष केलेले दिसते. ते चाणक्याला 'राजर्षि' म्हणणे पसंत करतात. अंतिमत: त्याला मुनिदीक्षा देऊन, ५०० साधूंच्या संघासह दक्षिणापथास पाठवितात. श्वेतांबर साहित्यात चाणक्यकथांची क्रमाने वृद्धी झालेली दिसते तर दिगंबरांवर हरिषेणाच्या चाणक्यमुनिकथेचा पूर्ण प्रभाव दिसतो.

दिगंबर आचार्य श्रीचंद्राचा, अपभ्रंश कथाकोषातील चाणक्य, हरिषेणाच्या चाणक्यापेक्षा अधिक वास्तविक आणि तर्कसुसंगत वाटतो. हरिषेणाने रंगविलेला जलदुर्गाचा प्रसंग यथायोग्य वाटत नाही. त्याच्या चरित्रात चाणक्य आणि चंद्रगुप्ताच्या पराक्रमावर आणि राजनैतिक कौशल्यांवर भर दिलेला दिसत नाही. चाणक्यमुनींचे क्रौंचपुरास झालेले गमन हे एक मोठे कोडेच वाटते. तो जन्माने दाक्षिणात्य असल्याचे सूचनही त्यातून होते. श्वेतांबर उल्लेखांमधील 'गोल्ल'देश हा खरोखरच गोदावरीच्या किनाऱ्यावरील असेल तर

त्याने अंतिम प्रसंगी जन्मगावी येणे स्वाभाविकही वाटू शकते. गेल्या शतकात अर्थशास्त्राची सापडलेली पहिली हस्तलिखिते तमिळ आणि मल्याळम् लिपीत असल्यामुळे या शंकेस थोडा दुजोराही मिळतो. परंतु चाणक्याचा मृत्यू पाटलिपुत्राजवळील 'गोकुळ' स्थानात झाला, याबाबत श्वेतांबरांचे एकमत दिसते.

## (८) श्वेतांबर साहित्यातील चाणक्यकथांची विविधता

वरील मुद्यात म्हटल्याप्रमाणे, हरिषेणाने लिहिलेली चाणक्यमुनिकथा दिगंबरांनी अतिशय प्रमाणित मानलेली दिसते. त्या तुलनेने श्वेतांबरांनी केलेली चाणक्याची मांडणी वेगवेगळ्या अंगांनी केलेली दिसते. श्वेतांबर साहित्यिक विविध संदर्भांच्या अनुषंगाने चाणक्यकथांची आणि प्रसंगांची निर्मिती करण्यासाठी खूपच उत्साहित दिसतात. कधी ते त्याला सर्वोत्कष्ट अनुभवसिद्ध बुद्धीचा आदर्श मानतात. विविध युक्त्यांनी राजकोष भरण्याच्या त्याच्या कौशल्याची तारीफ करतात. आदर्श गुरुशिष्याचे उदाहरण म्हणून नि:संदिग्धपणे चाणक्य-चंद्रगुप्ताची कथा लिहितात. त्याच्या कठोर नियमावलींची आणि अनुशासनाची जिनांच्या आज्ञेबरोबर तुलना करतात. सारांश, श्वेतांबरांचा चाणक्य खूपच आकर्षक भासतो.

## (९) जैन चाणक्यकथांमधील ऐतिहासिकता

प्रथमत: हे मान्यच करावे लागेल की, जैनांच्या चाणक्यकथांबाबत संपूर्ण ऐतिहासिकतेचा दावा करता येत नाही. या कथांचे चित्रण दोन प्रकारे केलेले दिसते. जनश्रुतीने चालत आलेल्या दंतकथा तर त्यांनी नोंदविल्या आहेतच परंतु कौटिलीय अर्थशास्त्राचा बारकाईने अभ्यास करून, त्यातील सकस कथाबीजेही चाणक्यकथांना

तर्कसुसंगतपणे उपयोजित केली आहेत. त्या कथांमधले सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन अर्थशास्त्राशी इतके मिळतेजुळते आहे की, 'जैन साहित्यिकांच्या कल्पनाविलासाचे आविष्कार', असे म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

## (१०) अर्थशास्त्र : जैन आचारावलीचा मूलस्रोत

आजच्या नागरिकशास्त्राच्या दृष्टीने, अर्थशास्त्रातील लक्षणीय भाग आहे तो म्हणजे नियम, गुन्हे, नियमभंग आणि त्यांना दिलेल्या शिक्षांचा. या पार्श्वभूमीवर जैन आचारातील नियमावलीचा सूक्ष्मतेने अभ्यास केला तर असे दिसते की, चाणक्याने सर्व प्रजेसाठी घालून दिलेले हे नियम जैनांच्या साधुआचारात आणि गृहस्थाचारात कौशल्याने गुंफलेले आहेत. विशेषत: अर्थशास्त्रातील वैश्यविषयक नियमावली आणि जैन गृहस्थांसाठी नोंदविलेले अणुव्रतांचे अतिचार यातील साम्य थक्क करणारे आहे.

श्वेतांबर अंगग्रंथ आणि मूलसूत्रे यातील साधुआचार मुख्यत: विधानात्मक आहे. पहिले भद्रबाहु हे चाणक्याला जवळजवळ समकालीन असल्यामुळे त्यांनी साधुआचारातील अतिचार आणि त्याबद्दलची तपस्यात्मक प्रायश्चित्ते आपल्या छेदसूत्रात जोडलेली आहेत. नंतरच्या काळात हे अत्यावश्यक मानले गेले की साधुसंतांचे नायकत्व करणाऱ्या आचार्यांनी छेदसूत्रांचा आणि प्रायश्चित्तांचा अभ्यास केलाच पाहिजे. शेवटी एक निरीक्षण नोंदवावेसे वाटते की, चाणक्याच्या आज्ञावलींनी परिष्कृत झालेला जैन साधुआचार आणि गृहस्थाचार शतकानुशतके तोच राहिला आहे. याउलट ब्राह्मण परंपरेतील गृहस्थाश्रम आणि संन्यासाश्रमांचे वर्णन मात्र वेळोवेळी परिवर्तित आणि परिवर्धित झालेले दिसते.

## (११) चाणक्य आणि त्याच्या अर्थशास्त्राकडे पाहण्याचा दृष्टिकोण

'अर्थशास्त्र' हा ग्रंथ ब्राह्मण परंपरेतील आहे याबाबत काहीच वाद नाही. तुलनेने

बराच उदारमतवादी, धार्मिकतेच्या पलीकडे नेणारा आणि शुद्ध राजनीतीची चर्चा करणारा असा हा ग्रंथ आहे. चाणक्याचा हा उदारमतवाद नंतरच्या धर्मशास्त्रकारांना आणि विशेषत: स्मृतिकारांना फारसा पसंत पडलेला नसावा. परिणामी ज्यावेळी चाणक्याविषयीचा आदरभाव हिंदू परंपरेतून लोप पावत चालला होता, त्याच वेळी जैन साहित्यातून चाणक्याविषयीची आदरणीयता अधिकाधिक वृद्धिंगत होत होती.

ब्राह्मण परंपरेने अर्थशास्त्राचे हस्तलिखित ब्राह्मी, शारदा अथवा ग्रंथलिपीत जपण्याची दक्षता घेतली नाही. जैनांनी मात्र नवनव्या आख्यायिकांची रचना करून चाणक्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेचे गुणग्रहण केले आणि ते प्राकृत आणि संस्कृत भाषांमध्ये देवनागरी लिपीत बद्ध करून ठेवले.

## (१२) अर्थशास्त्राचे जैन संस्करण

दिगंबर आचार्य सोमदेवसूरींनी लिहिलेला 'नीतिवाक्यामृत' हा ग्रंथ म्हणजे जणू काही जैन परंपरेने चाणक्याच्या व्यक्तिमत्वाला आणि शास्त्रकर्तृत्वाला वाहिलेली आदरांजलीच आहे. सोमदेवाने नीतिमूल्यांवर आधारित अशी एक समान आचारसंहिता अर्थशास्त्राच्या सहाय्याने तयार केली. आजही राजनैतिक ग्रंथांच्या अभ्यासात नीतिवाक्यामृताचे स्थान अढळ आहे. आपल्या 'यशस्तिलकचम्पू' नामक ग्रंथात पारंपरिक पद्धतीने जैन श्रावकाचार नोंदविणाऱ्या सोमदेवाने, मोठ्याच धाडसाने सर्व मानवजातीसाठी म्हणून नीतिवाक्यामृतात अनेक वैश्विक मूल्ये अधोरेखित केली आहेत.

## (१३) चाणक्याच्या जीवनातील विविध प्रसंग

हिंदू पुराणांमध्ये मगधाच्या राजवंशांचे वर्णन विस्ताराने येते. चाणक्याचा वृत्तांत अतिशय त्रोटक आहे. पुराणे आणि कथासरित्सागरात चाणक्याची मुख्यत: एकच कथा

अनुवृत्त केलेली दिसते. चाणक्याचा नंदाच्या दरबारात झालेला अपमान आणि त्याने शेंडी सोडून केलेली प्रतिज्ञा, यालाच हिंदू परंपरेत विशेष अधोरेखित केले आहे. कथासरित्सागरात नंदवंशाच्या नाशासाठी चाणक्याने केलेल्या अभिचारक्रियेलाच विशेष महत्त्व दिले आहे. चाणक्याची बुद्धिमत्ता, राजनीतीतील कौशल्य आणि पराक्रम या कशाचेच दर्शन त्यातून होत नाही. चाणक्याचा जन्म, मृत्यू आणि आयुष्यातील विविध घटनांवर हिंदू परंपरा प्रकाश टाकीत नाही. त्या मानाने मुद्राराक्षस नाटकातून विशाखदत्ताने त्याची बुद्धिमत्ता आणि राजनैतिक कौशल्य विशेषत्वाने रंगविले आहे. तरीही संपूर्ण नाटक 'अमात्यराक्षसाला अनुकूल करून घेण्याच्या' घटनेभोवतीच सतत फिरत ठेवले आहे. मुद्राराक्षसाने 'कौटिल्यः कुटिलमतिः' हा वाक्प्रचार मात्र अतिशय लोकप्रिय केला.

चाणक्याच्या माहितीबाबात जैन साहित्याची विशेषत: श्वेतांबरांची स्थिती मात्र पूर्ण वेगळी आहे. चाणक्याचे माता–पिता–जन्मस्थान–बालपणाचे प्रसंग–बालकाचे भविष्य–शिक्षण–विवाह–पाटलिपुत्रास गमन–नंदाकडून अपमान–योग्य व्यक्तीचा शोध–चंद्रगुप्ताशी भेट–चंद्रगुप्तास घेऊन भ्रमण–मौल्यवान धातूंचा शोध–पर्वतकाशी मैत्री–मगध साम्राज्याची प्राप्ती–पर्वतकाचा कपटाने केलेला वध–राज्यचिंता व राज्यव्यवस्था–राज्यकोष समृद्ध करणे–त्याची कडक आज्ञापत्रे व दंडपद्धती–चंद्रगुप्ताचा मृत्यू–राजा बिंदुसाराकडून अवहेलना–त्याचा स्वेच्छामरणाचा निर्णय–गोकुलग्रामामध्ये गमन–त्याचे ध्यानस्थ होणे–सुबंधूच्या द्वारा दहन–मरणाचा शांतपणे स्वीकार आणि तत्पूर्वी सुबंधूवर घेतलेला सूड— या सर्व घटना हेमचंद्राने परिशिष्टपर्वात संकलित केल्या आहेत. हरिषेणानेही दिगंबरांना मान्य असलेले चाणक्यचरित्र नोंदविले आहे.

हिंदू आणि जैन परंपरेने रंगविलेल्या चाणक्यातील तफावत यातून सहज दृष्टोत्पत्तीस

येते. जैनांनी जपलेल्या चाणक्याची थोरवी यानेच सिद्ध होते. याच कारणाने प्रस्तुत पुस्तकाचे शीर्षक आहे – ''चाणक्याविषयी नवीन काही...''

## (१४) शंकानिरसनासाठी जैन संदर्भांची उपयुक्तता

कौटिलीय अर्थशास्त्राच्या पहिल्या हस्तलिखित प्रतीच्या शोधानंतर प्राच्यविद्येच्या अभ्यासकांनी चंद्रगुप्त, चाणक्य आणि अर्थशास्त्र यासंबंधी वादविवादाचे अनेक मुद्दे उपस्थित केले. जैन साहित्यातील चाणक्याचे समग्र दर्शन घेतले की, त्यातील अनेक शंकांना अतिशय मुद्देसूद उत्तरे मिळतात.

- चाणक्य आणि चंद्रगुप्त मौर्य, या दोन्हीही ऐतिहासिक व्यक्तिरेखा आहेत. चाणक्याने पुढाकार घेऊन केलेल्या चंद्रगुप्त मौर्याच्या राज्याभिषेकाचे अचूक वर्ष परिशिष्टपर्वात नोंदविले आहे.
- 'चाणक्य, 'कौटिल्य' आणि 'विष्णुगुप्त', ही तीनही एकाच व्यक्तीची नावे आहेत. बहुधा 'विष्णुगुप्त' हे त्याचे जन्मनाम; 'चाणक्य' हे त्याचे ग्रामनाम आणि 'कौटिल्य' हे त्याचे विशेषण असावे.
- नालंदा विद्यापीठात प्राचीन भारतीय शिक्षणाचा जो अभ्यासक्रम होता त्यात कौटिलीय अर्थशास्त्राचा समावेश निश्चितपणे केलेला होता.
- आज उपलब्ध असलेले 'अर्थशास्त्र' हे कौटिल्याच्या नावाने उत्तरवर्ती काळात केलेले संकलन नसून, 'चाणक्य' नावाच्या खऱ्याखुऱ्या व्यक्तीने, आपल्या अनुभवांची भर घालून, पूर्वसूरींच्या विचारांचे धन त्याच्या बुद्धिमत्तेचा परिपाक म्हणून, अर्थशास्त्राच्या रूपाने, समग्र भारतीयांसाठी सादर केले आहे. कदाचित् काही थोडा भाग त्यात प्रक्षिप्त असू शकेल. परंतु मुख्य गाभा चाणक्याचाच आहे.

- चाणक्य आणि चंद्रगुप्त यांची जोडी आदर्श गुरुशिष्यांची जोडी असून, चाणक्य खरोखरच चंद्रगुप्ताचा हितैषी, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ होता.

## (१५) श्रावक चाणक्य आणि चाणक्यमुनि :

जैन साहित्यिकांची एक विशेष प्रवृत्ती त्यांच्या साहित्यातून दृष्टोत्पत्तीस येते. जे जे म्हणून उत्कृष्ट, आकर्षक आणि लक्षणीय असेल त्या त्या सर्वांचे कमीअधिक जैनीकरण केल्याशिवाय त्यांची धर्मबुद्धी जणू काही शांतच होत नाही. चोवीस तीर्थंकरांपासून सुरू झालेली शलाकापुरुषांची यादी उत्तरवर्ती जैन साहित्यिकांनी हळूहळू १०५ व त्याहूनही अधिक शलाकापुरुषांपर्यंत पोहोचवलेली दिसते. याच मानसिकतेतून जैनांनी चाणक्यालाही 'जैन' म्हटले आहे.

श्वेतांबरांनी त्याला 'श्रावक' म्हणून रंगविले आहे तर दिगंबरांनी जैनदीक्षा ग्रहण करायला लावून ५०० साधूंचे प्रमुख बनविले आहे. कौटिलीय अर्थशास्त्रातून प्रतीत होणारा चाणक्याचा भिक्षुविषयक दृष्टिकोण लक्षात घेता, त्याने स्वत: जैनदीक्षा घेणे, सर्वथा असंभवनीय वाटते. 'मिच्छामि दुक्कडम्' ही पारंपरिक जैन पदावली चाणक्याच्या तोंडून बळेच वदवून घेतली आहे. अर्थशास्त्रात सर्व अवैदिकांना तो 'परपाषण्ड' असे म्हणत असताना त्याच्या तोंडून परपाषण्डांची म्हणजे वैदिकांची निंदा करवून घेतली आहे. त्याने शांत चित्तवृत्तीने समाधिस्थ होऊन, स्वीकारलेल्या स्वेच्छामरणाला 'संलेखना' अथवा 'संथाऱ्याचे' स्वरूप दिले आहे.

इतके सारे प्रयत्न करूनही, चाणक्याचे ब्राह्मणत्व आणि वेदाभिमान लपून राहात नाहीच. अर्थशास्त्रातून तर तो उघडउघड व्यक्त होतो. तरीही चाणक्याचे व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व जैनांनी ज्या जाणिवेने आणि कसोशीने जपले त्याखातर एवढे जैनीकरण

आपण क्षम्य मानावयास हरकत नाही. त्याला 'समन्वयात्मक दृष्टिकोण' असेही संबोधता येईल.

## (१६) जैनांनी चाणक्याच्या व्यक्तिमत्वाला दिलेला पूर्ण न्याय

जैन साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या चाणक्याच्या व्यक्तिमत्वाचा समग्रतेने विचार करू लागल्यावर, आपल्या डोळ्यासमोर त्याचे विशिष्ट व्यक्तिमत्व त्याच्या अंगभूत गुणांनी झळकू लागते. त्याचा निरासक्त, कल्याणकारी दृष्टिकोण — वैयक्तिक जीवनातील निस्वार्थता — बहुधा संतान नसल्यामुळे अधिकच टोकदार झालेली अपरिग्रही वृत्ती — समाजाविषयीची उदारमतवादी आणि व्यावहारिक दृष्टी धर्माच्या जोडीनेच त्याने अर्थ आणि काम या पुरुषार्थांना दिलेले महत्त्व — कूटनीतीवर आधारलेली असूनही 'प्रजासुखे सुखं राज्ञः' या प्रजाहितैषी सूत्रावर चालणारी त्याची राजनीति — अतिश्रीमंतवर्गाचा पैसा जनसामान्यांसाठी अपहरण करण्याचे त्याचे कौशल्य — इंगित आणि आकार यांच्या सहाय्याने मनुष्यस्वभावाचे अचूक परीक्षण करणारा एक मानसशास्त्रज्ञ — ग्रामीण आणि नागरी दोहोंच्याही समान विकासासाठी झटणारा एक राष्ट्रप्रेमी आणि अखेरीस पूर्वप्राप्त पारंपरिक ज्ञान आणि स्वानुभव यातून अजोड राजनैतिक ग्रंथ लिहिणारा एक व्यासंगी पंडित — एवढ्या साऱ्या गुणविशेषांच्या पैलूंनी झळकणारा हा चाणक्य, जैनांच्या कथा — चरित्रातून अतिशय समर्थपणे साकार झाला आहे. म्हणूनच संदर्भ जुने असूनही या पुस्तकातून चाणक्याविषयीची माहिती नव्याने मिळते.

◆◆◆

## अखेरचे दोन शब्द .....

या प्रकल्पाच्या निमित्ताने, जैन साहित्यातील चाणक्य सूक्ष्मतेने अभ्यासला. सर्वांच्या मनात असलेले चाणक्याचे व्यक्तिमत्व, त्यामुळे अधिकच परिष्कृत होऊन पुढे आले. परंतु हे तथ्य केवळ चाणक्यापुरतेच मर्यादित ठेवून चालणार नाही. भारताच्या प्राचीन इतिहासातील अनेक व्यक्तिमत्वे आणि घटनांचाही, जैन साहित्यात धांडोळा घेतला तर, कितीतरी नव्या गोष्टी अधिकाधिक समृद्धतेने पुढे येतील. एकाच भारतीय मातीत रुजलेल्या ब्राह्मण आणि श्रमण परंपरांचा अभ्यास, तुटकपणे न करता, हातात हात घालून केला तर भारतीय संस्कृतीचे अधिकाधिक यथार्थ चित्र समोर येण्यास नक्कीच मदत होईल.

◆◆◆

# संदर्भ-ग्रंथ-सूची

# संदर्भ-ग्रंथ-सूची


१. अणुओगद्दाराइं : आर्यरक्षित, सं. पुण्यविजय, श्री महावीर जैन विद्यालय, मुंबई, १९६८.

२. अनुयोगद्वार-सूत्र : सं.नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०१२.

३. अभिधान-चिन्तामणि-नाममाला : हेमचंद्र, श्री जैनसाहित्यवर्धक सभा, अहमदाबाद, वि.सं.२०३२.

४. आचारांगसूत्र (भाग १,२) : अनु. अमलोकऋषिजी, सं.पं. शोभाचन्द्र भारिल्ल, श्री अमोल जैन ज्ञानालय, धुलिया (महाराष्ट्र)२००६

५. आचारांग-सूत्र (भाग १,२) : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०१०.

६. आचारांग-चूर्णि : सम्यक् ज्ञानभांडार, रावटी जोधपुर, ऋषभदेव केसरीमल पेढी, रतलाम.

७. आचारांग-टीका : शीलांक, आगमोदयसमिति मेहसाना, १९१६.

८. आराधना-पताका : पइण्णयसुत्ताइं (भाग १,२) महावीर जैन विद्यालय, १९८७.

९. आर्य : वसंत पटवर्धन, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे १९८०.

१०. आवश्यक-सूत्र : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०११.

११. आवश्यक-सूत्र-चूर्णि (पूर्वभाग, उत्तरभाग) : जिनदासगणि, श्री ऋषभदेवजी केशरीमलजी श्वेतांबर संस्था, रतलाम, १९२८, १९२९.

१२. आवश्यक-टीका : हरिभद्र, आगमोदयसमिति, मेहसाना, १९१६.

(पूर्वभाग, उत्तरभाग)

१३. ओघनिर्युक्ति (वृत्तिसहित) : द्रोणाचार्य, आगमोदयसमिति, मेहसाना, १९१९.

१४. उत्तरज्झयणाणि : जैन-विश्व-भारती, लाडनूं (राजस्थान), १९९७.

१५. उत्तराध्ययन-सूत्र (भाग १,२) : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०१०.

१६. उपदेशपद-टीका : हरिभद्र,टी.मुनिचंद्र,श्री मन्मुक्तिकमलजैन-मोहनज्ञानमन्दिरम्, वडोदरा, १९२५.

१७. उपदेशमाला-टीका : धर्मदासगणि, सं. हेमसागरसूरि, धनजीभाई देवचंद्र झवेरी, मुंबई, १९५८.

१८. उपासकदसांग-सूत्र : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०१२.

१९. कथाकोषप्रकरण : जिनेश्वरसूरि, सं. जिनविजयमुनि, सिंघी जैनशास्त्र विद्यापीठ, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९४९.

२०. कथासरित्सागर (प्रथमखंड) : अनु. केदारनाथ शर्मा, बिहार राष्ट्रभाषा परिषद्, पटना, १९६०.

२१. कहाकोसु : श्रीचंद्र, सं. हिरालाल जैन, प्राकृत ग्रंथ परिषद, अहमदाबाद, १९६९.

२२. कामंदकीय नीतिसार : खेमराज श्रीकृष्णदास, मुंबई, शके १८७४.

२३. कुवलयमाला : उद्योतनसूरि, सं. ए.एन्.उपाध्ये, सिंघी जैनशास्त्र विद्यापीठ, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९५९.

२४. कौटिलीय अर्थशास्त्र (पूर्वार्ध, उत्तरार्ध) : ब.रा.हिवरगांवकर, प्रस्तावना : दुर्गा भागवत, 'वरदा', सेनापती बापट मार्ग, पुणे, १९८८.

२५. गोम्मटसार (जीवकांड-कर्मकांड) : नेमिचंद्र, जे.एल्.जैनी, लखनौ, १९२७.

२६. जिनरत्नकोश : एच्.डी.वेलणकर, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे, १९४४.

२७. जुगाइजिणिंदचरिय : वर्धमानसूरि, सं. रूपेन्द्रकुमार पगारिया, लालभाई

दलपतभाई भारती संस्कृति विद्यामंदिर, अहमदाबाद, १९८७.

२८. ज्ञाताधर्मकथा-टीका : अभयदेवसूरि, रामचंद्र येशु शेडगे, आगमोदयसमिति, निर्णयसागर प्रेस, १९१९.

२९. तत्त्वार्थसूत्र : उमास्वाति, सुखलाल संघवी, पार्श्वनाथ विद्यापीठ, वाराणसी, २००७.

३०. त्रिलोकप्रज्ञप्ति : यतिवृषभ, ए.एन्.उपाध्ये, जैन संस्कृत संरक्षक संघ, सोलापुर, १९४३.

३१. दशवैकालिक-सूत्र : अनु. घेवरचंदजी बांठिया, अखिल भारतीय साधुमार्गी जैन संस्कृति रक्षक संघ, सैलाना, १९८३.

३२. दशवैकालिक-सूत्र : सं. नेमीचन्द बांठिया, पारसमल चण्डालिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०११.

३३. दशवैकालिक-चूर्णि : जिनदासगणि, श्री ऋषभदेवजी केशरीमलजी श्वेताम्बरसंस्था, इन्दौर, १९३३.

३४. दशवैकालिक (निर्युक्ति, चूर्णिसहित) : शय्यंभव, प्राकृत ग्रंथ परिषद, अहमदाबाद, १९७३.

३५. धर्मोपदेशमाला-विवरण : जयसिंहसूरि, सं. जिनविजय, सिंघी जैन ग्रंथमाला, मुंबई, १९४९.

३६. धूर्ताख्यान : हरिभद्र, सं. जिनविजय, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९४४.

३७. नंदीसूत्र : पारसकुमार, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०११.

३८. नंदीसूत्र-टीका : मलयगिरि, आगमोदयसमिति, मुंबई, १९२४.

३९. निर्युक्ति-संग्रह : भद्रबाहु, सं. विजयजिनेंद्र, हर्षपुष्पामृत जैन ग्रंथमाला, शांतिपुरी (सौराष्ट्र), १९८९.

४०. निशीथसूत्र : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २००९.

४१. निशीथसूत्र-चूर्णि (भाग १,२,३,४) : जिनदासगणिमहत्तर, सं. अमरमुनि, मुनि कन्हैयालाल ‘कमल’, भारतीय विद्या प्रकाशन, दिल्ली,

१९८२.

४२. नीतिवाक्यामृत : सोमदेवसूरि, सं. पन्नालाल सोनी, माणिकचन्द्र दिगम्बर जैन ग्रंथमाला, बम्बई, १९२३.

४३. परिशिष्टपर्व : हेमचंद्र, श्री जैनधर्म प्रसारक सभा, भावनगर, १९११.

४४. पिण्डनिर्युक्ति (तथा पिण्डनिर्युक्तिभाष्य) : भद्रबाहु, देवचंद लालभाई जैन पुस्तकोद्धार फंड, सूरत, १९५८.

४५. पुण्याश्रव-कथाकोष : रामचंद्रमुमुक्षु, हिंदीभाषाटीका, पं. दौलतरामजी काशलीवाल, हिंदी ग्रंथरत्न भांडार, गिरगाव, मुंबई, ४.

४६. प्रश्नव्याकरण-सूत्र : अनु. रतनलाल डोशी, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०११.

४७. बृहत्कथाकोश : हरिषेण, सं. डॉ.ए.एन्.उपाध्ये, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९४३.

४८. बृहत्कथामञ्जरी : क्षेमेन्द्र, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९३१.

४९. भगवती आराधना : शिवकोटि, देवेंद्रकीर्ति, दिगंबर जैनग्रंथमाला, कारंजा, १९३५.

५०. भद्रबाहु-चाणक्य-चन्द्रगुप्त-कथानक : रइधू, सं. राजाराम जैन, श्री गणेश वर्णी, दिगंबर जैन संस्थान, वाराणसी, १९८२.

५१. भारतीय संस्कृति में जैनधर्म का योगदान : डॉ. हिरालाल जैन, मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद, भोपाल, १९६२

५२. *Magadhan Literature : MM. Haraprasad Sastry, Sri Satguru Publication, Delhi, 1986.*

५३. मत्स्यपुराण : डॉ. श्रद्धा शुक्ला, नाग पब्लिशर्स, २००४.

५४. मुद्राराक्षस : विशाखदत्त, अनु. गोविन्द केशव भट, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई, १९७४.

५५. मूलाचार : वट्टकेर, सं. कैलाशचन्द्र शास्त्री, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, १९८४.

५६. वायुपुराण : सं. श्रीराम शर्मा, संस्कृति-संस्थान, बरेली (उ.प्र.), १९९७.

५७. विविधतीर्थकल्प : जिनप्रभ, सिंघी जैन ग्रन्थमाला, शांतिनिकेतन (बंगाल), १९३४.

५८. विशेषावश्यकभाष्य : मलधारि हेमचंद्र, शहा हरखचंद भूरभाई, बनारस, वी.सं. २४४१.

५९. विष्णुपुराण : सं. श्रीराम शर्मा, संस्कृति-संस्थान, बरेली (उ.प्र.), १९९७.

६०. व्यवहारटीका (प्रथम भाग) : मलयगिरि, वृत्तिसहित, त्रिकमलाल उगरचन्द्र, तलियानी पोल, अहमदाबाद, १९२८.

६१. व्यवहार-भाष्य : वाचनाप्रमुख-तुलसी, सं. महाप्रज्ञ, जैन विश्वभारती संस्थान, लाडनौ, १९९७.

६२. संक्षिप्त-तरंगवती-(तरंगलोला) : सं. भायाणी, लालभाई दलपतभाई भारतीय कथा संस्कृति विद्यामंदिर, अहमदाबाद, १९७९.

६३. समवायांग-सूत्र : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २००९.

६४. समवायांग-टीका : अभयदेवसूरि, आगमोदयसमिति, मेहसाना, १९१८.

६५. सुखबोधा-टीका : नेमिचंद्र, शेठ पुष्पचंद्र खेमचंद्र, अहमदाबाद, निर्णयसागर मुद्रणालय, १९३७.

६६. सूत्रकृतांग-सूत्र : अनु. अमोलकऋषि, श्री अमोल जैन ज्ञानालय, धुलिया, २००२.

६७. सूत्रकृतांग-सूत्र (प्रथम, द्वितीय श्रुतस्कन्ध) : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २००९, २०१२.

६८. सूत्रकृतांग-निर्युक्ति-चूर्णिसहित : भद्रबाहू, पुण्यविजय, प्राकृत ग्रंथ परिषद, अहमदाबाद, १९७५.

६९. स्कन्दमहापुराण : गोपाल प्रिंटिंग वर्क्स, कलकत्ता, १९६२.

(पञ्चमो भागः) (उत्तरार्धम्)

७०. स्थानांग-सूत्र : सं. नेमीचन्द बांठिया, श्री अखिल भारतीय सुधर्म जैन संस्कृति रक्षक संघ, जोधपुर, ब्यावर, २०१०, २०११.

७१. स्थानांग-टीका : अभयदेव, वेणिचंद्र सूरचंद्र, आगमोदयसमिति, निर्णयसागर मुद्रणालय, १९१८.

◆◆◆



डॉ. नलिनी जोशी या प्राकृत आणि जैनविद्येच्या क्षेत्रात गेली २८ वर्षे कार्यरत असून, त्या –

* भांडारकर–प्राच्य–विद्या संस्थेत सुरू असलेल्या प्राकृत–इंग्रजी महाशब्दकोषात मुख्य–संपादकत्वाचा कार्यभार सांभाळत आहेत.
* प्राकृत–जैनविद्येचे अध्यापन, संशोधन करणाऱ्या सन्मति–तीर्थ संस्थेच्या मानद निदेशक आहेत.
* सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात त्यांनी २००७ ते २०१४ पर्यंत जैन अध्यासनात प्राध्यापिका म्हणून काम केले आणि अध्यासनातर्फे १० दर्जेदार प्रकाशने काढली.
* पूर्ण भारतातील अनेक विद्यापीठात आणि जैन संस्थांमध्ये सुमारे २० शोधनिबंध सादर केले.
* वृत्तपत्रीय स्तंभलेखन, लोकप्रिय व्याख्याने आणि आकाशवाणीवर प्रदीर्घ कार्यक्रममालिका ही त्यांची अजून काही वैशिष्ट्ये !
* वेळोवेळी त्यांना आत्तापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.
* विद्यार्थ्यांना अनेक अंगांनी विचारप्रवृत्त करून सर्वधर्मसहिष्णु बनविणे, हे त्यांच्या रसाळ अध्यापनाचे उद्दिष्ट राहिलेले आहे.